संस्कृतग्रंथार्थसंग्रह.

# उदयनचरित,

भाग १ ते ४

किंमत १२ आणे

संस्कृतग्रंथार्थसंग्रह.
पुस्तक २०.

# उदयनचरित,

## भाग पहिला.

हें पुस्तक,
महाकवि श्रीसोमदेवभट्टविरचित कथासरित्सागरनामक
काव्याच्या आधारानें महाराष्ट्रभाषेंत लिहिलें आहे,
तें

**जावजी दादाजी**

यांनीं आपल्या
निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई,—सन १८९१.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व
हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत २ आणे.

# विक्रीचीं पुस्तकें.

| मराठी. | किंम रु. |
|---|---|
| ययातिराजाची कथा. ... ... ... | ०-१ |
| कादंबरीकथासार. ... ... ... ... | ०-३ |
| वासवदत्ताकथासार ... ... ... ... | ०-१ |
| मुद्राराक्षसकथासार.... ... ... ... | ०-३ |
| वेणीबंधन ... ... ... ... ... | ०-६ |
| नागानंदसार... ... ... ... ... | ०-२॥ |
| नलदमयंतीचरित्र. ... ... ... ... | ०-४ |
| सावित्रीचरित्र ... ... ... ... | ०-॥ |
| शकुंतलाचरित्र. ... ... ... ... | ०-१ |
| द्रौपदीहरण.... ... ... ... ... | ०-१ |
| धर्मराजद्रौपदीसंवाद... ... ... ... | ०-१॥ |
| मनुवचन. ... ... ... ... ... | ०-१ |
| सुलभशाकुंतल पूर्वभाग ... ... ... | ०-२॥ |
| सुलभशाकुंतल उत्तरभाग ... ... ... | ०-३ |
| सुगम प्रियदर्शिका. ... ... ... ... | ०-२ |
| सुलभविक्रमोर्वशी. ... ... ... ... | ०-३ |
| विदुरवचन. ... ... ... ... | ०-२ |

| | | |
|---|---|---|
| घोषयात्रा ... ... ... ... ... | ०—२ | ॥ |
| सीताहरण. ... ... ... ... ... | ०—३ | ॥ |
| कीचकवध. ... ... ... ... | ०—३ | ॥ |
| बृहन्नडा. ... ... ... ... ... | ०—४ | ॥ |
| सैरंध्री. ... ... ... ... ... | ०—३ | ॥ |
| चंद्रसेना किंवा अहिमहिनिधन. ... ... | ०—२ | ॥ |
| मदालसाचरित्र. ... ... ... ... | ०—२ | ॥ |
| मनुकथामृत. ... ... ... ... | ०—३ | ॥ |
| सुशर्माचरित्र. ... ... ... ... | ०—२ | ॥ |
| भानुदासचरित्र. ... ... ... ... | ०—३ | ॥ |
| मद्यपाननिषेध. ... ... ... ... | ०—१॥ | ॥ |
| प्रपंच आणि परमार्थ. ... ... ... | ०—१ | ॥ |
| विद्यार्थी. ... ... ... ... ... | ०—१॥ | ॥ |
| सहा सुलभ संवाद.... ... ... ... | ०—१ | ॥ |
| बाळमित्र. ... ... ... ... ... | ०—१ | ॥ |
| आर्यवृत्त. ... ... ... ... ... | ०—१ | ॥ |
| टेक्निकल एज्युकेशन किंवा धंदेशिक्षण. ... | ०—२ | ॥ |
| नकला-वैद्यकीय चुटके. ... ... ... | ०—३ | ॥ |

हीं पुस्तकें, रोख पैसा आल्यास मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर **निर्णयसागर** छापखान्यांत विकत मिळतील.

श्री.

# संस्कृतग्रन्थार्थसंग्रह.

या नांवाचें पुस्तक सवडीप्रमाणें अंकरूपानें काढावयाचें आहे. यांत श्रुति, स्मृति, महाभारत, रामायण, पुराणें, वगैरे जुन्या संस्कृतग्रंथांतील मनोरंजक, धर्मनीतिपर, व इतिहासपर अशा गोष्टींचा संग्रह केला जाईल. या संग्रहाचे सवडीप्रमाणें वेळोवेळीं वेगळाले अंक काढून थोड्या किमतींस वाचकांस मिळावे असा यत्न केला आहे. जेवढे अंक निघतील तेवढे सगळे आह्मांकडे पाठवावे असें आह्मांस कोणी कळविल्यास त्याप्रमाणें अंक निघतांच पाठविले जातील. या कृत्यास आश्रय मिळून चांगलें चालल्यास कालांतरानें जुन्या संस्कृत ग्रंथांतील गोष्टींचीं मराठींत सुंदर रीतीनें लिहिलेलीं पुष्कळ पुस्तकें तयार होतील.

एक अंक घेतला असतां दुसरा घेतलाच पाहिजे असें कोणावर ओझें पडूं नये ह्मणून कोणत्याही अंकांतील कथा अर्धवट ठेविली जाणार नाहीं.

त्यांना याच चरित्रांतील कथानकांचा मुख्यत्वें आधार आहे. त्यांमध्यें या राजाचे गुण व स्वभाव चांगले प्रतिबिंबित झाले आहेत.

हें चरित्र बरेंच विस्तृत आहे; सबब कथासंदर्भानुसार त्याचे अनेक भाग कल्पून प्रत्येक अंकांत एकेक भाग द्यावा अशी योजना केली आहे. प्रस्तुत अंकांत या चरित्राचा पहिला भाग आला आहे. यांत चरित्रनायक **वत्सराज** व त्याची भावी राणी **वासवदत्ता** यांची कुलकथा, जन्मवृत्तांत आणि **वत्सराजाचें** राज्यपदारोहण एथपर्यंत कथाभाग आला आहे.

मूळकाव्यास शब्दशः अनुसरून हें चरित्र लिहिण्या प्रयत्न केला आहे; तथापि कथेचा संबंध जुळण्याकरितां व कविहृद्गतार्थ स्पष्ट करण्याकरितां मधून मधून कांहीं पदरचीं वाक्यें यांत घातलीं आहेत; पण तीं फाजिलपणाचीं किंवा अप्रासंगिक नसून अगदीं बेताबाताचीं आहेत; एकदरीनें या चरित्राच्या वाचनापासून वाचकांचें चांगलें मनोरंजन होईल अशी उमेद आहे. इतकें सांगून ही लहानशी प्रस्तावना पुरी करितों.

# उदयनचरित.

## भाग पहिला.

### कुलकथा, जन्मवृत्तांत आणि राज्याभिषेक.

प्राचीनकालीं या **भरत**खंडाच्या उत्तरदिशेस **वत्स** या नामेंकरून एक प्रसिद्ध देश होता. भूतलावर ज्याला केवळ स्वर्गाचीच उपमा दिली असतां शोभेल अशा या रमणीय देशामध्यें **पांडवांच्या** वंशांत उत्पन्न झालेला **शतानीक** या नांवाचा एक महापराक्रमी राजा राज्य करीत असे. याचे राजधानीचें ठिकाण **कौशांबी**[1] या नां-

---

१ **अलाहाबादे**च्या नैर्ऋत्येस सुमारें १५ कोशांवर **यमुने**च्या काठीं **कोसाम** या नांवाचें हल्लीं जें एक खेडेगांव आहे तीच पूर्वींची **कौशांबी**नगरी असावी; असें कित्येक शोधकांचें ह्मणणें आहे.

वाचें एक नगर होतें. वैभवाच्या अत्युच्च शिखरास पोंचल्यामुळें हें नगर **लक्ष्मी**चें केवळ विलासस्थान अथवा भूदेवीचें केवळ नाकच होतें असें ह्मटलें तरी चालेल. **कुरुवंशा**मध्यें उत्पन्न झालेल्या **पांडवां**पैकीं मध्यमपांडव जो **अर्जुन** त्याला **सुभद्रे**पासून **अभिन्मयु** या नांवाचा पुत्र झाला. **अभिमन्यू**चा पुत्र परीक्षित्, त्याचा पुत्र **जनमेजय** आणि **जनमेजया**चा **शतानीक**, याप्रमाणें परंपरा चालून **अर्जुना**पासून **शतानीक** हा पांचवा पुरुष झाला. 'बहुरत्ना वसुंधरा' या ह्मणीप्रमाणें या राजाच्या वसुंधरारूप पत्नीच्या उदरीं जरी अनेक रत्नें निर्माण झालेलीं होतीं, तरी त्याची पट्टाभिषिक्त स्त्री जी **विष्णुमती** तिच्या पोटीं एकही पुत्ररत्न नसल्यामुळें त्याचें चित्त सदोदित फार उदास असे.

एके दिवशीं राजा **शतानीक** मृगयेच्या नादानें वनामध्यें फिरत असतां सुदैवानें **शांडिल्य**-

ऋषि त्याला भेटले. त्यांणीं त्याला त्याच्या उदासवृत्तीचें कारण विचारिल्यावरून राजानें आपली सर्व हकीकत त्यांना कळविली. ती ऐकतांच त्या तपोधन ऋषीच्या अंतःकरणांत दया उत्पन्न होऊन तो लागलाच राजाला बरोबर घेऊन **कौशांबीस** आला आणि त्याणें पुत्रप्राप्तीसाठीं राजाकडून पुत्रकामेष्टि या नांवाचा यज्ञ करविला. हवन यथासांग झाल्यावर अवशिष्ट राहिलेला पुरोडाश **अग्निनारायणा**चा प्रसाद ह्मणून अभिमंत्रित करून त्याणें राणी **विष्णुमती**ला भक्षण करावयास दिला व या प्रसादभक्षणाचें फल तुला पुत्रसंतान होईल असें सांगून तो ऋषि तपोवनास निघून गेला.

इकडे तो प्रासादिक चरु भक्षण करतांच राणी **विष्णुमती**च्या उदरांत गर्भधारणा झाली. तो गर्भ शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस वाढत जाऊन पूर्णदशेस पोंचतांच ती पुत्ररत्न प्र-

सवली. तेणेंकरून राजाला जो आनंद झाला त्याचें वर्णन कोठवर करावें! त्याणें सर्व नगर शृंगारून जिकडे तिकडे आनंदोत्सव सुरू केले. ब्राह्मणांस व गोरगरीब याचकांस विपुल द्रव्य देऊन व भोजनास मिष्टान्न घालून संतुष्ट केलें. जन्मकालच्या ग्रहांवरून तो राजपुत्र आपणापेक्षांही जास्त पराक्रमी आणि गुणवान् निपजेल असें ज्योतिष्यांनीं सांगितल्यावरून राजानें त्याचें **सहस्रानीक** असें नांव ठेविलें.

'गृहरत्नानि बालकाः' अशी एक कव्युक्ति आहे ती खोटी नव्हे. आजपर्यंत पुत्ररत्न घरांत खेळत नसल्यामुळें राजगृह अगदीं उदासवाणें व शून्यवत् भासत होतें. तेंच **सहस्रानीक** जन्मल्यापासून भरल्याप्रमाणें दिसूं लागलें. त्या लेंकराच्या बाललीला पाहून राजा व राणी यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. हळू हळू **सहस्रानीक** प्रौढ होत चालला तेव्हां राजानें त्या-

च्याकडून क्षात्रधर्मास आवश्यक अशा धनुर्विद्यादि सर्व विद्या आणि कला यांचा अभ्यास करविला. सर्व विद्यांत पुत्राची निपुणता व त्याच्या अंगचे शौर्य धारिष्टादि गुण पाहून राजाला धन्यता वाटली, व विनयानें गुण जसा शोभतो तसा त्या पुत्राच्या प्राप्तीनें राजा शोभूं लागला.

याच वेळेस स्वर्गामध्यें देव आणि दैत्य यांच्यामध्यें मोठा कलह माजून रणसंग्राम होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. दैत्य मोठे पराक्रमी होते. त्यांच्याबरोबर देवांच्यानें सामना करवणार नाहीं हें जाणून देवांचा राजा इंद्र याणें साह्य मागण्याकरितां **शतानीका**कडे **मातली** या नांवाच्या आपल्या सारथ्यास पाठविलें. त्यानें **कौशांबीस** येऊन इंद्राचा निरोप कळवितांच **शतानीकानें** युवराज **सहस्रानीक** याला राज्याभिषेक केला, आणि मुख्यप्रधान **युगंधर** व सेनापति **सुप्रतीक** यांच्या सह्यानें राज्यकारभार पाहात

जा असें त्याला सांगून आपण स्वतः दैत्यांचा पराभव करण्याकरितां **मातलीबरोबर इंद्रलोकास** निघून गेला. **इंद्रानें** मोठ्या सत्कारानें त्याचें आदरातिथ्य केलें. नंतर दैत्यांशीं मोठ्या निकरानें युद्ध करून **यमदंष्ट्रादि** अनेक बलाढ्य दैत्यांचा त्याणें फडशा उडविला; पण दुर्दैवानें त्याचा आयुर्दाय संपला असल्यामुळें त्याच युद्धांत तो मरण पावला. त्याचें प्रेत **इंद्रानें कौशांबीस** पाठविलें, त्या वेळीं त्या नगरांत एकच हाहाकार होऊन गेला. युवराज **सहस्रानीक** व राणी **विष्णुमती** यांच्या शोकास तर सीमाच राहिली नाहीं. साध्वी स्त्रियांच्या धर्माप्रमाणें राणीनें पतीच्या चितेंत आपल्या देहाची आहुति देऊन सहगमन केलें. याप्रमाणें **शतानीक** परलोकवासी झाल्यावर राज्यलक्ष्मी अर्थातच **सहस्रानीकाच्या** गळ्यांत पडली. तो वयानें लहान होता तरी मोठा पराक्रमी व शूर असल्या-

मुळें राज्यपदारूढ होतांच त्याच्या बापाच्या वेळीं शिरजोर झालेले सारे शत्रु त्याला शरण आले.

याप्रमाणें जिकडे तिकडे स्थिरस्थावर होऊन **सहस्रानीक** राज्यकारभार पाहूं लागतो आहे इतक्यांत स्वर्गलोकीं दैत्यांचा पूर्ण पराभव झाल्यामुळें **अमरावती**मध्यें **इंद्रानें** मोठा आनंदोत्सव सुरू केला व ज्या वीरपुरुषाच्या पराक्रमानें तो सुदिन प्राप्त झाला त्या **शतानीका**च्या मरणाविषयीं दुःख प्रदर्शित करून सुहृत्पुत्र **सहस्रानीक** याला त्याणें त्या उत्सवास येण्याविषयीं मोठ्या आग्रहानें **मातली**ला पाठवून निमंत्रण पाठविलें. **सहस्रानीकानें** तें मान्य करून लागलेंच स्वर्गलोकीं गमन केलें. तेथें इंद्राच्या आदरातिथ्यानें आनंदांत काल घालवीत असतां एके दिवशीं तो **नंदन**वनांत मौजेनें फिरावयास गेला. तेथें त्याणें अप्सरांसहवर्तमान देव नानाप्रकारच्या क्रीडा करीत आहेत असें पाहिलें;

तेव्हां आपणासही असेच विलास करण्यास मि-
ळावें असें त्याच्या मनांत आलें; पण योग्य स-
हचारिणी नसल्यामुळें त्याला फार वाईट वाटलें.
हा त्याच्या मनांतील अभिप्राय देवेंद्राला कळ-
तांच तो त्याला ह्मणाला, "राजा तुझ्या मनांत
जी इच्छा उद्भवली आहे ती लवकरच पूर्ण हो-
ईल, कांहीं काळजी करूं नको. तुझें मन रं-
जविणारी अशी योग्य भार्या भूतलावर **विधा-
त्यानें** पूर्वींच निर्माण करून ठेविली आहे, व ती
तुझी वाटच पाहात बसली आहे. तिचा वृ-
त्तांत तुला सांगतों तो श्रवण कर. कांहीं व-
र्षांपूर्वीं **ब्रह्मदेवास** भेटण्याकरितां मी त्याच्या
सभेंत गेलों होतों. माझ्या मागोमाग **विधूम**
या नांवाचा माझ्या अष्टवसूंपैकीं एक असामी
तेथें आला. इतक्यांत **ब्रह्मदेवाच्या** दर्शना-
साठीं **अलंबुषा** नांवाची एक अप्सराही तेथें
आली. तिच्या अंगावरील वस्त्र वाऱ्यानें ए-

कीकडे सरकलें असल्यामुळें तिचे अवयव स्पष्ट दिसत होते. त्यांची मोहकता पाहून विधू-माच्या अंगांत कामदेवानें संचार केला. ताही स्वरूपानें फार देखणा होता. त्याचें सौंदर्य पाहून ती अप्सराही त्याच्याकडे एकसारखी टक लावून पाहूं लागली. हें त्या उभयतांचें निर्लज्जपणाचें वर्तन पाहून ब्रह्मदेवास मोठें आश्चर्य वाटलें, आणि तो माझ्या तोंडाकडे पाहूं लागला. मी त्याच्या मनांतील आशय लागलाच समजलों आणि रागानें त्या निर्लज्ज जोडप्यास शाप देऊन ह्मणालों कीं, या तुमच्या निर्लज्जपणामुळें तुह्मी स्वर्गापासून भ्रष्ट व्हाल व मृत्युलोकीं जन्म पावून उभयतां नवराबायकोच्या नात्यानें वास कराल. त्याप्रमाणें राजा तू मूळचा वसु असून चंद्रवंशाला भूषणभूत असा शतानीकाचा पुत्र झाला आहेस, व ती अलंबुषा अप्सरा अयोध्येचा राजा कृतवर्मा याची कन्या

होऊन **मृगावती** या नामेंकरून अवतरली आहे तीच कन्या तुझी भार्या होईल". ही चमत्कारिक जन्मकथा श्रवण करून **सहस्रानीका**च्या अंतःकरणांत कामाग्नि धडकूं लागला, व त्या **मृगावती**चा समागम केव्हां होईल असें त्याला झालें. उत्सव संपल्यावर **इंद्रानें** त्याचा बहुमान करून व आपला सारथी आणि रथ बरोबर देऊन त्याला **कौशांवीस** जाण्याविषयीं निरोप दिला, त्याप्रमाणें तो जाण्याच्या तयारींत आहे इतक्यांत **तिलोत्तमा** या नांवाची दुसरी एक अप्सरा घाईघाईनें तेथें आली आणि मोठ्या प्रेमानें त्याला ह्मणाली, "राजा, अंमळ थांव, मला तुला कांहीं सांगावयाचें आहे तें ऐकून घे." राजाचें सर्व लक्ष्य **मृगावती**कडे लागलें होतें, यामुळें तिचें तें भाषण न ऐकतां तो तसाच जाऊं लागला. राजानें हा आपला अपमान केला ह्मणून मनांत खजील होऊन **तिलोत्तमेनें** त्याला

जातां जातां असा शाप दिला कीं, जिच्या नादानें तू इतका बेहोष होऊन माझा अनादर करीत आहेस तिच्याशीं चौदा वर्षेपर्यंत तुझा वियोग होईल. राजाचें मन ठिकाणीं नव्हतें, यामुळें त्याणें हा शाप देखील ऐकिला नाहीं. **मातली**च्या मात्र कानांवर तो आला होता.

**कौशांबीस** येऊन दाखल झाल्यावर **सहस्रानीकानें युगंधरा**दि प्रधानमंडळीस झालेलें सर्व वर्तमान कळविलें. त्याचें सर्व लक्ष **अयोध्ये**कडे लागलें होतें, यामुळें राज्यकारभाराकडे त्याचें मन लागेना. त्याणें **युगंधरास** बोलावून आणवून मोठ्या उत्सुकतेनें सांगितलें कीं, व्यर्थ कालक्षेप न करितां **कृतवर्म्या**कडे जासूद रवानां करून **मृगावती**विषयीं मागणी घालावी. त्या चतुर प्रधानानें राजाच्या मनाची स्थिति जाणून तावडतोब एक हुशार कामगार **अयोध्येस** रवाना केला. **कृतवर्म्या**ला त्या कामगाराच्या मु-

त्यानें राजाचा निरोप समजतांच अत्यंत हर्ष झाला; कारण **सहस्रानीका**ची कीर्ति व योग्यता त्याला ऐकून माहीत होती व **मृगावती**ला तो अनुरूप भर्ता होईल अशी त्याची खात्री होती. नंतर त्याणें ती गोष्ट राणी **कलावती** इला कळविली. तिला पूर्व रात्रीं कोणी एका ब्राह्मणानें स्वप्नांत येऊन असें सांगितलें होतें कीं, तू ही तुझी कन्या **कौशांबी**चा राजा **सहस्रानीक** याला अर्पण कर. आपण कांहीं प्रयत्न न करितां त्याच राजाकडून कन्येविषयीं मागणी आली असें पाहून तिणेंही मोठ्या आनंदानें आपलें अनुमोदन दिलें. नंतर **कृतवर्म्यानें मृगावती**ला आणून त्या कामगारास दाखविली व राजकन्यांच्या अंगीं अवश्य असणाऱ्या नृत्यगायनादि कलांमध्यें तिचें नैपुण्य किती आहे हेंही त्याच्या दृष्टीस पाडिलें. तिच्या अंगचे गुण व अप्रतिम लावण्य पाहून तो कामगार अगदीं थक्क

झाला. **कृतवर्म्यानें मृगावती सहस्रानीकास** देण्याचें कबूल केलें व विवाहाकरितां निघून येण्याविषयीं त्या कामगाराबरोबर निरोप पाठविला. कामगारानें तो निरोप **सहस्रानीकास** कळवितांच त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्याणें प्रधानास सांगून विवाहाची सर्व तयारी मोठ्या जलदीनें करविली आणि **अयोध्येस** जाऊन तेथें मोठ्या समारंभानें **मृगावतीचें** पाणिग्रहण केलें. चंद्र आणि ज्योत्स्ना अथवा शास्त्र आणि बुद्धि यांचा समागम जसा आल्हादजनक होतो तसें तें जोडपें परस्परांस अनुरूप असल्यामुळें आपापल्या गुणांनीं एकमेकांस अत्यंत सुख देणारें झालें. नंतर **कृतवर्म्याचा** निरोप घेऊन राजा **सहस्रानीक मृगावती**सहवर्तमान आपल्या राजधानीस निघून आला.

याप्रमाणें राजा **सहस्रानीक** आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान नानाप्रकारच्या सुखोपभोगांत का-

लक्रमणा करीत असतां थोड्या दिवसांनीं **मृगा-वती** गरोदर राहिली. तिचें शरीर कृश होऊन मुखावर पांडुरता दिसूं लागली. तिला जे जे डोहळे होत ते ते सर्व राजा मोठ्या हौसेनें पूर्ण करूं लागला. एके दिवशीं तिला असें वाटलें कीं, रक्तानें पूर्ण भरलेल्या पुष्करणींत आपण स्नान करावें. तिणें ती इच्छा राजाला कळ-विली. त्याला हा विलक्षण आणि अशुभसूचक डोहळा ऐकून कांहींसें वाईट वाटलें; पण बि-चारा करतो काय! बायको आवडती पडली, तेव्हां कशी तरी तिची समजूत करावी, ह्मणून त्याणें एक मोठा हौद तयार करवून तो अळि-त्याच्या रंगानें तोंडोतोंड भरून काढिला. त्या हौदांत राणी **मृगावती** डुंबत असतां एक मोठी अनिष्टकारक गोष्ट घडून आली. ती अशी कीं, अकस्मात् वरून एक गरुडपक्षी घिरव्या घालीत त्या ठिकाणीं आला. त्याणें **मृगावतीला**

पाहून हा एक मोठा मांसाचा गोळा पाण्यावर तरंगत आहे अशा शंकेनें तिच्यावर झडप घातली आणि अचानक तिला आपल्या चोंचींत धरून आकाशांत उड्डाण केलें! जवळ सख्या होत्या त्यांणीं बावऱ्यां घावऱ्यां जाऊन राजाला तें वर्तमान कळवितांच तो मोठ्या लगबगीनें पक्षी कोणीकडे गेला तें पाहूं लागला; पण तो कोठेंही दिसेना. तेव्हां निराशेनें त्याची कंबर अगदीं खचून गेली, व त्या दुःखानें विव्हल होत्साता बेशुद्ध होऊन तो धाडकन् खालीं पडला! इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, **तिलोत्तमेनें** राजाला दिलेला शाप ज्याणें ऐकिला होता तो इंद्राचा सारथी **मातली** अकस्मात् आकाशमार्गानें तेथें येऊन उतरला. त्याणें राजाला सावध करून, तुला पूर्वीं शाप झाला होता, त्यामुळें ही गोष्ट घडून आली असें सांगितलें. तें ऐकतांच राजाला अत्यंत दुःख झालें. तो विलाप

करून ह्मणूं लागला, "प्रिये तू मला सोडून कोठें गेलीस! तुझा वियोग एक क्षणभर देखील मला सहन होत नाहीं, तो आतां चौदा वर्षें-पर्यंत म्यां कसा बरें सहन करावा! त्या चांडाळ पापिणी **तिलोत्तमेनें** ह्मटल्याप्रमाणें शेवटीं घडून यावें हें केवढें माझें दुर्भाग्य!" याप्रमाणें तो शोक करीत आहे, इतक्यांत **युगंधरादि** त्याचे प्रधान त्याच्या सभोंवती जमा झाले. त्यांणीं त्याला बोधाच्या चार गोष्टी सांगून त्याचें सांत्वन केलें; तेणेंकरून तो कांहींसा शांत झाला आणि चौदा वर्षांनीं तरी आपणास आपली प्रिया पुनः खचीत भेटेल अशी आशा बाळगून आयुष्याचे दिवस कसे तरी घालवूं लागला.

इकडे तो गरुडपक्षी **मृगावतीला** चोंचींत धरून जो उडाला तो हां हां ह्मणतां **उदय**पर्वतावर जाऊन उतरला. तेथें तिला खालीं ठेवून तिजकडे भक्ष्यबुद्धीनें तो पाहूं लागला तों हा

कांहीं भक्षण करण्याचा पदार्थ नसून कोणी सजीव प्राणी आहे असें त्याला समजलें, तेव्हां तिला तशीच तेथें टाकून तो आकाशांत उडून गेला. मनुष्याचा ज्या ठिकाणीं संचार नाहीं अशा पर्वतावरील दुर्गमस्थळीं ती विचारी अबला एकटी येऊन पडल्यामुळें ती अत्यंत भयभीत व शोकाकुल झाली. हौदामध्यें स्नान करतांना ती जें पातळ नेसली होती त्यावांचून थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठीं तिच्याजवळ दुसरें वस्त्रदेखील नव्हतें, व तें पातळही भिजून अगदीं चिंब झालें होतें. अशा स्थितींत ती राजमहिषी एकाद्या अनाथ स्त्रीप्रमाणें दीनस्वर काढून रडूं लागली. इतक्यांत दुर्दैवानें तिच्यावर दुसरें एक मोठें संकट येऊन गुदरलें. ती बसली होती तेथें जवळच एक वारूळ होतें, त्यांतून भला मोठा एक अजगर फणा वर करून फों फों करीत तिला खाण्यासाठीं तिच्या अंगावर चवताळून आला;

पण तिच्या आयुष्याची दोरी बळकट होती व पुढें तिला सुखाचे दिवस पाहावयाचे होते, ह्मणून कर्मधर्मसंयोगानें अकस्मात् तेथें एक दिव्य पुरुष प्रगट झाला, आणि त्याणें त्या अजगरास मारून तिला त्या संकटांतून मुक्त केलें आणि लागलाच तो गुप्त झाला! **मृगावती** आपल्या जिवाला अगदीं कंटाळली होती. अशा दुःखमय स्थितींत राहण्यापेक्षां मरण येईल तर बरें असें तिला वाटूं लागलें, व कोणत्या रीतीनें आपण आपल्या आत्म्याची या कष्टमय स्थितींतून सुटका करावी याविषयीं विचार करीत ती हळू हळू मार्ग क्रमूं लागली. इतक्यांत एक मोठा मदोन्मत्त झालेला जंगली हत्ती समोरून धांवत धांवत तिजकडे येत आहे असें तिनें पाहिलें, तेव्हां, 'बरेंच झालें, आतां हा आपणास तुडवून मारून टाकील' असें समजून ती त्याच्या मार्गांत जाऊन आडवी पडली; पण भवितव्यता कांहीं नि-

राळीच होती, ती तिला कशी मरूं देईल? आश्चर्य हें कीं, त्या पिसाळलेल्या गजाच्या तडाक्यांत ती सांपडली असतांही त्याणें तिला स्पर्शदेखील केला नाहीं. जणूं काय परमेश्वरानेंच त्याला तिला मारूं नको ह्मणून सुचविलें असावें! असो. अशा रीतीनेंही मृत्यु आपणास पराङ्मुख झाला, ह्मणून निराश होत्साती ती तशीच पुढें वाट चालूं लागली. जातां जातां एके ठिकाणीं एका उंच कड्यावरून पाण्याचा एक धबधबा मोठ्या जोरानें खालीं पडत होता तो तिणें पाहिला. त्यांत उडी टाकून आत्मघात करावा अशा हेतूनें ती त्याच्या जवळ जाऊन उभी राहिली. इतक्यांत उदरांतील गर्भाचें तिला स्मरण होऊन ती ह्मणाली, "हरहर! माझ्याबरोबर या बिचाऱ्या गर्भाचाही आतां नाश होणार ना! होवो, देवाची इच्छा!" असें ह्मणून व आपल्या प्रिय भ्रताराचें स्मरण करून

ती मोठ्यानें रडूं लागली, आणि प्रवाहांत उडी टाकणार इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, कोणीएक ऋषिकुमार कंदमूलफळें नेण्याकरितां त्या मार्गानें चालला होता त्याणें तिचें रडणें ऐकून तो धांवत धांवत तिच्या जवळ आला, आणि तिला मागें ओढून त्याणें तू कोण, एथें कशी आलीस व रडतेस कां, वगैरे तिची हकीकत विचारिली. ऐथेंही आपल्या दुःखाचा शेवट होत नाहीं असें पाहून तिणें आपली सारी हकीकत त्याला कळवितांच त्या ब्राह्मणबटूचें अंतःकरण दयेनें फारच कळवळलें. त्याणें तिला स्वस्थ राहा, कांहीं काळजी करूं नको असें आश्वासन देऊन जवळच **जमदग्निऋ**षीचा आश्रम होता त्यांत तिला नेऊन पोंचविलें.

**उदय**पर्वतावर स्थिर झालेला मूर्तिमंत बालसूर्यच कीं काय असा भासणारा जो तेजस्वी **जमदग्नि**ऋषि त्याला पाहून **मृगावतीनें** त्याच्यापुढें

साष्टांग नमस्कार घातला. शरणागतांवर दया करणाऱ्या त्या मुनिवर्यानें दिव्यदृष्टीनें पाहिलें तों पतिवियोगानें दुःखार्त झालेल्या त्या राजपत्नीचा सर्व वृत्तांत त्याला कळून आला. नंतर कृपादृष्टीनें तिजकडे पाहून तो तिला ह्मणाला, "मुली, तुझें वर्तमान सर्व मला माहीत आहे. तू एथें आलीस हें बरें झालें. आतां एथें स्वस्थ राहा. कांहीं काळजी करूं नको. याच आश्रमांत तू प्रसूत हो. चंद्रवंशाची वृद्धि करणारा असा गुणवान् व पराक्रमी पुत्र तुझ्या उदरीं अवतीर्ण होईल, व तुझी आणि तुझ्या पतीची भेट होऊन तुह्मी सुखाचे दिवस लवकरच पहाल." हा त्या ऋषीचा आशीर्वाद श्रवण करून **मृगावती**ला बराच धीर आला, आणि प्रियपतीचा समागम लवकर होईल या आशेनें ती त्या आश्रमांत मोठ्या आनंदानें राहिली.

थोड्याच दिवसांनीं **मृगावती**चे नवमास पूर्ण

भरले. सत्संगतीपासून सदाचाराची जशी उत्पत्ति होते तद्वत् शुभलग्नावर त्या साध्वीच्या उदरीं सर्वमान्य असें पुत्ररत्न जन्मास आलें. जन्मकालीं आकाशवाणीनें सांगितलें कीं, "हे **मृगावति**, हा तुझा पुत्र मोठा भाग्यशाली निपजेल. व यालाही एक पुत्र होईल तो सर्व विद्याधरांचा राजा होईल." ही आकाशवाणी ऐकून **मृगावती**ला अत्यंत हर्ष झाला, व आजपर्यंत भोगलेल्या सर्व दुःखाचा तिला विसर पडून ती मोठ्या आनंदानें त्या बालकाचें लालनपालन करूं लागली. **जमदग्निऋषीं**नें त्याचें जातक वर्तवून तो **उदय**पर्वतावर जन्म पावला ह्मणून **उदयन** असें त्याचें नांव ठेविलें. तो जसजसा वाढत चालला तसतसा त्याच्या वयाबरोबरच त्याच्या सद्गुणांचाही विकास होऊं लागला. त्याच्या बाललीला पाहून **मृगावतीस** मोठें कौतुक वाटे. **जमदग्निऋषीं**नें त्या बालकाचे,

क्षत्रियांस आवश्यक असे सर्व संस्कार यथाविधि केले व त्याला चांगलें समजूं लागलें तेव्हां धनुर्विद्यादि सकल विद्या पढवून त्यांत त्याला पारंगत केलें.

**उदयन** प्रौढवयांत आल्यावर त्याला मृगया करण्याचा फार नाद लागला. एके दिवशीं तो एकटाच रानामध्यें हरिणांची पारध करीत हिंडत असतां एक शबरजातीचा गारुडी मोठ्या जबरदस्तीनें एका सर्पाला धरीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तो सर्प नागजातीचा असून फार सुंदर दिसत होता. त्याचे तो गारुडी फार हाल करीत आहे असें पाहून **उदयनास** दया आली आणि त्याणें त्याला सोडून दे ह्मणून शबरास दरडावून सांगितलें; तेव्हां तो राजपुत्रास मुजरा करून ह्मणाला, "महराज, मी गरीब आहें व हा माझा उपजीविकेचा धंदा आहे. लोकांच्या घरोघर अशीं जनावरें खेळवून ते जें देतील त्या-

वर मी आपला गुजारा करीत असतों. या राना-
मध्यें मोठ्या मेहनतीनें व मंत्रौषधींच्या बळानें हा
मला सांपडला आहे; यासाठीं कृपा करून मा-
झ्या पोटावर आपण पाय देऊं नका." हें त्या-
चें नम्रतेचें आणि दीनवाणें भाषण ऐकून राज-
पुत्राला त्याचीही दया आली; यामुळें त्याचें कां-
हीं नुकसान न करितां सर्पालाही कसें तरी सो-
डवावें असा निश्चय करून त्याणें आपल्या हा-
तांतील रत्नखचित सुवर्णाचें कडें काढून तें त्या
गारुड्यास दिलें आणि त्याला सांगितलें, "हें क-
डें बहुमोल आहे. याच्या किमतीच्या द्रव्यावर
तुझी उपजीविका पुष्कळ वर्षेंपर्यंत होईल; हें घे
आणि त्या गरीब प्राण्याला सोडून दे." तें कडें
पाहातांच गारुड्याच्या तोंडाला पाणी सुटलें. त्या-
णें मोठ्या आनंदानें तें हातांत घेऊन राजपुत्रास
लवून मुजरा केला व त्याच्या औदार्याबद्दल त्या-
चे उपकार मानून व सर्पाला सोडून देऊन तो

चालता झाला. हें कडें **मृगावतीनें** आपल्या हातांतून काढून **उदयना**च्या हातांत घातलें होतें, व त्यावर **सहस्रानीका**चें नांव कोरलेलें होतें. राजपुत्राला हें आपल्या पित्याच्या नांवाचें कडें आहे ही गोष्ट माहीत नव्हती; यामुळें परोपकारार्थ तें देऊन टाकण्याविषयीं त्याच्या मनांत कांहींच किंतू आला नाहीं. असो.

गारुड्याच्या तावडींतून सुटका होतांच तो (र्प अत्यंत हर्षभरित होत्साता मनुष्यवाणीनें **उदयना**स ह्मणाला, "हे महाभागा, तुझें औदार्य आणि परोपकारबुद्धि पाहून मी तुजवर प्रसन्न झालों आहें. नागांचा राजा **वासुकि** याचा मी ज्येष्ठ भ्राता होय. माझें नांव **वसुनेमि**, हें तू बहुधा ऐकिलेंच असेल. भूतदयेनें त्वां माझे प्राण वांचविले, या उपकाराच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां तुला कांहीं अलौकिक देणगी देऊन संतुष्ट करावें असें माझ्या मनांत आहे." असें ह्म-

णून त्याणें घोषवती या नांवाची एक सुंदर वीणा, एक सुवासिक पुष्पमाला, व एक तांबूल अशा तीन वस्तू काढून त्याला दिल्या, आणि कांहीं-एक प्रकारचा तिलक त्याच्या कपाळावर लाविला. नंतर तो त्याला ह्मणाला, "या वस्तूंचा गुण असा आहे कीं, या वीणेंतून पाहिजे त्या रागांत व पाहिजे तसे मधुर सूर निघतील व हिच्या मनोहर नादानें पाहिजे तो प्राणी मोहित होऊन तुला वश होईल. ही माला सदोदित अशीच टवटवीत राहील. हा तांबूल तूं भक्षण केला ह्मणजे तुझ्या ओठांचा रंग सदोदित पोंवळ्याप्रमाणें लाल राहील, व हा तिलक कधीं पुसून न जातां त्याच्या योगानें तुझें मुख निरंतर शोभमान दिसेल." याप्रमाणें सांगून त्याणें त्या वस्तू त्याच्या स्वाधीन केल्या आणि आपल्या पाठी-

---

१ वीणा हा शब्द संस्कृत असून स्त्रीलिंगी आहे. मराठींत तो पुल्लिंगी वापरण्याची रूढि पडली आहे.

वर बसवून त्याला त्याणें **जमदग्नीच्या** आश्रमास आणून पोंचविलें. राजपुत्र रानांत जाऊन फार वेळ झाल्यामुळें त्याची माता **मृगावती** तो केव्हां येतो ह्मणून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. तिच्या तो दृष्टीस पडतांच अमृतवृष्टि करण्याऱ्या चंद्राला पाहून चकोरीला जसा आनंद होतो तसा तिला आनंद झाला, आणि त्याच्या भरांत तिणें त्याला मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरून त्याचें चुंबन केलें.

इकडे सुदैवानें प्राप्त झालेलें तें राजनामांकित कडें पाहून गारुड्याला जो हर्ष झाला त्याचें वर्णनच करितां येत नाहीं. तें विकून त्याचें द्रव्य करावें ह्मणून मोठ्या घाईनें तो बाजारांत गेला, व तेथें एका जवाहिऱ्यास तें दाखवून विकत घेता का? ह्मणून त्याणें विचारिलें. जवाहिऱ्यानें तें खालींवर करून निरखून पाहिलें, तेव्हां गारुड्यासारख्या जंगली व दरिद्री माणसाजवळ ए-

वढें बहुमोल कडें कसें आलें याविषयीं त्याच्या मनांत संशय आला, ह्मणून लागलीच त्यानें ती गोष्ट कोतवालाच्या कानावर घातली. कोतवालानें ताबडतोब त्या गारुड्याला पकडून **सहस्रानीका**कडे नेलें. त्याणें तें कडें पाहिलें तों त्यावर आपलें नांव खोदलेलें आहे व आपण विवाहसमयीं आपल्या प्रियपत्नीच्या हातांत घातलें होतें, तेंच हें कडें आहे असें त्याला स्मरण होऊन त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. नंतर त्यानें मोठ्या उत्कंठेनें, हें कडें तुला कोणीं दिलें ह्मणून त्या शबरास विचारिलें, तेव्हां त्याणें **उदय**पर्वतावर झालेला सर्व वृत्तांत कळविला. तो ऐकून घेऊन व आपल्या प्रियेच्या हातांतीलच निःसंशय हें कडें आहे असें ओळखून राजाचें मन अनेक प्रकारच्या विचारतरंगांत हेलकावे खाऊं लागलें. त्या कड्याच्या दर्शनानें प्रियेच्या भेटीची बळकट आशा त्याच्या मनांत उत्पन्न

झाली, व आतां तिचा शोध कोणत्या मार्गानें करावा याविषयीं तो विचार करीत आहे, इतक्यांत, मेघवृष्टि मयूरास जसा आनंद देते तद्वत् स्त्रीविरहाग्नीनें होरपळून गेलेल्या राजाच्या अन्तःकरणास आनंद आणि शांति देणारी आकाशवाणी त्याच्या कानीं आली. ती गंभीर स्वरानें ह्मणाली, "राजा, **तिलोत्तमे**च्या शापानें तुला तुझ्या प्रियपत्नीचा वियोग चौदा वर्षेंपर्यंत झाला होता, तो शाप आज संपला. ती तुझी प्रिया **मृगावती** पुत्रासहवर्तमान **उदय**पर्वतावर **जमदग्नि** ऋषीच्या आश्रमांत सुखरूप आहे. तिला तू आतां खुशाल घेऊन ये" ही अमृताप्रमाणें आल्हादजनक वाणी ऐकतांच राजाच्या अन्तःकरणांत आनंदाचा जो उमाळा आला त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! **मृगावती**ला भेटण्याविषयीं त्याचें मन फारच उताविळें झालें, व एकएक पळ त्याला युगाप्रमाणें भासूं लागलें. तो दिवस

त्याणें मोठ्या दुःखानें कसा तरी घालविला, व दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं थोडेसे लोक बरोबर घेऊन व मार्ग दाखविण्याकरितां त्या शबराला पुढें करून तो **उदयाचलावरील** ऋष्याश्रमाकडे जावयास निघाला.

तो आश्रम पुष्कळ दूर होता. मार्गक्रमण करतां करतां त्याला संध्याकाळ झाला, तेंव्हां अरण्यांतच एका सरोवराच्या कांठीं निवाऱ्याची जागा पाहून तेथें त्यानें रातोरात मुक्काम केला. सर्वांचें जेवणखाण आटोपल्यावर राजा विश्रांति घेण्याकरितां बिछान्यावर जाऊन पडला. सारा दिवस मार्ग क्रमीत असल्यामुळें वास्तविक ह्मटलें ह्मणजे त्याला झोंप लवकर लागावी; पण प्रियपत्नीच्या मुखकमलाचें दर्शन घेण्याविषयीं त्याचें मन अत्यंत उत्सुक असल्यामुळें त्याचा डोळा क्षणभर देखील लागला नाहीं. **संगतक** नांवाचा त्याचा आवडता सेवक त्याचे पाय दाबीत

बसला होता, त्याला तो ह्मणाला, "**संगतका,** मला झोंप येत नाहीं व चैनही पडत नाहीं; यासाठीं मनाला करमणूक होण्याकरितां एकादी गमतीची गोष्ट तरी सांग." हें ऐकून तो सेवक ह्मणाला, "महाराज, राणीसाहेबांकडे आपलें मन वेधलें असल्यामुळें आपणास चैन पडत नाहीं व झोंप येत नाहीं हें खरें आहे; पण उगीच इतकी उताविळी करून जिवाला संताप कां बरें देता? आपणास झालेल्या शापाची मुदत संपली आहे, तेव्हां आतां लवकरच राणीसाहेबांची व आपली भेट होईल, यांत संशय नाहीं. आपणावरच अशा प्रकारचें संकट आलें आहे असें नाहीं. प्रियजनांचा वियोग करणारे दुःसह प्रसंग आजपर्यंत पुष्कळ लोकांवर आले आहेत; पण ते सर्व लोक विचारी आणि मनाचे खंबीर असल्यामुळें त्यांतून पार पडून शेवटीं ते सुखी झाले." असें ह्मणून त्यानें राजाला **मालवदेशांत**

राहणाऱ्या **श्रीदत्त**नामक ब्राह्मणाची एक मनोरंजक गोष्ट[1] सांगितली. तींतील तात्पर्य असें होतें कीं, **श्रीदत्त** हा प्रथम गरीब ब्राह्मणकुळांत उत्पन्न झाला असून स्वपराक्रमानें त्याणें पृथ्वीचें राज्य संपादन केलें. मध्यंतरीं त्याच्या प्रियपत्नीचा व त्याचा बहुतकालपर्यंत वियोग होऊन तिचा शोध करीत असतां त्याच्यावर अनेक संकटें आलीं; पण त्या धीरपुरुषानें आपलें धैर्य खचूं न देतां दृढनिश्चयानें सतत यत्न चालविला, यामुळें त्याच्या पत्नीचा शोध लागून शेवटीं तिजसहवर्तमान तो सार्वभौमराज्याचा उपभोग घेऊं लागला. राजाच्या सद्यःस्थितीला लागू असणारी ही गोष्ट **संगतकानें** मुद्दाम सांगितली; कारण

---

१. मूळ संस्कृत ग्रंथांत ही गोष्ट सविस्तर दिलेली आहे. प्रस्तुत चरित्राशीं तिचा विशेष संबंध नसल्यामुळें अप्रासंगिक दिसेल; ह्मणून ती एथें गाळली आहे.

ती ऐकिल्यापासून हुटहुटलेल्या त्याच्या मनाला धीर यावा असा त्याचा हेतु होता, तो बऱ्याच अंशीं पूर्ण झाला. ती गोष्ट ऐकून दयितादर्शनाविषयीं उत्कंठित झालेल्या त्याच्या मनाला बरीच करमणूक झाली व थोडा वेळ त्याचा डोळाही लागला. प्रातःकाळ होतांच त्यानें तेथून पुढें कुच केलें. राजाचें जड शरीर मात्र मार्ग क्रमीत होतें; पण त्याचें मन केव्हांच त्याच्या प्राणवल्लभेकडे जाऊन दाखल झालें होतें. असो. याप्रमाणें कित्येक दिवसपर्यंत कुच दरकुच करीत शेवटीं तो **जमदग्नी**च्या आश्रमास जाऊन पोंचला. तें आश्रमस्थान फारच रमणीय आणि शांत होतें. तेथें श्वापदादिकांचा कांहींएक उपद्रव नसून हरिण देखील आपला चपल स्वभाव टाकून निःशंकपणानें वास करीत असत. राजा **सहस्रानीक** आपल्या भेटीस आला आहे असें समजतांच तो तपोधन ऋषि त्याला सामोरा गेला व

आश्रमांत आणून त्यानें त्याचें यथायोग्य आदरातिथ्य केलें. राजानेंही ऋषीच्या चरणांवर मस्तक ठेवून आपण खुशाल आहां ना? व आपलें तपश्चरण निर्विघ्नपणें चालत आहे ना? इत्यादि कुशलप्रश्न त्याला विचारिले. त्यांचीं उत्तरें तो देत असतां त्याच्या जवळ तपस्व्याच्या वेषानें एक कुमार बसला होता त्याच्याकडे राजाची सहज दृष्टि गेली, व त्याला पाहतांच त्याच्या अंतःकरणांत कांहीं विलक्षण प्रेमविकार उत्पन्न होऊन हा मुलगा कोणाचा ह्मणून त्यानें ऋषीला विचारिलें. तेव्हां त्यानें **मृगावती** रानांत अनाथाप्रमाणें पडलेली सांपडली, तेव्हांपासून झालेलें सर्व वृत्त राजाला निवेदन केलें व हा तुझा पुत्र आहे असें सांगितलें. नंतर **मृगावतीला** हाक मारून तिला पुत्रासहवर्तमान त्याच्या स्वाधीन केलें. त्या उभयतांना स्त्रीपुत्रभावानें पाहतांच राजाला जो आनंद झाला, त्याचें वर्णन

करणें केवळ अशक्य आहे. त्याच्या नेत्रांतून खळखळां आनंदाश्रु वाहूं लागले. त्यानें मोठ्या प्रेमानें पुत्राला आलिंगन देऊन त्याच्या मुखाचें चुंबन केलें, आणि **मृगावतीच्या** पुनःप्राप्तीबद्दल त्या ऋषीचे फार आभार मानिले. याप्रमाणें अप्सरेनें दिलेला शाप संपून त्या उभयतांचा संयोग झाल्यावर **जमदग्नि**ऋषीची आज्ञा घेऊन राजा **मृगावती** व **उदयन** यांसहित **कौशांबी**नगरीस परत यावयास निघाला. त्या मायलेकांचा सहवास बहुत वर्षांचा असल्यामुळें, त्यांचा आतां वियोग होणार ह्मणून **जमदग्नि**ऋषीस व आश्रमवासी सर्व तापसजनांस अत्यंत दुःख झालें यांत कांहीं नवल नाहीं; पण तेथील हरिण देखील वियोगदुःखभरानें व्यथित होत्साते त्यांच्या मागोमाग जाऊं लागले. हें विलक्षण प्रेमबंधन पाहून राजाचाही पाय तेथें घुटमळूं लागला; पण करतो काय? निरुपायास्तव त्यानें त्या सर्वांची कशी

तरी समजूत करून व ऋषीचा निरोप घेऊन स्त्रीपुत्रांसहवर्तमान त्या शांत आणि पुण्यरूप तपोवनाश्रमांतून आपला पाय काढिला. मार्गानें येतां येतां **मृगावतीनें**, तिला गरुडपक्ष्यानें उचलून नेलें तेव्हांपासून झालेली सर्व हकीकत राजाला निवेदन केली. तिजवर एकामागून एक आलेलीं संकटें ऐकून त्याला अतिशय दुःख झालें; तथापि परमेश्वरानें शेवट गोड केला ह्मणून तो त्याची स्तुति करूं लागला. नंतर राजानेंही तिचा शोध कसा लागला तें इत्थंभूत वर्तमान तिला कळविलें. याप्रमाणें तीं उभयतां स्त्रीपुरुषें गोष्टी बोलत बोलत कांहीं दिवसांनीं **कौशांबी**नगरीजवळ येऊन पोंचलीं. राजानें **मृगावती**सह आपण आल्याची खबर प्रधानाला कळविण्याकरितां एक जासूद पुढें रवाना केला. त्यानें ती शुभवार्ता कळवितांच नगरामध्यें जिकडे तिकडे आनंदोत्सव सुरू झाला. नागरिक लोकांनीं घरो-

घर ध्वज, पताका व तोरणें उभारून आपला आनंद प्रदर्शित केला. राजवाड्यांतही मोठा मंगलोत्सव सुरू झाला. प्रधानमंडळी राजाला सामोरी गेली व त्यांच्या समागमें मोठ्या थाटानें तो हळू हळू नगरांत प्रवेश करूं लागला. फार दिवस राजाचा वियोग झाल्यामुळें सर्व प्रजा दुःखी व म्लानवदन झाली होती. आपला स्वामी पत्नी **मृगावती** आणि पुत्र यांसहित नगरांत येत आहे असें पाहून तिच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. कृतकृत्य होऊन परत आलेल्या राजाची मुखश्री आनंदानें टवटवीत दिसूं लागली व ती नागरिक स्त्रिया व पुरुष आपल्या प्रफुल्लित नयनांनीं जणूं काय प्राशनच करीत आहेत असें भासूं लागलें. याप्रमाणें स्वारी राजवाड्यांत येऊन दाखल झाल्यावर मोठा दरबार भरवून राजानें सर्व कामगारांच्या व इष्टमित्रांच्या मोठ्या प्रेमानें भेटी घेतल्या.

राजपुत्र **उदयन** या समयीं बराच प्रौढ वयांत आला होता. त्याच्या वयाबरोबर त्याच्या अंगचे सद्गुणही विकास पावूं लागले. ते शेवटीं इतके वाढले कीं, त्यांच्या योगानें सर्व लोकांस तो अत्यंत प्रिय झाला. ही त्याची लोकप्रियता पाहून **सहस्रानीका**नें मोठा समारंभ करून त्याला यौवराज्याचा अभिषेक करविला. **उदयाचला**वर **उदयना**चा जन्म झाला त्याच सुमारास **कौशांबी**मध्यें राजाचा मुख्यप्रधान **युगंधर**, सेनापति **सुप्रतीक**, आणि खुषमस्कऱ्या **रैवतक** यांनाही पुत्र झाले होते. त्यांचीं नांवें त्यांच्या आईबापांनीं **यौगंधरायण**, **रूमण्वान्** आणि **वसंतक** अशीं अनुक्रमें ठेविलीं होतीं. हे तिघेही पुत्र सांप्रत युवराज **उदयन** याचे समवयस्क असून आपापल्या बापांप्रमाणेंच गुणवान् व चतुर होते. **उदयना**ला राज्याभिषेक करतांच **सहास्रानीका**नें **यौगंधरायणा**ला मु-

ख्यप्रधानकीचीं वस्त्रें देऊन रुमण्वानाला मुख्य सेनापति केलें, आणि वसंतकावर खुषमस्कऱ्याचें काम सोंपविलें. तो ब्राह्मण आपल्या बापाप्रमाणें स्वभावानें मोठा गमती व चतुर असल्यामुळें तरुण राजाचें त्याच्यावर फारच प्रेम बसलें व त्यामुळें तो त्याला नेहमीं आपल्याजवळ बाळगीत असे. या नेमणुका झाल्या त्या वेळेस असा चमत्कार झाला कीं, आकाशांतून एकाएकीं पुष्पवृष्टि होऊन देववाणी झाली. तिनें असें सांगितलें कीं, "या तिघांच्या सह्यानें राज्यकारभार चालविला असतां हा उदयनराजा लवकरच दिग्विजय करून सकल पृथ्वीचें राज्य संपादन करील."

याप्रमाणें कुमार उदयनावर राज्यभार टाकून राजा सहस्रानीक मृगावतीसहवर्तमान स्वस्थ घरीं बसून सुखानें कालक्रमणा करूं लागला. हळू हळू त्याला वार्धक्यानें गांठलें व

त्याबरोबरच सांसारिक विषयोपभोगांचाही त्याला वीट आला. आपल्यामागें आपलें राज्य कसें चालेल व प्रजेचें पालन कसें होईल याविषयीं त्याला यत्किंचितूही काळजी करण्याचें कारण राहिलें नव्हतें; कारण, कुमार **उदयन** हा भाग्यशाली असून सारी प्रजा त्याजवर अनुरक्त आहे व त्याच्या हातून जगाचा उत्कर्ष खचीत होईल अशी त्याची खात्री होती. शिवाय त्याचे मंत्रीही मोठे बुद्धिवान् व कार्यदक्ष होते. या सर्व कारणांमुळें राजा **सहस्रानीक** अगदीं निश्चित होता. त्यानें सर्व राज्यभार पुत्रावर सोंपविला, आणि विरक्त होत्साता **युगंधरादि** वृद्ध प्रधानमंडळी व **मृगावती** यांसहवर्तमान परलोकप्राप्त्यर्थ तपश्चर्या करण्यासाठीं **हिमालय**पर्वतावर गमन केलें.

पित्यानें दिलेला राज्याचा भार **उदयना**च्या शिरावर येतांच त्यानें राज्यकारभारांत आणि

प्रजेचें पालन करण्याच्या कामांत अत्यंत दक्षता ठेवून सर्वांस संतुष्ट केलें. **वत्सदेशाचें** आधिपत्य त्याच्याकडे आलें ह्मणून या वेळेपासून **वत्सराज** हें अन्वर्थक नामाभिधान त्यास प्राप्त झालें व याच नांवानें तो पुढें जगांत प्रसिद्धीस आला. **यौगंधरायणा**दि प्रधानांच्या सल्लामसलतीनें तो राज्यकारभार उत्तम रीतीनें चालवीत असतां तारुण्याच्या ऐन भरांत असल्यामुळें आपल्या कुलशीलरूपास योग्य अशी भार्या आपणास प्राप्त व्हावी अशी इच्छा सहजच त्याच्या मनांत उत्पन्न झाली, व सुदैवानें त्याच्या मनाप्रमाणें सर्वगुणसंपन्न असें स्त्रीरत्न **विधात्या**नें पृथ्वीच्या पाठीवर निर्माण करून ठेविलेंच होतें. **वत्सराज कौशांबी**नगरींत तारुण्यदशेस येत चालला असतां तें रत्नही आपल्या आईबापांच्या घरीं वाढीस लागून या समयीं उपवरस्थितीस पोंचलें होतें, व याच्या उत्पत्ति-

कथेप्रमाणेंच त्या भावी राजपत्नीच्याही उत्पत्तीची कथा मोठी चमत्कारिक आणि मनोरंजक आहे; ह्मणून ती प्रथम एथें सांगतों.

**माळवा**प्रांतांत **उज्जयिनी** या नांवाची एक प्रसिद्ध नगरी आहे, ती त्या काळीं वैभवाच्या अत्युच्च शिखरास पोंचली असल्यामुळें भूदेवीचें ती केवळ भूषणच होती असें ह्मटलें असतां चालेल. शुभ्रवर्णानें लखलखणाऱ्या भव्य आणि उंच अशा मंदिरांनीं सुशोभित दिसत असल्यामुळें **इंद्रा**च्या **अमरावती**चा ती मोठ्या डौलानें जणूं काय उपहासच करीत आहे असें वाटे. **कैलास**पर्वतावर फार दिवस राहून कंटाळल्यामुळें मनाला करमणूक व्हावी, म्हणूनच कीं काय भगवान् त्रिपुरारि **महाकाळेश्वर** या नांवानें त्या ठिकाणीं वास्तव्य करूं लागला. त्या नगरींत सर्व राजांमध्यें **श्रेष्ठ** असा **महेंद्रवर्मा** या नांवाचा एक प्रतापी राजा राज्य करीत होता.

त्याच्या पाठीमागून त्याच्यासारखाच पराक्रमी असा **जयसेन** या नांवाचा त्याचा पुत्र राज्यपदारूढ झाला. त्याच्या पोटीं अतुल बलशाली असा **महासेन** या नामेंकरून पुत्र उत्पन्न झाला. कालगतीनें तो राज्यपदारूढ झाल्यावर प्रजेचें संरक्षण उत्तम प्रकारें करीत असतां एके दिवशीं सहज त्याच्या मनांत अशी इच्छा उद्भवली कीं, आपण श्रेष्ठ क्षत्रियांच्या कुलांत उत्पन्न झालों आहों त्याअर्थीं आपल्या कुलरूपाला शोभणारी अशी भार्या आपणास असावी. त्याप्रमाणेंच पृथ्वीवरील सर्व राजांस आपण अजिंक्य व्हावें, यासाठीं एकाद्या दिव्य आयुधाची आपणास प्राप्ति व्हावी. ही इच्छा मनांत उद्भवतांच राज्यकारभार सोडून तो **चंडिकादेवीच्या** मंदिरांत गेला आणि इष्टकामसिद्ध्यर्थ खडखडीत उपोषणें करून तिची आराधना करीत बसला. पुष्कळ दिवसपर्यंत त्यानें हें

अनुष्ठान चालविलें तरी देवी प्रसन्न होईना; ह्मणून त्यानें आपल्या शरीरांतील मांस काढून त्याचा होम केला. हें त्याचें सत्व पाहून चंडिकामाता प्रसन्न झाली, आणि साक्षात् त्याच्यापुढें उभी राहून त्याला ह्मणाली, "पुत्रा, तुझी निस्सीम भक्ति पाहून मी संतुष्ट झाल्यें, तुला पाहिजे तो वर मागून घे." राजानें आपला हेतु कळवितांच ती ह्मणाली, "तुझ्या इच्छेप्रमाणें मी हा माझा दिव्य खड्ग तुला अर्पण करितें, हा घे. याच्या प्रभावानें तू शत्रूंला अजिंक्य होशील. आणखी तुला सागत्यें. **अंगारक** या नांवाच्या दैत्याला **अंगारवती** या नांवाची एक कन्या आहे. सौंदर्यानें तिची बरोबरी करणारी दुसरी कोणीही या त्रैलोक्यांत सांपडावयाची नाहीं. ती कन्या लवकरच तुझी भार्या होईल. होमकुंडांत तूं आपल्या मांसाच्या आहुति दिल्यास हें फारच क्रूरकर्म तुझ्या हातून घडलें; ह्मणून लोक

तुला आजपासून **चंडमहासेन** असें ह्मणत जातील.'' याप्रमाणें भाषण करून व खड्ग त्याच्या हातांत देऊन देवी तेथल्या तेथेंच अंतर्धान पावली. राजाही आपली मनःकामना पूर्ण झाल्यामुळें संतुष्ट होत्साता आपल्या घरीं आला. देवीनें ही जी त्याला दिव्य देणगी दिली, तिच्याशिवाय त्याच्याजवळ **नडागिरि** या नांवाचा एक मोठा बलाढ्य हत्ती होता. वज्र आणि ऐरावत यांच्या योगानें देवांचा राजा **इंद्र** जसा शोभतो तद्वत् या दोन रत्नांच्या प्रभावानें **चंडमहासेन** भूतलावर शोभमान् होत्साता अत्यंत सुखी झाला.

एके दिवशीं **चंडमहासेन** मृगया करीत एका निर्जन अरण्यांत फिरत असतां तेथें एक मोठा धिप्पाड आणि भयंकर रानडुकर त्याच्या दृष्टीस पडला. रात्रीचा सर्व अंधकार दिवसाढवळ्या एके ठिकाणीं गोळा व्हावा त्याप्रमाणें तो काळा-

कभिन्न जणूं काय काजळाचा पर्वतच दिसत होता. राजानें तो अंगावर धांवून येत आहे असें पाहून त्याच्यावर पुष्कळ तीक्ष्ण बाण सोडिले; तथापि त्यांच्या योगानें त्याच्या एका केंसासही इजा न होतां त्यानें मोठ्या जोरानें राजाच्या रथाला धक्का मारून जवळच भूमीमध्यें एक विवर होतें त्यांत प्रवेश केला. राजाही रथावरून उतरून व धनुष्यबाण हातांत घेऊन मोठ्या क्रोधावेशानें त्याच्या मागोमाग त्या भुयारांत शिरला व त्याचा पाठलाग करीत बराच दूर गेला, तों इतक्यांत तो वनसूकर कोठें दिसेनासा झाला. कांहीं वेळ पुढें चालून पाहातो तों एका उघड्या प्रदेशांत एक सुंदर नगर त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहून हें नगर कोणाचें असावें याविषयीं मोठ्या विस्मित अंतःकरणानें विचार करीत तो एका सरोवराच्या कांठीं बसला असतां कोणी एक कन्या आपल्या शंभर

सख्या बरोबर घेऊन त्या स्थळाकडे येत आहे असें त्यानें पाहिलें. तो स्त्रियांचा समुदाय पाहून आपलें धैर्य नष्ट करण्याकरितां कामदेव ही बाणांची वृष्टिच आपणावर करितो आहे कीं काय असें त्याला वाटलें. इतक्यांत प्रेमरसानें परिपूर्ण अशा नयनांनीं त्याच्याकडे पहात पहात हळू हळू ती कन्या त्याच्या अगदीं जवळ येऊन पोंचली. राजा तिच्या दृष्टिपथांत येतांच अशा सुंदर पुरुषाचें येणें या स्थळीं कसें झालें याविषयीं तिलाही मोठें आश्चर्य वाटलें. नंतर जवळ जाऊन ती त्याला ह्मणाली, "हे महाभागा, तुह्मी कोण आहां व कोणत्या कामानिमित्त या भयंकर स्थळीं आलां तें सांगाल तर मोठी कृपा होईल." हा तिचा प्रश्न ऐकतांच राजानें झालेली सर्व हकीकत तिला निवेदन केली. ती ऐकतांच तिच्या त्या प्रेमभरित नेत्रांतून दुःखाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या व त्याव-

रोबरच तिचें धैर्यही नष्ट होऊन ती अगदीं घाबरून गेली. तिची ती विकल स्थिति पाहून राजाला फार खेद झाला व आश्चर्यही वाटलें. तो तिला ह्मणाला, "हे सुंदरी, मीं तुला आपली हकीकत सांगितली त्याप्रमाणेंच तू कोण आहेस व मला पाहातांच एकाएकीं तुला दुःख होऊन रडें कां कोसळलें तें सांग. तुझ्या दुःखाचा प्रतिकार करण्याचें माझ्या हातीं असल्यास तो मी खचीत मोठ्या आनंदानें करीन." हें त्याचें अमृतासारखें गोड भाषण ऐकून कामदेवाला वश झालेली ती कन्या आपली हकीकत सांगूं लागली, ती येणेंप्रमाणें:—

महाराज, आपण भुयारांतून या ठिकाणीं आलेला जो रानडुकर पाहिला ह्मणून सांगतां तो खरोखरीचा डुकर नसून मायेनें त्यानें तें रूप घेतलें होतें. तो एक मोठा बलाढ्य आणि वज्रदेही दैत्य आहे. त्याचें नांव **अंगारक.** शा-

पाच्या योगानें तो राक्षसजन्म पावून एथें वास करीत आहे. मी त्याची कन्या आहें. माझें नांव **अंगारवती**. या ज्या मजबरोबर शंभर सख्या आहेत त्या सर्व राजकन्या असून त्यांच्या बापांपासून त्यांना पळवून आणून माझ्या बापानें माझ्या सेवेसाठीं एथें आणून ठेविल्या आहेत. आज तुह्मी त्याच्या तावडींतून सूटलां हें मोठें नशीबच समजावयाचें. तहान, भूक आणि श्रम यांनीं फार व्याकूळ झाल्यामुळें विश्रांति घेण्याकरितां तो घाईघाईनें स्वस्थानीं निघून आला, यामुळें त्याचें लक्ष्य तुमच्याकडे गेलें नाहीं, ह्मणून बरें झालें. या वेळेस आपलें मायावी रूप टाकून तो स्वस्थपणें झोंप घेत पडला आहे. पण निजून उठल्यावर तो खचीत तुमच्यावर धाड घालील ह्मणून मला फार भय वाटतें. या दुष्टापासून तुमचा बचाव कसा करावा तें मला कांहींच सुचत नाहीं. तुह्माला वाटतें, दुःखाच्या उमा-

ळ्यानें माझ्या नेत्रांतून हे अश्रुबिंदु गळत आहेत; पण हे अश्रू नव्हत; तर तुमच्यावर आलेलें अरिष्ट अनिवार्य जाणून हे साक्षात् माझे पंचप्राणच मला सोडून डोळ्यांवाटे बाहेर निघून जात आहेत." ही तिची हकीकत व आपणाविषयीं ममतेचें भाषण ऐकतांच राजा आपल्या मनांत एकदम चपापला. त्याला देवीनें सांगितलेल्या गोष्टीचें स्मरण झालें, व हीच सुंदर कन्या आपली राणी होणार असें समजून तो आनंदानें कांहीं वेळ तिजकडे पाहात स्तब्ध राहिला. अशा भयंकर स्थितींतून आपली व तिची सुटका कशी करावी हें त्याला कांहींच सुचेना. शेवटीं थोडा वेळ विचार करून तो तिला ह्मणाला, "हे सुंदरी, तू सांगतेस यावरून प्रसंग तर कठिण आहे खरा; तथापि विचार करतां अशाही संकटांतून माझा बचाव करण्याची मला एक युक्ति सुचली आहे; पण ती पार पा-

डण्यास मला तुझें साह्य पाहिजे. तुझें जर मजवर खरोखर निष्कपट प्रेम असेल, तर मी सांगतों असें कर. तुझा बाप जागा झाला ह्मणजे तू त्याच्या जवळ जाऊन मोठ्यानें गळा काढून रडूं लाग; ह्मणजे अर्थातच तो तुला रडण्याचें कारण विचारील, तेव्हां तू त्याला ह्मण कीं, "बाबा, तुमचा जर कोणीं नाश केला तर माझें पालनपोषण कोण करील, याविषयीं मला मोठी काळजी वाटते, ह्मणून रडूं येतें." यावर तो जें कांहीं बोलेल तें मी जवळच एका कोंपऱ्यांत लपून बसून ऐकेन व पुढें मला जें करणें योग्य वाटेल तें करीन; पण तुला इतकें खचीत सांगतों कीं, जें मी कांहीं करीन त्याच्या योगानें तुझें व माझें उभयतांचेंही कल्याण होईल." आपल्या बापाला कांहीं तरी युक्ति करून हा ठार करणार असा संशय **अंगारवतीच्या** मनांत तर येऊन चुकलाच; पण राजाला पाहिल्यापासून तिचें प्रेम

त्याच्यावर अत्यंत जडलें होतें व कसेंही करून हा पुरुष आपला पति व्हावा अशी उत्कट इच्छा तिच्या अंतःकरणांत उद्भवली होती. याशिवाय बाप मरण पावला तर तो या दुष्ट राक्षसजन्मांतून सुटेल अशी तिला आशा होती. या सर्व गोष्टी मनांत आणून तिनें राजाचें बोलणें कबूल केलें. नंतर त्याला आपल्याबरोबर घरीं नेऊन बाप निजला होता तेथें जवळच एका अंधाराच्या जाग्यांत तिनें त्याला लपवून ठेविलें, आणि आपण बापाच्या पायांपाशीं तो जागा होण्याची वाट पाहात बसली. कांहीं वेळानें **अंगारक** जागा झाला. तेव्हां संकेताप्रमाणें ती मोठा गळा काढून रडूं लागली, तेव्हां त्यानें तिला जवळ घेऊन, "लाडके मुली, तू अशी कां रडतेस? तुला कोणतें दुःख झालें आहे तें मला सांग," असें विचारिलें. या प्रश्नाला तिचा जबाब पूर्वीं ठरलेलाच होता. त्याप्रमाणें ती

ह्मणाली, "बाबा, काय सांगूं? ह्मण आहे कीं, 'मन चिंती तसें वैरीही न चिंती,' आज माझ्या मनांत भलतीशीच मेली एक शंका उत्पन्न होऊन तिनें माझें चित्त अगदीं उदास करून टाकिलें आहे. मला असें वाटूं लागलें आहे कीं, तुह्मी नाहीं नाहीं तीं मायावी रूपें घेऊन इकडे तिकडे फिरतां तेव्हां तुह्माला जर कोणी मारून टाकिलें तर माझें कसें होईल व या एकांतवासांत माझें पालनपोषण कोण करील? ही भीति माझ्या मनानें घेतल्यापासून मला अगदीं चैन पडेनासें झालें आहे." हें मुलीचें भाषण ऐकून **अंगारक** हंसत हंसत तिला ह्मणाला, "वेडे मुली, हें काय तू भलतेंच मनांत आणून रडत बसली आहेस? अग, हा माझा सारा देह वज्रासारखा निर्भेद्य आहे हें तुला माहीत नाहीं काय? अशा वज्रदेह्याच्या केशालाही धक्का लावण्याचें सामर्थ्य कोणाच्या अंगीं आहे? तथापि माझ्या मरणाचें एक मात्र

मर्मस्थान आहे तें मी तुला सांगून ठेवितों. या माझ्या डाव्या हातावर एक छिद्र आहे, त्यावर जर कोणी घाव केला तर मात्र मी जगावयाचा नाहीं; पण तें छिद्र मी कधीं उघडें ठेवीत नाहीं. त्या हातांत मी नेहमीं धनुष्य धरीत असतों, यामुळें तें सदोहित झांकलेलें असतें. यासाठीं तुला सांगतों, नसत्या कल्पना मनांत आणून विनाकारण तू आपल्या मनाला दुःख देऊं नको." याप्रमाणें सांगून त्यानें तिचें समाधान केलें. हें त्या दैत्याचें भाषण राजा लपून ऐकत होताच. नंतर थोड्या वेळानें तो दैत्य उठून स्नानास गेला. स्नान झाल्यावर मौन धारण करून तो भगवान् शंकराची पूजा करावयास बसला. ही संधी साधून राजा अकस्मात् धनुष्यास बाण लावून त्याच्या पुढें येऊन उभा राहिला, आणि युद्ध करण्यासाठीं त्याला बोलावूं लागला. एकाएकीं परका मनुष्य तेथें आलेला पाहून अंगारकाला

मोठा विस्मय झाला; पण त्या वेळीं तो मौनस्थ असून शंकराची आराधना करीत होता; ह्मणून कांहींएक भाषण न करितां त्यानें आपला डावा हात वर करून 'क्षणभर थांब' असें खुणेनें त्याला सुचविलें. त्या हातावरच त्याचें मरणाचें मर्म आहे हें राजाला माहीत झालेंच होतें. त्यावर लक्ष्य ठेवून त्यानें आपलें धनुष्य आकर्ण ओढिलें आणि मोठी चपळता करून जो एक जोरानें बाण मारिला तो नेमका मर्मस्थानीं लागतांच त्यासरसा कासावीस होऊन त्या दैत्यानें मोठ्यानें किंकाळी फोडिली आणि त्या अंतकाळच्या असह्य वेदनांनीं व्याकुल होत्साता भूमीवर गडबडां लोळून प्राण सोडिला! मरतां मरतां त्याच्या तोंडांतून एवढे शब्द निघाले कीं, "अरेरे! मी तृषार्त झालों असतांना माझें देहावसान झालें आहे; यासाठीं ज्यानें मला मारिलें असेल

त्यानें प्रतिवर्षी श्राद्धतर्पणादि करून मला जर उदक पाजिलें नाहीं, तर त्याचे पांच प्रधान प्राणास मुकतील."

बापाच्या मरणानें **अंगारवती** फार दुःखी झाली; पण तिचें दुःख क्षणिक होतें. कारण तिचें सर्व प्रेम **चंडमहासेना**वर जडलें होतें. तो भाग्यशाली व सुंदर पुरुष आपलें पाणिग्रहण केव्हां करील असें तिला झालें होतें. असो. याप्रमाणें उभयतांच्या समागमांत व्यत्यय आणणारा कंटकभूत तो दैत्य मरण पावतांच राजा मोठ्या आनंदानें **अंगारवती**ला तिच्या सख्यांसहवर्तमान बरोबर घेऊन तेथून निघाला तो आल्या मार्गीनें **उज्जयिनीस** येऊन सुखरूप पोंचला. त्याचे प्रधान व नगरवासी जन तो एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें फार काळजी क-

रीत होते. त्या सर्वांस तो परत आला हें पाहून अत्यंत हर्ष झाला. नंतर झालेली हकीकत सर्वांस कळवून राजानें ज्योतिष्यांकडून एक शुभदिवस पाहविला व त्या मुहूर्तावर त्यानें मोठ्या समारंभानें **अंगारवतीचें** पाणिग्रहण केलें.

कांहीं काळ लोटल्यावर **अंगारवतीला** दोन पुत्र झाले. वडील पुत्राचें नांव **गोपालक** व धाकट्याचें **पालक** असें ठेविलें. त्यांच्या जन्मकालीं राजानें मोठा आनंदोत्सव केला. स्त्रियांना पुत्र कितीही झाले तरी तेवढ्यानें त्यांची तृप्ति न होतां एकादी तरी कन्या असावी असें त्यांस वाटत असतें. त्याप्रमाणें देव आपणाला एकादें कन्यारत्न देईल तर बरें अशी **अंगारवतीस** इच्छा झाली. तिनें तें आपलें इद्गत राजाला कळवितांच त्यानें इंद्राची आराधना करण्यास आ-

रंभ केला. बरेच दिवसपर्यंत तें अनुष्ठान चालल्यावर इंद्रानें त्याला स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, "राजा, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालों आहें व तुझ्या इच्छेप्रमाणें तुला वर देतों कीं, माझ्या प्रसादानें अत्यंत रूपवती आणि सर्वगुणसंपन्न अशी लवकरच तुला एक कन्या होईल." राजानें हें स्वप्न राणीला कळवितांच तिला अत्यंत हर्ष झाला. पुढें ती लवकरच गरोदर राहिली व पूर्ण दिवस भरतांच तिला एक सुंदर कन्या झाली. तिचें तें अप्रतिम लावण्य पाहून विधात्यानें ही केवळ दुसरी चंद्रिकाच निर्माण केली आहे कीं काय असें सर्वांस वाटूं लागलें. ती जन्मास येतांच आकाशवाणी होऊन तिनें सांगितलें कीं, "ही कन्या मोठी भाग्यवती निपजेल व इच्या पोटीं जो पुत्र होईल तो केवळ

**कामदेवा**चा अवतार असून सर्व विद्याधरांचा राजा होईल." **इंद्रा**नें प्रसन्न होऊन हें कन्यारत्न आपणास दिलें, ह्मणून **चंडमहासेना**नें तिचें **वासवदत्ता**[1] असें नांव ठेविलें. देवदैत्यांनीं समुद्राचें मंथन करण्यापूर्वीं **लक्ष्मी**[2] जशी त्याच्या पोटांत राहिली होती तद्वत् ती कन्या आपल्या पित्याच्या घरीं राहात असून दिवसेंदिवस वाढूं लागली, व ती उपवर होतांच **चंडमहासेन** तिच्यासाठीं योग्य वर कोठें मिळेल याविषयीं शोध करूं लागला.

**वत्सराजा**च्या मनांत आपणास अनुरूप भार्या मिळावी असें होतेंच, व **चंडमहासेन**ही

---

१ **वासव** ह्मणजे **इंद्र**. त्यानें दिलेली ह्मणून **वासवदत्ता**. २ देवदैत्यांनीं **मंदराचला**चा मंथा करून त्याणें समुद्र घुसळिला, तेव्हां त्यांतून चौदा रत्नें बाहेर निघालीं. त्यांतील **लक्ष्मी** हें पहिलें रत्न होय.

वासवदत्तेला अनुरूप भर्ता मिळावा ह्मणून प्रयत्न करीत होता. ब्रह्मदेवानेंही तीं उभयतां एकमेकांसाठीं निर्माण केलीं होतीं; म्हणूनच त्यांचें पुढें कांहीं एका चमत्कारिक प्रसंगानें परस्परांवर प्रेम जडून विवाहरूप बंधनानें तीं एकत्र झालीं. तो प्रसंग कोणता व कसा आला त्याचें सविस्तर वर्णन पुढील भागांत येईल.

समाप्त.

संस्कृतग्रंथार्थसंग्रह.

पुस्तक २१.

# उदयनचरित,

## भाग दुसरा.

हें पुस्तक,

महाकवि श्रीसोमदेवभट्टविरचित कथासरित्सागरनामक काव्याच्या आधारानें महाराष्ट्रभाषेंत लिहिलें आहे,

तें

**जावजी दादाजी**

यांनीं आपल्या

निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई,—सन १८९२.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत ४ आणे.

# प्रस्तावना.

या चरित्राच्या पहिल्या भागांत चरित्रनायकाच्या पूर्वजांचें वर्णन, त्याचा व त्याची पट्टराणी **वासवदत्ता** यांचा जन्मवृत्तांत व त्याला राज्याभिषेक झाला एथ-पर्यंत सांगितलेली कथा वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्याच्यापुढील कथा या अंकांत वाचकांस सादर करीत आह्मों. **वत्सराजाला चंडमहासेन**राजानें कपटानें धरून नेऊन प्रतिबंधांत कसें ठेविलें, तेथें असतां तो व राजकन्या **वासवदत्ता** यांचें प्रेम एकमेकांवर कसें जडलें, प्रधानाच्या साह्यानें तिजसहवर्तमान त्याची बं-धनांतून सुटका कशी झाली आणि शेवटीं तिच्याबरो-बर त्याचा विवाह कसा झाला इत्यादि गोष्टींचें वर्णन या भागांत केलें आहे.

# उदयनचरित.

## भाग दुसरा.

### कारागृहवास, त्यांतून सुटका आणि वासवदत्तेशीं विवाह.

**वत्सराजाला** राज्याभिषेक होऊन तो राज्यकारभार पाहूं लागला, एथपर्यंत कथा पहिल्या भागांत आलेली वाचकांच्या स्मरणांत असेलच. **यौगंधरायणादि** चतुर आणि स्वामिभक्त प्रधानांच्या सल्लामसलतीनें तो राज्यकारभार जरी मोठ्या दक्षतेनें चालवूं लागला, तथापि सांप्रत तारुण्याच्या ऐन भरांत असल्यामुळें त्याचें लक्ष त्या कामाकडे चांगलेंसें लागेना. मनुष्याच्या मनाच्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणें विषयोपभोगाच्या इच्छेचे अंकुर त्याच्या हृदयांत उद्भवून त्यांची

वाढ अनावर झाली, व त्या योगानें आपणास अनुरूप भार्या कोठें व कधीं मिळेल हे विचार त्याच्या मनांत रात्रंदिवस घोळूं लागले; यामुळें राज्यकारभाराकडील त्याचें लक्ष हळू हळू कमी होत चाललें. अशा स्थितींत कांहीं दिवस लोटल्यावर त्याच्या वृत्तींत इतका पालट झाला कीं, त्यानें नेहमीं एकांतस्थळीं आपणाशींच कांहीं विचार करीत बसावें, फारसें कोणाशीं बोलूं नये, **वसुनेमी**नें दिलेली वीणा वाजवीत तिच्या मधुर नादांतच नेहमीं गुंग असावें. त्याही करमणुकीचा कंटाळा आला ह्मणजे मृगया करण्याकरितां अरण्यांत जावें, व त्या वीणेच्या सुस्वर नादानें मोठमोठे जंगली हत्ती मोहित करून त्यांस धरून आणावें. कधीं कधीं त्यानें आपल्यासभोंवतीं वारवधूंचा मेळा जमवून त्यांच्या समागमें यथेच्छ क्रीडा करावी, व त्यांच्या मुखचंद्रांच्या प्रतिबिंबांनीं अलंकृत झालेल्या मद्याचें

सेवन करावें. हा राज्याचा वर्तनक्रम पाहून **यौगंधरायणादि** मंत्रिमंडळी मोठ्या काळजींत पडली. त्यांनीं राजाला ताळ्यावर आणण्याकरितां काय उपाय करावा, याविषयीं पुष्कळ भवति नभवति केली. शेवटीं याचें चित्त हरण करणारी अशी उत्तम भार्या याला मिळाल्यावांचून हा शुद्धीवर येणार नाहीं असा त्यांचा निश्चितार्थ ठरला, व अशी मनोरंजिनी स्त्री कोठें मिळेल याविषयीं ते तपास करूं लागले. **उज्जयिनी**चा राजा **चंडमहासेन** याची कन्या **वासवदत्ता** ही सर्व गुणांनीं आपणास योग्य भार्या होईल असें **वत्सराजा**च्या कानावर आलें होतें त्यानें ती गोष्ट प्रधान **यौगंधरायण** याला कळविली, आणि कसेंही करून ती भार्या मला प्राप्त होईल अशी तजवीज करा ह्मणून सांगितलें.

याच वेळेस **चंडमहासेन** याची कन्या **वासवदत्ता** उपवर झाली असून तिला योग्य भ्र-

तार पाहण्याच्या खटपटींत तो गुंतला होता, असें पूर्वभागांत सांगितलेलें वाचकांच्या ध्यानांत असेलच. **वत्सराजाची** कीर्ति त्यानें ऐकिली होती, त्यावरून त्याच्याशिवाय आपल्या कन्येला योग्य वर दुसरा कोणी मिळणार नाहीं अशी त्याची खातरी होती; पण तो योग घडून येण्यास एक मोठी अडचण होती, ती ही कीं, **वत्सराज** स्वभावानें मोठा मानी असून **चंडमहासेनाशीं** फार बांकून वागत असे; यामुळें तो आपली कन्या पतकरील किंवा नाहीं याविषयीं त्याला मोठा संशय होता. कदाचित् आपणहोऊन बोलणें लाविलें, आणि त्यानें त्याचा धिक्कार केला तर त्या योगानें आपला दुर्लौकिक व मानहानि होईल ही त्याला धास्ती होती; ह्मणून उघडपणें त्याला बोलणें लावतां येईना. इकडे **वत्सराजाच्या** मनांत **वासवदत्ता** आपणास मिळावी असें जरी होतें, तरी आपण होऊन

तिच्याविषयीं मागणी न करितां तिच्या बापा-
कडून तत्संबंधी बोलण्याचा उपक्रम व्हावा ह्म-
णजे त्यांत आपला मोठेपणा राहील असें त्याला
वाटत होतें. सारांश, उभयतांच्याही मनांत हा
संबंध घडून यावा असें जरी पूर्णपणानें वागत
होतें, तरी दोघेही अभिमानी असल्यामुळें आपला
मोठेपणा राखून तो संबंध कोणत्या युक्तीनें घ-
डवून आणावा याविषयीं ते आपापल्या ठिकाणीं
विचार करीत होते. **वत्सराजा**च्या मनांत
**चंडमहासेना**वर स्वारी करून **वासवदत्ते**चें
हरण करावें असें होतें; ह्मणून त्यानें **यौगंध-
रायणा**चा अभिप्राय त्या कामांत विचारिला,
तेव्हां तो दूरदर्शी प्रधान ह्मणाला, "महाराज,
आपण ह्मणतां तसें करणें क्षत्रियांना योग्यच
आहे; तथापि तो **चंडमहासेन** देवीच्या प्रसा-
दानें सांप्रत मोठा बलाढ्य झाला असून त्याच्या
राजधानीभोंवतीं मोठा मजबूद कोट आहे; यामुळें

त्याला जिंकून बलात्कारानें त्याची कन्या आणणें तूर्त अशक्य आहे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे आपणासारखा योग्य जामात त्याला कोणीही मिळणार नाहीं, व आपणालाही **वासवदत्ते**-सारखी स्त्री सारी पृथ्वी धुंडाळिली तरी कोठें मिळणार नाहीं; यासाठीं आपण होऊनच तिच्याविषयीं तिच्या बापाजवळ मागणी करावी हें मला बरें वाटतें, व असें करणें क्षात्रधर्माला विरुद्धही नाहीं."

तिकडे **उज्जयिनी**मध्यें **चंडमहासेन**ही **वत्सराजा**ला कोणत्या युक्तीनें वश करावें याविषयीं विचार करीत होता. **वत्सराजा**ला मृगयेचा नाद फार असून हत्ती धरण्याकरितां तो एकटाच अरण्यामध्यें फिरत असतो हें त्याला माहीत होतें; ह्मणून त्यानें असा बेत केला कीं, तो मृगयेस गेला ह्मणजे संधी साधून युक्तीनें त्याला पकडून आपल्या घरीं आणावें, आणि तो नृत्यगायनादि

कलांत निपुण आहे, यासाठीं त्या कला आपल्या कन्येला शिकविण्याकरितां त्याला शिक्षक करून ठेवावें, ह्मणजे नेहमीं तिच्या व त्याच्या बैठका एका ठिकाणीं होत जातील. असें झालें ह्मणजे अर्थातच उभयतांचें प्रेम एकमेकांवर बसेल व त्या योगानें त्याला जामात करण्याचा जो आपला हेतु आहे तो अनायासें सिद्ध होईल. याप्रमाणें मनांत बेत योजून तो निर्विघ्नपणें शेवटास जावा ह्मणून **चंडिकेच्या** देवालयांत जाऊन तिची तो आराधना करीत बसला. तेव्हां, "राजा, तुझ्या मनांतील हेतु लवकरच पूर्ण होईल, तू कांहीं काळजी करूं नको" अशी आकाशवाणी त्याच्या कानीं पडली. ती ऐकतांच संतुष्ट होत्साता तो राजवाड्यांत आला आणि **बुद्धदत्त** नांवाच्या आपल्या प्रधानाला बोलावून आणवून त्याला त्यानें तें आपलें मनोगत व त्याच्या सिद्धीसाठीं झालेली आकाशवाणी कळविली व त्याची त्या

कामांत काय सल्ला आहे ती विचारिली. तो प्रधान मोठा चतुर होता. त्यानें विचार करून राजाला सांगितलें, "महाराज, तो **वत्सराज** मोठा अभिमानी, बलाढ्य आणि निस्पृह आहे व त्याच्या जीवास जपणारे असे हुशार सेवक त्याच्याजवळ नेहमीं असतात, ते त्याला अशा कपटयुक्तीनें कधीं फसूं देणार नाहींत, व कपटानें त्याला धरून आणण्यांत कांहीं पुरुषार्थही नाहीं; यासाठीं प्रथम सामोपचारानेंच निरोप पाठवून आपल्या मनांतील हेतु त्याला कळवावा, आणि तो जर नच ऐकेल—तो ऐकणार नाहीं हें खचित आहे—तर मग आपण ह्मणतां त्याप्रमाणें कपटयुक्तीनें त्याला धरून आणावें हें मला बरें दिसतें. **चंडमहासेना**ला ही सल्ला पसंत पडली, आणि त्यानें लागलाच एक दूत **वत्सराजा**कडे पाठवून त्याला असा निरोप कळविला कीं, "माझ्या कन्येच्या मनांत नृत्यगायनवाद-

नादि कला शिकावयाच्या आहेत, व तुह्मी त्या विद्येंत चांगले अभिज्ञ आहां; यासाठीं आमच्याविषयीं तुमच्या मनांत जर कांहीं प्रेमभाव वागत असेल तर एथें आमच्या घरीं कांहीं दिवस वास करून तिची इच्छा पूर्ण करावी." हा निरोप घेऊन दूत **कौशांबीस** गेला आणि त्यानें तो **वत्सराजा**ला कळविला. तो ऐकतांच त्याला मोठें आश्चर्य वाटलें व **चंडमहासेना**च्या उद्धतपणाबद्दल अतिशय रागही आला; तथापि त्यावेळीं त्या दूताशीं त्या संबंधाचें कांहींएक भाषण न करितां, 'विचार करून या निरोपाचा जबाब उदयिक देऊं' एवढेंच त्यानें सांगितलें. नंतर **यौगंधरायणा**ची एकांतांत गांठ घेऊन त्याला त्यानें तें वर्तमान कळविलें. राजाला त्या निरोपाचें मोठें गूढ पडलें होतें. तो **यौगंधरायणाला** ह्मणाला, "प्रधानजी, या उन्मत्त राजानें असा गर्विष्ठपणाचा व माझ्या योग्यतेस सर्वथैव अनुचित

असा जो हा निरोप पाठविला यांतील इंगित काय बरें असावें ? तो दुरात्मा मला इतका नीच समजतो काय ?" राजाच्या वृत्तीला आलीकडे विपर्यास होऊन तो फार विषयासक्त झाला होता व स्वच्छंदानें वागत असून राज्यकारभारांत तो कांहींच मन घालीत नसे, यामुळें त्याचे मंत्री राज्याचें कसें होईल याविषयीं मोठ्या फिकिरींत पडले होते. अशा वेळीं **चंडमहासेना**कडून आलेला निरोप त्यांच्या मोठ्या पथ्यावर पडला. राजाची चांगली कानउघडणी करून त्याला शुद्धीवर आणण्यास ही संधी चांगली आहे असा विचार करून **यौगंधरायण** त्याला ह्मणाला, "महाराज, **चंडमहासेना**च्या निरोपांतील इंगितार्थ काय आहे ह्मणून आपण मला विचारितां, तर त्याबद्दल आपणच आपल्या मनाशीं विचार करून पहाल तर तो सहज ध्यानांत येण्यासारखा आहे. मीं तो सांगितला असतां रोग्याला

मधुरान्नही जसें विषतुल्य लागतें तसें माझें भाषण आपणास कदाचित् अप्रिय वाटेल." राजा ह्मणाला, "प्रधानजी, तुह्मी मोठे स्वामिभक्त आणि चतुर आहां; यासाठीं या निरोपांत काय कारस्थान उभारलेलें आहे, याबद्दल प्रथम तुमचा अभिप्राय मला समजलाच पाहिजे." राजाचा हा आग्रह पाहून **यौगंधरायण** ह्मणाला, "महाराज, मी जें कांहीं बोलणार तें राज्याचें व आपलें हित व्हावें या बुद्धीनें बोलणार आहें; यासाठीं माझ्या भाषणांत कांहीं कठोर अथवा उपमर्द करणारे शब्द आल्यास महाराजांनीं त्याबद्दल मला क्षमा केली पाहिजे. महाराज, मी बोलतों तें नीट लक्ष देऊन ऐका, व त्याचा स्थिरचित्तानें आणि शांतपणानें विचार करा. आपण विषयलंपट होऊन स्वच्छंदपणाचें वर्तन करीत असतां, व राज्यकारभारांत बिलकुल मन घालीत नाहीं, ही बातमी चोहोंकडे पसरली आहे, व त्यामुळें शत्रु आपलें

राज्य घेण्याच्या खटपटींत आहेत. **चंडमहासेनाकडून** आपणास जो हा अत्यंत अपमानकारक निरोप आला आहे तो या आपल्या वर्तनाचाच परिणाम होय. आपण स्त्रैण आणि छांदिष्ट झालां आहां असें पक्कें समजून त्यानें हा निरोप पाठविला आहे. त्याची कन्या **वासवदत्ता** अत्यंत लावण्यसंपन्न आहे अशी ख्याति आपण ऐकिलीच आहे व तिच्यावर आपलें मनही बसलें आहे हें तो जाणून आहे. तेव्हां तिचा लोभ दाखवून कांहीं तरी निमित्तानें आपणास आपल्या घरीं न्यावें आणि खळग्यांत पडलेला जंगली हत्ती जसा धरून बांधून ठेवितात त्याप्रमाणें आपणास कैद करून ठेवावें असा त्याचा मतलब दिसतो. हा मतलब साध्य झाला ह्मणजे मग आपलें राज्य हिसकून घेण्यास त्याला कांयि उशीर लागणार ? यासाठीं मी विनंति करून सांगतों कीं, हीं दुर्व्यसनें आपण सोडून द्या,

व राज्यकारभारांत मन घाला. असें कराल तरच आपल्या पूर्वजांची कीर्ति आणि वैभव आपल्या हातून कायम राहील." **वत्सराज** जरी विषयासक्त झाला होता तरी तो मोठा विचारी असे. त्यानें **यौगंधरायणा**चें हें भाषण शांतपणानें ऐकून घेतलें व तें त्याचें ह्मणणें त्याला सर्वांशीं खरेंही वाटलें. नंतर उभयतांचा एकविचार होऊन राजानें **चंडमहासेना**कडे आपल्या दूताबरोबर असा जबाब पाठविला कीं, "तुमचा निरोप आह्मांस समजला. तुमच्या कन्येला गायनवादनादि कला शिकविण्याचें काम तुह्मीं आम्हांवर सोंपविलें हा मोठा अनुग्रहच झाला असें आह्मी समजतों; पण तुमच्या इच्छेप्रमाणें मात्र तो योग घडवून आणण्याला सवड नाहीं, ह्मणून आह्मांस फार दिलगिरी वाटते; यासाठीं तुमची मर्जी असेल तर तिलाच आमच्या घरीं पाठवून द्या ह्मणजे मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतील."

राजानें वरकांतीं असा जबाब पाठविला खरा; पण **चंडमहासेना**नें जो त्याचा अपमान केला होता त्याबद्दल तो अंतःकरणांत फारच जळूं लागला. दूत **उज्जयनीस** गेल्यावर दुसरे दिवशीं राजानें **यौगंधरायणा**ला जवळ बोलाविलें आणि विचारिलें कीं, "प्रधानजी, त्या दांडग्या **चंडमहासेना**चा निरोप तुह्मीं ऐकिलाच आहे. माझ्या मनांत या उन्मत्तपणाबद्दल त्याची खोड मोडण्यासाठीं त्याच्यावर स्वारी करून त्याला बांधून कैद करून एथें आणावें असें आहे, तर याविषयीं तुमचें कसें काय मत आहे?" राजाचें हें भाषण ऐकून तो बुद्धिमान् प्रधान ह्मणाला, "महाराज, आपण ह्मणतां तसें करणें रास्त आहे खरें; परंतु सांप्रतच्या स्थितींत तसें करण्यापासून कांहीं उपयोग होणार नाहीं असें मला वाटतें; कारण हल्लीं आपल्याजवळ सैन्याची चांगलीशी तयारी नाहीं, व पूर्वीं मी आपणास सांगितलेंच

आहे कीं, देवीच्या प्रसादानें तो सर्वांस अजिंक्य झाला आहे; यासाठीं आपण मनांत आणिलेली गोष्ट तूर्त एकीकडे राहूं द्या. पुढें प्रसंग पाहून युक्तिप्रयुक्तीनें त्याचा विचार करितां येईल." **वत्सराजाचें** मन **वासवदत्तेवर** फारच बसलें असल्यामुळें तिच्या बापास जिंकून तिचें हरण करावें असें त्याच्या मनांत फार होतें; पण प्रधानाचें अनुमोदन त्या गोष्टीस मिळेना, ह्मणून पाठविलेल्या निरोपाचा परिणाम काय होतो तो अगोदर पहावा व त्याप्रमाणें पुढील तजविजीस लागावें असें मनांत आणून दूताची वाट पहात कांहीं दिवस तो स्वस्थ राहिला.

**वत्सराजानें** पाठविलेला दूत थोडे दिवसांनीं **उज्जयिनीस** जाऊन पोंचला. त्यानें **चंडमहासेनाची** भेट घेऊन त्याला आपल्या यजमानाचा निरोप कळवितांच तो मोठ्या विचारांत पडला, व आपल्या मनांत ह्मणूं लागला, "हा

**वत्सराज** मोठा मानी असल्यामुळें स्वसंतोषानें एथें येणार नाहीं असें मला वाटलेंच होतें, व तेंच शेवटीं प्रत्ययास आलें. बरें, कन्येला त्याच्याकडे पाठवावी तर तसेंही करणें योग्य नाहीं; कारण त्या योगानें आपल्याकडे कमीपणा येईल; यासाठीं कांहीं तरी युक्ति लढवून त्यालाच पकडून एथें आणावें, यावांचून आपला हेतु सिद्ध होण्याला दुसरा मार्गच नाहीं." असा विचार करून त्यानें आपली प्रधानमंडळी एकत्र जमविली आणि सर्वांच्या मसलतीनें, त्याच्याजवळ जो **नडागिरि** नांवाचा हत्ती होता त्याच्यासारखाच थेट दिसणारा असा एक भला मोठा कृत्रिम हत्ती त्यानें तयार करविला, व त्याच्या पोटांत कित्येक शस्त्रधारी वीर पुरुष गुप्तरूपानें बसवून त्याला **विंध्यारण्या**मध्यें नेऊन उभा केला. **वत्सराजा**ला हत्तीची शिकार करण्याचा फार नाद असल्यामुळें त्याचे शिकारी लोक नेहमीं त्या अ-

रण्यामध्यें फिरत असत. त्यांच्या तो कृत्रिम हत्ती कळेच्या योगानें इकडे तिकडे संचार करीत असतांना दुरून दृष्टीस पडला, तेव्हां तत्क्षणींच ते धांवत धांवत वत्सराजाकडे गेले आणि ह्मणाले, "महाराज, **विंध्याटवी**मध्यें फिरत असलेला एक हत्ती आज आह्मांस आढळला. तो एवढा मोठा धिप्पाड आहे कीं, त्याला पहातांच हा गगनाला व्याप्त करणारा जंगम **विंध्याद्रीच** आहे कीं काय असा आह्मांस भास झाला! खरोखरच महाराज, आह्मांस असें वाटतें कीं, एवढा मोठा प्रचंड हत्ती या पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही स्थळीं सांपडावयाचा नाहीं." ही बातमी समजतांच **वत्सराजा**ला इतका आनंद झाला कीं, त्यानें त्या शिकारीलोकांस मोठमोठीं इनामें देऊन संतुष्ट केलें. त्याला वाटलें कीं, हा हत्ती जर आपल्या हातीं लागेल तर **चंडमहासेन** आपल्या मुठींत सांपडल्यासारखाच आहे, व

असें झालें ह्मणजे **वासवदत्ता** तो स्वतःच आणून आपल्या हवालीं करील. त्याच्याजवळ **नडागिरि** नांवाचा हत्ती आहे, ह्मणून तो इतका प्रबळ आणि रगेल झाला आहे; पण त्याच्यावरही तान करणारा हा हत्ती मला प्राप्त झाला तर त्याला मी पाहिजे तसा वांकवीन. याप्रमाणें विचार करून त्यानें ती रात्र जशीतशी घालविली. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं त्यानें तें वर्तमान व आपले विचार प्रधान **यौगंधरायणा**ला कळविले, आणि कांहीं सैन्य व शिकारीलोक बरोबर घेऊन त्या अरण्यांत जाण्याविषयीं प्रस्थान केलें. प्रधानानें यावेळीं प्रस्थान केलें असतां काय फलप्राप्ति आहे तें ज्योतिष्यांकडून पाहविलें, तेव्हां ते ह्मणाले कीं, या मुहूर्तावर प्रयाण केलें असतां राजाला भार्येचा लाभ होईल; पण कांहीं दिवस कारागृहवास भोगावा लागेल, असा या वेळेचा योग आहे. हें ऐकून **यौगंधरायणानें** रा-

जाला यावेळीं प्रयाण करण्याविषयीं पुष्कळ मोडता घातला; पण त्याचें न ऐकतां व ज्योतिष्यांनीं सांगितलेल्या भाकितालाही न जुमानितां त्यानें **विंध्यारण्या**ची वाट धरिली. त्या अरण्याच्या सीमेवर पोंचतांच, सैन्याच्या गोंगाटानें तो हत्ती बुझून कदाचित् पळून जाईल, ह्मणून त्यानें आपलें सैन्य तेथेंच ठेविलें आणि शिकारीलोक मात्र बरोबर घेऊन व आपली ती आवडती **घोषवती** वीणा हातांत धरून तो पुढें चालला. जातां जातां त्या अरण्याच्या दक्षिणभागांत तो येऊन पोंचला, तेव्हां खऱ्या सजीव हत्तीप्रमाणें हुबेहूब दिसणारा तो कृत्रिम हत्ती शिकाऱ्यांनीं त्याला दुरून दाखविला. त्याला पाहतांच त्याला कोणत्या युक्तीनें पकडावा याविषयीं विचार करीत व एकीकडे ती सुस्वर वीणा वाजवीत आणि मधुर गायन करीत तो एकटाच हळू हळू त्या हत्ती-

जवळ जाऊन पोंचला. यावेळीं संध्याकाळ झाला असल्यामुळें थोडासा अंधकार पडला होता, व राजा आपल्या तानबाजींत आणि वीणावादनांत गुंग असल्यामुळें त्यानें आजपर्यंत जरी पुष्कळ हत्ती धरिले होते, तरी हा तशाचप्रकारचा सजीव हत्ती नसून यंत्रानें बनविलेला आहे हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. इतक्यांत तो हत्तीही आपले कान उभारून आपण गायनास लुब्ध झालों आहों असें दाखवूं लागला. त्याच्या पोटांत हत्यारबंद शिपाई बसविलेले होते, ते कळ दाबून राजा जसजसा जवळ येई तसतसे त्या हत्तीला हळू हळू मागें हटवूं लागले. अशी चाळवणूक करतां करतां तो हत्ती बराच दूर गेला व राजाही त्याच्या मागोमाग जाऊं लागला. नंतर राजा आपल्या चांगला आटोक्यांत आला असें पाहून ते हत्यारबंद लोक एकदम त्या हत्तीच्या पोटांतून बाहेर पडले आणि त्यांनीं

आपलीं हत्यारें उपसून **वत्सराजाच्या** सभों-वतीं गराडा घातला! एवढा प्रसंग अकस्मात् येऊन गुदरला तरी तो शूर राजा यत्किंचितही घाबरला नाहीं. त्याच्या कमरेस तलवार लट-काविलेली होती, ती उपसून मोठ्या आवेशानें तो त्यांच्याशीं लढूं लागला; पण कसा झाला तरी तो एकटा होता, यामुळें त्याचें कांहीं चा-ललें नाहीं. त्याच्या मागच्या बाजूनें कांहीं लोकांनीं येऊन त्याला तेथल्या तेथें बंदिवान केलें आणि जवळच **चंडमहासेन** सैन्याचा तळ देऊन राहिला होता तिकडे नेलें. **वत्सरा-जाला** अशी कपटयुक्ति करून कैद केलें यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं हें **चंडमहासेन** जाणत होता; ह्मणूनच तो जवळ येत आहे असें सम-जतांच तो त्याला सामोरा गेला आणि मोठ्या सन्मानानें त्याला बरोबर घेऊन **उज्जयिनी**कडे जाऊं लागला. **वत्सराज** स्वरूपानें फारच

देखणा होता, यामुळें त्याचा प्रवेश नगरांत होऊं लागला त्यावेळीं चंद्रावर कलंक असूनही तो जसा नेत्रांस आल्हादकारक होतो तसा, अपमानरूप कलंकानें जरी तो दूषित होऊन निस्तेज दिसत होता, तरी त्याचा तो मुखचंद्र पहातांच आज आमच्या नेत्रांचें पारणें फिटलें असें **उज्जयिनीं**तील सर्व स्त्रिया व पुरुष ह्मणूं लागले. सांपळ्यांत सांपडलेला व्याघ्र जसा दीन होतो तशी त्याची पराधीन स्थिति पाहून सर्व लोक दुःखानें हळहळूं लागले, व आतां आपला दुष्ट राजा त्याला ठार मारतो कीं काय अशी त्यांना भीति पडली. **वत्सराज** ह्मणतात तो हाच असें समजतांच त्याचे गुण आठवून सर्व नागरिकजन त्याच्यावर इतके अनुरक्त झाले कीं, त्याचा बचाव करण्यासाठीं आपल्या प्राणांचेही बलि देण्याचा त्यांनीं निश्चय केला! आपल्या प्रजाजनांमध्यें अशाप्रकारची चाललेली

कुजबूज **चंडमहासेनाच्या** कानावर आली, तेव्हां त्यांचा क्षोभ शांत होण्याकरितां त्यानें सर्वांस असें जाहिर केलें कीं, **वत्सराज** जो मी एथें आणिला आहे तो त्याचा जीव घेण्याकरितां नव्हे, तर त्याच्याशीं स्नेहभाव वाढविण्याकरितां होय. एथें असतां त्याच्या जीवास यत्किंचित्ही धोका लागणार नाहीं, हें सर्वांनीं पक्कें समजावें. हें राजाचें आश्वासन मिळतांच सर्वांचें समाधान होऊन जिकडे तिकडे शांतता झाली. नंतर **चंडमहासेनानें** गंधर्वशाळेमध्यें एका एकांतस्थळीं **वत्सराजाला** राहण्यासाठीं जागा नेमून दिली, आणि **वासवदत्तेला** त्याच्या स्वाधीन करून मोठ्या अदबीनें तो त्याला ह्मणाला, "वत्सराज, तुह्मी एथें स्वस्थ राहून आमच्या कन्येला गांधर्वविद्येंत प्रवीण कराल तर तेणेंकरून तुमचें कल्याण होऊन तुमच्या मनांतील सर्व हेतु पूर्ण होतील. तुह्मी एथें जरी नजर

कैदेंत आहां तरी त्यापासून तुमच्या जीवाला कांहीं अपाय होईल ही शंका मनांतदेखील आणूं नका, व त्याबद्दल कांहीं विषादही मानूं नका." **चंडमहासेना**च्या मनांत खरोखरच **वासवदत्ता वत्सराजा**ला अर्पण करावयाची होती; परंतु तो अत्यंत मानी असल्यामुळें आपली कन्या आपण होऊन देतों असें ह्मटल्यावांचून तिचा स्वीकार करणार नाहीं हें तो पक्कें समजून होता; ह्मणूनच कांहीं तरी युक्ति करून त्या दोघांचा सहवास घडेल असें करावें, ह्मणजे त्यांचें प्रेम एकमेकांवर जडून सहजच आपला कार्यभाग होऊन जाईल, हें मनांत आणून त्यानें हा विलक्षण व्यूह रचिला होता.

याप्रमाणें **वत्सराज** आणि **वासवदत्ता** या उभयतांचा नेहमीं सहवास घडूं लागला. तिला पाहून वत्सराजाचें मानस अगदीं तल्लीन होऊन गेलें. तिचेही नेत्र आणि मन हीं दोन्ही त्याच्या

हृदयांत अगदीं खिळून बसलीं. लज्जेनें केव्हां केव्हां ती आपले डोळे मात्र मागें फिरवी; पण मन जें त्याच्या हृदयांत घट्ट ठाणें धरून बसलें होतें तें कांहीं केल्यानें तेथून भ्रष्ट होईना. अंकावर **घोषवती** वीणा, कंठांत गायनाचे मधुर आलाप, आणि पुढें चित्ताला रमविणारी ती **वासवदत्ते**ची सुंदर मूर्ति, अशा थाटानें बसून तो तिला गांधर्वविद्येचें शिक्षण प्रत्यहीं देऊं लागला. तो आपल्या बापाचा कैदी आहे हें मनांत न आणितां त्याच्या गुणरूपांला लुब्ध होऊन तीही त्याची मनापासून सेवा करूं लागली. होतां होतां त्या उभयतांमधील गुरुशिष्यिणीचें नातें एका बाजूस राहून त्यांच्यामधील भावी संबंध व्यक्त करणाऱ्या प्रेमाचे अंकुर जे पूर्वींच उभयतांच्या हृदयांत उद्भूत झाले होते ते जोरानें वाढूं लागले.

इकडे **विंध्याटवी**मध्यें **वत्सराजाला** चंड

**महासेना**च्या लोकांनीं धरून नेलें त्यावेळीं त्याच्याबरोबर जे कांहीं लोक होते त्यांनीं तें वर्तमान **कौशांबीस** येऊन प्रधान **यौगंधरायणा**ला कळविलें. आपल्या आवडत्या राजाला परकीय राजानें कपटानें धरून कैद केलें ही बातमी समजतांच सर्व राष्ट्रांत एकच गडबड होऊन गेली. सर्व प्रजा अत्यंत क्रुद्ध झाली, आणि **उज्जयिनी**वर स्वारी करून **चंडमहासेना**ची चांगली खोड मोडावी व राजाला सोडून आणावें असा निश्चय करून त्या कामाकरितां सर्व लोकांनीं एकदम कमरा बांधिल्या. त्यांनीं सेनापति **रुमण्वान्** याजकडे जाऊन सर्व सैन्य लवकर तयार करण्यास सांगितलें. **रुमण्वान्** मोठा विचारी आणि दूरदर्शी होता. सांप्रत आपला राजा एकटाच शत्रूच्या हातीं लागला आहे, तेव्हां आपण त्याच्यावर अशा वेळीं स्वारी केली तर राजाच्या जीवास कदाचित् कांहीं अ-

पाय घडेल, याकरितां कांहीं तरी युक्ति लढवून प्रथम त्याला सोडवून आणावें आणि नंतर युद्ध करून शत्रूचें पारिपत्य करावें हें बरें असा विचार करून त्यानें प्रजाजनांला तो विचार कळवून त्यांचीं मनें स्थिर केलीं, आणि **यौगंधरायणा**ची भेट घेऊन त्याचा त्या कामांत काय अभिप्राय आहे तो विचारिला. तो प्रधानही मोठा बुद्धिमान् आणि चाणाक्ष होता. त्याला **रुमण्वाना**नें काढिलेली कल्पना तेव्हांच पसंत पडली. नंतर सर्व प्रधानमंडळी आणि सरदारलोक एकत्र जमवून तो त्यांस ह्मणाला, "मित्रहो, प्रसंग तर मोठा आणिबाणीचा येऊन गुदरला आहे. **चंडमहासेन** मोठा प्रबळ असून उन्मत्त झाला आहे व सध्याच्या आपल्या स्थितींत त्याच्याशीं सामना करून त्याला जिकणें अशक्य आहे, यासाठीं सेनापतींनीं सांगितलेली मसलतच या समयीं मला योग्य वाटते. सांप्रत आपली सर्व

प्रजा राजनिष्ठ आहे, यामुळें राज्यांत कांहीं फंद-फितूर होण्याची भीति बाळगावयास नको; यासाठीं तुह्मीं सर्वांनीं एकदिलानें एथें राहून आपापलीं कामें दक्षतेनें पहात जावीं व आपला पराक्रम दाखविण्याची वेळ येई तोंपर्यंत राज्याचें संरक्षण करावें. मी **वसंतकाला** बरोबर घेऊन गुप्त रीतीनें **उज्जयिनी**स जातों आणि आपल्या बुद्धीच्या प्रभावानें कांहीं अचाट युक्ति योजून राजाला खचित सोडवून आणितों. किल्ल्याचे कोट फोडून आंत प्रवेश कसा करावा, बेड्या कशा तोडाव्या, लोक आपणाला दिसावे; पण आपणमात्र त्यांना दिसूं नये, इत्यादि क्रिया योगबलानें मला चांगल्या अवगत आहेत त्या प्रसंग पडेल तशा योजून मी हें काम फत्ते करितों. उगीच उतावळी करून उपयोग नाहीं. पाण्यानें भरलेल्या ढगांच्या घर्षणापासून उत्पन्न होणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें आपत्काळीं संकटांतून

सुटका करून घेण्याची ज्याला कल्पना सुचते त्यालाच धीर पुरुष ह्मणावें; यासाठीं तुह्मी स्वस्थ राहा, कांहीं काळजी करूं नका." याप्रमाणें सांगून व **रुमण्वाना**च्या हातांत सर्व राज्यकारभार देऊन **वसंतका**सहवर्तमान तो जो **कौशांबीहून** निघाला तो थेट त्या दुर्गम **विंध्याटवी**मध्यें जाऊन पोंचला. त्या अरण्यामध्यें **पुलिंदक** या नामेंकरून एक जंगली लोकांचा राजा रहात असे, त्याचें **वत्सराजा**शीं फार सख्य होतें. त्याची भेट घेऊन त्याला त्यानें आपल्या येण्याचें कारण कळविलें, आणि **वत्सराज** त्या मार्गानें आला असतां त्याचें संरक्षण करण्याकरितां पुष्कळ सैन्यानिशीं तूं तयार रहा असें सांगून **यौगंधरायण** **वसंतका**सहवर्तमान **उज्जयिनी**कडे चालता झाला. त्या नगराजवळ जातां जातां त्याला रात्र झाली, ह्मणून नगराबाहेर **महाकालेश्वरा**ची स्मशानभूमि होती, तेथेंच

रातोरात त्यानें मुक्काम केला. मध्यरात्रीचा समय होतांच तेथें वेताळ, भूत पिशाच इत्यादिकांची गर्दी झाली त्यामुळें तें स्थान फारच भयंकर दिसूं लागलें. जिकडे तिकडे प्रेतें जळत असल्यामुळें त्यांच्या दुर्गंधानें व चितांमधून निघत असलेल्या काळ्या कुळकुळीत धुरानें ती भूमि अगदीं भरून गेली. **यौगंधरायण** स्वतः मांत्रिक व योगाभ्यासी असल्यामुळें त्याला त्या भूतादिकांचें कांहीं भय वाटलें नाहीं; पण **वसंतका**ची मात्र तेथील तो भयंकर देखावा पाहून भीतीनें अगदीं गाळण झाली. त्याला **यौगंधरायण** धीर देऊन स्वस्थ करीत आहे, इतक्यांत त्या भूतांचा अधिपति **योगेश्वर** नांवाचा एक ब्रह्मराक्षस त्या ठिकाणीं आला. त्यानें **यौगंधरायणा**ला पहातांच त्याच्या मनांत त्याच्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न होऊन तूं कोण आहेस व एथें कशाकरितां आलास वगैरे हकीकत विचा-

रिली. **यौगंधरायणानें** आपली सर्व हकीकत कळवितांच तो ब्रह्मराक्षस ह्मणाला, "तू आज- पासून माझा मित्र झाला आहेस, यासाठीं तुला पाहिजे असेल त्या प्रकारचें साह्य करण्यास मी तयार आहें." **यौगंधरायणानें** या आश्वासना- बद्दल त्याचे फार आभार मानिले आणि ही संधि साधून आपणास पाहिजे तें रूप घेण्याची विद्या त्याजवळून मागून घेतली. नंतर कांहीं वेळ ते इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसले, तों इतक्यांत उजाडलें. तेव्हां तो ब्रह्मराक्षस व वेताळादि त्याचे सर्व अनुचर एकाएकीं अदृश्य झाले.

आपला बेत सिद्धीस नेण्याचें साधन–ब्रह्मरा- क्षसानें दिलेली विद्या–प्राप्त झाल्यामुळें **यौगंध- रायणाला** अत्यंत हर्ष झाला. त्यानें त्या वि- द्येच्या सामर्थ्यानें आपलें रूप लागलेंच पालटलें. अतिशय ह्मातारा, पाठीवर कुबड आलेला, अ-

त्यंत कुरूप, डोक्यावर टक्कल पडलेला, दिसण्यांत वेडगळ, ज्याला पाहातांच लोकांना हसतां हसतां पुरे होईल अशा प्रकारचा तो चमत्कारिक मनुष्य बनला. **वसंतका**चेंही रूप त्यानें त्याच विद्येच्या प्रभावानें एका क्षणांत बदललें. डेऱ्यासारखें पोट, दांत बाहेर आलेले, व सर्वांग शिरांनीं भरलेलें, असा तो अत्यंत विरूप दिसूं लागला. याप्रमाणें तयारी करून त्यानें **वसंतका**ला प्रथम पुढें राजवाड्याकडे पाठवून दिलें. आणि आपण पाठीमागून हळू हळू तिकडे जाऊं लागला. त्याचें तें विलक्षण रूप पाहून रस्त्यांतील पोरांना मोठी मौज वाटली. तीं त्याच्या सभोंवतीं जमा होऊन कोणी त्याला नाचावयास सांगूं लागलीं, कोणी गावयास सांगूं लागलीं. त्या त्याप्रमाणें नाचत व गात व सर्वांच्या मनाला करमणूक करीत तो राजवाड्याजवळ येऊन पोंचला. **वसंतक** अगोदरच तेथें जाऊन दाखल

झाला होता. तेथील राजाच्या सेवकांना या दोन्ही विलक्षण मूर्ति पाहून फारच कौतुक वाटलें. हळू हळू ती बातमी **वासवदत्तेच्या** कानावर गेली. लहान वयांत मुलांना काय आणि मुलींना काय, अशा प्रकारची मौज पाहण्याची व थट्टामस्करी करण्याची फार आवड असते. तिनें बाहेर कोणी गमती माणसें आलीं आहेत असें ऐकतांच आपल्या एका दासीला पाठवून त्या दोघांना गंधर्वशाळेंत बोलाविलें; पण **यौगंधरायण वसंतकाला** तेथेंच ठेवून आपण एकटाच प्रथम **वासवदत्ते**कडे गेला. त्याची गम्मत पाहण्यांत ती गुंतली असतां त्याची नजर पायांत बिड्या पडलेल्या **वत्सराजाकडे** गेली. त्याची ती परतंत्र स्थिति पाहून त्या राजनिष्ठ प्रधानाला जें दुःख झालें त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! त्याच्या डोळ्यांतून दुःखाश्रूंचे बिंदु टपटप गळूं लागले. त्यानें

**वासवदत्ते**ला न समजूं देतां **वत्सराजा**ला कांहीं इशारा केला तो पाहून हा कोण मनुष्य असावा याविषयीं त्याला मोठें गूढ पडलें. नंतर कांहीं वेळ तो त्याच्याकडे निरखून पाहूं लागला, तेव्हां हा आपला प्रधान **यौगंधरायण** वेष पालटून आपल्या भेटीस आला आहे अशी त्याला ओळख पटली. इतक्यांत मंत्रसामर्थ्यानें **यौगंधरायण, वासवदत्ता** व तिची दासी यांना दिसेनासा झाला. फक्त राजाला मात्र तो दिसत होता. हा चमत्कार होतांच त्या दोघीजणी अत्यंत विस्मित होऊन, "अरे, तो वेडगळ म्हातारा आतां एथें होता आणि इतक्यांत एकाएकीं कोठें नाहींसा झाला ! हें काय चेटुक असेल कोण जाणे," असें म्हणूं लागल्या. त्यावरून **वत्सराजा**नें जाणलें कीं, हा योगबलानें या दोघींनाही दिसत नाहीं हें खचित आहे, आणि हीच संधि याच्याशीं भाषण करण्यास चांगली

आहे, असें मनांत आणून **वासवदत्तेला** दासी-
सहवर्तमान तेथून कांहीं तरी निमित्तानें घा-
लवून द्यावी ह्मणून तो तिला ह्मणाला, "राज-
कन्ये, **सरस्वती**पूजनाची वेळ झाली, यासाठीं
पूजासाहित्य लवकर जाऊन घेऊन ये." ही गु-
रुजींची आज्ञा होतांच बरें आहे, असें ह्मणून
दासीसहवर्तमान ती तेथून निघून गेली. याप्र-
माणें **वत्सराजा**ची अगदीं एकांतस्थळीं गांठ प-
डतांच **यौगंधरायणा**नें वेष बदलून तेथें ये-
ण्याचा आपला हेतु व पुढील सर्व बेत थोडक्यांत
त्याला कळविला. नंतर कारागृहांतून मुक्तता
होण्यासाठीं पायांतील बेड्या तोडण्याचा मंत्र व
वीणेच्या मधुरस्वरानें स्त्रियांना वश करण्याचा
मंत्र हे त्यानें त्याला शिकविले. इतकी तयारी
झाल्यावर तो राजाला ह्मणाला, "महाराज,
**वसंतकाला**ही रूप बदलून मी आपल्याबरोबर
घेऊन आलों आहें, व तो राजवाड्याच्या दर-

वाज्यांत उभा आहे. त्याला कांहीं तरी युक्ति करून तुह्मी आपल्याजवळ ठेवून घ्या; कारण पुढील कार्यभाग साधण्यास तो चांगला उपयोगीं पडेल. वशीकरणाचा जो मी मंत्र तुह्मांस शिकविला आहे त्याच्या योगानें ही राजकन्या लवकरच तुह्मांला वश होईल. ती पक्की तुमच्या हातांत आली ह्मणजे पुढें काय करावयाचें तें मी तुह्मांस कळवीन, तोंपर्यंत स्वस्थ राहा." याप्रमाणें सांगून **यौगंधरायण** तेथून निघून गेला. इतक्यांत **वासवदत्ता** पूजेचें साहित्य घेऊन परत आली. तिला **वत्सराज** ह्मणाला, "**सरस्वती**ची पूजा झाल्यावर तिच्या सांगतेकरितां ब्राह्मणाला दक्षणा दिली पाहिजे; यासाठीं कोणी एकादा गरीब ब्राह्मण बाहेर उभा असेल तर दासीला पाठवून त्याला एथें बोलावून आण." तिनें बरें आहे ह्मणून दासीला पाठविलें. ती बाहेर जाऊन पाहूं लागली तों विरूप वेष धारण

करून **वसंतक** उभा होता तो तिच्या दृष्टीस पडला. त्याला घेऊन ती आंत आली. तेथें **वत्सराज** बसलाच होता. आपल्या धन्याची ती दुःखमय स्थिति पाहून त्या भोळ्या ब्राह्मणाचे डोळे दुःखाश्रूंनीं भरून आले. त्याला दुःख होण्याचें कारण राजाला समजलेंच; पण **यौगंधरायणानें** केलेल्या मसलतीची परिस्फुटता न व्हावी ह्मणून तो त्या ब्राह्मणाला ह्मणाला, "भटजीबावा, तुह्मी रडतां याचें कारण माझ्या ध्यानांत आलें आहे. रोगामुळें तुमच्या देहाला यातना होत आहेत व विरूपता आली आहे, हें मी समजतों; पण कांही चिंता नाहीं. मी औषधोपचार करून तुह्माला बरे करीन, तोंपर्यंत कांहीं काळजी न करितां तुह्मी एथेंच मजजवळ स्वस्थ रहा." **वसंतकाला** तेथें राहणें इष्टच होतें. तो राजाचे आभार मानून ह्मणाला, "महाराज, एवढी मज गरीबावर दया कराल तर

मजवर आपले अनंत उपकार होतील." हा संवाद चालला असतां **वत्सराज वासवदत्तेची** नजर चुकवून त्याच्याकडे पाहून गालांतल्या गालांत हसूं लागला. त्याला त्याचें तें विरूप शरीर पाहून मोठी मौज वाटली. राजाच्या मनांतील आशय जाणून **वसंतक**ही तोंडें अधिकच वेडींवांकडीं करून हसूं लागला व नानाप्रकारच्या चेष्टा करून नाचूं बागडूं लागला. तें पाहून **वासवदत्ते**ला मोठी गम्मत वाटली. तिला वाटलें कीं, आपल्याला करमणूक होण्याकरितां हा मदनाचा पुतळा चांगला उपयोगीं पडेल; ह्मणून त्याला ठेवून घेण्याविषयीं तिनेंही मोठ्या संतोषानें रुकार दिला. तिनें थट्टेनें त्या ब्राह्मणाला विचारिलें, "भटजीबावा, तुह्मी मोठे विद्वान् दिसतां, तुमच्या या मोठ्या पोटांत किती विद्या सांठविल्या असतील कोण जाणें! तेव्हां कोणकोणत्या विद्या पढलां आहां तें मला कळूं द्याल

तर खरें ?" **वसंतक** ह्मणाला, "मुली, मला दुसऱ्या तिसऱ्या कांहीं विद्या येत नाहींत. मिठ्यामिठ्या बाता सांगून तुमच्यासारख्यांचें मन रंजवावें आणि पोट भरावें ही विद्या माझ्या बापानें मला चांगली शिकविली आहे, आणि ह्मणूनच हें माझें पोट पहा केवढें मोठें झालें आहे !" असें ह्मणून तो आपलें ढेर पुढें करून त्यावर हात फिरवूं लागला. हें गमतीचें भाषण ऐकून **वासवदत्ता** पोट धरधरून हसूं लागली. ती ह्मणाली, "भटजीबावा, असें असेल तर फारच चांगलें झालें. सारा वेळ गायनवादन करून मेला कंटाळा येतो; यासाठीं तुह्मी एथें राहून मधून मधून चांगल्या गमतीच्या गोष्टी मला सांगत जा, ह्मणजे मला करमणूक होईल व तुमचेंही पोट हलकें होईल." तेव्हांपासून **वसंतकाचें** ठाणें तेथें बसलें व तो केव्हां केव्हां हास्यविनोदपर गोष्टी सांगून तिचें मन रंजवूं लागला. त्यानें प्रथम तिला मथुरा-

नगरींत राहणाऱ्या रूपणिकानामक एका वेश्येची एक मजेदार गोष्ट सांगितली. तींतील तात्पर्य असें होतें कीं, **लोहजंघ** नांवाच्या एका तरुण आणि सुंदर पुरुषावर तिचें मन गेलें होतें; पण तो मनुष्य अत्यंत दरिद्री असल्यामुळें तिच्या आईला आवडला नाहीं; तथापि त्या पुरुषाला आपलें सर्वस्व अर्पण करून त्याचा समागम करावा असा निश्चय करून ती वेश्या आपल्या आईचाही त्याग करण्यास सिद्ध झाली. त्या थेरडीनें त्यांचें ऐक्य होण्याच्या कामांत अनेक विघ्नें आणिलीं; पण **लोहजंघानें** मोठ्या युक्तीनें त्या सर्वांचें निवारण केलें आणि शेवटीं तिची फटफजीती करून **रूपणिकेला** घेऊन तो निघून गेला. **वसंतक** मोठा धूर्त होता. ही गोष्ट सांगण्यांत त्याचा हेतु **वासवदत्तेनें** आपल्या आईबापांची पर्वा न करितां **वत्सराजाबरोबर** युक्तीनें पळून जावें असें सुचविण्याचा होता.

तिला ती गोष्ट ऐकून फारच संतोष झाला, व तेणेंकरून **वत्सराजाकडे** तिच्या मनानें अधिकच ओढ घेतली, व तेव्हांपासून आईबापांवरील तिचें प्रेम हळूहळू शिथिल होत चाललें.

याप्रमाणें दररोज गोष्टी सांगून **वसंतक वासवदत्तेचें** मन **वत्सराजाकडे** अधिकाधिक वळविण्याचा प्रयत्न करीत असतां एके दिवशीं प्रधान **यौगंधरायण** पुनः अदर्शनविद्येच्या प्रभावानें संगीतशाळेंत येऊन **वत्सराजाला** भेटला, व त्याच्याजवळ **वसंतका**वांचून दुसरें कोणी नाहीं अशी संधि पाहून त्याला ह्मणाला, "महाराज, **चंडमहासेनानें** आपणास कपटानें धरून एथें कैद करून ठेविलें आहे, यांतील त्याचा हेतु आपल्या जिवास कांहीं धोका करावा असा बिलकूल नाहीं, हें खरें आहे. त्याच्या मनांत **वासवदत्ता** आपणाला सत्कारपूर्वक अर्पण करून आपणाशीं स्नेह करावा व सन्मान करून

आपली मुक्तता करावी असें आहे; परंतु अशा-प्रकारें तिचें पाणिग्रहण करणें आपल्या योग्यतेला अत्यंत लाजिरवाणें होय. यासाठीं माझा बेत असा आहे कीं, 'शेरास सव्वाशेर' या न्यायानें वागून तिच्या बापाच्या हातावर तुरी द्याव्या आणि कांहीं तरी युक्ति करून तिलाच एथून उपटून पळून जावें; ह्मणजे त्या दांडग्या गर्विष्ठ राजाची चांगली रग जिरेल. आतां अशा रीतीनें भित्र्यासारखें पळून जाणें हें आपल्या पौरुषास कांहीं अंशीं बट्टा लावून घेण्यासारखें आहे खरें; पण प्रसंगीं जशास तसें वागलें असतां आपणांस कोणी नांव ठेवील असें वाटत नाहीं. मी या कामांत योजिलेली युक्ति आपणास सांगतों ती नीट ऐकून घ्या आणि त्याप्रमाणें वागा, ह्मणजे **वासवदत्तेचा** लाभ होऊन या बंदिखान्यांतून आपण लवकरच मुक्त व्हाल. ती युक्ति ही कीं, **वासवदत्तेच्या** बापानें **भद्र-**

**वती** नांवाची एक हत्तीण तिच्या तैनातीस दिलेली आहे. ती इतकी जलद चालणारी आहे कीं, **नडागिरी** हत्तीवांचून दुसऱ्या कोणत्याही हत्तीच्यानें तिचा पाठलाग करवणार नाहीं; पण त्या हत्तीचें या हत्तिणीवर इतकें प्रेम आहे कीं, तिच्याशीं प्रतिस्पर्धा करण्याच्या भरीस तो कधीं पडावयाचा नाहीं; तेव्हां प्रसंग पडल्यास तिचा पाठलाग करण्याचें साधन **चंडमहासेना**जवळ कांहीं एक नाहीं, हें उघड आहे. त्या हत्तिणीचा महात **आषाढक** या नांवाचा आहे, त्याला पुष्कळ लांच देऊन मी आपलासा करून ठेविला आहे. आपणाला मीं स्त्रीवशीकरणाचा व बिड्या तोडण्याचा मंत्र शिकविलाच आहे, त्याच्या योगानें **वासवदत्ते**ला अनुकूल करून घेऊन पायांतील बिड्या तोडून टाकाव्या, आणि हत्यारबंद होऊन आजच्या आज रात्रीं तिजसहवर्तमान त्या हत्तिणीवर बसून गुपचुप एथून

पळून जावें. कदाचित् ही बातमी फुटून **नडागिरी**वर बसवून राजा आपला पाठलाग करण्यास कोणाला पाठवील तर त्याच्या महाताला अगोदरच यथेच्छ मद्य पाजून झिंगवून ठेवावें, ह्मणजे अर्थातच त्याच्यानें **नडागिरी**ला जलदीनें चालवणार नाहीं. इतकेंही करून पाठलाग झालाच तर मी पुढें **विंध्याटवी**मध्यें जाऊन आपला मित्र **पुलिंदक** याची भेट घेतों, व पाठलाग करणारांचा प्रवेश त्या अरण्यांत न होईल अशी नाकेबंदी करून ठेवण्यांस त्याला सांगतों." याप्रमाणें सांगून **यौगंधरायण** राजाचा निरोप घेऊन तेथून निघून गेला.

प्रधानानें सांगितलेली मसलत **वत्सराजाच्या** मनास तर आलीच; पण ती पार कशी पाडावी या विचारांत तो अगदीं निमग्न झाला. इतक्यांत **वासवदत्ता** तेथें आली. तिचें प्रेम त्याच्यावर इतकें निस्सीम जडलें होतें कीं, त्याच्यावांचून

तिला क्षणभर देखील चैन पडत नसे. त्याची त्या वेळेस ती चिंताग्रस्त मुखचर्या व पायांतील शृंखला पाहून ती दुःखाचे सुस्कारे टाकूं लागली, व डोळ्यांस पाणी आणून त्याला ह्मणाली, "महाराज, आपण एथें अशा विपत्तींत पडलां आहां हें आतां माझ्यानें पाहवत नाहीं. किती दिवस तरी आतां हे हाल सोशीत राहावयाचे ? यांतून सुटका होण्याचा आपणास कांहीं मार्ग सुचत नाहीं काय ?" **वत्सराज** तें तिचें ममतेचें भाषण ऐकून तिला आणखी कसास लावून पहावें या हेतूनें ह्मणाला, "प्रिये वासवदत्ते, तुझ्या समागमानें मला याच स्थितींत जें सुख होत आहे तें तुला सोडून स्वतंत्रपणानें सार्वभौम पदवीचा उपभोग घेतल्यानेंही होणार नाहीं; मग एथून सुटून जाण्याची खटपट करण्यांत तरी अर्थ काय ?" **वासवदत्ता** ह्मणाली, "पण महाराज, कांहीं युक्ति करून मलाही बरोबर घे-

ऊन आपण या यातनांतून सुटाल तर किती बरें चांगलें होईल?" **वत्सराज** ह्मणाला, "प्रिये, तू ह्मणतेस तें खरें आहे. तसें झालें तर दुधांत साखर घातल्यासारखें होईल; पण तें व्हावें कसें? या कामांत तू अनुकूल झालीस तर कदाचित् कांहीं युक्ति काढितां येईल." **वासवदत्ता** ह्मणाली, "महाराज, आपल्या मर्जीबाहेर मी वागेन असें आपणास वाटतें काय? आपण जसें सांगाल तसें वागण्यास मी एका पायावर तयार आहें." **वासवदत्ते**चें आपणाविषयीं खरें हृद्गत कसें काय आहे तें पाहाण्याकरितांच वत्सराजानें हा संवाद चालविला होता, व ती आपणाला पूर्णपणें अनुकूल आहे अशी जेव्हां त्याची खातरी झाली, तेव्हां त्यानें आपणास धन्य मानिलें. नंतर तिला जवळ घेऊन त्यानें जवळ बसलेला तो कुरूप ब्राह्मण कोण व जो दुसरा एक वृद्ध कुबडा मनुष्य कांहीं दिवसांपूर्वीं तेथें

आला होता आणि एकाएकीं कोठें नाहींसा झाला तो कोण तें सर्व तिला सांगितलें. तशीच आपली सुटका करण्याविषयीं त्यानें योजिलेली मसलतही तिला कळविली. ती मसलत **वासवदत्ते**ला पसंत पडून तिणें राजाबरोबर निघून जाण्याचा निश्चय केला. तिनें तत्क्षणींच **आषाढका**ला बोलावून आणवून त्या रात्रीं आपल्या हत्तिणीला बाहेर जाण्यासाठीं तयार करून ठेव ह्मणून सांगितलें, व **नडागिरी**च्या महाताला देवीचा प्रसाद ह्मणून पुष्कळ मद्य पाजून अगदीं सुस्त करून ठेविलें. इतकें झाल्यावर **कांचनमाला** या नांवाची तिची एक आवडती व विश्वासू दासी नेहमीं तिच्याजवळ असे तिला तिनें आपला बेत कळविला. आणि तिच्याकडून आपली सर्व चीजवस्त बांधवून प्रयाणाची सर्व तयारी करविली.

संध्याकाळ होऊन थोडीशी रात्र पडली

तेव्हां **वासवदत्तेनें कांचनमालेला** पाठवून **आषाढकाला** संकेताप्रमाणें तयार राहाण्याविषयीं सूचना केली. त्याप्रमाणें त्यानें हत्तीण अंबारीसह तयार करून संगीतशालेच्या दरवाजापुढें आणून उभी केली. तिला पाहून **वत्सराजानें** ही आपल्या तयारीस आरंभ केला. **यौगंधरायणानें** शिकविलेला श्रृंखलाभंजनाचा मंत्र जपतांच त्याच्या पायांतील बिड्या आपोआप तुटून पडून तो मोकळा झाला. नंतर आपली ती **घोषवती** नांवाची सुस्वर वीणा व **वासवदत्तेनें** आणून दिलेलीं शस्त्रास्त्रें बरोबर घेऊन **वसंतकासहवर्तमान** तो गुपचुप त्या हत्तिणीवरील अंबारींत जाऊन बसला. पाठीमागून **वासवदत्ताही कांचनमालेसह** त्या अंबारींत जाऊन बसली. त्या वेळीं आकाशांत मेघांच्या गडगडाट होत असून मधून मधून वीज चमकत होती, व थोडा पाऊसही पडत होता. अशासमयीं

त्या **भद्रवती** हत्तिणीनें मोठ्यानें ओरडून कांहीं अस्पष्ट शब्द उच्चारिले. **आषाढकाला** हत्तींची भाषा समजत होती; त्यानें ती हत्तीण, 'मी आज त्रेसष्ट योजनें चालून जाईन,' असें ह्मणाली तें तत्काळ जाणलें व तें आपल्या धनीणीला कळविलें. तें ऐकतांच **वासवदत्तेला** फार आनंद झाला. आसपास दुसरे महात होते; पण ते सर्व मद्यप्राशन करून गुंग झाले असल्यामुळें त्यांचें लक्ष्य त्या हत्तिणीच्या ओरडण्याकडे विशेष गेलें नाहीं, यामुळें तिच्या दूर प्रवासाची गोष्ट त्यावेळीं दुसऱ्या कोणाला समजली नाहीं. लागलीच ती हत्तीण **वत्सराज, वसंतक, वासवदत्ता, कांचनमाला,** आणि **आषाढक** या पांचजणांसह संगीतशाळेपासून निघाली ती थेट नगराच्या वेशीपर्यंत जाऊन पोंचली. त्यावेळीं रात्र फार झाली नव्हती, ह्मणून वेशीचा दरवाजा उघडाच होता; तथापि

अशा अवेळीं राजकन्येची हत्तीण बाहेर चालली हें पाहून तेथील रखवालदारांस संशय आला व ते त्याविषयीं विचारपूस करूं लागले. तेव्हां आतां आपली फजीती होण्याची वेळ आली असें पाहून **वत्सराजा**नें खालीं उडी टाकिली आणि तरवारीनें त्याचें मस्तक तेथल्या तेथें छेदून टाकिलें ! याप्रमाणें आलेल्या विघ्नाचें निवारण करून तो अंबारींत जाऊन बसला आणि त्यानें **आषाढकास** हत्तिणीला त्वरेनें चालविण्याचा इशारा केला, त्याप्रमाणें अंकुश टोंचतांच ती जी तडक निघाली ती मोठ्या जलदीनें तिनें **विंध्याट**वीचा मार्ग धरिला.

इकडे नगरांत गस्तवाले लोक फिरत होते, त्यांनीं वेशीमध्यें घडलेला प्रकार धांवत धांवत जाऊन **चंडमहासेना**च्या कानावर घातला. त्यानें स्वतः संगीतशाळेंत जाऊन चौकशी केली, तेव्हां **वत्सराज वासवदत्ते**ला घेऊन पळून

गेला असें त्याला समजलें. मग काय विचारितां? सर्व राजवाड्याभर व नगरामध्यें एकच गोंधळ होऊन गेला. **चंडमहासेन** व राणी **अंगारवती** यांच्या शोकाला तर सीमाच राहिली नाहीं. राजाचा ज्येष्ठ पुत्र **पालक** याला तें वर्तमान समजतांच तो क्रोधानें लाल होऊन गेला. तो बापाच्या हुकमाची वाट न पाहतां **नडागिरी**-वर बसून **वत्सराजा**ला पकडण्याकरितां मोठ्या त्वरेनें **विंध्यारण्या**कडे जावयास निघाला. तो हत्तीही जलद चालणारा होता. त्यानें पाहाटेच्या सुमारास **भद्रवती**ला **विंध्याटवी**च्या सीमेवर गांठिलें. धरणें आपल्या अगदीं जवळ येऊन ठेपलें असें पाहतांच वत्सराजानें धनुष्य सज्ज करून त्याच्यावर बाण सोडण्यास आरंभ केला. आपला भाऊ पाठलाग करीत आला आहे असें समजतांच आतां काय अनर्थ होईल कोण जाणे असें ह्मणून **वासवदत्ता** अगदीं घाबरून गेली.

तिकडून **पालकानें**ही **वत्सराजा**वर शरवृष्टि चालू केली व आपला हत्ती त्याच्या हत्तिणीजवळ आणून भिडविण्याचा प्रयत्न केला; पण तो तिला पाहतांच अगदीं थंड पडून पुढें चाल करीनासा झाला; यामुळें **पालका**चा उपाय हरून पुढें काय करावें या विवंचनेंत तो पडला.

इकडे **उज्जयिनी**मध्यें **वत्सराज वासवदत्ते**ला घेऊन पळून गेला हें वर्तमान समजल्यापासून **चंडमहासेन अंगारवती**सहवर्तमान तिच्या महालांत शोक करीत बसला होता, त्याला पुढें काय करावें तें सुचेनासें झालें. आपली मुलगी **वत्सराजा**लाच द्यावयाची असा त्याचा निश्चय होता खरा; तथापि अशा रीतीनें त्यानें आपणांस फसवून तिचें हरण केलें, या गोष्टीबद्दल त्याला फार लज्जा वाटली व दुःखही झालें. शेवटीं झाल्या गोष्टीस कांहीं इलाज नाहीं, ब्रह्मलिखित जसें होतें तसें घडून आलें अशी त्यानें

आपल्या मनाची समजूत केली. इतक्यांत आपला ज्येष्ठ पुत्र **पालक वत्सराजा**चा पाठलाग करण्याकरितां गेला आहे हें वर्तमान त्याला समजलें, तेव्हां तर त्याचा जीव फारच काळजींत पडला. तो आपल्या मनांत ह्मणाला, हा साहसी मुलगा त्या शूर पुरुषाशीं युद्ध करण्याच्या भरीस पडला तर याला यश कदापि यावयाचें नाहीं. उलटा याच्या जीवास कांहीं अपाय झाला तर मोठा अनर्थ होईल. असें मनांत आणून त्यानें कनिष्ठ पुत्र **गोपालक** याला बोलावून आणिलें आणि तात्र्डतोब जाऊन **पालका**ला परत घेऊन ये ह्मणून सांगितलें. ही बापाची आज्ञा होतांच तो इतक्या त्वरेनें निघून गेला कीं, **वत्सराज** आणि **पालक** यांची वर सांगितल्याप्रमाणें चकमक झडत आहे, इतक्यांत तो तेथें जाऊन दाखल झाला. त्यानें बापाचा निरोप, **वत्सराजा**शीं सामना करण्याच्या भरीस न पडतां त्याला

बेनहरकत जाऊं द्यावें, असा कळवितांच **पाल-कानें** लढाई बंद केली व उभयतां बंधु आल्या मार्गानें परत **उज्जयिनीस** निघून आले.

एकाएकीं लढाई बंद करून **पालक** आपल्या नगरास परत गेला या गोष्टीचें **वत्सराजास** मोठें नवल वाटलें; पण थोडा विचार करतांच त्यांतील सारें इंगित त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें. आपल्या पाठीवरील धरणें नाहींसें झालें व आतां आपणास निर्भयपणें वाट चालण्यास कांहीं हरकत नाहीं असें समजतांच त्याच्या जिवास स्वस्थता वाटली. **वासवदत्तेला**ही आपले दोघे भाऊ मुकाट्यानें परत गेले असें पाहून समाधान वाटलें. इतकें होत आहे तों सूर्योदय होण्याचा समय झाला. पुढें बराच लांब मार्ग क्रमावयाचा होता, ह्मणून तिनें महाताला सांगून हत्तीण जलदीनें चालविली ती दोनप्रहरच्या सुमारास **विंध्यारण्याच्या** मध्यभागीं येऊन पोंचली. पूर्वीं

तिनें सुचविल्याप्रमाणें त्रेसष्ट योजनें लांबीचा मार्ग एथपर्यंत संपला. एवढा मोठा प्रवास एक रात्र व अर्धा दिवस इतक्या अल्पकाळांत केल्यामुळें ती बिचारी हत्तीण अगदीं थकून गेली व तृषेनें तिचा जीव फारच कासावीस होऊं लागला. हें पाहून व दोन प्रहरचा समय झाला होता, ह्मणून जेवणखाण वगैरे करून थोडावेळ विश्रांति घेण्याकरितां **वत्सराजानें** तेथेंच एका नदीच्या कांठीं दाट छायेची जागा पाहून मुक्काम केला. इकडे तृषेनें व्याकुळ झालेल्या त्या हत्तिणीनेंही तें नदीचें थंडगार पाणी पाहून तें पिण्याकरितां तिकडे धांव घेतली आणि तिच्या पात्रांत शिरून यथेच्छ उदकपान केलें. तें इतकें कीं त्याच्या योगानें तिचें पोट फुगून ती एकाएकी गतप्राण होऊन खालीं पडली !

आपली प्रिय हत्तीण **भद्रवती** एकाएकी मरण पावली हें समजतांच **वासवदत्तेला** फार

दुःख झालें, व पुढील प्रवासास हें मोठें विघ्न उत्पन्न झालें ह्मणून **वत्सराज** मोठ्या काळजींत पडला. तीं उभयतां हत्तिणीजवळ जाऊन पाहतात तों अकस्मात् आकाशवाणी त्यांच्या कानीं पडली ती अशी, "राजा, हत्तिणीच्या रूपानें **वासवदत्ते**ची जी आजपर्यंत चाकरी करीत आली ती मी एका विद्याधराची कन्या आहें. माझें नांव **मायावती**. कांहीं दोषामुळें मला शाप मिळून मी आजपर्यंत हत्तीण झालें होतें. आज मी तुझ्या कार्याच्या उपयोगीं पडलें आहें, व पुढेंही प्रसंगवशात् तुझ्या पुत्राच्या उपयोगीं पडेन. ही राजकन्या वासवदत्ता लवकरच तुझी भार्या होईल. ही मानुषी नसून साक्षात् देवी आहे व कांहीं कारणासाठीं या भूतलावर अवतीर्ण झाली आहे. ही गोष्ट मनांत ठेवून इचें मन कधीं दुखवूं नको." ही आकाशवाणी ऐकून राजाला मोठा चमत्कार वाटला, व **वासवदत्ते**सारख्या

दिव्य स्त्रीरत्नाचा लाभ झाल्यामुळें अत्यंत हर्षही झाला.

नंतर जेवणखाण आटपून व थोडावेळ विश्रांति घेऊन ती सर्व मंडळी पुढील मार्ग क्रमण्याचा विचार करूं लागली. **भद्रवती** मरण पावल्यामुळें पायांनीं चालल्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. त्या रानांतील भिल्लांचा राजा **पुलिंदक वत्सराजा**चा मित्र असून **विंध्य** पर्वताच्या एका शिखरावर राहत होता. तो खचित वाहनांची कांहीं तजवीज करील असें मनांत आणून आपण पादचारी येत आहों हें वर्तमान त्याला कळविण्याकरितां **वत्सराजानें वसंतका**ला तिकडे रवाना केलें व आपण **वासवदत्ते**ला हातानें धरून बाकीच्या मंडळीसह हळू हळू वाट चालूं लागला. इतक्यांत दुसरें एक मोठें अरिष्ट त्यांच्यावर येऊन गुदरलें. कांहीं मार्ग चालून जातात तों त्यांस एक किर्र

झाडी लागली. तींत प्रवेश करतांच चोहोंकडून चोरांनीं येऊन त्यांच्यावर एकदम हल्ला केला! ते चोर एकशें पांच होते, व हीं काय तीं चार मनुष्यें, त्यांत दोघी तर अबला स्त्रिया! पण राजा जात्या शूर होता. त्यानें ती चोरांची झुंड आपल्याभोवतीं मिळालेली पाहून लवमात्रही न घाबरतां आपलें धनुष्य सज्ज केलें, आणि बाणांचा जो भडिमार चालविला त्याच्यायोगानें त्या सगळ्या चोरांचे तेथल्यातेथें मुरदे पाडिले. चोरांचा हल्ला पाहून **वासवदत्ता** अगदीं घाबरून गेली होती; पण **वत्सराजा**चा प्रताप पाहून तिला फार आनंद झाला व मोठी धन्यता वाटली.

**यौगंधरायणा**नें **वत्सराजा**ला **वासवदत्ते**चें हरण करून निघून येण्याची मसलत सांगितल्यावर तो राजनिष्ठ प्रधान मोठ्या त्वरेनें **कौशांबी**स आला. **वत्सराज** पळून गेला

ही बातमी समजतांच त्याला धरण्याकरितां **चंडमहासेनाचें** सैन्य खचित येईल ही त्याला धास्ती होती; ह्मणून त्यानें सेनापति **रुमण्वान्** याला सैन्यासहवर्तमान **विंध्याटवीच्या** मार्गानें येण्याविषयीं सूचना केली, व आपण एकटाच **वत्सराजाला** भेटण्याकरितां पुढें निघून आला. तो **पुलिंदकाच्या** घरीं येऊन पोंचतो आहे इतक्यांत **वत्सराजानें** पाठविलेला **वसंतकही** तेथें जाऊन दाखल झाला. त्यानें **यौगंधरायणाला** सर्व हकीकत कळविली. ती ऐकून आपल्या मसलतीस यश आलें ह्मणून त्याला अत्यंत हर्ष झाला. नंतर **वसंतकाला** पुढें करून **पुलिंदकासहवर्तमान** तो **वत्सराजाच्या** भेटीस निघाला. कांहीं वेळानें **वत्सराजाची** मार्गांत गांठ पडली, इतक्यांत आणखी कांहीं दरोडेखोर जमा होऊन त्यांनीं **वत्सराजावर** पुनः हल्ला केला; पण ते सारे लोक **पुलिंदकाच्या** ताब्यां-

तील असल्यामुळें त्यानें त्यांचें लागलेंच निवारण केलें. नंतर सर्वांच्या भेटी झाल्यावर त्या भिल्लांच्या राजानें **वत्सराजाच्या** पायांवर मस्तक ठेवून मोठ्या सत्कारानें सर्व मंडळीसह त्याला आपल्या घरीं नेलें. **वासवदत्ता** शरीरानें फारच नाजुक होती. चालतांना रानांतील कांटेकुटे लागून तिचे पाय अगदीं सुजून गेले होते, व चालण्याच्या श्रमानें ती फारच थकली होती; ह्मणून त्या दिवशीं त्यांनीं तेथें मुक्काम केला, व तिजसहवर्तमान कोमल तृणाच्या शय्येवर **वत्सराजानें** विश्रांति घेऊन ती रात्र मोठ्या आनंदानें घालविली. पूर्वरात्रींच **यौगंधरायणानें** दूत रवाना करून **रुमण्वानाला** तेथें बोलाविलें होतें, त्याप्रमाणें प्रातःकाल होतांच सैन्यासहवर्तमान तो तेथें येऊन दाखल झाला. त्यानें बरोबर आणिलेलें सैन्य एवढें मोठें अफाट होतें कीं, त्यानें तें सारें अरण्य अगदीं व्यापून

टाकिलें. **वत्सराज** प्रातर्विधि आटपून **उज्जयिनी**कडील कांहीं बातमी लागावी या हेतूनें त्या सैन्यामध्यें जाऊन बसला, इतक्यांत त्या नगरांत राहणारा **यौगंधरायणा**चा मित्र एक वाणी तेथें आला. तो **वत्सराजा**ला मुजरा करून ह्मणाला, "महाराज, आपण **वासवदत्ते**ला घेऊन आलां याबद्दल **चंडमहासेना**ला कांहीं एक वाईट न वाटतां उलटा आपणासारखा जामात त्यांना मिळाला ह्मणून त्यांना फार आनंद झाला आहे. त्यांनीं हें वर्तमान आपणास कळविण्याकरितां आपला चोबदार इकडे पाठविला आहे. तो व मी बरोबरच **उज्जयिनी**हून निघालों. कांहीं कामानिमित्त तो मागें राहिला व मी पुढें निघून आलों. ही बातमी ऐकतांच **वत्सराजा**ला जो हर्ष झाला त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! त्यानें लागलेंच तें वर्तमान **वासवदत्ते**ला जाऊन कळविलें. आईबाप, इष्ट-

मित्र इत्यादिकांचा त्याग करून पळून आल्या-
मुळें ती मनांत फार लज्जित झाली होती, व
**वत्सराजा**चें विधिपूर्वक पाणिग्रहण केव्हां क-
रीन असें तिला झालें होतें. वरील बातमी ऐ-
कून तिचें मन अगदीं निश्चिंत झालें, व आतां
आईबाप आपण होऊनच मोठ्या समारंभानें
आपला विवाह करतील याविषयीं निःशंक झा-
ल्यामुळें तिला अत्यंत हर्ष झाला; तथापि विवा-
हाविषयीं तिचें मन फार उताविळें झालें अस-
ल्यामुळें तिचा वेळ जातां जाईना, ह्मणून तिनें
**वसंतका**ला एकादी विनोदपर कथा सांगण्या-
विषयीं आग्रह केला. त्या चतुर ब्राह्मणानें प्र-
संगास योग्य अशी **धनदत्त** नांवाचा एक ध-
नाढ्य सावकार व **देवस्मिता** नांवाची त्याची
महासाध्वी स्त्री यांची एक मनोरंजक गोष्ट सां-
गितली. तींतील तात्पर्य असें होतें कीं, मोठ्या
कुलांत उत्पन्न झालेल्या स्त्रिया आपल्या शुद्ध

आचरणानें, स्थिर अंतःकरणानें व एकनिष्ठभावानें सदासर्वकाळ आपल्या पतीची सेवा करतात; कारण, पतिव्रता स्त्रियांना पतीवांचून श्रेष्ठ दैवत दुसरें कोणतेंही नाहीं. **वासवदत्तेचें** अंतःकरण तिनें घर सोडल्यापासून **वत्सराजावर** अगोदरच दृढप्रेमानें आसक्त झालें होतें; पण **वसंतकानें** सांगितलेली भर्तृभक्ति वाढविणारी मार्मिक कथा ऐकून तें अगदी तल्लीन होऊन गेलें.

**वसंतकाची** गोष्ट संपत आहे इतक्यांत वाण्यानें सांगितल्याप्रमाणें **चंडमहासेनाचा** चोबदार तेथें येऊन दाखल झाला. तो मोठ्या अदबीनें **वत्सराजाला** मुजरा करून व हात जोडून त्याच्या पुढें उभा राहिला, आणि ह्मणाला, "महाराज, **उज्जयिनीचे** राजे **चंडमहासेन** यांचा मी चोबदार आहें, व त्यांचा निरोप आपणास कळविण्याकरितां आलों आहें, तो कृपा करून ऐकून घ्यावा. ते असें ह्मणाले,

'आपण स्वतः होऊन वासवदत्तेचें हरण केलें हें, आपणास जी स्थिति प्राप्त झाली होती तिचा विचार केला असतां योग्यच आहे व ही गोष्ट घडून यावी ह्मणूनच आपणास मी युक्तीनें धरून आणून येथें प्रतिबंधांत ठेविलें, यांत माझा कांहीं एक वाईट हेतु नव्हता. आपण तिचें मन हरण कराल अशी माझी खातरी होती, ह्मणूनच तिचा व आपला नेहमीं सहवास घडावा अशी मीं योजना केली होती. मी होऊन आपण तिचा स्वीकार करा असें ह्मटलें नाहीं, याचें कारण आपण माझें बोलणें संतोषानें मान्य केलें असतें किंवा नाहीं याविषयीं मला संशय होता, व कदाचित् आपण मान्य केलें नसतें तर त्यायोगानें माझा मोठा दुर्लौकिक झाला असता; यासाठीं जें झालें, तें सर्व योग्यच झालें, व तें सर्वथैव मला मान्य आहे. आतां आपणास माझी इतकीच विनंति आहे कीं, लोक नांवें ठेवितील

अशा प्रकारचा माझ्या कन्येचा व आपला संबंध नसावा; यासाठीं आपण थोडे दिवस वाट पहावी. माझा पुत्र **गोपालक** लवकरच आपणाकडे येईल, आणि शास्त्रोक्तविधीनें तिचा विवाह करून आपणास ती अर्पण करील.' याप्रमाणें सांगून त्यानें **वासवदत्ते**ची भेट घेतली आणि तिलाही तो निरोप कळविला. **चंडमहासेना**ला आपण केलेलें कृत्य मान्य झालें व लवकरच तो यथाविधि आपला विवाह करणार हें ऐकून **वत्सराज** आणि **वासवदत्ता** यांना फार आनंद झाला. लागलीच त्यांनीं **कौशांबीस** जाण्याची तयारी करविली. **गोपालक** येईतोंपर्यंत चोबदारानें तेथेंच राहावें व तो आल्यावर त्याला आणि **पुलिंदका**ला बरोबर घेऊन **कौशांबीस** यावें असें ठरवून त्यानें चोबदारास तेथेंच राहण्यास सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहाटेस सर्व सैन्या-

सहवर्तमान **वत्सराज कौशांबीस** जावयास निघाला. त्याचें सैन्य फारच अवाढव्य होतें. सर्वांच्यापुढें, ज्यांच्या गंडस्थळांतून मदोदकाचे पाझर सुटले आहेत असे मोठमोठे हत्ती चालले होते. त्यांचीं तीं धिप्पाड शरीरें पाहून **विंध्यपर्वताचीं** हीं जंगम शिखरेंच प्रेमानें **वत्सराजाला** आपल्या नगरास पोंचविण्याकरितां चाललीं आहेत कीं काय असा भास होऊं लागला. त्यांच्या मागून असंख्य घोडे रांगारांगांनीं चालले होते. त्यांच्या खुरांच्या आवाजानें त्या **विंध्यारण्याचा** सारा प्रदेश अगदीं दणाणून गेल्यामुळें बंदीजन राजाच्या कीर्तीचे पोवाडेच जणूंकाय गात आहेत असें वाटूं लागलें. त्यांच्यामागें पायदळ, व सर्वांच्या मागून एका श्रृंगारलेल्या हत्तीवर अंबारींत **वत्सराज वासवदत्ते**सह बसून चालला होता. सर्व सेना एकवटून मार्ग क्रमीत असल्यामुळें धुरळा उडून त्याचे

मोठमोठे लोट आकाशांत जाऊं लागले, तेणेंकरून पर्वतांना पुनः पंख फुटून ते अंतराळांत इतस्ततः परिभ्रमण करीत आहेत कीं काय अशी **इंद्राला** शंका आली. याप्रमाणें **वत्सराजाची** स्वारी मोठ्या थाटानें जाऊं लागली; ती दोन तीन दिवसांनीं **कौशांबीच्या** अगदीं जवळ जाऊन पोंचली. या ठिकाणीं सेनापति **रुमण्वान्** याच्या सैन्याची छावणी असून तो तेथेंच राहत असे. राजानें त्याच्या आग्रहास्तव एक रात्र त्याच्या घरीं मुक्काम करून विश्रांति घेतली आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें **कौशांबीं**त प्रवेश केला.

बहुत दिवसांनीं आपला राजा **वासवदत्ते**सारखें अप्रतिम स्त्रीरत्न संपादन करून नगरांत

---

१ प्राचीनकालीं पर्वतांना पंख होते. त्यांच्या योगानें ते इकडेतिकडे फिरते राहून लोकांना फार उपद्रव देऊं लागले; ह्मणून **इंद्रानें** त्यांचे पंख तोडून टाकून त्यांना अचल केलें असें पुराणांतरीं वर्णन केलेलें आहे.

येत आहे असें समजतांच त्याला पहाण्याक-
रितां पौरजनांचे थव्यांचेथवे लोटले व त्यांनीं
सर्व रस्ते इतके गच्च भरून गेले कीं, कोठें मुं-
गीचा रिघाव होण्याइतकी देखील जागा रा-
हिली नाहीं. नगरांत जिकडे पहावें तिकडे
आनंदोत्सवाची एकच गर्दी उडून गेली. सर्व नगर
शृंगारून लोकांनीं घरोघर ध्वज, पताका व तोरणें
उभारिलीं व रस्त्यांतून चंदनाचे सडे घालून त्यावर
तऱ्हतऱ्हेच्या रांगोळ्या आणि सुंदर वेलबुट्या
काढिल्या. मंगलवाद्यांच्या मधुर स्वरांनीं सर्व न-
गर नादमय होऊन गेलें. पतिवियोगानें स्त्री जशी
म्लानवदन दिसते तशी **वत्सराज** गेल्यापासून
सर्व नगरी उदासवाणी झाली होती, तिला, त्या
दिवशीं सर्व नागरिक स्त्रिया मंगलस्नानें करून
व नानाप्रकारचीं अलंकारभूषणें व उंचीं वस्त्रें प-
रिधान करून आपापल्या घरांतील खिडक्यांम-
धून व गच्च्यांवरून उभ्या राहिल्यामुळें, कांहीं अ-

पूर्व शोभा प्राप्त झाली. त्या स्त्रिया आपलीं सुंदर वदनें बाहेर काढून **वत्सराजा**कडे उत्फुल्ल नेत्रांनीं अवलोकन करीत असतां असें वाटूं लागलें कीं, हा राजमार्ग नव्हे; तर ही आकाशगंगा असून तिचे दोन्ही तटाक सुवर्णकमलांनीं जणूं काय प्रफुल्लित झाले आहेत! उन्हाच्या तापानें त्रस्त झालेले मयूरपक्षी विद्युल्लतेसह मेघाचें दर्शन झालें असतां जसें आनंदित होतात, त्याप्रमाणें **वासवदत्ते**सह **वत्सराजा**ला पाहून तद्वियोगानें शोकाकुल झालेल्या पौरजनांचे नेत्र थंडगार झाले. अशा थाटानें मिरवत मिरवत **वत्सराजा**नें आपल्या गृहांत प्रवेश केला, त्या वेळीं नजराणे देण्याकरितां व कामगिऱ्या बजाविण्याकरितां आलेल्या अनेक मांडलिक राजांनीं व मंगलगीतें गाणाऱ्या बंदीजनांनीं, घरांत निजलेलीं माणसें जागीं झालीं ह्मणजे सर्व घरभर जशी गडबड होऊन जाते त्याप्रमाणें,

एका क्षणांत तें राजगृह अगदीं गजबजून गेलें.

नंतर **चंडमहासेना**कडून निरोप आल्याप्रमाणें थोड्याच दिवसांनीं **वासवदत्ते**चा भाऊ **गोपालक** आपल्या बापाचा चोपदार व **पुलिंदक** यांसहवर्तमान **कौशांबीस** येऊन दाखल झाला. तो आल्याची खबर समजतांच, हा मूर्तिमंत आनंदच आपणास भेटावयास येत आहे असें **वत्सराजा**ला वाटून तो त्याला सामोरा गेला, आणि मोठ्या सत्कारानें त्यानें त्याला राजवाड्यांत आणिलें. आपला भाऊ आपल्या लग्नाकरितां आला आहे हें ऐकून **वासवदत्ते**चे नेत्रही आनंदानें प्रफुल्लित झाले. त्यानें **वासवदत्ते**ची भेट मोठ्या प्रेमानें घेतली. आईबाप व बंधु यांना फसवून ती निघून आली होती, ह्मणून **गोपालका**कडे दृष्टि जातांच लज्जेनें तिनें आपली मान खालीं घालून रडण्यास आरंभ केला. जणूं काय तिची ती सलज्ज दृष्टि त्याच्याकडे न जावी, ह्मणून अश्रुधा-

रांनीं मध्यें येऊन तिच्या डोळ्यांवर पडदा घातला! **गोपालकानें** तिला जवळ घेतलें; व बाबांचा तुजवर बिलकुल राग नाहीं, व तुझ्या वर्तनाला आमचें सर्वांचें पूर्ण अनुमोदन आहे असें सांगून तिचें समाधान केलें. त्या योगानें तिच्या अंतःकरणांत उत्साह व धैर्य उत्पन्न होऊन भावाच्या भेटीमुळें तिनें आपणास कृतार्थ मानिलें.

नंतर **यौगंधरायणानें** ज्योतिष्यांकडून लग्नाचा मुहूर्त पाहविला. त्यांनीं दुसऱ्या दिवशींच उत्तम मुहूर्त आहे असें सांगितल्यावरून उभयपक्षांकडील मंडळी लग्नसमारंभाची तयारी मोठ्या जारीनें करूं लागली. त्यांत **गोपालक** परस्थ असल्यामुळें त्याच्या जिवाची फारच धांदल उडून गेली. दुसऱ्या दिवशीं शुभमुहूर्तावर वधुवरांनीं लग्नमंडपांत प्रवेश केला. तेथें शास्त्रोक्तविवाहविधि सर्व यथासांग आटोपल्यानंतर रतिरूप वेलीला नुकत्याच फुटलेल्या कोंवळ्या लुसलुशीत

पल्लवाप्रमाणें कांतिमान दिसणारा **वासवदत्ते**चा सुकुमार हात **वत्सराजा**नें आपल्या हातांत धरला, त्यासरसा जिकडे तिकडे जयजयकाराचा घोष होऊन मंगलवाद्यें वाजूं लागलीं, तेणेंकरून तो सारा लग्नमंडप नादमय होऊन गेला. प्रियपतीच्या हस्ताचा स्पर्श होतांच **वासवदत्ते**ची कांहीं विलक्षण प्रकारची स्थिति होऊन गेली. त्या स्पर्शजन्य सुखाचा अनुभव होतांच तिला जो कांहीं अद्वितीय आनंद झाला त्याच्या योगानें तिचे डोळे मिटून गेले. सर्वांगास घाम सुटून तिची सुकुमार तनु लटलटां कांपूं लगाली, आणि सर्व शरीरावर रोमांच थरारून आले. कामदेवाच्या तडाक्यांत सांपडून मोहन, वायव्य, वारुण, इत्यादि अस्त्रांचा त्यानें तिच्यावर एकसारखा भडिमार चालू केल्यामुळें आपलें शरीर घायाळ झालें, व त्यापुढें आपली धडगत नाहीं असें तिला वाटूं लागलें. विवाहहोमाला प्रदक्षिणा

करतेवेळीं अग्नीचा धूर लागून तिचे डोळे लाल झाले, ते पाहून मदिरा प्राशन करून तिच्या माधुर्याचा आस्वाद घेण्यांत जणूं काय ती गुंग झाली आहे असें प्रेक्षकांस वाटलें. **गोपालकानें वत्सराजाला** देण्याकरितां अमोलिक रत्नें व नानाप्रकारच्या दुर्मिळ वस्तु आणिल्या होत्या त्या सर्व विवाहसमयीं त्याला अर्पण केल्या. तसेंच मांडलिक राजांकडून व इतर बड्या बड्या कामगार मंडळीकडून त्याला मोठमोठे मूल्यवान् नजराणे मिळाले, तेणेंकरून त्याचा खजिना भरून गेला, व त्यायोगानें त्याचें वैभव इतकें वाढलें कीं, हा राजा भूलोकींचा कुबेरच आहे असें सर्व लोक ह्मणूं लागले. असो. याप्रमाणें विवाहविधि यथासांग आटोपल्यावर त्या उभयतां वधुवरांनीं अंतःपुरांत प्रवेश केला. त्या वेळीं त्यांना पाहून लग्नसमारंभास आलेल्या सर्व प्रेक्षकजनांच्या नेत्रांस अत्यंत हर्ष झाला.

नंतर प्रधान, मांडलिक राजे, सरदार, व इतर मंडळी यांची पाठवणी करण्याच्या कामास सुरुवात झाली. **वत्सराजाचा** मेहुणा **गोपालक** व **विंध्याटवीं**तील वनराजा **पुलिंदक** यांना मोठमोठे प्रांत इनाम देऊन त्याबद्दल राजानें ताम्रपटावर सनदा करून दिल्या. याप्रमाणें स्वतः त्यांचा सन्मान करून इतर मांडलिक राजे, सरदार, व नागरिक जन यांची यथायोग्य संभावना करण्याच्या कामावर त्यानें प्रधान **यौगंधरायण** व सेनापति **रुमण्वान्** यांची योजना केली. त्यांनीं प्रत्येकाच्या योग्यतेचा नीट विचार करून कोणाचेंही मन न दुखवितां त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें देणग्या देऊन सर्वांला संतुष्ट केलें. ह्या पाठवण्या करण्याच्या कामांत त्यांनीं इतकें चातुर्य व दक्षता दाखविली कीं, प्रत्येकाला मीच काय तो राजाला अधिक प्रिय आहें असें वाटूं लागलें. गोरगरीब याचकांची त्या समारंभास

मोठी दाटी झाली होती, त्या सर्वांना अन्नवस्त्र व द्रव्य देऊन तृप्त केलें. याप्रमाणें सर्वांचें आदरातिथ्य झाल्यावर **यौगंधरायण, रुमण्वान्** आणि **वसंतक** यांची पाळी आली. हे तिघेही राजाला अत्यंत प्रिय होते. मुख्यत्वेंकरून त्यांच्याच साह्यानें राजाची बंधनांतून मुक्तता होऊन **वासवदत्ते**सारख्या स्त्रीरत्नाचा त्याला लाभ झाला; यासाठीं त्यांच्याकरितां मोठा समारंभ करून त्यांना त्यानें मोठमोठ्या जाहगिरी दिल्या, व आपल्या हातानें त्यांस उंची पोशाख, मूल्यवान् आभरणें व अंगरागादिक सुवासिक द्रव्यें अर्पण करून त्यांचा बहुमान केला.

याप्रमाणें सर्व वऱ्हाडी मंडळीची पाठवणी झाल्यावर ती जिकडील तिकडे निघून गेली. बापाकडून बोलावणें आल्यावरून **गोपालक**ही **उज्जयिनी**स जावयास निघाला. त्यावेळीं **वासवदत्ते**ला फार वाईट वाटलें; पण **वत्सराजानें**

पुनः लवकरच तुह्मीं आपल्या बहिणीच्या भेटीस यावें अशी विनंति करून त्याला निरोप दिला, तेव्हां तिचें समाधान झालें, व तिच्या समागमानें आपलें सर्व मनोरथ फलद्रूप झाले ह्मणून त्यालाही फार आनंद झाला.

**वत्सराज** स्वभावानें मोठा रंगेल व चैनी असून चपलमनाचा होता. **वासवदत्ते**सारखी सद्गुणी आणि सुंदर स्त्री त्याला प्राप्त झाली होती व तिच्यावर त्याचें प्रेमही निस्सीम होतें; तथापि तिच्या समागमानें त्याची विषयवासना कधीं तृप्त न होतां कोठें एकादी सुंदर स्त्री पाहिली व ती अविवाहित आहे असें समजलें कीं तिला हरतऱ्हा करून वरण्याविषयीं त्याचें मन धांव घेई. त्याच्या अंतःपुरांत **विरचिता** या नांवाची एक सुंदर तरुण दासी होती, तिच्यावर पुष्कळ दिवसांपासून या राजश्रीचा डोळा होता व ती गोष्ट **वासवदत्ते**लाही समजली होती. एके दिवशीं तिला

एकांतीं भेटण्याचा संकेत ठरून राजा तिची वाट पाहत बसला. **वासवदत्ता** त्याच्या पाळतीवर होतीच, व **विरचिता** त्या संकेतस्थळीं येण्याच्या पूर्वीच ती तेथें गेली, तेव्हां **विरचिता** आली असें समजून त्याणें तिच्या नांवानें तिला हाक मारिली. मग काय विचारितां, चक्षुर्वैसत्यं, असा प्रकार झाल्यावर तिच्या अंगाचा तिळपापड झाला, व त्या रागाच्या भरांत तिनें त्याची जी फटफजीती उडविली त्या योगानें पाण्यांत ढेंकूळ जसें विरघळतें त्याप्रमाणें लज्जेनें तो अगदीं वरमून गेला, व तिची समजूत करतां करतां त्याला पुरेपुरेसें झालें. तो तिच्या पायांपडून मोठ्या आर्जवानें क्षमा मागूं लागला. **वासवदत्ता** जरी मोठी मानी व रागीट स्वभावाची होती तरी तिचें अंतःकरण फार कोमल होतें, व **वत्सराजावर** तिचें अत्यंत प्रेम होतें; त्यामुळें त्याच्या मनाला दुःख झालें असें पहातांच तिला

फार वाईट वाटलें व तिनें आपला राग शांत केला. पुढें थोड्या दिवसांनीं तिचा भाऊ **गोपालक** याणें लढाईत जिंकून आणिलेली **बंधुमती** नांवाची एक सुंदर राजकन्या तिला भेट ह्मणून पाठवून दिली, तिच्यावरही या राजश्रींचें मन गेलें व तिच्याबरोबर त्यानें कोणाला कळूं न देतां गांधर्वविधीनें विवाह केला इतकें झालें तरी या विषयी पुरुषाच्या मनाची तृप्ति होईना. लवकरच आणखी एक शिकार त्याच्या आटोक्यांत आली तीवरही त्यानें झडप घालण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. तो प्रकार असा—

**मंजुलिका**[१] या नांवाची एक राजकन्या कांहीं

---

१ **श्रीहर्षानें प्रियदर्शिका** या नांवाची एक शृंगाररसप्रधान नाटिका संस्कृत भाषेंत रचिलेली प्रसिद्ध आहे, तिच्या संविधानकांतील मुख्य मुद्यांच्या गोष्टी एथें सांगितलेल्या गोष्टींशीं बऱ्याच अंशांनीं मिळतात, यावरून ती नाटिका, हें चरित्र ज्या ग्रंथांतून घेतलें आहे त्या ग्रंथाच्या

प्रसंगानें त्याच्या दरबारांत आली होती. तिला त्यानें **वासवदत्तेच्या** स्वाधीन करून तिचें उत्तमप्रकारें रक्षण करण्यास सांगितलें. ही कन्या स्वरूपानें अत्यंत सुंदर असून उपवर झाली होती. लावण्यजलधींतून उत्पन्न झालेली दुसरी लक्ष्मीच कीं काय असें तिला ह्मटलें तरी शोभण्यासारखें होतें. एके दिवशीं **वसंतका**ला बरोबर घेऊन **वत्सराज** आपल्या बागेमध्यें फिरत असतां तेथील एका लतागृहांत बसलेली ती त्याच्या दृष्टीस पडली. तिचें तें अनुपम लावण्य पाहून त्याच्या मनानें तिच्याविषयीं ध्यासच

---

ह्मणजे कथासरित्सागराच्या आधारानें रचिली असावी असें निःसंशय सिद्ध होतें. मूळांतील गोष्ट फारच संक्षिप्त आहे, तीवर विस्तार करून **श्रीहर्षानें** ती नाटिका रचिली आहे. त्यांतील **मंजुलिका** हें नांव बदलून कवीनें आपल्या उपनायिकेला **प्रियदर्शिका** हें नांव कां दिलें, याचें कारण मात्र समजत नाहीं.

उ.

घेतला, व त्याला पाहून तिचेंही मन त्याच्यावर आसक्त झालें. तेव्हांपासून उभयतांच्या भेटी बागेमध्यें प्रत्यहीं होत असत. **वासवदत्तेला** ही गुणगुण समजतांच ती त्याच्या पाळतीवर राहिली. एके दिवशीं तीं उभयतां लतागृहामध्यें गोष्टी बोलत बसलीं आहेत व **वसंतक** बाहेर दारामध्यें उभा आहे अशी बातमी ठेवून ती तेथें अकस्मात् गेली, तों दोघांचें खलबत चाललें होतें, तें पाहून तिला अतिशय संताप आला. **वसंतकाचें** हें सर्व कारस्थान असावें असा तिला संशय येऊन प्रथम तिणें त्याच्या मुसक्या बांधविल्या व राजवाड्यांत पाठवून तेथें एका खोलींत त्याला कोंडून ठेविलें. इतकें झाल्यावर तिनें आपल्या क्रोधाग्नीची आग राजावर पाखडण्यास आरंभ केला. त्या रागाच्या सपाट्यांत तिनें त्याच्यावर नाहीं नाहीं त्या उपरोधिक भाषणांचा इतका गहजब केला कीं, त्याच्या योगानें तो बि-

चारा अगदीं गर्भगळित होऊन गेला. त्यानें नानाप्रकार करून तिची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला; पण त्या मानिनीचें समाधान न होतां उलट ती अधिकच संतापली आणि रागानें चडफडत अंतःपुरांत निघून गेली. राजाही तिच्या मागोमाग राजवाड्यांत गेला. कोणत्या उपायांनीं तिचें शांतवन करून समजूत पाडावी तें त्याला कांहीं सुचेना. शेवटीं **सांकृत्यायनी** या नांवाची तिच्या माहेरची एक वृद्ध बाई तिच्याजवळ राहत असे तिला या राजश्रींनीं आपणाविषयीं रदबदली करण्यास सांगितलें. तिनें मोठ्या युक्तीनें **वासवदत्ते**ची एकदांची समजूत केली, तेव्हां तिचा राग शांत झाला. वासवदत्ता स्वभावानें रागीट होती, तरी भोळी, मोकळ्या मनाची व उदार अंतःकरणाची असे. आपल्या पतीचें स्त्रैण वर्तन पाहून तिला राग येत असे खरा; पण तो जाण्यासही उशीर लागत नसे. त्याचें **मंजुलिके**-

वर मन गेलें आहे व तिच्यावांचून त्याच्या जिवाला कधीं स्वस्थता वाटावयाची नाहीं, असें जेव्हां तिला समजलें तेव्हां तिनें होऊनच त्याच्याकडून तिचें पाणिग्रहण करविलें, इतकी ती त्याच्या सुखाविषयीं जपत असे.

**मंजुलिके**बरोबर **वत्सराजा**चें लग्न होतांच **वासवदत्तेनें वसंतका**ला प्रतिबंधांतून मोकळें केलें. तो ब्राह्मण मोठा धूर्त व नकल्या असे. तिला कितीही राग आला असला तरी एकादी समयोचित नक्कल सांगून तिला गार करून सोडण्याची हातोटी त्याला चांगली साधली होती. बंधनांतून मोकळा होतांच तो तिच्याकडे येऊन हंसत हंसत तिला ह्मणाला, "बाईसाहेब, तुमच्या दरबारांत न्याय करण्याची पद्धत फार चांगली आहे. **मंजुलिका** व महाराज या दोघांचें मेतकूट जमलें हें पाहून तुह्मी त्याकडे कानाडोळा करावा; एवढेंच नव्हे; तर आपल्याच हातानें

त्यांचें लग्नही लावून टाकावें व त्याच्या बरोबर मला गरिबालाही चतुर्भुज करावें. वा: खासा न्याय ? ही वड्याचें तेल वांग्यावर काढण्याची अथवा चोराला सोडून संन्याशाला सुळावर चढविण्याची अपूर्व न्यायरीति आपण आजपर्यंत कोठेंच बुवा पाहिली नव्हती, ती आज एथें दृष्टीस पडली ! कोठें **मंजुलिका** आणि कोठें हा गरीब भट **वसंतक**. कांहीं तरी संबंध ! असो. तुमच्या या वर्तनावरून मला एक लहानशी गोष्ट आठवली आहे तेवढी सांगतों. ती ऐकून घेऊन मग या मंगल कार्यानिमित्त मला आणखी अशीच कांहीं बक्षिशी द्यावयाची असेल तर खुशाल द्या." वासवदत्तेला त्याच्या मजेदार गोष्टी ऐकण्याची लज्जत लागलीच होती. ती त्याला काय गोष्ट सांगतोस ती सांग असें ह्मणतांच तो गोष्ट सांगूं लागला ती अशी—

पूर्वीं एके समयीं **रुरु** या नांवाचा एक मु-

निपुत्र स्वच्छंदानें फिरत असतां लावण्याची केवळ खाण अशी **स्थूलकेश**ऋषीच्या आश्रमांत राहणारी **प्रमद्वरा**नांवाची एक कन्या त्याच्या दृष्टीस पडली. ही कन्या एका विद्याधरापासून **मेनका** अप्सरेच्या पोटीं उत्पन्न झाली होती. तिला पाहतांच **रुरू**चें मन तिजवर आसक्त झालें, आणि त्यानें त्या ऋषीला ती कन्या मला अर्पण कर ह्मणून विनंति केली. ऋषीनें ती विनंति मान्य करून लग्नाची सर्व तयारी केली, इतक्यांत त्या कन्येला सर्पदंश होऊन ती मरण पावली. तिला मृत झालेली पाहून **रुरु** शोक करूं लागला, तेव्हां एकाएकीं आकाशांतून अशी वाणी ऐकूं आली कीं, "हे ब्राह्मणा, इचें आयुष्य सरलें ह्मणून ही मेली. जर तू आपलें अर्धे आयुष्य हिला देशील तर ही पुनः जीवंत होईल." ही आकाशवाणी ऐकतांच त्यानें आपल्या अर्ध्या आयुष्याचा संकल्प करून पाणी सोडिलें, तेव्हां

संस्कृतग्रंथार्थसंग्रह.

पुस्तक २२.

# उदयनचरित,

## भाग तिसरा.

हें पुस्तक,

महाकवि श्रीसोमदेवभट्टविरचित कथासरित्सागरनामक काव्याच्या आधारानें महाराष्ट्रभाषेंत लिहिलें आहे,

तें

**जावजी दादाजी**

यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक
**तुकाराम जावजी** यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई,—सन १८९२.

किंमत ४ आणे.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व
हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

श्री.

# संस्कृतग्रन्थार्थसंग्रह.

या नांवाचें पुस्तक सवडीप्रमाणें अंकरूपानें काढा-
वें आहे. यांत श्रुति, स्मृति, महाभारत, रामायण,
ें, वगैरे जुन्या संस्कृतग्रंथांतील मनोरंजक, धर्मनी-
., व इतिहासपर अशा गोष्टींचा संग्रह केला जाईल.
संग्रहाचे सवडीप्रमाणें वेळोवेळीं वेगळाले अंक काढून
ड्या किमतीस वाचकांस मिळावे असा यत्न केला आहे.
वढे अंक निघतील तेवढे सगळे आह्मांकडे पाठवावे
असें आह्मांस कोणीं कळविल्यास त्याप्रमाणें अंक निघतांच
पाठविले जातील. या कृत्यास आश्रय मिळून चांगलें
चालल्यास कालांतरानें जुन्या संस्कृत ग्रंथांतील गोष्टींचीं
मराठींत सुंदर रीतीनें लिहिलेलीं पुष्कळ पुस्तकें तयार
होतील.

एक अंक घेतला असतां दुसरा घेतलाच पाहिजे असें
कोणावर ओझें पडूं नये ह्मणून कोणत्याही अंकांतील कथा
अर्धवट ठेविली जाणार नाहीं.

# विक्रीचीं पुस्तकें.

**एब्राहाम लिंकन ह्याचें चरित्र.**—अ। देशाच्या उद्धारास कशीं माणसें उत्पन्न झालीं जेत, त्याचा नमुना ह्यांत दिला आहे. हें रा. रा. नायक कोंडदेव ओक ह्यांनीं लिहिलें आहे; आ आन. जस्टिस काशिनाथ त्रिंबक तेलंग ह्यांनीं तपा आहे. किंमत ८ आणे, ट. हां ॽ॥ आणा.

**दिनार्बस** किंवा **रासलेस्** ह्या ग्रंथाचा उत्तरा किंमत १४ आणे, ट. हां. १॥ आणा.

**दुःखिताश्रुमार्जन.**—यांत पुत्रशोकासारखीं म हद्दु:खें ह्या जगामध्यें मनुष्यांस प्राप्त होतात, त्या प्रसंगीं त्यांच्या अंत:करणाचें सांत्वन करण्यास हें पुस्तक फार उपयोगी आहे. अवश्य संग्रहीं असावें. किंमत ३ आणे, ट. हां. ॽ॥ आणा.

**भाऊबंदांत कलह उत्पन्न होऊन विभक्त होतात त्याचीं कारणें काय व ते न होण्याचे उपाय.** किंमत ४ आणे, ट. हां. ॽ॥ आणा.

हीं पुस्तकें, रोख पैसा आल्यास मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर **निर्णयसागर** छापखान्यांत विकत मिळतील.

# प्रस्तावना.

या चरित्राच्या पहिल्या दोन भागांत वर्णिलेली कथा वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्यानंतरचा कथाभाग ह्या तिसऱ्या भागांत वर्णन करून वाचकांस सादर करीत आहों.

या भागांत चरित्रनायक **उदयन** अथवा **वत्सराज** याचा, त्याच्या प्रधानानें **मगध**देशचा राजा **प्रद्योत** याच्या कन्येशीं विवाह करविला, तो कोणत्या कारणानिमित्त व कशा युक्तीनें घडवून आणिला तो प्रकार सविस्तर कथन केला आहे. राजेलोक बहुतकरून ऐषआरामी व विषयासक्त असतात अशी सर्वत्र प्रसिद्धि आहे. राज्यांत काय चाललें आहे याची त्यांस मुळींच दाद नसते. अशा प्रसंगीं प्रधानादिक पदरची मंडळी हुशार व आपापलीं कामें दक्षतेनें आणि प्रामाणिकपणानें करणारी असली तरच तें राज्य सुयंत्रितपणें चालून प्रजेचें संरक्षण होतें. आम

चरित्रनायक **वत्सराज** हे अशाच कोटींतील चैनी राजे होते; पण त्यांचा प्रधान **यौगंधरायण** हा मोठा बुद्धिमान्, राजनिष्ठ व कार्यदक्ष असल्यामुळें राज्यांत शांतता राहून त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला. सारांश, या चरित्राच्या वाचनापासून आमच्या राजे-रजवाड्यांनीं एक बोधाची गोष्ट शिकण्यासारखी आहे; ती ही कीं, त्यांनीं स्वतः जरी राज्यकारभारांत मन घातलें नाहीं, तरी राज्यशकट हाकणारी पदरची मंडळी हुशार व प्रामाणिक अशी पाहून नेमावी ह्मणजे त्यांच्या राज्यांत कांहीं घोटाळा होणार नाहीं.

**श्रीहर्षकवीनें** संस्कृत भाषेंत **रत्नावली** या नांवाची एक अत्युत्तम नाटिका रचिलेली प्रसिद्ध आहे, तिला मुख्यत्वेंकरून आधार याच कथेचा आहे. मूळ ग्रंथांत **मगधदेशचा** राजा **प्रद्योत** याची कन्या **पद्मावती** इच्याशीं **वत्सराजाचें** लग्न झाल्याची कथा आहे; पण नाटिकाकारानें **प्रद्योताच्या** ठिकाणीं **सिंलद्वीपाचा** राजा **विक्रमबाहु** कल्पून **पद्मावतीच्या**

ठिकाणीं त्याची कन्या **रत्नावली** कल्पिली आहे. असा फेरफार करण्याचें कारण 'निरंकुशाः कवयः' यावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं. कवीला आपल्या नायिकेवर सागरांत पडण्याचा प्रसंग आणावयाच होता, एवढ्याचसाठीं त्यानें तिचा बाप **सिंह**
**पां**त राज्य करीत होता असें कल्पून आर्याव
लमार्गानें येतांना ती समुद्रांत पडून एका
हातीं लागली, व पुढें सागरांत सांपडली
**[illegible]गिका** या नांवानें वत्सराजाच्या घरीं तिचा [illegible]
झाल्या[illegible] तिच्याशीं त्यानें विवाह [illegible] संविधानक रचिलें असावें; तथापि मूळग्रंथांत **पद्मावती**
**वत्सराजा**शीं विवाह घडवून आणण्याकरितां ज्या युक्तीचें वर्णन केलेलें आहे तीच युक्ति **श्रीहर्षा**नें आपल्या नाटिकेंत कायम ठेविली आहे. यावरून त्याच कथेच्या आधारानें **रत्नावलीं**तील संविधानक कल्पि असावें असें निर्विवाद सिद्ध होतें.

---

# उदयनचरित.

## भाग तिसरा.

### दिग्विजयाचा बेत व त्याच्या सिद्धीसाठीं पद्मावतीशीं विवाह.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें **वासव**
**त्तेशीं वत्सराजाचा** विवाह झाल्यावर तो
रोबर रममाण होत्सात राज्य
क्ष्य करूं लागला. त्याचा मुख्य
न **यौगंधरायण** आणि सेनापति **रुमण्वान्** हे उभयतां राजाचे हितचिंतक असून आपापलीं कामें मोठ्या दक्षतेनें पहात असत, यामुळें त्याला कोणत्याही प्रकारची काळजी नव्हती; तथापि धनी ऐषआरामांत निमग्न असल्यामुळें राज्याला केव्हां ना केव्हां तरी अपाय होईल, या काळजीनें त्यांचीं मनें नेहमीं अस्वस्थ असत.

एके दिवशीं **यौगंधरायण** रात्रीं बिछान्यावर प-
डला असतां हेच विचार त्याच्या मनांत येऊन
त्याला झोंप लागेना. विचार करतां करतां
त्याच्या मनाचा इत्यर्थ असा ठरला कीं, या रं-
गेल्या राजाला कांहीं तरी निमित्तानें क्षात्रधर्मास
योग्य अशीं पराक्रमाचीं कृत्यें करण्यास लाविल्या-
वांचून ही स्वारी शुद्धीवर यावयाची नाहीं. ही
ना मनांत येतांच त्याला उजाडेपर्यंत देखील
निधेप. लागलेंच त्यांने पेव
**रुमण्वानाला** बोलावून आणिलें;
मनांत योजिलेल्या बेताला मुख्यत्वेंकरून त्या
साह्य पाहिजे होतें. एवढ्या रात्रीं प्रधानाकडून बो-
लावणें कां आलें याचें सेनापतीला मोठें गूढ पडलें;
तथापि तसेंच कांहीं महत्वाचें राजकारण असेल
असें समजून तो तत्क्षणींच उठून त्याला जाऊन
भेटला. दोघांची एकांतांत भेट होतांच **यौगंध-
रायणानें** तेवढ्या अपरात्रीं त्याला बोलावून

आणण्याचें कारण सांगितलें. तो ह्मणाला, "मित्रा, आपले महाराज नांवाला मात्र राज्यपदारूढ झाले आहेत, पण त्यांनीं राज्यकारभाराचीं सारीं सूत्रें आमच्या हातीं दिलीं आहेत, व आपण स्वतः स्त्रिया, मद्य आणि मृगया या दुर्व्यसनांच्या त्रिपुटीमध्यें निमग्न होऊन राज्याविषयीं अगदीं बेफिकीर होऊन बसले आहेत, हें चिन्ह मला कांहीं चांगलें दिसत नाहीं. वास्तविक ह्मटलें ह्मणजे हा राजा शूर **पांडवांच्या** वंशामध्यें उत्पन्न झाला आहे त्याअर्थीं कुलपरंपरेप्रमाणें यानें **हस्तिनापुरांत** राहून याच्याकडे आज सकल पृथ्वीचें अधिपत्य असावयाचें; पण तें सारें विसरून जाऊन या प्रादेशमात्र देशाच्या राज्यानेंच हा संतुष्ट होत्साता विषयसेवनांतच आपणास कृतार्थ मानितो, हें आमच्यानें पाहवत नाहीं. याच्या पूर्वजांचा प्रताप कोणीकडे आणि याचें स्त्रैणवर्तन कोणीकडे ! कांहींच मेळ नाहीं.

यासाठीं मला वाटतें कीं, आपण कांहीं तरी युक्ति लढवून याच्या हातून दिग्विजय करवावा व याला याच्या पूर्वजांचें सार्वभौमपद प्राप्त करून द्यावें. असें केलें तरच आमच्या स्वामिनिष्ठेचें आणि मंत्रीपणाचें सार्थक्य. नाहींपेक्षां उगीच माशा मारीत बसण्यांत काय अर्थ आहे? युक्तीनें कोणतेंही काम केलें तर तें तडीस जाण्यास उशीर लागणार नाहीं; त्यांतूनही तुझ्यासारख्या शूर सेनापतीचें साह्य असल्यावर कार्यसिद्धीविषयीं संशयच घ्यावयास नको. सार्वभौमपद मिळविण्याकरितां पृथ्वीवरील सर्व राजांस जिंकिलें पाहिजे. त्यांमध्यें **उज्जयिनी**चा राजा **चंडमहासेन** हा देवीच्या प्रसादानें अजिंक्य होता; पण युक्तीनें त्याच्या कन्येबरोबर महाराजांचें लग्न लावून त्याच्याशीं आपण स्नेह जोडिला आहे, यामुळें दिग्विजयाच्या कामांत त्याच्याकडून कांहीं प्रतिबंध होण्याची धास्ती

बाळगावयास नको. बाकीच्यांपैकीं [1]**मगधदेशचा** राजा **प्रद्योत** एवढाच काय तो ह्मणण्यासारखा शिरजोर शत्रु राहिला व त्याचेंच काय तें भय आहे. तो मोठा पराक्रमी असून त्याचें राज्य आपल्या देशाच्या अगदीं सीमेवर आहे, यामुळें तो कदाचित् आपणास अडथळा करील. यासाठीं कांहीं तरी युक्तीनें त्याला अनुकूल करून त्याच्याशींही स्नेहसंबंध जोडावा, ह्मणजे चारी दि आपणांस मोकळ्या होतील. या कामीं म एक युक्ति सुचली आहे, ती तुला कशी काय वाटते पहा. त्या **मगधेश्वराला पद्मावती** या नांवाची एक अत्यंत रूपवती कन्या आहे. ती **वत्सराजाला** देण्याविषयीं आपण त्याजकडे मागणें करूं. पूर्वी एके प्रसंगीं मीं त्याजवळ ही गोष्ट काढिली होती; पण त्या वेळीं तो ह्मणाला,

---

१ सांप्रत ज्या प्रांताला 'बहार' असें ह्मणतात त्याला प्राचीनकालीं **मगधदेश** हें नांव होतें.

"ही माझी कन्या मला प्राणांहूनही अधिक प्रिय आहे. ती मी **वत्सराजाला** कधीं देणार नाहीं; कारण **वासवदत्तेवर** त्याचें अत्यंत प्रेम असून ती त्याची पट्टराणी आहे, तेव्हां मी आपली कन्या सवतीवर देऊन तिला तिचें दास्य करावयास लावावें ही गोष्ट माझ्या हातून कधीं घडाऱ्याची नाहीं." "मित्रा, **रुमण्वंता,** हें त्याचें ्रणणें कांहीं अंशीं खरें आहे, व तो जरी आपली कन्या देण्यास तयार झाला तरी आमचे महाराज तिचा स्वीकार करतील याचा तरी काय भरंवसा? कारण **वासवदत्तेवर** त्यांचें अत्यंत प्रेम असल्यामुळें ते तिच्या अगदीं मुठींत आहेत, व तसेंच कांहीं योग्य कारण असल्याशिवाय आपल्या पाठीवर आणखी एक सवत करून घेण्यास ती कधीं कबूल व्हावयाची नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करतां मला एक युक्ति सुचली आहे ती योजिली असतां हें काम खचीत फत्ते

होईल. ती युक्ति कोणती ह्मणशील तर **वासवदत्तेला** कोठें तरी नेऊन लपवून ठेवावें आणि ती गेल्यावर पाठीमागें तिच्या मंदिराला आग लावून देऊन तींत ती जळून मरण पावली असा चोहोंकडे पुकार करावा. ती शहाणी व समजूतदार बायको आहे. महाराजांना सार्वभौमपद प्राप्त होण्याकरितां आह्मी हें भयंकर धाडसाचें काम करीत आहों असें तिला सांगितलें तर ती आपणास खचीत अनुकूल होईल. **वासवदत्ता** जळून मेली ही गोष्ट **मगधेश्वराच्या** कानावर गेली ह्मणजे तो आपली कन्या महाराजांना देण्यास कांहीं आढेवेढे घेणार नाहीं व महाराजही मग तिचें संतोषानें पाणिग्रहण करतील. अशा रीतीनें शरीरसंबंध होऊन **पद्मावती** महाराजांच्या पदरीं पडली कीं, तिचा बाप आपल्या मुठींत आलाच ह्मणावयाचा. त्याला मग कन्येकरितां महाराजांशीं स्नेहानेंच वागलें

पाहिजे व त्यांना दिग्विजयाच्या कामांत कांहीं विघ्न न करितां उलट साह्यच केलें पाहिजे. नंतर त्याच्या आणि **चंडमहासेना**च्या मदतीनें प्रथम पूर्वदिशेकडील सर्व राजांना जिंकावें व पुढें क्रमाक्रमानें बाकीच्या दिशांकडील राजांना पादाक्रांत करून सर्वांपासून करभार घेण्याचे ठराव करावे आणि मांडलिकांप्रमाणें त्यांना त्यांच्या राज्यांवर कायम करून आपण परत यावें. याप्रमाणें दीर्घ उद्योग करून सर्व पृथ्वी जिंकल्यावर महाराजांस सार्वभौमपदाचा अभिषेक करावा. आपलें हें काम परमेश्वरकृपेनें सिद्धीस जाईल याविषयीं मला कांहींच संशय वाटत नाहीं; कारण महाराज सकल पृथ्वीचें राज्य करतील अशी पूर्वी आकाशवाणी झालेली तुला माहीतच आहे."

मंत्रिश्रेष्ठ **यौगंधरायणा**चें हें भाषण **रुमण्वाना**नें शांत चित्तानें ऐकून घेतलें. नंतर

काहीं वेळ विचार करून तो त्याला ह्मणाला, "मित्रा **यौगंधरायणा, पद्मावतीच्या** प्राप्तीसाठीं जो हा कपटव्यूह रचण्याचा तू बेत करीत आहेस त्याविषयीं खरें विचारशील तर मला मोठी भीति वाटते; कारण हा तुझा घाट मोठ्या साहसाचा असून तो सिद्धीस न गेला तर त्यापासून परिणामीं आपले जीव धोक्यांत पडण्याचा मात्र संभव आहे. महाराज ही आपली प्रियपत्नी दग्ध झाली हें वर्तमान ऐकून तिच्या विरहानें व्याकुल होत्साते काय अनर्थ करतील न कळे; यासाठीं जें करणें तें पूर्वींच नीट विचार करून करावें हें बरें. तू बुद्धिमान् आणि पोक्तविचारी आहेस, तेव्हां तुझ्या मर्जीबाहेर वागण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं."

हें सेनापतीचें भाषण ऐकून **यौगंधरायण** ह्मणाला, "मित्रा, तू ह्मणतोस तसें घडून येणें जरी कदाचित् संभवनीय असलें, तरी महारा-

जांच्या हातून दिग्विजय करविणें ही गोष्ट अ-
त्यंत महत्वाची आहे, व ती साध्य होण्याला मी
जी कल्पना काढिली आहे तिच्यावांचून दु-
सरा मार्गच नाहीं. ते राजश्री तर व्यसनाधीन
होऊन खुशाल चैन करीत बसले आहेत, अशा
प्रसंगीं जर आपण प्रधानमंडळीनें कांहीं हात-
पाय हालविले नाहींत तर सांप्रत आहे एवढें
देखील राज्य धुळीस मिळण्याला उशीर लाग-
णार नाहीं, व असें झालें ह्मणजे, **वत्सराजाचे**
प्रधान मोठे शहाणे आणि चतुर आहेत असा
जो सर्वत्र डंका वाजत आहे त्यांत कांहींच
अर्थ नाहीं असें लोक ह्मणूं लागतील. आपले
महाराज विषयासक्त होऊन राज्याविषयीं अ-
गदीं निष्काळजी असतात याचें कारण एका
अर्थीं पाहिलें तर आमच्यावर त्यांचा पूर्ण वि-
श्वास हें होय असें मला वाटतें. यासाठीं आपण
जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें आणि प्रामाणिक-

पणानें बजाविलें नाहीं तर त्या योगानें महाराजांचा दुर्लौकिक होऊन त्यांच्या कृपेस आपण अपात्र होऊं यांत संशय नाहीं. आतां इतकें खरें आहे कीं, राजेलोक जर आपल्या मंत्र्यांची सल्लामसलत घेतल्यावांचून आपल्या बुद्धीनें राज्यशकट हांकूं लागले तर त्यांचा मंत्रीपणा कोणीही पतकरणार नाहीं; मग त्या राजांनीं हातीं धरलेलें कृत्य घडो अथवा बिघडो. त्यापासून होणाऱ्या नफानुकसानीची जबाबदारी त्यांच्याच शिरावर राहते, परंतु ज्या ठिकाणीं राज्यधुरेचें सारें ओझें प्रधानादिकांच्या मानेवर लादून राजेलोक निश्चिंतपणें ऐषआरामांत आपला काळ घालवितात, त्या ठिकाणीं एकादें जड जोखिमीचें काम करणें झालें तर प्रधानांनींच आपली बुद्धि खर्च करून तें तडीस नेलें पाहिजे, व अशा प्रसंगीं जर ते निरुत्साह होऊन स्वस्थ बसतील तर तें राज्य लवकरच धु-

ळीस मिळून त्याच्या नांवानें तिलांजलि देण्याचा प्रसंग आल्यावांचून कदापि रहावयाचा नाहीं! तू कदाचित् असें ह्मणशील कीं, **वासवदत्तेचा** पिता **चंडमहासेन** हा सांप्रत आपल्या महाराजांचा सासरा असल्यामुळें दिग्विजयाच्या कामास प्रतिबंध करणार नाहीं; पण **वासवदत्ता** मरण पावली हें वर्तमान त्याला समजलें ह्मणजे मग तो महाराजांची पर्वा कशाला करील? त्यांचा उत्कर्ष अर्थातच त्याला सहन न होऊन लागलाच तो त्यांच्यावर उलटून पडेल. ही तुझी शंका सकृद्दर्शनीं खरी वाटते; पण मी तुला सांगतों कीं, आपण **वासवदत्ता**, तिचा बाप व भाऊ यांस आपली मसलत कळवून हा सर्व खटाटोप आह्मी **वत्सराजाचाच** उत्कर्ष होण्यासाठीं करीत आहों असें सांगितलें तर ते तेव्हांच आपणांस अनुकूल होऊन आपल्या सांगण्याप्रमाणें वागतील अशी माझी खातरी आहे."

**यौगंधरायण** हा सर्व मित्रमंडळांत पोक्त विचाराचा व खोल बुद्धीचा असून धीरपुरुषांमध्यें अग्रगण्य होता, तरी त्याचें पूर्वोक्त कोटिक्रमाचें भाषण ऐकूनही त्या संशयी **रुमण्वानाच्या** मनाची खातरी होईना. जों जों त्याच्या संशयांची निवृत्ति करण्याविषयीं तो बुद्धिमान् प्रधान प्रयत्न करी तों तों त्याला तो बेत अधिकाधिक धोक्याचा व असाध्य आहे असें वाटूं लागलें, आणि तो पुनः **यौगंधरायणाला** ह्मणाला, "मित्रा, तू ह्मणतोस तें सर्व जरी खरें असलें तरी, या कामांत महाराजांचा आपल्या प्रियपत्नीशीं वियोग होणार हें खचीत आहे, व अशा प्रकारच्या वियोगदुःखानें मोठमोठे विवेकी पुरुषही झुरणीस लागून नाश पावले आहेत, मग महाराजांसारख्या स्त्रैण पुरुषाची काय कथा? त्यांना तर एक क्षणभरदेखील ती दृष्टीआड झाली तर चैन पडत नाहीं. बरें, तिकडे पाहिलें तर

**वासवदत्ता**ही प्रियपतीच्या विरहानें झुरणीस लागेल. याप्रमाणें एकमेकांच्या वियोगानें दोघांचाही नाश झाला तर केवढा वरें अनर्थ होईल? याचा तू नीट विचार कर. मला वाटतें त्यांची ताडातोड न होईल अशी दुसरी एकादी मसलत करावी हें बरें." याप्रमाणें भाषण करून नानाविध शंकांनीं आकुल झालेला तो सेनापति स्तब्ध राहिला. तें पाहून धैर्याचा केवळ सागर व बुद्धीनें बृहस्पतीची बरोबरी करणारा तो प्रधान त्याला ह्मणाला, "सेनापते, तुमच्या मनानें जी ही धास्ती घेतली आहे तींत कांहींएक अर्थ नाहीं. मीं याविषयीं पूर्ण विचार केलेला आहे. राज्याच्या उलटापालटी व राजकारस्थानें अशाच प्रकारचीं साहसाचीं कृत्यें केल्यावांचून कधीं सिद्धीस गेलीं नाहींत, अशा पुष्कळ गोष्टी पूर्वी घडलेल्या आहेत; ह्मणून मी ह्मणतों, **वासवदत्ते**च्या मरणाची खोटी अफवा उठवून आपण

या दिग्विजयाच्या कामास एकदम आरंभ करूं. नेटानें आणि धैर्यानें तें चालविलें असतां परमेश्वर खचीत आपणांस यश देईल."

यापमाणें **यौगंधरायणा**चा फारच आग्रह पाहून **रुमण्वान्** ह्मणाला, "तुमचा या कामाविषयीं निश्चयच झाला असेल तर माझी कांहीं हरकत नाहीं. मी काय शिपाईगडी, सांगाल ती मोहीम करण्याचें माझें काम. पण एवढें तरी माझें ऐका कीं, **वासवदत्ते**चा भाऊ **गोपालक** याला लवकर बोलावून आणवून व त्याला हा सर्व बेत कळवून त्याच्या द्वारानें तिला अनुकूल करून घ्या ह्मणजे कांहीं घोटाळा होणार नाहीं. **यौगंधरायणा**ला ती गोष्ट मान्य होऊन त्यानें दुसऱ्या दिवशींच **उज्जयिनी**स आपला दूत रवाना केला. पूर्वी **वासवदत्ते**च्या लग्नसमारंभास **गोपालक** आला होता त्या वेळीं 'तुह्मी लवकरच पुनः आपल्या बहिणीच्या भेटीस या,' असें **वत्सराजा**नें

त्याला जातेवेळीं सांगितलें होतें हें **यौगंधराय-णाला** माहीत होतें. तेंच निमित्त पुढें करून त्यानें, **वासवदत्ता** तुमच्या भेटीविषयीं फार उत्कंठित झाली आहे, यासाठीं तिच्या संतोषा-साठीं कृपा करून लवकर निघून यावें, असा दूताबरोबर निरोप पाठविला. निरोप पोंचतांच तो राजपुत्र मोठ्या त्वरेनें **कौशांबीस** निघून आला. जसा मूर्तिमंत उत्सव आपल्या घरीं चालून यावा त्याप्रमाणें त्यानें राजवाड्यांत पाय ठेवतां-क्षणींच **वत्सराजानें** सामोरा जाऊन त्याला मोठ्या सन्मानानें अंतर्गृहांत नेलें व त्याचें उत्तम प्रकारें आगतस्वागत करून कुशल प्रश्न विचा-रिले. त्याला पाहून राजा राणी व प्रधानमंडळी यांना तो दिवस मोठ्या आनंदाचा उगवला असें वाटलें.

त्याच दिवशीं रात्रीं सवड पाहून **यौगंधरा-यणानें गोपालक** व **रुमण्वान्** यांना आपल्या

घरीं बोलावून नेलें व तिथे एकांतस्थळीं मसलत करण्याकरितां बसले. नंतर त्यानें मनांत योजिलेला बेत, जो पूर्वी **रुमण्वाना**ला कळविला होता, तो सर्व **गोपालका**ला निवेदन केला. आपल्या बहिणीविषयीं अशी अनिष्ट आणि अशुभ वार्ता प्रसिद्ध करून तिच्या मनाला दुःख देणें हें त्याला अर्थातच प्रथम चांगलें वाटलें नाहीं; पण **वत्सराजा**चें ज्या गोष्टींत हित तींत तिचेंही हितच आहे असें समजून त्यानें **यौगंधरायणा**च्या मसलतीस अनुमोदन दिलें. खरेंच आहे कीं, शहाण्या आणि बुद्धिमान् मनुष्याच्या भाषणावर कोण भरंवसा ठेवणार नाहीं ? **गोपालका**चें मन वळलें, तथापि सेनापतीच्या मनाची मळमळ अद्यापि गेली नव्हती. पुनः त्याच्या मनांत शंका येऊन तो ह्मणाला, "प्रधानजी, आपला हा जो बेत ठरला आहे त्याप्रमाणें करावयाचें तर खरेंच; पण **वासवदत्ते**ला अशा प्र-

कारें शोचनीय मृत्यु आला ही बातमी कळतांच महाराज आपला प्राण ठेवतील असें मला वाटत नाहीं; तेव्हां तो अनर्थ टाळण्याकरितां कोणत्या उपायाची योजना करावयाची याचा आपण पूर्वींच कांहीं तरी विचार करणें अवश्य आहे. एखाद्या कार्याच्या सिद्धीकरितां नुसत्या उत्तम उपायांची अनुकूलता असून उपयोग नाहीं. तें कार्य करीत असतां त्यापासून कदाचित् कांहीं अनिष्ट परिणाम घडून येण्याचा संभव असला तर त्याच्या प्रतीकाराची अगोदरपासून तजवीज करून ठेवणें हेंच कोणत्याही मसलतीचें मुख्य अंग आहे." **यौगंधरायणा**ला हे विचार पूर्वीं सुचले नव्हते असें नाहीं, व त्यानें त्याविषयीं विचारही करून ठेविला होताच. सेनापतीचें हें भाषण ऐकून तो ह्मणाला, सेनापते, तुह्मी जी भीति मनांत बाळगीत आहां ती व्यर्थ आहे; कारण असें कीं, **वासवदत्ता** ही राजकुमार **गो-**

**पालक** यांची धाकटी बहीण असून त्यांना ती प्राणांपेक्षांही अधिक प्रिय आहे; तेव्हां तिच्या मरणाची वार्ता ऐकून ते तिचे प्रत्यक्ष बंधु असतांही कांहींएक दुःख न मानितां खुशाल बसले आहेत हें जर महाराजांच्या पाहाण्यांत आलें तर ते आपोआप मनांत समजतील कीं, ही बातमी खोटी असावी, व ती आपली प्राणवल्लभा जिवंत असून लवकरच आपणास भेटेल अशा आशेनें अधीर न होतां ते जिवावर कधीं उदार व्हावयाचे नाहींत हें मी खातरीनें सांगतों. कदाचित् त्यांच्या चित्ताची चलबिचल होण्याचा रंग दिसूं लागला तर आपण लगट करून **पद्मावतीशीं** त्यांचा विवाह करून टाकूं ह्मणजे त्यांचें मन स्वस्थ होईल. **पद्मावती**चा बाप **प्रद्योत वासवदत्ता** मेली असें समजून आपली कन्या महाराजांस मोठ्या आनंदानें अर्पण करील. एकदा लग्न लागून चुकलें कीं, लगेच आपण **वा-**

**सवदत्ते**ला प्रकट करूं ह्मणजे झालें. एथपर्यंत कार्य झालें ह्मणजे दिग्विजयाचें अर्धें काम आटोपलेंच असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं."

ही **यौगंधरायणा**ची मसलत शेवटीं **रुमण्वाना**ला पसंत पडली, व ते तिघेजण पुढें कसें करावयाचें याची वाटाघाट करूं लागले. त्यांनीं या गोष्टीचा पुष्कळ खल केला. सरतेशेवटीं **यौगंधरायणा**नें असें ठरविलें कीं, कांहीं निमित्तानें **वत्सराज** आणि **वासवदत्ता** यांना बरोबर घेऊन **लावाणक** या नांवाच्या त्यांच्याच राज्यांतील एका प्रांतांत कांहीं दिवस जाऊन राहावें. हा प्रांत **मगध** देशाला अगदीं लागून आहे व त्यांत शिकारीची चांगली सोय आहे. महाराजांना शिकारीचा नाद पुष्कळ आहेच, तेव्हां त्या निमित्तानें आपण **वासवदत्ते**सहवर्तमान त्यांना तिकडे नेऊं व ते शिकारीसाठीं दूर अरण्यांत गेले अशी संधी पाहून युक्तीनें **वास-**

**वदत्तेला** मी **पद्मावतीच्या**च घरीं गुप्त वेषानें नेऊन ठेवीन व पाठीमागें तुह्मी तिच्या मंदिराला आग लावून तींत ती जळून मरण पावली अशी बातमी चोहींकडे पसरा ह्मणजे झालें. याप्रमाणें खलबत झाल्यावर दुसऱ्या दिवशीं त्या कामास लागावयाचें असा निश्चय करून ते आपापल्या ठिकाणीं निजावयास गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते तिघेजण राजवाड्यांत जाऊन राजाला भेटले. नंतर **रुमण्वानानें** पुढें होऊन राजाला विनंति केली ती अशी: " महाराज, **मगध** देशाच्या सीमेवर **लावाणक** या नांवाचा आपला प्रांत आहे त्यांतील प्रजेला तो **मगधेश्वर** फार उपद्रव करीत असतो, यासाठीं तिचें संरक्षण करण्याकरितां आपण एक वेळ तिकडे जावें हें अवश्य आहे. तिकडे जाण्यांत दुसराही एक फायदा आहे, तो असा कीं, तो प्रदेश अत्यंत रमणीय असून त्यांत शिकार

करण्यासारखीं अफाट आणि सुंदर वनें पुष्कळ आहेत; यामुळें राजकार्य साधून चार दिवस मृगया करण्यांत वेळ घालविला असतां आपल्या जिवास सुखसमाधान वाटेल." राजाला शिकार करण्याची मोठी हौस होतीच. त्यानें सेनापतीची ती विनंति ऐकून **वासवदत्ते**ची सल्ला त्या कामांत घेतली. तिनें फार उत्तम आहे मीही आपल्या बरोबर येतें; घरीं राहून राहून कंटाळा आला आहे; तेव्हां चार दिवस हवा पालटण्यानें मलाही करमणूक होईल, असें सांगतांच त्यानें **लावाणकां**त जाण्याचा निश्चय केला, व दुसऱ्या दिवशींच मुहूर्त चांगला होता; ह्मणून प्रधानास सांगून प्रयाणाची सर्व तयारी करविली. इतक्यांत आकाशमंडल आपल्या तेजानें दीप्तिमान् करीत होत्साते **नारद**मुनि त्या ठिकाणीं अकस्मात् येऊन उतरले. **वत्सराज** चंद्रवंशांत उत्पन्न झाला होता, ह्मणूनच कीं काय, साक्षात्

चंद्रच त्या ब्रह्मर्षीच्या रूपानें स्वकीय वंशाला भूषणभूत अशा त्या राजाच्या नेत्रांस प्रेमभावानें आनंदोत्सव देत त्याला भेटण्याकरितां तेथें आला असावा असें सर्वांस वाटलें! **नारद**मुनींना अकस्मात् आलेले पाहून राजानें त्यांस बसावयास आसन दिलें, व कुशलप्रश्न करून त्यांचा योग्य सत्कार केला; त्यामुळें संतुष्ट होऊन त्या ऋषिश्रेष्ठानें आपल्या कंठांतील पारिजातकपुष्पांचा दिव्य हार काढून तो **वत्सराजा**च्या गळ्यांत घातला. **वासवदत्ते**नेंही त्या ब्रह्मर्षीच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याची यथासांग पूजा केली, तेणेंकरून प्रसन्न होऊन त्यानें, 'कामदेवाचा अंशभूत असा तुला सुंदर पुत्र होईल व तो सकल विद्याधरांचा राजा होईल,' असा आशीर्वाद देऊन तिला संतुष्ट केलें. नंतर **यौगंधरायणा**दि प्रधानमंडळी व राजकुमार **गोपालक** जवळ बसले होते त्यांच्यासमक्ष **नारद**मुनि राजाला ह्मणाले,

"राजा, तुझी ही प्रियभार्या **वासवदत्ता** मोठी पतिव्रता आहे. हिला पाहून मला एका गोष्टीचें स्मरण झालें. ती तुला सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. पूर्वी **युधिष्ठिरादि** पांच पांडव तुझे पूर्वज होऊन गेले. त्या पांचजणांची **द्रौपदी** या नामेंकरून एकच भार्या होती व तिचें सौंदर्य **वासवदत्ते**प्रमाणेंच अप्रतिम होतें. एका समयीं मी त्यांच्या भेटीस गेलों होतों, तेव्हां या विलक्षण संबंधामुळें त्यांच्यामध्यें कदाचित् कलह माजेल अशी मला भीति पडली. पांडव हे मला प्राणांपेक्षांही अधिक प्रिय होते; यासाठीं त्यांच्यामध्यें फुटाफूट होऊं नये, ह्मणून मीं त्यांस सांगितलें, 'बाबांनो, ही **द्रौपदी** तुमची पांचाजणांची स्त्री आहे, तेव्हां इच्या संबंधानें तुमच्यामध्यें परस्परांविषयीं जेणेंकरून मत्सरभाव उत्पन्न होणार नाहीं, अशा प्रकारचें तुह्मी वर्तन ठेवा; कारण हें स्त्रीमूलक वैर मोठें भयंकर आणि परि-

णामीं घातक आहे. यापासून नानाप्रकारच्या विपत्ति मनुष्यांस भोगावयास लागून शेवटीं त्यांचा नाश होतो, ह्मणून या वैराला तुह्मीं फार जपलें पाहिजे.' असें ह्मणून **नारदांनीं** त्यांस एक गोष्ट सांगितली, ती अशीः—

पूर्वी **सुंद** आणि **उपसुंद** या नांवांचे दोन दैत्य सख्खे बंधु होऊन गेले. ते शंकराच्या प्रसादानें अजिंक्य होऊन त्यांनीं आपल्या पराक्रमानें त्रैलोक्य पादाक्रांत करून टाकिलें; तेव्हां **इंद्रादि** देवांना मोठी काळजी पडून त्यांच्या नाशाविषयीं त्यांनीं **ब्रह्मदेवा**ची आराधना केली. त्यानें **विश्वकर्म्या**ला सांगून त्याच्याकडून **तिलोत्तमा** या नांवाची एक अप्सरा निर्माण करविली. तिचें सौंदर्य इतकें अनुपम बनून गेलें होतें कीं त्या वेळीं कैलासनाथ **शंकर** जवळ बसले होते, त्यांना ती स्वर्गाहून येतेवेळीं प्रदक्षिणा करूं लागली; तेव्हां तिचें रूप पाहण्याविषयीं उतावीळ

होत्साते ते चतुर्मुख[1] बनले ! नंतर एके दिवशीं ते मदोन्मत्त दोघे दैत्य **कैलास**पर्वतावरील उद्यानांत फिरत असतां, आपल्या सौंदर्यानें व हावभावांनीं त्यांना मोहित करून त्यांच्यामध्यें कलह माजविण्याच्या हेतूनें **ब्रह्मदेवाच्या** आज्ञेनें ती अप्सरा त्यांच्याजवळ गेली. तिला पाहतांच कामवश होऊन दोघांनीं तिचे दोन हात धरिले. प्रत्येकजण ही मला पाहिजे असें ह्मणूं लागला. याप्रमाणें उभयतांमध्यें भांडण लागून दोघांचें द्वंद्वयुद्ध जुंपलें व शेवटीं एकमेकांशीं झगडतां झगडतां दोघेही मरून गेले ! सारांश, स्त्रियांच्या पायीं आपणांस सुज्ञ ह्मणविणारे मोठमोठे लोकही विपत्तींत पडतात. ते तर दोघेच होते; पण तुह्मी पांचजण आहां, आणि ही **द्रौपदी** एकटी असून सगळ्यांचीच आवडती. यासाठीं इच्छा

१ **शंकराला** पांच मुखें आहेत हें प्रसिद्ध आहे; पण पुराणांतरीं कोठें कोठें चार मुखें असल्याचेंही वर्णन आहे.

निमित्तानें तुमच्यामध्यें मत्सरभाव उत्पन्न होऊन कलह न माजावा याविषयीं तुह्मी फार जपून राहा, व मी सांगतों ती मर्यादा पाळा. ज्येष्ठ भ्रताराच्या सहवासांत ही असली ह्मणजे बाकीच्यांनीं तिला मातेप्रमाणें मानावें, व कनिष्ठाच्या सहवासांत असली ह्मणजे ज्येष्ठांनीं आपल्या स्नुषेप्रमाणें तिच्याशीं वर्तन ठेवावें. वर्षाचे पांच भाग करून प्रत्येकानें दोन महिने आणि बारा दिवस तिच्याशीं पाळीपाळीनें संबंध ठेवावा, ह्मणजे तुमचें कल्याण होईल. राजा, पांडवांनीं ही माझी आज्ञा मान्य करून तीप्रमाणें वागण्याचें कबूल केलें व जन्मभर तसे वागले, ह्मणून त्यांचें कल्याण झालें. तू त्यांचा वंशज असून त्यांच्यासारखाच मला प्रिय आहेस; यासाठीं तुला तुझ्या कल्याणाच्या चार गोष्टी सांगाव्या हा हेतु मनांत धरून तुझ्या भेटीस मी आलों आहें; यासाठीं मी सांगतों तें नीट ऐकून घे. हे तुझे प्र-

धान मोठे बुद्धिमान् व तुझ्या हितासाठीं मनापासून झटणारे आहेत. यांच्या सल्लयानें नेहमीं वागत जा; ह्मणजे लवकरच तुझा उत्कर्ष होऊन तुला मोठें वैभव प्राप्त होईल. कांहीं कालपर्यंत तुला दुःख भोगावें लागेल; पण त्यामुळें घाबरून जाऊं नको. त्याचा शेवट अत्यंत सुखावहच होईल, हें माझें वचन प्रमाण मान," याप्रमाणें भावी उत्कर्षाविषयीं **वत्सराजाला** मोठ्या युक्तीनें सुचवून व प्रधानांच्या सांगण्याप्रमाणें वागत जा असा बोध करून तो बुद्धिमान् **नारद**-ऋषि तेथल्यातेथेंच अंतर्धान पावला. त्या महर्षीनें केलेला उपदेश **यौगंधरायणादि** प्रधानांनीं ऐकिला तेव्हां आपल्या मनांतील हेतु सिद्धीस जाण्याकरितां **नारदा**ची भेट ही एक मोठी अनुकूल गोष्ट घडून आली असें त्यांस वाटलें व त्यामुळें कार्याविषयीं प्रोत्साहन होऊन त्यांस अत्यंत आनंद झाला.

नंतर दुसऱ्या दिवशीं सर्व तयारी करून **यौगंधरायणा**दिक प्रधानांनीं **वत्सराजाला वासवदत्ता** व **गोपालक** यांसहित **लावाणकास** नेलें. सेनापति **रुमण्वान्** यानें स्वारीचा मोठा थाट करून पुष्कळ सैन्य बरोबर घेतलें होतें, त्याचा जयघोष ऐकून आपला इष्ट हेतु लवकरच सिद्ध होईल असें **यौगंधरायणास** वाटलें व त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें उत्साहानें भरून गेलीं. एवढ्या मोठ्या सैन्यासह **वत्सराज** आपल्या राज्याच्या अगदीं जवळ येऊन ठेपला ही बातमी ऐकून तो लढाई करण्याकरितां आला कीं काय अशा शंकेनें **मगधदेश**चा राजा **प्रद्योत** भयानें थरथर कांपूं लागला, व त्यानें लागलाच आपला **सद्बुद्धि** नांवाचा दूत **यौगंधरायणा**कडे पाठविला व मोठ्या नम्रतेनें स्वारी करण्याचें कारण काय तें विचारून आमच्याशीं आपण स्नेहभावानें वागावें अशी आमची इच्छा

आहे असा निरोप कळविला. **यौगंधरायणा**ला खरोखर तेंच पाहिजे होतें; यासाठीं त्यानें त्या दूताचा सत्कार करून व आपल्याप्रमाणें आमचीही इच्छा आहे असें आपल्या राजाला कळवा असें सांगून त्या दूताची परत रवानगी केली. तथापि **प्रद्योत**राजाचें खरें अंतःकरण कसें आहे हें त्याला कळेना, ह्मणून आपला बेत कोणत्या रीतीनें पार पाडावा याविषयीं त्याचे विचार एकसारखे चालू होते. इकडे **वत्सराजा**नें शिकारीकरितां दररोज रानांत जाण्याचा क्रम सुरू केला. एके दिवशीं तो एका फार दूरच्या अरण्यामध्यें गेला आहे अशी संधी पाहून त्याच दिवशीं आपल्या बेताप्रमाणें बार उडवून द्यावा असा निश्चय करून **यौगंधरायणानें गोपालक, रुमण्वान्** आणि **वसंतक** यांसहवर्तमान **वासवदत्ते**ची तिच्या मंदिरांत एकांतीं जाऊन भेट घेतली व योजिलेलें राजकार्य तिला कळवून

.करितां अशा अशा प्रकारचें
ु... लाव्य पाहिजे अशी विनंति केली. **गोपा-
लका**नें पूर्वींच तिला तो बेत कळवून तिचें मन
वळविलें होतेंच. शिवाय **नारद**मुनीनें प्रधा-
नाच्या सल्लामसलतीनें वागलां असतां त्यांत तुमचें
कल्याण आहे असें नुकतेंच सांगितलेलें तिच्या
स्मरणांत होतें, ह्मणून तिनें तत्काळ, काय पा-
हिजे ती मदत करण्यास मी तयार आहें, असें
सांगून पुढील तयारी करण्याविषयीं आपलें अनु-
मोदन दिलें. ती ह्मणाली, " प्राणनाथाचें ज्या
गोष्टींत हित आहे ती गोष्ट मला मान्य केलीच
पाहिजे. त्यांच्या कल्याणाकरितां कांहीं दिवस
थोडे क्लेश भोगावे लागले ह्मणून काय झालें ?
कुलांगना आणि पतिव्रता स्त्रीनें ते सहन करणें
.. तिचा मुख्य धर्मच होय." हें तिचें उत्साह-
ाषण ऐकून **यौगंधरायणा**ला अत्यंत हर्ष
व पुढील कर्तव्याविषयीं मोठी उमेद आली.

त्याला रूपांतर करण्याची विद्या.
तिच्या प्रभावानें त्यानें **वासवदत्तेचें** तात्काळ रूप बदलून तिला साधीभोळी, पण सुंदर अशी एक ब्राह्मणस्त्री बनविली. नंतर **वसंतकाला** एक डोळा फुटलेला अशा ब्राह्मणबटूचें रूप देऊन आपण स्वतः एक जखड म्हातारा बनला. याप्रमाणें रूपांतरें करून तो बुद्धिमान् आणि धाडसी प्रधान **वासवदत्ता** आणि **वसंतक** यांसहवर्तमान **मगधेश्वराचें** नगर जें **पाटलीपुत्र** तिकडे जावयास निघाला. जातांना पाठीमागें जी व्यवस्था करावयाची ती सर्व त्यानें **रुमण्वान्** आणि **गोपालक** यांस सांगून ठेविली. आपल्या हातून हें मोठें साहस घडत आहे असें मनांत येऊन **वासवदत्तेला** फार वाईट वाटलें. पण **न**
ऋषीनें केलेल्या बोधावर व आशीर्वादावर
वसा ठेवून ती साध्वी मुकाट्यानें वाट च

गली. तिचा जड देह मात्र मार्गानें चालला होता; पण सारें चित्त प्रिय भर्त्याकडे लागलें होतें.

**यौगंधरायणा**बरोबर **वासवदत्ता** निघून गेल्यावर पाठीमागें संकेताप्रमाणें **रुमण्वानानें** तिच्या मंदिरास आग लावून दिली, व तिचा धडका होतांच, अहो ! धांवा हो धांवा ! राणी **वासवदत्ता वसंतका**सह या मंदिरांत सांपडली आहे तिला वांचवा ! ती आतां जळून खचीत मरणार ! अशी ओरड केली. त्याची ती आरोळी ऐकतांच आसपासचे सर्व लोक घाबऱ्यां घाबऱ्यां तेथें जमा होऊन त्यांनीं ती आग विझविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण ती न विझतां थोड्याच वेळांत सर्व मंदिर जळून खाक झालें ! **वासवदत्ता** त्या आगींत जळून मेली असें स-मजून सर्व लोक ढळढळां रडूं लागले. **रुमण्वान्** आणि **गोपालक** हेही बाह्यात्कारें फार आक्रोश करूं लागले, व **वत्सराज** शिकार करून परत

आला ह्मणजे त्याला काय सांगावें याविषयीं मोठ्या काळजींत पडल्याचें त्यांनीं सोंग आणिलें. कांहीं वेळानें ती आग हळू हळू शांत होऊन जिकडे तिकडे स्थिरस्थावर झालें.

इकडे **यौगंधरायण, वासवदत्ता** व **वसंतक** यांस घेऊन जो निघाला तो थेट **पाटलीपुत्र** नगरांत जाऊन पोंचला. तें नगर **लावाणका**पासून जवळच होतें. तेथें गेल्यावर राजकन्या **पद्मावती** इची भेट कोठें होईल याविषयीं चौकशी करीत असतां ती नगराबाहेरील उद्यानांत विहार करण्यासाठीं गेली आहे असें त्याला समजलें. तेव्हां तीं तिघेंजणें त्या बागांत गेलीं. तेथें **पद्मावती** आपल्या सख्यांसह एका लतागृहांत विश्रांति घेत बसली होती. **यौगंधरायण** त्या लतागृहांत जाऊं लागला; पण तेथें रखवालदार होते ते त्याला प्रतिबंध करूं गले. तो आंत जाऊं देण्याविषयीं त्यांचें

करूं लागला; पण ते कांहीं केल्यानें ऐकतना. हा सर्व प्रकार **पद्मावती** आंतून पाहात होती. ब्राह्मणीचें रूप घेतलेल्या **वासवदत्ते**ला पाहून तिजविषयीं तिच्या अंतःकरणांत प्रेमभाव उत्पन्न झाला आणि तिनें रखवालदारांस रागें भरून त्या तिघांनाही आंत येऊं देण्यास सांगितलें. आंत जातांच त्यांना बसावयास सांगून मोठ्या विनयानें तिनें विचारिलें, "भटजीबावा, तुह्मी एथें कोणत्या कामाकरितां आलां आहां व ही स्त्री तुमची कोण आहे व हा मुलगा कोणाचा तें कृपा करून सांगा. तुमचें जें काम असेल तें माझ्या हातून होण्यासारखें असेल तर मी खचीत करीन." हें तिचें ममतेचें भाषण ऐकून आपली बी एथें रुजण्याचा बराच रंग दिसतो आहे असें समजून **यौगंधरायणा**ला बराच धीर आला, आणि तो तिला ह्मणाला, "राजकन्ये, मी गरीब ब्राह्मण असून ही दुर्दैवी मुलगी माझी कन्या

आहे. इचें नांव **अवंतिका**. इचा नवरा दुर्व्यसनांच्या नादास लागून इला टाकून कोणीकडे निघून गेला त्याचा पत्ता नाहीं. तू मोठी उदार व गरिबां.र दया करणारी आहेस असें ऐकतों; ह्मणून मी इच्या नवऱ्याचा शोध करून त्याला परत आणीं तोंपर्यंत इला तुझ्या स्वाधीन करावें असें माझ्या मनांत आहे; कारण या तरुण मुलीचें संरक्षण करण्याला माझ्यावांचून दुसरें कोणी नाहीं. हा मुलगा इचा भाऊ आहे. इला एकटी राहिल्यानें करमेनासें होईल, ह्मणून यालाही इच्याजवळ ठेवावें अशी माझी इच्छा आहे. एवढें काम जर तू करशील तर मज गरिबावर मोठे उपकार होऊन इला संसारसुखांत घातल्याचें तुला पुण्य लागेल." त्या ब्राह्मणाची ही काकळूतवाणी विनंति ऐकून **पद्मावती**ला दया आली, आणि ती त्याला ह्मणाली, "भटजीबावा, तुह्मी या मुलीला आणि मुलाला खुशाल मजज-

वळ ठेवून आपलें काम करून या. मी आपल्या भावंडांप्रमाणें यांचें संरक्षण करीन. कांहीं काळजी करूं नका." **यौगंधरायणाला** जें पाहिजे होतें तेंच झाल्यावर त्याला जो आनंद झाला त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! त्यानें तथास्तु ह्मणून **वासवदत्ता** आणि **वसंतक** यांना **पद्मावती**च्या हवालीं केलें, व ईश्वर तुझें कल्याण करो असा तिला आशीर्वाद देऊन तो तेथून निघाला, तो मोठ्या त्वरेनें **लावाणकांत** येऊन दाखल झाला, व **रुमण्वान्** आणि **गोपालक** यांस भेटून त्यांना त्यानें झालेली सर्व हकीकत कळविली.

इकडे त्या बनावट बहिणभावंडांची मुखचर्या व चालचलणूक पाहून **पद्मावती**च्या मनांत त्यांच्याविषयीं स्नेहभाव उत्पन्न झाला, व मोठ्या कौतुकानें ती त्यांना बरोबर घेऊन आपल्या मंदिरांत गेली. **वासवदत्ता** स्वभावानें

मोठी मनमिळाऊ होती, यामुळें **पद्मावतीचें** तिच्यावर फारच प्रेम जडलें. ती तिला आपल्या बहिणीप्रमाणें मानून कोणत्याही गोष्टीविषयीं तिला उणें पडूं देत नसे; तथापि **वासवदत्ता** ही राजकन्या व राजपत्नी असल्यामुळें तिला स्वतंत्रपणें वागण्याची संवय झाली होती, ह्मणून परक्या ठिकाणीं गुप्तवेषानें राहून तिला चैन पडेनासें झालें. तशांतूनही प्रियपतीचा वियोग झाल्यामुळें तिची वृत्ति फारच उदास झाली होती. तिच्या उदासवृत्तीचें कारण तिच्या नामधारी बापानें कळविलें होतें, तेंच खरें मानून **पद्मावती** तिला वारंवार ह्मणे, "गडे **अवंतिके,** तू जर अशी सारा दिवस दुःख करीत बसलीस तर कसें बरें होईल? तुझा बाप तुझ्या नवऱ्याचा शोध लावून लवकरच त्याला घेऊन येईल. उगीच काळजी करून आपल्या जिवाला दुःख देण्यांत काय अर्थ आहे?" अशा प्रकारें ती तिचें

वरच्यावर समाधान करीत असे; पण अशा गोष्टींनीं तिचें समाधान कसें होणार ? तिच्या दुःखाचें कारण निराळेंच होतें. **पद्मावतीच्या** मंदिरांतील भिंतींवर रामायणांतील चित्रें काढलेलीं होतीं. त्यांत **रामचंद्राच्या** वियोगानें **सीतादेवी** कष्टी होऊन बसलेली आहे असें एक चित्र तिच्या दृष्टीस पडलें. तें पाहून **सीतेचें** वियोगदुःख संपून ती जशी **रामचंद्राशीं** संयुक्त झाली त्याप्रमाणेंच आपलेही हे दुःखाचे दिवस संपून प्राणनाथांची भेट लवकरच होईल अशा आशेनें ती कसा तरी काळ घालवूं लागली. तिचें सौंदर्य आणि सौकुमार्य, तसेंच बसणें, उठणें, खाणें, पिणें, इत्यादिकांची टापटीप व शरीरास सदासर्वकाळ येणारा सुवासिक पुष्पासारखा सुगंध, इत्यादि प्रकार पाहून ही आपणासारखीच कोणी तरी उत्तम कुलांत जन्मलेली राजकन्या असावी असा **पद्मावतीला** संशय

आला, आणि तेव्हांपासून ती तिची अधिकच बरदास्त ठेवूं लागली. तिला वाटलें कीं, **द्रौपदी** जशी **विराटाच्या** घरीं **सैरंध्रीच्या** रूपानें राहिली होती तशीच ही कोणी तरी थोर कुलांतील कन्या प्रसंगवशात् गुप्त वेषानें एथें राहिली असावी, यांत संशय नाहीं. **पद्मावती**च्या मनाचा मोकळेपणा व निष्कपट वर्तन पाहून हळू हळू **वासवदत्ते**चेंही प्रेम तिजवर बसत चाललें. ती **वत्सराजा**पासून, कधीं न कोमेजणारा पुष्पहार व मुखास अद्वितीय शोभा आणणारा तिलक कसा करावा तें शिकली होती. त्याप्रमाणें एके दिवशीं उभयतां आनंदांत असतां **वासवदत्तेनें पद्मावती**ला तसा एक हार करून दिला व तिच्या कपाळावर तिलक लाविला, त्या योगानें ती फारच खुष झाली व पूर्वींपेक्षां अधिक सुंदर दिसूं लागली. कांहीं वेळानें तो हार व तिलक तिच्या आईच्या दृष्टीस पडला,

तेव्हां तिनें ते पदार्थ तुला कोणीं दिले ह्मणून विचारिलें. **पद्मावतीनें** झालेली सर्व हकीकत तिला कळविली, ती ऐकून **अवंतिकेच्या** चातुर्याविषयीं तिला फारच आश्चर्य वाटलें, आणि तिच्याविषयीं तिच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला. ती **पद्मावतीला** ह्मणाली, "मुली, ब्राह्मणकन्येच्या रूपानें ही जी **अवंतिका** तुझ्याजवळ राहिली आहे ह्मणून तू सांगतेस ती सामान्य मानुषी नसून खचीत कोणी तरी देवता असावी; एरव्हीं असलें अमानुष कौशल्य तिच्या हातून कधीं घडलें नसतें. देवता किंवा तापसी स्त्रिया सज्जनांचें सत्व पाहाण्याकरितां त्यांच्या घरीं वास करीत असतात अशा पूर्वी पुष्कळ गोष्टी घडून आल्या आहेत. **कुंतिभोज** राजाची कन्या **कुंती** इचें सत्व पाहण्यासाठीं **दुर्वास** ऋषि तिच्या घरीं जाऊन राहिले होते, ही कथा तुला माहीत असेलच. तशाच प्रका-

रची ही **अवंतिका** कोणी तरी तापसी किंवा देवकन्या असावी, असें मला खास वाटतें; यासाठीं तुला सांगतें, तू तिचें मन कधींही दुखवूं नको; ह्मणजे त्यांत तुझें कल्याण होईल." **पद्मावती**ला हा संशय पूर्वी आलाच होता, तो तिच्या आईच्या सांगण्यावरून दृढ झाला, व तेव्हांपासून ती **अवंतिके**च्या फारच भजनीं लागली. तिच्या जिवास सुखसमाधान वाटावें ह्मणून ती नाना तऱ्हांचे उपचार करी; पण रात्रीं कमलिनी जशी निस्तेज होते तशी पतिवियोगजन्य दुःखानें ती नेहमीं उदासवाणी दिसत असे. **वसंतक** भावाच्या नात्यानें तिच्याजवळ राहिला होता; तो वरच्यावर कांहीं पोरचेष्टा करी व विनोदाच्या गोष्टी सांगे, त्या योगानें मात्र, म्लान झालेलें तिचें मुखकमल केव्हां केव्हां प्रफुल्लित होत असे.

यांप्रमाणें **वासवदत्ता पद्मावती**च्या गृहांत राहून पतिवियोगाचे दिवस कंठीत असतां

इकडे **लावाणकांत** हकीकत घडली ती अशीः—**वत्सराज** मृगयेकरितां फार दूरच्या अरण्यांत गेला होता तो सायंकाळीं परत आल्यावर सर्व लोकांचीं तोंडें दुःखानें म्लान झालेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं. पुढें तो विचारपूस करणार इतक्यांत **वासवदत्ता** आपल्या अंतःपुरांत **वसंतका**सह जळून मरण पावली हें दुःखकारक वर्तमान प्रधानाच्या तोंडून त्यानें ऐकिलें. त्या सरशी, आकाश एकदम कोसळून अंगावर पडावें अशी त्याच्या मनाची स्थिति झाली व लागलाच बेशुद्ध होऊन तो धाडकन् खालीं पडला! जणूं काय प्रियतमेच्या विरहानें होणाऱ्या दुःखाचा अनुभव घेण्याचा प्रसंग आपणावर न यावा, ह्मणून त्यानें तसें केलें! **यौगंधरायण, रुमण्वान्** आणि **गोपालक** हे तिघे जवळ होतेच. राजाची ती अवस्था पाहून त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. एवढा धै-

यांचा सागर **यौगंधरायण;** पण तोही क्षण-मात्र घाबरून गेला. ते राजाच्या अंगावर पाणी शिंपडून व वारा घालून त्याला सावध करूं लागले. कांहीं अवकाशानें,—प्रियपत्नीच्या विरहामुळें होणारे क्लेश भोगण्याकरितांच कीं काय तो सावध झाला; तथापि ज्या अग्नीनें त्याच्या प्रियेला दग्ध केलें असें तो समजत होता तोच त्याच्या हृदयांत प्रवेश करून त्याला शोकाग्नीच्या रूपानें जाळूं लागला, व त्या दुःखानें अत्यंत विलाप करीत होत्साता त्यानें प्राणत्याग करण्याचा निश्चय केला. **यौगंधरायणा**दि मंत्री व **गोपालक** त्याचें अनेक रीतींनीं शांतवन करूं लागले. कांहीं वेळानें तो दुःखावेग कमी झाल्यावर त्याला एकाएकीं **नारद**मुनीनें दिलेल्या आशीर्वादाचें स्मरण होऊन तो आपल्या मनांत ह्मणाला, "**वासवदत्ते**च्या उदरीं सकल विद्याधरांचा राजा असा पुत्र जन्मास येईल असें त्या

ब्रह्मर्षीनें सांगितलें होतें तें कदापि खोटें व्हावयाचें नाहीं. शिवाय त्याच्या भाषणांत, मला कांहीं दिवस विपत्ति भोगावी लागेल व ती मी निमूटपणें सहन केली तर तिचा परिणाम कल्याणकारक होईल असेंही आलें होतें; यावरून न जाणों, आजचा प्रसंग माझी परीक्षा पाहाण्याचाच नसेल कशावरून? मला वाटतें **वासवदत्ता** जिवंत असून कोठें तरी गेली असावी व तिचा माझा समागम लवकरच व्हावा. या माझ्या तर्काचें आणखी एका गोष्टीनें पुष्टीकरण होत आहे. ती गोष्ट ही कीं, हा **गोपालक** तिचा सख्खा भाऊ असून त्याला तिच्या मरणानें व्हावें तसें दुःख या समयीं होत आहे असें मला दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच **यौगंधरायण** आणि **रुमण्वान्** हेही फारसे दुःखी झालेले दिसत नाहींत. हे प्रधान मोठे धूर्त आणि दूरदर्शी आहेत. त्यांनीं मृगयेच्या निमित्तानें एथें येण्यावि-

षयीं मला जो एवढा आग्रह केला यांत त्यांचें कांहीं तरी राज्यकारस्थान असावें यांत संशय नाहीं, व ते जी गोष्ट करतील ती माझ्या कल्याणावर नजर देऊनच करतील अशी माझी खातरी आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां मला खचीत वाटतें, ती माझी प्रिया जिवंत असून लवकरच मला भेटेल." याप्रमाणें मनांत विचार आणून तो वारंवार संशयात्मक मुद्रेनें **यौगंधरायणा**कडे पाही व तो त्याचें समाधान करून ह्मणे कीं, महाराज, आपण दुःखी होऊं नका. स्वस्थ राहा. परमेश्वरकृपेनें व त्या ब्रह्मर्षीच्या आशीर्वादानें सर्व कांहीं ठीक होईल. **वत्सराजा**ला हें भाषण ऐकून अधिकच धीर आला आणि पुढें तो बुद्धिमान् प्रधान काय करितो तें निमूटपणें पाहावें असा निश्चय करून तो स्वस्थ राहिला.

**वासवदत्ता** आपल्या आईबापांची फारच लाडकी होती. तिला असा शोचनीय मृत्यु आला हें वर्तमान त्यांच्या कानावर गेलें तर ते दुःखाकुल होऊन आपल्या जिवाला कांहीं अपाय करतील या भीतीनें **गोपालकानें** त्यांच्याकडेताबडतोब एक दूत रवाना करून त्यांना खरी हकीकत व तसें करण्याचा गुप्त हेतु कळविला. **वासवदत्ते**च्या मरणाची बातमी उडत उडत त्यांच्या कानीं जाऊन तीं उभयतां शोक करीत होतीं इतक्यांत दूत जाऊन तेथें पोंचला. त्यानें खरी हकीकत कळवितांच त्यांचा जीव ठिकाणावर आला. इकडे **मगध**देशच्या राजाचे हेर **लावाणकां**त फिरत होते, त्यांनीं **वासवदत्ते**च्या मरणाची खबर आपल्या यजमानास कळविली. त्याला ती ऐकून फार वाईट वाटलें; तथापि **वत्सराजा**करितां **यौगंधरायणानें** **पद्मावती**विषयीं पूर्वीं मागणी केली होती, ती आतां मान्य

करण्यास हरकत राहिली नाहीं, यामुळें त्याला आनंदही झाला. त्यानें **वत्सराजा**कडे दूत पाठवून झालेल्या गोष्टीबद्दल दुःख प्रदर्शित केलें व आतां आमच्या कन्येचा आपण स्वीकार कराल तर आमच्यावर मोठा अनुग्रह होईल व आपणासही झालेल्या गोष्टीचा विसर पडेल, असा निरोप पाठविला. **वत्सराजानें यौगंधरायणा**चा अभिप्राय विचारतांच त्यानें अर्थातच कांहीं आढेवेढे न घेतां तात्काल आपलें अनुमोदन दिलें. त्याची या कामांत एवढी घाई पाहून राजाची बालंबाल खातरी झाली कीं, हें लग्न घडवून आणण्याकरितांच या राजश्रींनीं **वासवदत्ते**च्या मरणाची खोटी बातमी उठवून तिला कोठें तरी लपवून ठेविलें आहे. **वत्सराजा**ची स्त्रियांविषयीं लालसा अनिवार होती. तो आपल्या मनांत ह्मणाला, चाललें आहे हें ठीक आहे. येणेंकरून **पद्मावती**चा तरी आपणास लाभ होईल,

असें मनांत आणून त्याला फार आनंद झाला व प्रधानाच्या चातुर्याविषयीं तो फार वाखाणणी करूं लागला.

**प्रद्योत**राजा आपली कन्या **पद्मावती वत्सराजा**ला अर्पण करण्यास तयार आहे असें समजतांच **यौगंधरायण, रुमण्वान्** आणि **गोपालक** यांस आपण हातीं धरलेल्या कामास यश आलें ह्मणून अत्यंत हर्ष झाला. त्यांनीं तात्काल एक दूत तयार करून **मगधेश्वरा**कडे रवाना केला व त्याजबरोबर असा निरोप पाठविला कीं, आपली विनंति आमच्या महाराजांनीं मान्य केली आहे. सांप्रत **वासवदत्ते**च्या मरणामुळें ते फार दुःखी आहेत; ह्मणून त्या दुःखाचा विसर पडण्याकरितां हा संबंध जितका लवकर घडून येईल तितका चांगला; यासाठीं आजपासून सातव्या दिवशीं आह्मी महाराजांस घेऊन आपल्या नगरास येतों. तोंपर्यंत आपण सर्व तयारी

करावी. हा निरोप ऐकून **प्रद्योता**ला फार आनंद झाला तेव्हां त्यानें ती शुभवार्ता आणणाऱ्या दूताला चांगलें इनाम देऊन संतुष्ट केलें. नंतर आपल्या आवडत्या मुलीला तिच्या व आपल्या इच्छेप्रमाणें उत्तम वर मिळाला ह्मणून संतुष्ट होऊन आपल्या वैभवास व नांवलौकिकास शोभेल असा विवाहोत्सव करण्याची त्यानें कडेकोट तयारी चालविली. **वत्सराजा**ची कीर्ति ऐकिल्यापासून तो आपणास पति मिळावा असें **पद्मावती** मनापासून इच्छीत होती व शेवटीं तसेंच घडून येणार असें जेव्हां तिला समजलें तेव्हां तिचा आनंद गगनांत मावेनासा झाला. हळू हळू तें वर्तमान **वासवदत्ते**च्या कानावर गेलें. किती झालें तरी सापत्नभाव हा स्त्रियांना स्वभावतःच अत्यंत दुःसह असतो. तशांतून **वासवदत्ता** ही कांहीं सामान्य स्त्री नव्हती. शारीर आणि मानसिक सर्व गुणांनीं संपन्न असून **वत्सराजा**ची ती

फारच आवडती होती. 'सवत साहीना आणि लेंकरूं होईना,' असें ह्मणावें तर तीही ह्मण तिला लागू नव्हती; कारण **नारद**ऋषींच्या आशीर्वादानें सकल विद्याधरांवर राज्य करणारा असा पुत्र तिच्या उदरीं जन्मास येणार होता. तेव्हां अशा स्थितींत आपल्या पतीचा **पद्मावती**बरोबर विवाह होऊन आपल्या उरावर सवत येऊन बसणार ही गोष्ट तिला कशी सहन होईल? ती बातमी ऐकतांच तिच्या मनाची कशी स्थिति झाली असेल याचें अनुमान वाचकांनींच करावें. शोकानें अत्यंत विव्हल होऊन तिचें तोंड खारकन उतरून गेलें व ती निस्तेज दिसूं लागली. जणूं काय तिच्या गुप्त वेशाला साह्य करण्याकरतांच ती वार्ता इतक्या लगबगीनें तेथें येऊन थडकली! या वेळीं **वसंतका**वांचून तिच्याजवळ दुसरें कोणी नव्हतें. तिला शोकाकुल पाहून तो ह्मणाला, " बाईसाहेब, **पद्माव-**

तीच्या बापाशीं स्नेह जोडण्याकरितां हें सर्व कारस्थान आह्मीं चालविलें आहे हे तुह्मांस पूर्वी कळविलेंच आहे, व तुमचें अनुमोदनही त्या कामास मिळालेलें आहे, ही गोष्ट तुह्मी विसरलां काय? **पद्मावती**बरोबर महाराजांचा विवाह झाल्यानें तुमन्‍ पैरील त्यांचें प्रेम यत्किंचित्‌ही कमी व्हावयाच नाहीं हें तुह्मांस माहीत आहे. मग असा शोक करीत बसण्यांत काय अर्थ आहे? घेतलेल्या सोंगाची बतावणी आजपर्यंत उत्तम प्रकारें करून आतां जर तुह्मीं धीर सोडला तर एवढ्या प्रयत्नानें रचलेला सारा व्यूह ढांसळून जाऊन भलताच अनर्थ गुदरेल; यासाठीं चित्ताची चलबिचल होऊं न देतां जें कांहीं चाललें आहे तें निमूटपणें पाहात बसा, यांतच तुमचें कल्याण आहे." हें **वसंतका**चें भाषण ऐकून **वासवदत्ता** शुद्धीवर आली व प्रियसखीनें जसा बोध करावा तसें तें भाषण तिला हितावह वाटून त्या

योगानें तिच्या अस्थिर झालेल्या अंतःकरणास धीर आला. आपल्याविषयीं **पद्मावतीच्या** मनांत संशय न यावा ह्मणून तिनें त्या दिवशीं आपल्या हातानें पुनः तिला पूर्वींप्रमाणें न कोमेजणारा असा फुलांचा एक दिव्य हार गुंफून दिला व तिच्या भाळावर सुवासिक तिलक लाविला.

हा विवाह घडवून आणण्याविषयीं **यौगंधरायणानें** जी ही विलक्षण खटपट केली तिचें कारण **वत्सराजाच्या** ध्यानांत येऊन चुकलें होतें, ह्मणूनच तो त्या कामास प्रवृत्त झाला. त्याची खातरी होती कीं, हा विवाह पार पडला ह्मणजे **वासवदत्ता** प्रगट होऊन खचीत आपणास भेटेल व **पद्मावतीचाही** लाभ अनायासें होईल; ह्मणून तिचें पाणिग्रहण करण्याकरितां तो सर्व प्रधानांसह सैन्य बरोबर घेऊन मोठ्या थाटानें निघाला, तो **मगधदेशाची** राजधानी जें

**पाटलीपुत्र** नगर त्याच्या बहिर्भागांत संकेताप्रमाणें नेमलेल्या दिवशीं येऊन दाखल झाला. **वत्सराज** जवळ आला ही बातमी कळतांच **मगधेश्वरानें** सामोरें जाऊन मोठ्या सन्मानानें त्याला नगरांत आणिलें. त्या मूर्तिमंत महोत्सवानें नगरांत प्रवेश करण्याबरोबर नागरिक लोकांच्या अंतःकरणांतही त्याचा प्रवेश झाला. चंद्रोदय झाला ह्मणजे समुद्राला जशी भरती येते त्याप्रमाणें **वत्सराजाचें** दर्शन होतांच नगरवासी जनांच्या नेत्रांस संतोष होऊन त्यांचीं अंतःकरणें आनंदलहरींनीं उचंबळूं लागलीं. **वासवदत्तेच्या** विरहानें झुरणीस लागल्यामुळें तो कांहींसा कृश व निस्तेज झाला होता; तथापि तशा स्थितींतही नागरिक स्त्रियांचीं मनें त्याला पाहून मोहित झालीं, व **रतीवांचून मदन** जसा असावा तसा तो त्यांना दिसूं लागला. याप्रमाणें मोठ्या थाटानें मिरवत मिरवत **वत्सराजाची** स्वारी राज-

वाड्यांत येऊन दाखल झाली. त्याच दिवशीं लग्नाचा मुहूर्त ठरलेला होता. ती वेळ होतांच **वत्सराज** आणि **पद्मावती** यांनीं मंगलस्नानें करून लग्नमंडपांत प्रवेश केला. आपल्या भावी पतीला पाहून **पद्मावती**ला मोठी धन्यता वाटली. पूर्णेंदुमंडलाला आपल्या कांतीनें लाजविणारा तिचा मुखचंद्र पाहून त्यालाही अत्यंत आनंद झाला, व मोठ्या कौतुकानें **पद्मावती**कडे पाहून त्यानें आपणास कृतार्थ मानिलें. तिच्या कंठांतील दिव्य हार व भाळावरील तिलक पाहून त्या वस्तु तिला कशा प्राप्त झाल्या याविषयीं त्याला मोठें गूढ पडलें व आपली प्रिया **वासवदत्ता** कदाचित् एथेंच असेल असाही त्याला संशय आला.

लग्नघटका भरतांच मंगलवाद्यें सुरू झालीं व वधुवरें बहुल्यावर जाऊन बसलीं. तेथें **वत्सराजा**नें **पद्मावती**चें यथाविधि पाणिग्रहण केलें.

त्या वेळीं **यौगंधरायणा**दिकांना वाटलें कीं, त्यानें **पद्मावती**चाच केवळ करग्रह केला असें नाहीं; तर त्याबरोबर सकल पृथ्वीचाही कर[1]ग्रह करण्यास तेव्हांपासून आरंभ केला ! नंतर ब्राह्मणांनीं त्याच्या हातून विवाहहोम करविला व वधुवरांच्या पदरांस गांठ बांधून त्यांच्याकडून त्या होमाग्नीला प्रदक्षिणा करविली. त्या वेळीं **वत्सराजा**ची आवडती स्त्री **वासवदत्ता** तेथें कोठें त्याच्या दृष्टीस पडत नसल्यामुळें त्या समारंभाकडे पाहणें योग्य नव्हतें ह्मणूनच कीं काय होमधूमानें त्याची दृष्टि बंद करून टाकिली ! पद्मावतीचें मुख धूर लागून तांबडेंलाल झालें होतें.

---

१ या शब्दांत श्लेष आहे. **पद्मावती**पक्षीं करग्रह ह्मणजे हात धरणें, आणि पृथ्वीपक्षीं सकल राजांकडून करग्रह ह्मणजे खंडणी घेणें. अथवा **पद्मावती**बरोबर पृथ्वीशींही त्यानें विवाह केला असें ह्मटलें तरी चालेल. राजाला पृथ्वीपति असें ह्मणतातच.

जणूं काय भर्त्याच्या मनांतील अभिप्राय जाणून सवतीमत्सरामुळें तिला अतिशय संताप झाला! असो. याप्रमाणें विवाहविधि यथासांग आटोपल्यावर **वत्सराजानें पद्मावती**ला आपल्या हातांतून सोडिलें; पण **वासवदत्ता** त्याच्या हृदयांतून एक क्षणभर देखील ढळली नाहीं! नंतर **मगधेश्वरा**नें आपल्या जामातास पृथ्वींतील बहुमोल रत्नें, उंची वस्त्रें व अनेक दुर्मिळ वस्तु अर्पण करून त्याचा सत्कार केला. **यौगंधरायण** या वेळीं जवळच बसलेला होता. आपला कार्यभाग पूर्णपणें शेवटास नेण्याची हीच संधी आहे असें पाहून तो **मगधेश्वरा**ला ह्मणाला, " महाराज, **पद्मावती**शीं विवाह करून आमचे महाराज आपले जांवई झाले; तस्मात् ज्या गोष्टींत त्यांचें हित तींत आपलेंही हित आहे असें समजून आपण त्यांच्याशीं आजपासून निष्कपट [illegible]भावानें वागावें व त्यांस मनापासून साह्य

करावें हें आपणास योग्य आहे, व ही गोष्ट आपण या होमाग्नीच्या साक्षीनें कबूल करावी एवढी माझी विनंति आहे. ही मान्य केली ह्मणजे जांवईबुवा संतुष्ट होतील." हें त्या कारस्थानी प्रधानाचें भाषण ऐकून **प्रद्योत**राजा त्याच्या मनांतील अभिप्राय तेव्हांच समजला आणि **वत्सराज** आतां आपला जांवई झाला असून आपली कन्या त्याची पट्टराणी झाली असें समजून त्यानेंही शपथ वाहून ती विनंति मान्य केली. याप्रमाणें उभय राजांचें सख्य झाल्यावर भोजनोत्तर **मगधेश्वरानें वत्सराजा**ला आणखी वस्त्राभरणें अर्पण केलीं व वारांगनांचें नृत्यगायन करवून तो महोत्सव मोठ्या थाटानें समाप्त केला. हा समारंभ चालला असतां आपल्या पतीच्या ऐश्वर्याचा पूर्ण उत्कर्ष या विवाहापासून व्हावयाचा आहे असें समजून चंद्राची प्रभा दिवसास जशी गुप्त असते तशी **वासव**-

**दत्ता** एकांतस्थळीं जाऊन सारा दिवस
राहिली होती.

रात्र झाल्यावर **वत्सराज पद्मावतीच्य**
हालांत गेला तर तेथें **वासवदत्ता** त्याच्या
ष्टीस पडून कदाचित् कांहीं घोटाळा होईल अश
**यौगंधरायणा**ला भीति पडली, ह्मणून त्या बु
द्धिमान् प्रधानानें **प्रद्योता**ची भेट घेऊन त्याच
दिवशीं वरात नेण्याला मुहूर्त चांगला आहे व
कांहीं राजकारणानिमित्त **वत्सराजा**ला त्वरेनें
**लावाणकां**त जाणें जरूर आहे; यासाठीं वधु-
वरांची रवानगी आजच्याआजच करावी अशी
त्याला विनंति केली. **प्रद्योता**नेंही जरूरीचें
काम ह्मणून विशेष आग्रह न करितां मोठ
नाखुशीनें त्या विनंतीस रुकार दिला, आणि
रातीची सर्व तयारी करविली. **पद्मावर्त**
आतां वियोग होणार ह्मणून तिच्या आईबाप
फार वाईट वाटलें व तिचेही डोळे त्या वियोग

अश्रूंनीं भरून आले. तिनें त्यांच्या पा-
मस्तक ठेवून पतीबरोबर जाण्याविषयीं
र मागितला. **अवंतिके**ला तिच्या बापानें
ऱ्या स्वाधीन केलें होतें, यासाठीं तिची व्य-
स्था कशी करावी याविषयीं तिला मोठी पंचा-
त पडली. शेवटीं तिलाही आपल्याबरोबर ने-
ण्याचा तिनें निश्चय केला. व आपल्या खासगी
सेवकांस तिला माझ्या पाठोपाठ घेऊन या ह्मणून
सांगितलें. सर्व तयारी होऊन भोजनें वगैरे झाल्यावर
**वत्सराजा**ची स्वारी **पद्मावती**सह वाहनारूढ
होऊन प्रधानमंडळी व कुमार **गोपालक** यांस-
हवर्तमान **पाटलीपुत्र** नगराहून जी निघाली ती
च दरकूच करीत **लावाणकां**त येऊन दाखल
ली. पाठीमागून **अवंतिका** ह्मणजे अर्थातच
**प्रवदत्ता** हीही **वसंतका**सहवर्तमान तेथें येऊन
ली. **वत्सराज** आणि **पद्मावती** यांना राह-
ासाठीं व इतर मंडळीसाठीं निरनिराळ्या गृहांची

ातां सरल

.ाावतीनें आपल्या

ज्याजवळ आणून पोंचवा

पण मध्यंतरीं ती निराळ्याच

तेथून बाहेर येईना, ह्मणून तिची
वाट पाहून शेवटीं तें वर्तमान आपल्या य
णीस कळविण्याकरितां ते **वत्सराजाच्या** मं
राकडे गेले व **अवंतिका** आह्मांला सोडून राज-
ुत्र **गोपालक** याच्या घरीं जाऊन उतरली आहे
असें त्यांनीं तिला कळविलें. तें ऐकून **पद्माव-
ती**ला मोठें आश्चर्य वाटलें. एवढ्या रात्रीं मा-
झ्याकडे न येतां परक्या स्थळीं ती जाऊन रा-
ह्ली यामुळें तिच्या मनांत भलताच संशय
ला, आणि राजादेखत ती सेवकांना ह्मणाली,

॥; पण
. घट्ट ठाणें ध
॥हीं केल्यानें हालेना.
गोपालक निराळ्या गृ
. त्यांतच ती जाऊन उतरली,

बरोबरचे लोक बाहेरच्या बाजूस उत
. वेळेस रात्र बरीच झाली होती. आपल्या
वाला पाहून **वासवदत्तेला** अत्यंत हर्ष झा
आपल्या पतीसाठीं तिनें सोशिलेले कष्ट म
आणून त्याला फार दुःख झालें व तीही तें
हून त्याच्या गळ्यांत गळा घालून रडूं लाग
**यौगंधरायण** आणि **रुमण्वान्** यांना ती
**पालकाच्या** मंदिरांत आल्याची बातमी सम
तांच ते लागलेच तेथें गेले. त्यांचा **वासवद**

" आतांच्या आतां तुह्मी जाऊन तिला सांगा कीं, तुझ्या बापानें तुला माझ्या ताब्यांत दिलें आहे, यासाठीं मी जेथें असेन तेथें तुला येऊन राहिलें पाहिजे." सेवक हा निरोप घेऊन गेल्यावर **वत्सराजानें पद्मावतीला** विचारिलें, "प्रिये, ही माला आणि हा तिलक करावयाची विद्या तुला कोणीं शिकविली तें खरें सांग." **पद्मावती** हंसत हंसत ह्मणाली, "प्राणनाथ, खरेंच सांगतें, कोणी एका वृद्ध ब्राह्मणानें **अवंतिका** या नांवाची आपली कन्या मी माहेरीं असतां कांहीं कारणानें माझ्याजवळ आणून ठेविली, तिचेंच हें विलक्षण कौशल्य होय. तिला मीं आपल्याबरोबर एथें आणिलें आहे व तिचीच गोष्ट आतां माझे सेवक मला सांगत होते. ती मोठी सद्गुणी व बुद्धिमती असल्यामुळें मला फार आवडली आहे; पण आतांच मला सोडून ती परक्या ठिकाणीं जाऊन कां राहिली याचें मला

मोठें नवल वाटतें." हें भाषण ऐकून **वत्सराज** अगदीं गोंधळून गेला व त्याला कांहीं सुचेनासें झालें. अशा प्रकारची माला व तिलक करण्याची विद्या मी आणि **वासवदत्ता** यांवांचून तिसऱ्या कोणालाही माहीत नाहीं हें तो पक्कें जाणत होता, यामुळें जिचें नांव ही सांगते ती **वासवदत्ताच** असून **अवंतिका** या नांवानें इच्या घरीं जाऊन राहिली असावी, व इच्याशीं आपला विवाह घडवून आणण्याकरितां हें सर्व प्रधानजीचें कारस्थान असावें असा त्याच्या मनाचा पक्का ग्रह झाला. नंतर कांहीं निमित्त करून तो तेथून उठला तो तडक **गोपालका**च्या मंदिरांत गेला. तेथें जाऊन पाहतो तों **वासवदत्ता, गोपालक, यौगंधरायण, रुमण्वान्**, आणि **वसंतक** इतकी मंडळी सचिंत गोष्टी करीत बसली आहे असें त्यानें पाहिलें. चंद्रकला राहुग्रासापासून मुक्त होते त्याप्रमाणें इतके दिवस अज्ञातवासांत

राहून प्रकट झालेली ती प्रियदयिता दृष्टीस पडतांच एकाएकीं राजाचें देहभान नष्ट झालें, आणि शोकरूपविषानें विव्हल होत्साता तो धाडकन् खालीं पडला! पतिविरहानें झुरणीस लागून वासवदत्ता अगोदरच पांढरी फटक झाली होती. तशांतून आपल्यामुळें राजाची झालेली ती दुःखमय स्थिति पाहून तिला अतिशय वाईट वाटलें व तिच्या हृदयास एकसारखा कंप सुटला. बंधु आणि प्रधान यांच्या नादाला लागून या कामांत पडण्याची मला कोठून बुद्धि झाली न कळे असें ह्मणून ती आपणालाच शिव्याशाप देऊं लागली, व त्या दुःखावेगानें व्याकुल होऊन विलाप करीत तिनेंही आपलें अंग धरणीवर टाकिलें! कांहीं वेळानें तीं उभयतां सावध झाल्यावर दीन मुद्रेनें एकमेकांकडे पाहून रडूं लागलीं. यौगंधरायण एवढा मोठा दृढनिश्चयी व धैर्याचा सागर, पण त्यांची ती दुर्दशा पाहून त्याच्याही डोळ्यांतून

अश्रुधारा वाहूं लागल्या. बाकीच्या मंडळीचीही तीच दशा झाली.

**गोपालका**च्या घरांत कांहीं गडबड चालली आहे ही बातमी बाहेर फुटतांच ती **पद्मावती**-च्याही कानावर आली, तेव्हां ती घाबऱ्यां घाबऱ्यां उठून तिकडे गेली. तेथें **वसंतका**च्या मुखानें, **अवंतिका** ही कोण, राजाला इतकें दुःख होण्याचें कारण काय, इत्यादि गोष्टी क्रमाक्रमानें तिला समजल्या, तेव्हां दुःखानें तिचाहि गळा भरून आला. साध्वी स्त्रियांचें अंतःकरण स्वभावतःच कोमल, निर्मल आणि मायाळू असतें. आपणासाठीं या प्रेमळ स्त्रीपुरुषांवर असा दुर्धर प्रसंग यावा या गोष्टीबद्दल तिला अतिशय वाईट वाटलें व त्यांच्याबरोबर तीही रडूं लागली. **यौगंधरायणा**दिकांनीं त्यांचें समाधान केल्यावर **वासवदत्ता** ह्मणाली, मला दुर्दैवानें विपरीत बुद्धि होऊन प्राणनाथांना दुःख देण्यास मी का

रण झालें, तस्मात् त्यांचा छल करणारें हें दुष्ट जीवित ठेवून मला काय करावयाचें आहे? मला आतां मरण येईल तर फार चांगलें, असें ह्मणून ती पुनः रडूं लागली. ही तिची हताश स्थिति पाहून **यौगंधरायण वत्सराजाला** ह्मणाला, "महाराज, आपणाला या **प्रद्योतकन्ये**चा लाभ होऊन सार्वभौम पदवी प्राप्त व्हावी, एतदर्थ हें सर्व कारस्थान मीं रचिलें होतें. यांत राणीसाहे- ंचा यत्किंचितही अपराध नाहीं. आतां, पर- हीं त्यांचा बरेच दिवस वास झालेला आहे, मुळें आपल्या मनांत त्यांच्याविषयीं कांहीं सं- ा येत असेल तर त्या दुसऱ्या ठिकाणीं कोठें हेल्या नसून या धाकट्या राणीसाहेबांच्याच ां राहात होत्या. तेथें असतां त्यांची वर्तणूक कशी होती याबद्दल त्याच साक्ष देतील. अशा कामांत सवतीच्या साक्षीहून अधिक विश्वसनीय अशी दुसरी कोणाची साक्ष होणार आहे?" **प-**

**द्मावतीच्या** मनांत **वासवदत्ते**विषयीं मत्सरबुद्धि तिळभरदेखील वागत नव्हती. ती तिला आपल्या वडील बहिणीप्रमाणें मानून तिजवर प्रेम करीत असे. **वत्सराजाचें** मन तिच्याविषयीं कलुषित करावें हें तिच्या स्वप्नांतही कधीं आलें नाहीं. **यौगंधराय-णानें** तिचें नांव घेतांच ती ह्मणाली, "होय, खरो-खर या गोष्टीला मी साक्ष आहें. यांचें शुद्धाचरण स्थापित करण्याकरितां पाहिजे तर अग्निप्रवेश करण्याला देखील मी तयार आहें." राजा ह्म णाला, "या कामांत तुमचा कोणाचाच अपरा नाहीं. सर्व दोष माझ्या माथ्यावर आहे; कार माझ्यासाठीं या बिचारीला इतके क्लेश भोग लागून साध्वी स्त्रियांच्या मर्यादेचें उल्लंघन कर लागलें." हें भाषण **वासवदत्ते**च्या मनाला फ रच टोचलें. ती ह्मणाली, "प्राणनाथांच्या मनांत माझ्या हातून कांहीं दुर्वर्तन घडलें असा संशय आला असेल तर त्याच्या निरासाकरितां मला

अग्निप्रवेशच केला पाहिजे, व तो मी खचीत करणार." याप्रमाणें त्या रात्रीं तेथें एकच गोंधळ होऊन गेला; त्यामुळें एवढा बुद्धिमान् व शहाण्या पुरुषांमध्यें अग्रगण्य असा **यौगंधरायण**ही क्षणभर गांगरून जाऊन त्याला पुढें काय करावें तें सुचेनासें झालें. आपण करावयास गेलों एक व त्याचा परिणाम आतां भलताच होणार असें पाहून कृतकर्माविषयीं त्याला फार पश्चात्ताप झाला. नंतर क्षणभर ध्यानस्थ होऊन त्या धैर्यशाली पुरुषानें आपले हातपाय धुतले व पूर्वाभिमुख होऊन आचमन केलें. नंतर परमेश्वराचें स्मरण करून तो ह्मणाला, "अहो, लोकपालांनो! माझ्या कृतीचे तुह्मी साक्षी आहां. राजाचा जर मी खरा हितचिंतक असेन व ही **वासदत्ता** जर शुद्ध पतिव्रता असेल तर त्याबद्दल तुह्मीच महाराजांची खातरी करा; नाहीं तर मी प्राणत्याग करीन व त्यामुळें जर कांहीं अन्याय

झाला तर त्याचा दोष तुमच्या माथीं येईल." याप्रमाणें बोलून तो स्तब्ध राहिला. इतक्यांत अकस्मात् आकाशांतून असा ध्वनि निघाला, कीं, "राजा, **वत्सेश्वरा,** तू मोठा धन्य आहेस. सुदैवानें **यौगंधरायणा**सारखा राजनिष्ठ व बुद्धिमान् प्रधान तुला मिळाला आहे. तशीच ही **वासवदत्ता** पूर्व जन्मींची साक्षात् देवता असून या जन्मीं भार्यारूपानें तुझ्य: सुखदु:खाची वांटेकरीण झाली आहे. इच्याविषयीं तुझ्या मनांत जो संशय आला आहे तो निराधार असून इचें पातिव्रत्य निर्दोष आहे." याप्रमाणें मेघगर्जनेसारख्या गंभीर ध्वनीनें सकळ दिशा नादित करणारी ती आकाशवाणी ऐकून, दीन झालेले मयूरपक्षी मेघांच्या दर्शनानें विगतताप होत्साते वर माना करून जसे आनंदानें नाचूं लागतात, त्याप्रमाणें तेथें जमलेल्या सर्व मंडळीला अत्यंत हर्ष होऊन **वत्सराज** आणि

**वासवदत्ता** यांचा ती जयजयकार करूं लागली! **यौगंधरायणाचें** चातुर्य, स्वामिभक्ति व आपला उत्कर्ष व्हावा ह्मणून त्यानें केलेली अघटित घटना यांविषयीं **वत्सराजानें** त्याची फारच तारिफ केली व त्याच्या मनोदयाप्रमाणें सर्व पृथ्वीचें राज्य आजच आपल्या हातीं आलें असें तो समजूं लागला. **वासवदत्ता** आणि **पद्मावती** या उभयतां राण्या–एक **रति** आणि दुसरी **निर्वृति**–यांप्रमाणें नेहमीं त्याच्याजवळ बसत असत. त्याच्या अतिनिकट सहवासानें त्यांजवरील प्रेम दिवसानुदिवस वृद्धि पावूं लागलें व त्यामुळें सौख्याच्या अत्युच्च कळसावर मी बसलों आहें कीं काय असें त्याला वाटूं लागलें.

ती रात्र निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं **वासवदत्ता** आणि **पद्मावती** यांसहवर्तमान **वत्सराज** एकांतस्थळीं बसला असतां तेथें त्यानें **गोपालक, यौगंधरायण, रुमण्वान्** आणि व-

**संतक** या निवडक मंडळीस बोलावून आणिलें. तेथें अनेक प्रकारच्या खाद्यपेयादि पदार्थांचें यथेच्छ सेवन करीत मोकळ्या मनानें ते सर्वजण सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसले असतां **यौगंधरायण** ह्मणाला, "महाराज, खरेंच सांगतों. राणीसाहेबांचा वियोग आपण कसा सहन कराल याविषयीं मी मोठ्या काळजींत होतों; पण परमेश्वरानें आपणांस धैर्य देऊन आज हा सुखाचा दिवस दाखविला येणेंकरून मी कृतार्थ झालों." **वत्सराज** ह्मणाला, "प्रधानजी, प्रसंगविशेषीं विरहदुःख सहन न केलें तर त्यांत पुरुषार्थ तो कोणता ? पण चमत्कार एवढाच कीं जिला माझ्यावांचून एक क्षणभर देखील चैन पडत नसे तिनें मला कळूं न देतां वेषांतर करून परगृहवास केला व मला विरहरूप दुःखसागरांत ढकलून दिलें ती मोठी छातीची खरी ! तिला माझ्यावांचून इतके दिवस चैन कसें पडलें या-

चेंच मला मोठें नवल वाटतें. " असें ह्मणून **पु-रूरवा** आणि **उर्वशी** यांची गोष्ट त्यानें सांगितली. तींत **उर्वशीचें पुरूरव्यावर** जें निस्सीम प्रेम होतें तें स्पष्ट करून **वासवदत्तेकडे** पाहात तो ह्मणाला, "तसें प्रेम मजवर जर कोणाचें असतें तर त्या माणसाची दशा कांहीं निराळीच झाली असती. " **वासवदत्तेच्या** पातिव्रत्याविषयीं **वत्सराजाच्या** मनांत कांहींच शंका राहिली नव्हती; तथापि कांहीं विनोद करून तिला चिडवावें या हेतूनें त्यानें ही गोष्ट मुद्दाम सांगितली; पण तें त्या भोळीच्या लक्षांत न येतां **उर्वशी-**प्रमाणें माझें प्रेम प्राणनाथांवर नाहीं असें ते समजतात असें जाणून तिला फार वाईट वाटलें व लज्जेनें खालीं मान घालून ती स्तब्ध राहिली; पण **यौगंधरायण** मोठा चतुर होता. राजानें केलेली लबाडी तेव्हांच त्याच्या ध्यानांत आली. विनाकारण निंदा केल्यामुळें मनांत खट्टू होऊन

त्रस्त झालेल्या त्या बिचारीला पाहून त्याला तिची कींव आली आणि राजाला उलट टोला द्यावा या हेतूनें व तिचेंही समाधान व्हावें ह्मणून त्यानेंही एका प्राचीन राजाची गोष्ट सांगितली. तींतील तात्पर्य असें होतें कीं, त्या राजाच्या कल्याणाकरितां त्याच्या प्रधानानें त्याची राणी मरण पावली अशी खोटी बातमी उठवून तिला गुप्त ठिकाणीं कांहीं दिवस नेऊन ठेविलें होतें; पण त्यामुळें त्याच्या जिवावरील संकट दूर झालें असें पाहून परगृहीं वास केल्याबद्दल तिच्याविषयीं त्यानें मनांत काडीमात्र संशय न धरितां उलटे तिचे उपकारच मानिले. ही गोष्ट सांगून तो धूर्त प्रधान ह्मणाला, "महाराज, साध्वी स्त्रियांचें लक्षण कांहीं निराळेंच असतें. नुसतें पतीचें मन आपल्या सौंदर्यादि गुणांनीं रंजविल्यानें 'साध्वी' ही पवित्र पदवी त्यांस मिळत नाहीं. ज्या वर्तनानें पतीचें कल्याण होईल तें वर्तन ज्या स्त्रिया ठेवितात

त्याच खऱ्या पतिव्रता. आह्मांसारख्या प्रधाना-
विषयींही असाच विचार केला पाहिजे. 'राजा
बोले आणि दळ हाले,' या ह्मणीप्रमाणें यज-
मानाची मर्जी खुष राखून होस हो ह्मणणारे पो-
टभरू प्रधान पाहिजे तितके मिळतील, पण हें
खऱ्या प्रधानाचें लक्षण नव्हे. जो राज्यकारभा-
राचें ओझें एकनिष्ठपणें वाहून ज्या योगानें रा-
जाचा उत्कर्ष होईल अशा उपायांचें रात्रंदि-
वस चिंतन करून त्याप्रमाणें धैर्यानें आणि प्रामा-
णिकपणानें वागतो तोच खरा प्रधान. महा-
राज, खरोखरच सांगतों, पृथ्वीविजय आपल्या
हातून करवून आपणांस सार्वभौम पदवी मिळावी
हाच मुख्य हेतु मनांत धरून मी, सेनापति व
**गोपालक** मिळून या कामांत पडलों. राणीसा-
हेबांचें आपणांवरील प्रेम निस्सीम आहे हें आ-
पण जाणतच आहां. हें जर खरें असेल तर ए-
वढें मोठें असह्य वियोगदुःख सहन करण्यास त्या

ज्या तयार झाल्या त्या आपल्या फायद्यासाठीं नसून आपल्या जिवास दुःख देण्याकरितां झाल्या असें आपलें मन आपणांस सांगेल काय ? सारांश, या गोष्टीचा आपण नीट विचार कराल तर त्यांचा या कामांत कांहींएक अपराध नसून उलट आपणांवर त्यांचे अनंत उपकार झाले आहेत असें आपणांस कबूल करावें लागेल."

**यौगंधरायणा**चें हें स्पष्ट व कांहींसें निर्भीडपणाचें भाषण ऐकून **वत्सराजा**ची त्याच्या खरेपणाविषयीं खातरी झाली, व सर्व गोष्टींचा विचार करितां राणीला आपण विनाकारण दोष देऊन तिचें मन दुखविलें याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. तो ह्मणाला, "प्रधानजी, आतां माझ्या लक्षांत आलें. सर्व चूक माझीच आहे. तुमच्या सांगण्यावरूनच ही या कामास प्रवृत्त झाली, यांत पातिव्रत्याच्या मर्यादेचें यत्किंचितही उल्लंघन न करितां सर्व पृथ्वीचें राज्य आज इनें

मला दिलें असें मी समजतों. इच्या संबंधानें मीं जे असमंजसपणाचे उद्गार काढिले ते इच्यावर जें माझें निस्सीम प्रेम आहे त्याचाच परिणाम होय. तुह्मांला सांगावयास नकोच कीं, ज्यांचीं मनें प्रीतीनें अंध झालीं आहेत ते प्रायः विचार-शून्य असतात, तशीच माझीही आज स्थिति झाली. जाणूनबुजून मीं इला दोष दिला असें नाहीं." याप्रमाणें समजुतीच्या गोष्टी सांगून राजानें तो दिवस मोठ्या आनंदानें घालविला व त्याच्याबरोबरच **वासवदत्ते**च्या मनांतून लज्जा आणि दुःख हेही विकार घालवून दिले.

**अवंतिके**च्या रूपानें **वासवदत्ते**ला पोंचविण्याकरितां जे लोक आले होते ते परत गेल्यावर त्यांनीं इकडील सर्व हकीकत **पद्मावती**च्या बापास कळविली. तेव्हां त्याला अत्यंत राग आला व दुःखही झालें; पण झाल्या गोष्टीस इलाज नाहीं असें जाणून त्यानें दूताबरोबर **वत्सरा-**

जाला असा निरोप पाठविला कीं, "तुमच्या प्रधानांनीं कपट करून आह्मांस फसविलें. गोष्ट घडून चुकली. ती आतां फिरावयाची नाहीं हें जाणून आह्मी स्वस्थ बसलों आहों; पण आतां कृपा करून आमच्या कन्येला अशा रीतीनें तरी वागवा कीं जेणेंकरून मृत्युलोकचें हें जीवित्व आह्मांस नकोसें होणार नाहीं." हा निरोप दूतानें येऊन **वत्सराजाला** कळवितांच त्यानें त्याचा सत्कार केला व त्या निरोपाचें प्रत्युत्तर पाठविण्याकरितां त्याला **पद्मावतीकडे** पाठवून दिलें. **पद्मावती** आणि **वासवदत्ता** यांच्या मनांत परस्परांविषयीं सवतीमत्सराचा लवलेशदेखील वागत नव्हता. **वासवदत्ते**प्रमाणेंच तीही पतिव्रता असल्यामुळें आपल्या वडील बहिणीप्रमाणें तिच्याशीं ती नम्रतेनें आणि विनयानें वागत असे व तिही तिच्यावर धाकट्या बहिणीप्रमाणें प्रेम करीत असे. माहेराहून आलेल्या दूताची एकांतीं

भेट घेतली तर **वासवदत्तेच्या** मनांत संशय येईल, ह्मणून ती त्याला घेऊन तिच्याकडे गेली. तेथें गेल्यावर दूत **पद्मावतीला** ह्मणाला, "राजकन्ये, तुझ्या पित्याचा असा निरोप आहे कीं, **वत्सराजानें** कपट करून तुझें पाणिग्रहण केलें; पण या संबंधाचा परिणाम तुला सुखकर कसा होईल या काळजींत आह्मी रात्रंदिवस पडलों आहों; कारण त्याच्या सर्व प्रेमाचें स्थान निराळेंच आहे हें आह्मांस ठाऊक आहे, व यासाठींच तुला त्याला देण्याचें आह्मीं प्रथम नाकारिलें होतें; पण फसगतीनें ही गोष्ट घडून चुकली, यामुळें मला जें दुःख होत आहे त्या योगानें पोटीं कन्यासंतति असल्याचें अनिष्ट फल पूर्णपणें माझ्या नुभवास आलें!" बापाचे हे दुःखोद्गा **पद्मावतीला** फार वाईट वाटलें. ताला ह्मणाली, "अरे दूता, तू ह जाऊन बाबांना आणि आईला

रोप सांग कीं, "आर्यपुत्र **वत्सराज** सदयांतःकरणानें मजवर प्रीति करितात व **वासवदत्ता** ही पाठच्या बहिणीप्रमाणें मला ममतेनें वागवितें; यासाठीं तुम्हांला सत्य जसें प्रिय आहे त्याप्रमाणें मी जगून संसारसुख भोगावें हें जर इष्ट असेल तर प्राणनाथांविषयीं तुम्ही मनांत यत्किंचित्ही द्वेषभाव न वागवून मजविषयीं व्यर्थ शोकाकुल होऊं नका व कांहीं काळजी करूं नका. मला एथें कोणत्याही गोष्टीचें कमी नसून मी परमसुखांत आहें." **पद्मावतीनें** आपल्या आईबापांना पाठविलेला हा निरोप ऐकून **वासवदत्तेला** फार समाधान वाटलें, व तिनें त्या दूताचा योग्य स-
ॅ करून त्याची रवानगी केली. दूत निघून
**पद्मावतीला** माहेरच्या सर्व गोष्टींचें
न कांहींसें दुःख झालें व आईबापांना
नेचें मन फार उत्कंठित झालें.
त्ति पाहून **वासवदत्तेनें** व-

**संतकाला** जवळ बोलाविलें आणि त्याच्याकडून तिच्या मनोरंजनार्थ एक गोष्ट सांगविली. ती संपतांच तो ह्मणाला, "बाईसाहेब, यज्ञयाग आणि दान इत्यादि पुण्यकर्मे ज्या पुरुषांच्या हातून घडतात त्यांच्या, शापच्युत झालेल्या दिव्य स्त्रिया गृहिणी होऊन जन्मभर त्यांस आपल्या सहवासानें सुख देतात. देवब्राह्मणांची पूजाही सज्जनांना कामधेनूप्रमाणें वांच्छित फल देणारी होते. त्याप्रमाणेंच वैभवाच्या अत्युच्च शिखरास पोंचलेल्या पुरुषांच्या हातून जर कांहीं दुष्कर्म घडलें तर तें वावटळीनें उंच झाडांवरील पुष्पें जशीं खालीं गळून पडतात तसें, त्यांच्या अधःपातास मात्र कारण होतें. **इंद्र** एवढा प्रतापी आणि पुण्यशील, तशीच **गौतम**ऋषीची भार्या **अहल्या** महापतिव्रता; पण उभयतांच्या मनांत पापवासना उद्भवतांच त्यांची कशी दुर्दशा झाली हें आपणांस माहीत असेलच." असें ह्म-

णून त्यानें **अहल्येची** कथा सविस्तर सांगितली. अशाच आणखी अनेक गोष्टी सांगून त्या धूर्त ब्राह्मणानें त्या दोघी राण्यांस पतिव्रता स्त्रियांनीं देवब्राह्मणांची पूजा करावी व आपल्या पतींची निरंतर सेवा करून जेणेंकरून त्यांस सुख होईल अशा रीतीचें त्यांच्याशीं वर्तन ठेवावें असें मोठ्या खुबीनें सुचविलें. दोघीही त्या गोष्टी ऐकून फार संतुष्ट झाल्या. त्यांचें एकमेकींवर या पूर्वींच प्रेम जडलेलें होतें, तें **वसंतकाच्या** गोष्टी ऐकून अधिक दृढ झालें. **वासवदत्ता** ही राजाची पट्टराणी होती; ह्मणून स्वभावतःच तिनें **पद्मावतीवर** आपलें वर्चस्व मिरवावें; पण तसा भाव तिच्या मनांत कधीं आला नाहीं. जसा तो आपला पति तसाच तिचाही आहे असें समजून ती निरंतर तिच्यावर प्रेम करीत असे, व आपणाप्रमाणेंच पतीच्या प्रीतीस तीही पात्र व्हावी अशी तिची इच्छा असे.

या गोष्टीला कांहीं दिवस लोटले. **वत्सरा-जाची** स्वारी अद्यापि **लावाणकांतच** राहून उभयतां स्त्रियांच्या समागमानें व मृगयादि क्रीडांमध्यें आनंदानें काळ घालवीत असतां **पद्मावतीचा** बाप **प्रद्योत**, **वत्सराजाचें** आपल्या-मुलीवर कितपत प्रेम आहे, **वासवदत्ता** तिच्याशीं कोणत्या रीतीनें वागते, वगैरे बातम्या काढीत असे. **पद्मावतीही** नेहमीं दूत पाठवून, मी एथें फार सुखांत आहें, मजविषयीं कांहीं काळजी करूं नका, असें त्याला वरचेवर निरोप पाठवून, त्याचें समाधान करी. असें होतां होतां **वत्सराजाचें** आपल्या मुलीवर **वासवदत्तेप्रमा**णेंच खरोखर प्रेम आहे अशी जेव्हां त्याची खातरी झाली तेव्हां त्याला अत्यंत संतोष झाला, व तो व्यक्त करण्याकरितां त्यानें **वत्सराजाकडे** एक दूत रवाना केला. **प्रद्योताकडून** दूत आला आहे ही खबर द्वारपालाकडून कळतांच **वत्स-**

**राजानें** त्याला आपल्याजवळ बोलाविलें. तो प्रणाम करून पुढें उभा राहिला आणि ह्मणाला, "महाराज, आमच्या यजमानांचा आपणांस असा निरोप आहे कीं, **पद्मावती**कडून वारंवार खबर समजत असल्यावरून ती आपल्या समागमानें अत्यंत सुखांत आहे हें समजून आह्मांस फार आनंद होत आहे. त्यांनीं असेंही आपणांस कळविण्यास सांगितलें आहे कीं, ज्या हेतूस्तव आपल्या प्रधानांनीं युक्तीनें आपला व आमचा शरीरसंबंध करविला तो सर्व आमच्या लक्षांत आला व तो योग्य असल्यामुळें आपणांविषयीं आमच्या मनांत आतां कांहींएक वैषम्य राहिलें नाहीं. उलट आपल्या कृतीनें आह्मी संतुष्ट झालों आहों; यासाठीं ज्या कार्याकरितां एवढी खटपट केली त्याला लवकर आरंभ करावा. आपणांस पाहिजे तें साह्य करण्यास आह्मी तयार आहों." दूतमुखानें हा निरोप क-

ऊतांच **वत्सराजाला** अत्यंत हर्ष झाला व आपल्या चतुर प्रधानाचा राजकारस्थानरूप वृक्ष आज सुफलित झाला असें समजून त्यानें आपणास धन्य मानिलें. नंतर त्यानें **पद्मावतीला** बोलावून आणवून तिला तो निरोप कळविला व तिच्या देखत त्या दूताला ती शुभवार्ता कळविल्याबद्दल अलंकारभूषणें व उत्तम पोशाख देऊन मोठ्या सन्मानानें त्याची रवानगी केली.

दुसऱ्या दिवशीं **वासवदत्ता,** व इतर मंडळी जवळ बसली असतां **यौगंधरायण** राजाला ह्मणाला, “ महाराज, **मगधेश्वरा**कडून कालरोजीं निरोप आला तो आपण ऐकिलाच आहे. राजकार्यासाठीं आपण त्याला फसवून **पद्मावती**शीं विवाह केला, यामुळें त्याला राग येऊन तो आपल्या कार्यास विघ्न करील अशी भीति होती ती आतां समूळ नाहींशी झाली. त्याच्याशीं शरीरसंबंध झाल्यामुळें तो आतां आ-

पल्या अगदीं मुठींत आल्याप्रमाणें झाला आहे. **पद्मावती** त्याला प्राणापेक्षांही अधिक प्रिय आहे; तेव्हां आपणांविषयीं द्वेषभाव मनांत ठेवून तो आपल्या आवडत्या कन्येच्या सुखांत अंतराय आणील असें कधीं व्हावयाचें नाहीं. शिवाय त्यानें अग्नीच्या साक्षीनें आपणांशीं स्नेहभावानें वागेन अशी शपथ केली आहे ती त्याला पाळलीच पाहिजे. आपण त्याला फसविलें, ह्मणून त्याला कदाचित् वाईट वाटेल असें आपण ह्मणाल; पण तसा प्रकार मुळींच झाला नाहीं. आपणांलाही कळूं न देतां ही सर्व खटपट मीं स्वतः केली आहे, तेव्हां त्याबद्दल आपणांकडे यत्किंचितही दोष येत नाहीं. बरें, मीं जो हा एवढा खटाटोप केला यांत माझा कांहींएक वाईट हेतु नसून उलट त्याचेंच कल्याण झालें आहे; कारण या योगानें त्याला आपणांसारखा गुणवान् आणि पराक्रमी जांवई मिळाला. इतके दिवस

मीं आपणांस एथें ठेवून घेतलें याचें कारण त्याचें मन आपणांविषयीं निर्मळ करावें हेंच होतें व तसें झाल्याबद्दल माझ्या बातमीदारांकडून मला समजलें आहे व कालच्या त्याच्या निरोपावरून आपणांसही प्रत्यय आला आहे; तेव्हां त्याची भीति बाळगण्याचें आतां कांहींएक कारण राहिलें नाहीं; याकरितां जो हेतु मनांत धरून मीं ही खटपट केली तो सिद्धीस नेण्याकरिता आपण आतां बिनधोक **कौशांबीस** जाऊन पुढील तयारीस लागावें.

हें **यौगंधरायणाचें** भाषण संपतें आहे इ... क्यांत **उज्जयिनीहून वासवदत्तेच्या** बापाकडून एक दूत तेथें येऊन पोंचला. तो राजाला मुजरा करून मोठ्या अदबीनें ह्मणाला, “ महाराज, राजकारस्थानाचीं तत्त्वें जाणणारे आपले श्वशुर महाराज **चंडमहासेन** यांना, आपण **पद्मावतीशीं** विवाह कोणत्या हेतूस्तव केला तें सर्व स-

मजलें, व तेणेंकरून संतुष्ट होऊन त्यांनीं आपणांस असा निरोप सांगितला आहे कीं, **यौगंधरायणा**सारखा स्वामिभक्त आणि बुद्धिमान् प्रधान आपल्या पदरीं आहे; त्याच्या साह्यानें आणि मसलतीनें आपण वागत असल्यामुळें आपणांस कोणतीही गोष्ट असाध्य नाहीं; यापेक्षां ज्यास्त सांगावयास नको. माझी कन्या **वासवदत्ता** इनें आपल्या उत्कर्षाकरितां भक्तिपुरस्सर एवढे क्लेश सोशिले, तस्मात् ती खरोखर धन्य होय. या तिच्या वर्तनानें सत्पुरुषांमध्यें आमचें मस्तक चिरकाल वर उचललेलें राहील. **वासवदत्ता** आणि **पद्मावती** ह्या दोघीही मला सारख्याच प्रिय आहेत. दोघींचीं शरीरें मात्र भिन्न आहेत, पण अंतःकरणें एक असून त्या एकमेकींवर प्रेम करितात हें समजून मला फार आनंद होतो. आतां आपणांस एवढीच विनंति करितों कीं, ज्या कार्यासाठीं आपण एवढी खटपट केली

त्या दिग्विजयाच्या कार्यास एकदम सुरुवात क-रावी. त्या कामीं आपणांस पाहिजे ती मदत क-रण्यास आह्मी तयार आहों."

सासऱ्याकडून आलेला हा निरोप ऐकून **व-त्सराजाच्या** हृदयांत आनंद मावेनासा झाला, त्या योगानें **वासवदत्तेविषयीं** त्याचें मन निः-शंक होऊन तिच्यावरील त्याचें प्रेम वृद्धिंगत होऊं लागलें. त्याप्रमाणेंच मंत्रिश्रेष्ठ **यौगंधरा-यण** याच्या राजनिष्ठेबद्दल फारच तारिफ क-रून त्याच्याविषयींही तो आपल्या मनांत अ-धिक पूज्यभाव वागवूं लागला. नंतर **वत्सराज** आणि **वासवदत्ता** यांनीं त्या दूताचा योग्य स-त्कार करून त्याला संतुष्ट केलें, व **उज्जयि-नीस** जाण्याविषयीं निरोप दिला. दूत गेल्या-नंतर **वत्सराजानें** मंत्रिमंडळीच्या सल्ल्यानें दि-ग्विजयाची तयारी करण्याकरितां **कौशांबीस** जाण्याचा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं प्रस्थानाची तयारी करून सर्व परिवार व सैन्य यांसहित **वत्सराजाची** स्वारी **लावाणकाहून** निघाली. त्याच्याबरोबर आलेलें सैन्य मोठें अफाट होतें. तें **लावाणक** सोडून जेव्हां चालूं लागलें तेव्हां, तुफानाच्या वेळीं समुद्राचें पाणी मर्यादा सोडून वाढूं लागतें त्या वेळीं जशी गर्जना होते त्याप्रमाणें त्या सैन्य-सागरामध्यें एकच मोठा कोलाहल शब्द उत्पन्न होऊन त्यानें तो सारा प्रदेश दणाणून गेला. **वत्सराज** एका मोठ्या उंच हत्तीवर बसून चालला असल्यामुळें, उदयाद्रीवर आरोहण करून गगनमार्गानें गमन करणाऱ्या सूर्याप्रमाणें तो शोभत होता. त्याच्या मस्तकावर छायेकरितां छत्र धरिलेलें होतें, तें इतकें शुभ्र व तेजस्वी दिसत होतें कीं, त्याच्यापुढें सूर्याची प्रभा अगदीं लोपून गेली होती, व प्रत्यक्ष चंद्रच त्याची तेजस्विता पाहून संतुष्ट होत्साता छत्ररूपानें राजाची

सेवा करीत आहे कीं काय असा भास होऊं लागला. त्याच्या सभोंवतीं मांडलिक राजे अश्वारूढ होऊन चालले होते, ते उच्चस्थानीं असणाऱ्या तेजस्वी ध्रुवाभोंवतीं फिरणाऱ्या ग्रहगणांप्रमाणें दिसूं लागले. राजाच्या पाठीमागून एका हत्तिणीवर बसून **वासवदत्ता** आणि **पद्मावती** चालल्या होत्या. त्यांना पाहून असा भास होऊं लागला कीं, साक्षात् **लक्ष्मी** आणि **भूदेवी** मोठ्या प्रेमानें राजाच्या मागून चालल्या आहेत. त्यांच्यामागून घोडेस्वारांचा मोठा समुदाय चालला होता. त्या घोड्यांचे खूर भूपृष्ठावरील धुळींत उमटल्यामुळें ती भूमि, जिच्या वक्षःस्थळावर नखक्षतें पडलीं आहेत अशा उपभुक्त स्त्रीप्रमाणें शोभत होती. अग्रभागीं बंदीजन राजाच्या पराक्रमाचें व गुणांचें वर्णन करीत चालले होते. अशा थाटानें स्वारी निघाली ती कूच दरकूच करीत करीत थोड्या दिवसांनी **कौशांबी** नगरींच्या ब-

हिर्भागांत येऊन पोंचली. आपला राजा लवकरच नगरांत येणार अशी बातमी समजतांच सर्व नगरभर मोठा उत्सव सुरू झाला. फार दिवस प्रवासास गेलेला प्रियपति परत घरीं येत आहे असें समजतांच त्याच्या स्त्रीला जसा आनंद होतो व ती आपलें शरीर श्रृंगारून जशी मोठ्या उत्कंठेनें त्याची वाट पाहात बसते तशी स्थिति या वेळीं **कौशांबी**नगरीची झाली. ठिकठिकाणीं लाल वस्त्रांच्या पताका व ध्वज उभारलेले होते, हेंच जणूं काय तिनें वस्त्र परिधान केलें होतें. राजाची स्वारी पाहाण्याकरितां लोकांनीं आपल्या घरांतील खिडक्या उघड्या ठेविल्या होत्या तेच जणूं काय पतिदर्शनाविषयीं औत्सुक्यानें उत्फुल्ल झालेले तिचे नेत्र; जलानें पूर्ण भरलेले सुवर्णाचे कलश प्रत्येक गृहाच्या द्वारांत ठेविलेले होते तेच जणूं काय तिचे पुष्ट आणि उन्नत स्तन; पौरजनांचा गलबला हेंच तिचें आनंदयुक्त

भाषण; आणि पांढरासफेत रंग दिलेलीं मंदिरें हें तिचें हास्य[1]. याप्रमाणें श्रृंगारलेली ती नगरी त्या वेळीं फारच शोभमान दिसूं लागली.

लवकरच **वत्सराजानें** उभयतां राण्यांसहवर्तमान नगरांत प्रवेश केला. त्या वेळीं त्यांना पाहून नागरिक स्त्रियांना जो आनंद झाला त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! उंच उंच सुंदर मंदिरांच्या गच्च्यांवर राजदर्शनाकरितां बसलेल्या हजारों स्त्रियांच्या आननपंक्ति झळकत होत्या त्या, उभयतां राण्यांच्या मुखचंद्रांनीं आपल्या तेजानें पराजित केलेल्या आकाशांतील चंद्राला साह्य करण्याकरितांच कीं काय तेथें प्राप्त झाल्या असें प्रेक्षकजनांस वाटूं लागलें. कितीएक स्त्रिया खिडक्यांतून बाहेर तोंडें काढून तटस्थ नेत्रांनीं स्वारी पाहात होत्या. त्यांना पाहून ह्या स्व-

१ हास्याचा रंग पांढरा शुभ्र असतो अशी प्राचीन कवींची कल्पना आहे.

गींच्या अप्सरा कौतुकानें राजदर्शनासाठीं खालीं उतरल्या आहेत अशी भ्रांति होऊं लागली. दुसऱ्या कित्येक आपल्या धनुष्याकार भोंवया वर चढवून झरोक्यांच्या द्वारें राजावर नेत्रकटाक्ष फेंकीत होत्या, त्यामुळें त्या मदनबाणांची वृष्टिच करीत आहेत असा भास होई. कोणीएक स्त्री आपल्या उत्फुल्ल आणि विशाल नेत्रांनीं राजाकडे टक लावून बघत होती. तिचे ते आकर्णनेत्र, मागें राहून पाहात नसलेल्या कानांना, 'चला, पुढें व्हा आणि हें राजाचें सुंदर रूप अवलोकन करा,' असें जणूं काय मोठ्या औत्सुक्यानें सांगत आहे असें वाटे. कित्येक स्त्रिया स्वारीचा थाट पाहण्याकरितां मोठ्या लगबगीनें धांवत धांवत गच्चीवर जाऊन उभ्या राहिल्यामुळें थकून जाऊन श्वासोच्छ्वास टाकीत होत्या त्या योगानें त्यांचे स्तन कंपायमान होऊन वरखालीं होत असत; ते जणूं काय राजाला पाहाण्या-

साठीं मोठ्या उतावळीनें कंचुकींतून बाहेर पड-ण्याचा प्रयत्न करीत आहेत असें वाटे. त्या धां-दलींत एकीच्या गळ्यांतील मौक्तिकहार तुटून त्यांतील मुक्ताफळें जमिनीवर गळून पडूं लागलीं तीं पाहून तिच्या हृदयांत उत्पन्न झालेल्या आ-नंदाचे जणूं काय ते अश्रुबिंदूच टपटप खालीं गळत आहेत असें प्रेक्षकांस वाटूं लागलें. **वा-सवदत्ता लावाणका**मध्यें आगींत जळून मरण पावली हें वर्तमान ऐकल्यापासून सर्व नागरिक स्त्रिया तिच्याविषयीं शोक करीत होत्या, त्यांनीं **वासवदत्ते**ला जेव्हां जिवंत पाहिलें तेव्हां त्यांचा हर्ष गगनांत मावेनासा झाला. कित्येक ह्मणूं लागल्या कीं, या साध्वीला असें दुःखदायक म-रण आलें असेल हें आह्मांस कधींच खरें वाटलें नाहीं. अग्नीच्या हातून असें पापकर्म घडलें असतें तर तो जगाला प्रकाश देणारा असला तरी आह्मी त्याला आंधळा व जगाला अंधका-

रांत बुडविणारा असा दोष दिला असता. **प-द्मावती वासवदत्तेच्या** शेजारींच बसली होती. तिचें अनुपम सौंदर्य पाहून सर्व स्त्रिया थक्क झाल्या. **लावाणकांत** असतांना **वत्सराजानें मगधदेशचा** राजा **प्रद्योत** याच्या कन्येशीं विवाह केला ही गोष्ट त्यांनीं ऐकिली होती ती कन्या हीच असावी असें त्यांनीं अनुमान केलें व त्या आपापसांत ह्मणूं लागल्या, "आमच्या राणीसाहेबांचा स्वभाव किती तरी चांगला आणि मनमिळाऊ आहे पाहा! प्रत्यक्ष सवत जवळ बसली असतां तिच्याविषयीं त्यांच्या मनांत कांहींच मत्सरभाव वागत नाहीं. जशी काय आपली जिवलग मैत्रीणच आपल्याजवळ बसली आहे असें मानून खुशाल आनंदानें तिच्याशीं गोष्टी बोलत बसल्या आहेत." दुसऱ्या कित्येक त्या दोघींना पाहून ह्मणूं लागल्या, "खरोखरच या लावण्याच्या केवळ खाणी आहेत. यांचें स्वरूप ह-

रिहरांच्या दृष्टीस खचीत पडलें नसावें. पडलें असतें तर त्यांनीं **लक्ष्मी** आणि **पार्वती** यांना लुब्ध होऊन त्यांचें एवढें मोठें प्रस्थ माजविलेंच नसतें.'' सारांश, राजा व दोघी राण्या यांना पाहून सर्व स्त्रियांना फार कौतुक वाटलें व तज्जन्य आनंदाच्या भरांत त्यांच्यावर त्या आपल्या उत्फुल्ल नेत्रकमलांची एकसारखी वृष्टि करीत आहेत असा भास होऊं लागला. याप्रमाणें सर्व नागरिक स्त्रिया व पुरुष यांच्या तृषित नयनांना आपल्या दर्शनरूप उदकानें तृप्त करीत होत्साती **वत्सराजा**ची स्वारी उभयतां राण्यांसहवर्तमान राजवाड्याच्या द्वारांत येऊन पोंचली. तेथें संप्रदायाप्रमाणें त्यांच्यावरून लिंबलोण उतरण्याचा मंगलविधि झाल्यानंतर त्या त्रिवर्गांनीं मोठ्या आनंदानें गृहप्रवेश केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं **यौगंधरायणा**नें आनंदप्रदर्शक मोठा दरबार भरविला. मांडलिक

राजे व इतर सरदार लोक यांची त्या स्थळीं एकच गर्दी झाल्यामुळें, प्रफुल्लित कमलांनीं सरोवर जसें शोभमान दिसतें तद्वत् राजमंदिराला त्या दिवशीं कांहीं विलक्षण प्रकारची शोभा आली. राजाची स्वारी सिंहासनावर विराजमान झाल्यावर मांडलिक राजे व सरदारमंडळी यांनीं, पुढें दिग्विजयानंतर पृथ्वीवरील सर्व राजांकडून येणाऱ्या करभारांचे जणूं काय सूचक असे नजराणे केले. ते सर्व ग्रहण करून व त्या सर्वांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें बहुमान करून **वत्सराजानें** त्यांस आपापल्या स्थळीं जावयास निरोप दिले. याप्रमाणें तो मंगलोत्सव समाप्त करून सर्व जनांच्या अंतःकरणांतच जणूं काय प्रवेश करीत आहे असा तो दैवशाली राजा आपल्या अंतःपुरांत प्रवेश करिता झाला. तेथें गेल्यावर **रति** आणि **प्रीति** यांच्यामध्यें साक्षात् **कामदेव** जसा विराजमान होतो, त्याप्रमाणें **वा-**

**सवदत्ता** आणि **पद्मावती** या दोघीजणींस आपल्या दोहों बाजूंस बसवून नानाप्रकारचीं मद्यें व भक्ष्यभोज्यादि पदार्थ यांचें सेवन करीत व अनेक करमणुकीच्या क्रीडा करीत त्यांच्या समागमांत त्यानें तो दिवस सुखानें घालविला.

**यौगंधरायणा**सारखा बुद्धिमान् व राजनिष्ठ प्रधान राज्यकारभार चालविणारा असल्यामुळें या दैवशाली राजाला कोणत्याच गोष्टीची काळजी नव्हती. त्याच्यावर सर्व भार टाकून उभयतां राण्यांच्या समागमानें नानाप्रकारच्या विलासांत, व त्यांचा कंटाळा आला ह्मणजे मृगयादि क्रीडांत, तो मोठ्या आनंदानें आपला काळ घालवूं लागला; पण प्रधान **यौगंधरायणा**चें चित्त ठिकाणीं नव्हतें. मनांत योजिलेलें दिग्विजयाचें कार्य कोणत्या रीतीनें तडीस लागतें याविषयीं त्याचा जीव मोठ्या काळजींत पडला. फौजफांटा तयार करण्याकरितां व इतर खर्चाकरितां द्र-

व्याची गरज होती व त्याची तर खजिन्यांत टंचाई. जुलमानें रयतेकडून द्रव्य हरण करणें त्याला योग्य वाटेना, यामुळें तो मोठ्या विचारांत पडला. जे पुरुष दृढनिश्चयाचे असतात त्यांना परमेश्वर साह्य करतोच. त्याचप्रमाणें यावेळीं एक अकल्पित गोष्ट घडून आली, तिच्या योगानें त्याची ती सर्व काळजी नाहींशी होऊन त्याला उत्तेजन आलें. ती गोष्ट कोणती व त्यानंतर दिग्विजय कसा झाला याचें वर्णन पुढील भागांत केलें जाईल.

समाप्त.

संस्कृतग्रंथार्थसंग्रह.

पुस्तक २३.

# उदयनचरित;

## भाग चौथा.

हें पुस्तक,

महाकवि श्रीसोमदेवभट्टविरचित कथासरित्सागरनामक काव्याच्या आधारानें महाराष्ट्रभाषेंत लिहिलें आहे,

तें

**जावजी दादाजी यांच्या**

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक **तुकाराम जावजी** यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई,—सन १८९२.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत ३ आणे.

श्री.

# संस्कृतग्रन्थार्थसंग्रह.

---

या नांवाचें पुस्तक सवडीप्रमाणें अंकरूपानें काढावयाचें आहे. यांत श्रुति, स्मृति, महाभारत, रामायण, पुराणें, वगैरे जुन्या संस्कृतग्रंथांतील मनोरंजक, धर्मनीतिपर, व इतिहासपर अशा गोष्टींचा संग्रह केला जाईल. या संग्रहाचे सवडीप्रमाणें वेळोवेळीं वेगळाले अंक काढून थोड्या किमतीस वाचकांस मिळावे असा यत्न केला आहे. जेवढे अंक निघतील तेवढे सगळे आह्मांकडे पाठवावे असें आह्मांस कोणी कळविल्यास त्याप्रमाणें अंक निघतांच पाठविले जातील. या कृत्यास आश्रय मिळून चांगलें चालल्यास कालांतरानें जुन्या संस्कृत ग्रंथांतील गोष्टींचीं मराठींत सुंदर रीतीनें लिहिलेलीं पुष्कळ पुस्तकें तयार होतील.

एक अंक घेतला असतां दुसरा घेतलाच पाहिजे असें कोणावर ओझें पडूं नये ह्मणून कोणत्याही अंकांतील कथा अर्धवट ठेविली जाणार नाहीं.

# विक्रीचीं पुस्तकें.

| मराठी. | किंमत रु. आ. | टपाल. आ. |
|---|---|---|
| कीचकवध. ... ... ... ... | ०-३ | ॥ |
| धर्माश्वमेधसमारंभ. ... ... ... | ०-४ | ॥ |
| चंद्रसेना किंवा अहिमहिनिधन. ... ... | ०-२ | ॥ |
| वनराजाचें चरित्र ... ... ... ... | ०-४ | ॥ |
| घोषयात्रा. ... ... ... ... ... | ०-२ | ॥ |
| सुधन्वावध. ... ... ... ... | ०-४ | ॥ |
| हन्नडा. ... ... ... ... ... | ०-४ | ॥ |
| सैरंध्री. ... ... ... ... ... | ०-३ | ॥ |
| सीताहरण. ... ... ... ... ... | ०-३ | ॥ |
| नामदेवाची समाराधना. ... ... ... | ०-३ | ॥ |
| मदालसाचरित्र. ... ... ... ... | ०-२ | ॥ |
| टेक्निकल एज्युकेशन. ... ... ... | ०-२ | ॥ |
| सुशर्माचरित्र. ... ... ... ... | ०-२ | ॥ |
| साहा सुलभ संवाद. ... ... ... | ०-१ | ॥ |
| नकला-वैद्यकीय चुटके ... ... ... | ०-३ | ॥ |

☞ हीं पुस्तकें, रोख पैसा आल्यास मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर **निर्णयसागर** छापखान्यांत विकत मिळतील.

# प्रस्तावना.

या चरित्राच्या प्रसिद्ध झालेल्या तीन भागांतील कथा वाचकांच्या स्मरणांत राहिली असेलच. त्याच्यापुढील कथा, ह्मणजे चरित्रनायक **उदयन** अथवा **वत्सराज** यानें दिग्विजय करून आपणास सार्वभौम पदाची प्राप्ति करून घेतली, तदनंतर त्यास पुत्रलाभ होऊन तो स्वपराक्रमानें सकल विद्याधरांचा चक्रवर्ती राजा झाला व शेवटीं **वत्सराजानें** देहत्याग करून स्वर्गलोकीं गमन केलें, इत्यादि गोष्टींचें वर्णन या चौथ्या भागांत करून चरित्राची समाप्ति केली आहे.

**वत्सराज** हा जरी मोठा स्त्रैण, ऐषआरामी व विषयासक्त होता, तरी त्याच्या अंगीं कार्यदक्षता, शौर्य, पराक्रम, विनय, औदार्य, प्रजावात्सल्य, धर्मश्रद्धा, इत्यादि अनेक सद्गुण वास करीत होते, त्यांच्या योगानें तो फारच लोकप्रिय झाला होता. तसेंच त्याच्या पदरची प्रधानादि मंडळी राजनिष्ठ, चतुर, व आपा-

पल्या कामांत दक्ष असल्यामुळें त्यांच्यावर तो पूर्ण विश्वास ठेवून त्यांच्या सल्ल्यानें वागत असे; यामुळें त्याचें राज्य सुरळीतपणें चालून उत्तरोत्तर त्याचा उत्कर्षच होत गेला या गोष्टी वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहाणार नाहींत.

मूळ काव्यांत हें चरित्र फारच विस्तृत आहे. त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचा मात्र या चरित्रांत समावेश केला आहे. मूळ काव्य कवीनें आपल्या रसाळ वाणीनें ग्रथित केलें असल्यामुळें तें फारच सुरस आणि मनोहर झालें आहे; परंतु तें संस्कृत भाषेंत असल्यामुळें त्यांतील रसास्वाद ती भाषा जाणणारांस मात्र मिळणार. शुद्ध मराठी वाचकांस तो दुर्लभ आहे असें जाणून त्याची अंशतः तरी गोडी त्यांस समजावी या हेतूनें हें चरित्र मराठी भाषेंत रचून वाचकांस सादर केलें आहे. याच्या वाचनानें इष्ट हेतु सिद्धीस गेला तर चरित्रलेखनाचें साफल्य झालें असें आह्मी समजूं.

# उद्यनचरित.

## भाग चौथा.

### दिग्विजय, पुत्रलाभ आणि परलोकगमन.

**वत्सराज पद्मावतीशीं** विवाह करून **कौशांबीस** परत आल्यावर **यौगंधरायणादि** प्रधानमंडळी पुढील योजिलेल्या दिग्विजयाच्या कार्याची वाटावाट करूं लागली. त्या कामाकरितां मुख्य द्रव्याची जरूर होती, व खजिन्यांत तर पुरेसें द्रव्य नव्हतें; यामुळें **यौगंधरायण** मोठ्या काळजींत पडला होता. पण परमेश्वर ज्याला सहाय असतो त्याला काय कमी पडणार आहे? अकस्मात् अशी एक गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें **वत्सराजाच्या** भांडारांत अपरिमित द्रव्याची भर पडली. ती गोष्ट अशी कीं,

एके दिवशीं **वत्सराजाची** स्वारी दरबारांत ब-सून मंत्रिमंडळीच्या विचारानें राज्यकारभार पहात असतां राजद्वारांत कोणी एक वृद्ध ब्राह्मण आला व, 'राजा, घात झालारे घात झाला! माझें संरक्षण कर,' असें मोठ्या दीन वाणीनें ओरडून ह्मणाला. **यौगंधरायणानें** कोण ओरडत आहे याची चोपदाराकडून चौकशी करवून त्या ब्राह्मणाला आंत बोलाविलें आणि त्याची हकीकत विचारिली; तेव्हां तो ह्मणाला, "महाराज, मी गरीब ब्राह्मण आहें. आज मी आपल्या पुत्राला दर्भसमिधा आणण्याकरितां अरण्यांत पाठविलें होतें, तेथें कित्येक गुराखी गुरें चारीत होते. त्या दुष्टांनीं कांहींएक कारण नसतां माझ्या पुत्राचे पाय कीं हो तोडून टाकिले! हाय हाय! सर्वस्वीं माझें घर बुडालें. आतां मी काय करूं! या न्यायी राज्यांत ब्राह्मणावर विनाकारण एवढा अनर्थ गुदरावाना? हर हर!" ही त्या

ब्राह्मणाची हकीकत व विलाप ऐकून **वत्सरा-
जाचें** अंतःकरण दयेनें फारच कळवळलें. त्यानें
कोतवालाकडून त्या गुराख्यांना तत्क्षणींच पक-
डून आणवून असलें निंद्य व घोर कर्म तुह्मीं क-
शाकरितां केलें ह्मणून त्यांना विचारिलें; तेव्हां
ते ह्मणाले, "महाराज, हा ब्राह्मण सांगतो तें सर्व
खरें आहे; पण याच्या पुत्राचे पाय आह्मीं वि-
नाकारण तोडिले असें जो हा ह्मणतो हें मात्र
खरें नाहीं. त्यानें तसाच मोठा अपराध केला
ह्मणून आमच्या राजानें त्याला ही शिक्षा दिली,
यांत आमचा काय बरें दोष आहे?" ही चम-
त्कारिक हकीकत ऐकून **वत्सराजाला** मोठें आ-
श्चर्य वाटलें आणि तो ह्मणाला, " अरे, तुह्मी
कोण? तुमचा राजा कोण? व या गरीब ब्रा-
ह्मणाच्या मुलानें असा अपराध तरी कोणता
केला तें सविस्तर सांगा." तेव्हां ते ह्मणाले, "म-
हाराज, ऐकून घ्या. आह्मी गुराखी आहों. रा-

नामध्यें गुरें चारावयास नेहमीं जातों व तेथें एकांतस्थळीं नानाप्रकारचे खेळ खेळत असतों. आमच्यामध्यें **देवसेन** या नांवाचा एक गुराखी प्रमुख आहे. एके दिवशीं तो आह्मांला ह्मणाला, मी तुमचा राजा आहें. आजपासून तुह्मीं माझ्या हुकमांत वागलें पाहिजे. असें ह्मणून तेथें एक मोठी शिळा होती तें आपलें सिंहासन कल्पून तिजवर तो जाऊन बसला. त्या दिवसापासून तो आमच्यावर अधिकार चालवीत असतो व आह्मीही निमूटपणें त्याच्या आज्ञेंत वागत असतों. आज या ब्राह्मणाचा मुलगा त्या आमच्या राजाच्या अगदीं जवळून गेला; पण त्याला त्यानें मुजराविजरा वगैरे कांहींएक केलें नाहीं. या अपमानाबद्दल आमच्या राजाला फार राग आला. आह्मी त्या ब्राह्मण बटूला राजाला नमस्कार केल्याशिवाय जाऊं नको ह्मणून सांगितलें; पण आमचें न ऐकतां तो तसाच पुढें चालता झाला,

तेव्हां आमच्या राजेसाहेबांनीं त्या उद्धट पोराचे पाय तोडून टाका असा आह्मांस हुकूम फरमाविला. आह्मी काय हुकुमाचे चाकर. धन्याचा हुकूम मोडावा कसा ? ती आज्ञा होतांच आह्मी धांवत जाऊन त्या पोराला पकडलें आणि त्याचे पाय तोडून टाकिले !"

ही चमत्कारिक हकीकत ऐकून दरबारांतील सर्व मंडळीस फार आश्चर्य वाटलें. राजाला तर या अन्यायी कृत्याबद्दल अतिशय संताप आला. प्रधान **यौगंधरायण** मोठा चतुर होता. तो त्या विलक्षण हकीकतीचा आपल्या मनांत विचार करीत असतां, गुराख्याच्या पोराला राजा होण्याची त्या स्थळीं बुद्धि व्हावी यांत कांहीं तरी गोम आहे असें तेव्हांच त्याच्या ध्यानांत आलें, आणि राजाला एकीकडे नेऊन तो त्याला ह्मणाला, "महाराज, ज्या स्थळीं गुरें राखणाऱ्या यःकश्चित् कुणबटाला राजा होण्याची बुद्धि झाली

त्या स्थळाचें माहात्म्य कांहीं अलौकिक असलें पाहिजे, एरवीं अशी सद्वासना त्याच्या मनांत कधींच उद्भवली नसती. मला वाटतें, त्या ठिकाणीं द्रव्याचा मोठा संचय भूमीमध्यें पुरून ठेविलेला असावा यांत संशय नाहीं; यासाठीं आपण तेथें जाऊन याबद्दल तपास करावा हें बरें."

प्रधानाचा हा तर्क राजालाही खरा वाटला, व लागलाच तो थोडें सैन्य, मंत्रीमंडळी व सेवकजन यांसहवर्तमान त्या गुराख्यांना पुढें करून त्या अरण्यांत जावयास निघाला. तेथें पोंचल्यावर गुराख्यांनीं त्याला ती शिळा दाखविली. ती सेवकलोकांकडून एकीकडे करवून **यौगंधरायणानें** त्या ठिकाणीं मोठा खाडा खणावयास सांगितलें. तो खटल्यावर अकस्मात् त्यांतून पर्वतप्राय भला मोठा एक धिप्पाड यक्ष बाहेर निघतांना त्यांच्या दृष्टीस पडला! तो राजापुढें हात जोडून उभा राहून ह्मणाला, "महाराज,

या खळग्यांत एक मोठा द्रव्यनिधि आहे. हा तुमचे आजे **शतानीक** महाराज यांनीं आपल्या वंशजांस संकटसमयीं उपयोगीं पडावा ह्मणून या स्थळीं पुरून ठेविला आहे. त्याचें मीं आजपर्यंत संरक्षण केलें. आज तुह्मांला त्याचा शोध लागला हें फार उत्तम झालें. आतां हा तुमचा तुह्मीं संभाळून मला मोकळें करावें." हें त्या यक्षाचें भाषण ऐकतांच **वत्सराज** व **यौगंधरायण** यांना जो आनंद झाला त्याचें वर्णन कोठवर करावें! राजानें त्या यक्षाची पूजा केली, तिचें ग्रहण करून संतुष्ट होत्साता तो तेथल्या तेथेंच गुप्त झाला. नंतर तो सारा द्रव्यनिधि राजानें खणून बाहेर काढविला. खणतां खणतां त्या खळग्यांत त्याला अति मूल्यवान् असें एक रत्नखचित सिंहासन सांपडलें, तेंही त्यानें बाहेर काढविलें. 'अनंत हस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दोकरानें' अशी

जी एक कव्युक्ति आहे ती खरी आहे. उदयकाल प्राप्त झाला ह्मणजे एकामागून एक अशा कल्याणकारकच सर्व गोष्टी घडून येतात. असो. नंतर त्या ब्राह्मणाच्या मुलाचे पाय तोडल्याबद्दल त्या गुराख्यांस योग्य शासन करून राजा तो सारा द्रव्यनिधि व तें सिंहासन घेऊन मोठा आनंदोत्सव करीत आपल्या राजधानीस परत आला. त्या सिंहासनास सहस्त्रावधि अमूल्य रत्नें जडलेलीं होतीं त्यांच्या किरणांचा प्रकाश चोहोंकडे फांकत होता, यावरून या भाग्यशाली राजाच्या प्रतापसूर्याचाही प्रकाश असाच सर्वत्र पडून दशदिशांमध्यें त्याचा पराक्रम गाजून राहील अशी सर्व लोक कल्पना करूं लागले. रुप्याच्या तारांमध्यें गुंफलेल्या पांढऱ्या सफेत मौक्तिकांचे अनेक घोंस त्या सिंहासनावर लटकत होते त्यावरून तें आपल्या धन्याच्या घरीं आल्यामुळें आनंदानें जणूं काय हंसत आहे

असें वाटूं लागलें. याप्रमाणें राजाला प्राप्त झालेलें तें सुंदर सिंहासन स्वस्थानीं विराजमान होतांच स्वर्गामधून दुंदुभीचा मधुर आवाज ऐकूं आला तेणेंकरून सर्व लोक विस्मित होऊन आनंदानें डोलूं लागले. कोणत्याही कार्याला आरंभ करतांना जर कांहीं कल्याणसूचक शुभ गोष्टी घडून आल्या तर कार्यसिद्धि खचीत होते असा सर्वत्र अनुभव आहे, त्याप्रमाणें प्रस्तुत प्रसंगीं शुभ शकुन झालेले पाहून **यौगंधरायणादि** मंत्रिमंडळींनीं राजाच्या हातून आतां दिग्विजय खचीत होणार अशी आपल्या मनांत शकुनगांठ बांधिली आणि तत्प्रीत्यर्थ आपापल्या घरीं त्यांनीं मोठा उत्सव केला. सर्व नगरभरही असाच उत्सव सुरू झाला. त्यांत उभारलेल्या ध्वजपताकांनीं सर्व आकाशमंडळ व्यापून गेलें. याप्रमाणें लखलखणाऱ्या ध्वजरूप विद्युल्लतांनीं सारें मेघमंडळ भरून गेल्याबरोबर **वत्सराजरूप**

मेघानें आपल्या सर्व प्रजाजनांवर कनकरूप उदकाची वृष्टि सुरू करून सर्वांस संतुष्ट केलें यांत काय आश्चर्य आहे! विजा चमकून आकाशांत गडगडाट झाला ह्मणजे पर्जन्यवृष्टि होणें हें स्वाभाविकच आहे. असो.

तो दिवस आनंदोत्सवांत निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं **वत्सराज** दरबारांत बसला असतां त्याच्या मनाची परीक्षा करण्याकरितां **यौगंधरायण** त्याला ह्मणाला, "महाराज, कुलपरंपरेनें हें दिव्य सिंहासन आपल्या हातीं लागलें आहे; यासाठीं आपण त्यावर आरूढ होऊन त्याला अलंकृत करावें हें या समयीं योग्य आहे." **वत्सराज** हंसून ह्मणाला, प्रधानजी, तुह्मी सांगतां तसें माझ्यानें आज करवत नाहीं, यामुळें मला फार दिलगिरी वाटते. सकल पृथ्वी जिंकून ज्या सिंहासनावर माझे पूर्वज विराजमान झाले होते, त्यावर तशाप्रकारचा पराक्रम

केल्याशिवाय बसणें मला शोभत नाहीं. मी बसलों तर उद्यां वृथाभिमानी ह्मणून तुह्मीच माझी निंदा कराल, व माझ्या स्पर्शानें या दिव्य रत्नाचा अपमान केल्यासारखें होईल; ह्मणून तुह्मांला सांगतों, ही समुद्रवलयांकित सारी पृथ्वी जेव्हां मी जिंकीन तेव्हांच याच्या पायरीवर मी आपला पाय ठेवीन.'' खरोखरच आहे, कुलीन आणि पराक्रमी पुरुष कधींही वृथाभिमान बाळगून पोकळ डौल मिरवीत नसतात; तसेंच **वत्सराजानें** या प्रसंगीं केलें. त्यानें सिंहासनावर बसण्याचें तूर्त नाकारिलें हें पाहून **यौगंधरायणाला** त्याच्या मनाचें उदात्तपण कळून फार संतोष झाला, व पुढील उद्योगाविषयीं मोठी उमेद आली. राजाचें भाषण ऐकून तो ह्मणाला, ''महाराज, आपण ह्मणतां हेंच खरोखर आपल्या पौरुषास योग्य आहे. आतां माझी विनंति एवढीच आहे कीं दिग्विज-

याच्या कामास आरंभ करून पूर्व दिशेकडील राजे प्रथम जिकण्यास सुरुवात करावी. आपले शूर सेनापति **रुमण्वान्** यांनीं सर्व सैन्याची तयारी करून आपल्या आज्ञेची ते वाट पहात आहेत. खजिन्यांत द्रव्याची उणीव होती तीही आपल्या सुदैवानें नाहींशी झाली आहे; तेव्हां आतां या कामास दिनावधि लावूं नये." हें **यौगंधरायणा**चें भाषण ऐकून राजा ह्मणाला, "प्रधानजी, बाकीच्या दिशा टाकून प्रथम पूर्व दिशाच जिकावी असें जें आपण ह्मणतां यांतील हेतु काय? बाकीच्या दिशा अगदीं उध्वस्त आहेत कीं काय? **यौगंधरायण** ह्मणाला, "महाराज, तसें नव्हे. उत्तर दिशा विस्तीर्ण असून तिकडील राजे मोठे संपत्तिमान् आहेत खरे; तथापि तिकडे म्लेंच्छांची वस्ती फार असल्यामुळें तिला अशुभ मानितात. पश्चिमेस सूर्यचंद्रादिकांचा अस्त होतो ह्मणून तीही

शुभसूचक नव्हे. राहिली दक्षिण. ती तर दुष्ट राक्षसांचें वसतिस्थान असून तिकडे सकल प्राणिमात्रांचा संहार करणारा जो **यमराज** तो राहातो; ह्मणून तीही मंगल कार्यास वर्ज्य होय. पूर्व दिशेस सर्व जगाला प्रकाश देणारा **सूर्य-नारायण** उदय पावतो. **इंद्रलोक**ही त्याच दिशेस आहे. जगाला पावन करणारी **भागी-रथी** त्याच दिशेस वहात जाते. तिच्या पवित्र उदकानें **विंध्याचल** आणि **हिमाचल** या महापर्वतांच्या मध्यभागीं असणारा प्रदेश पवित्र झालेला आहे. या सर्व कारणांस्तव पूर्व दिशा ही पवित्र व शुभ कार्यास आरंभ करण्याला प्रशस्त अशी मानिली आहे, आणि ह्मणूनच स्वकीय कल्याण इच्छिणारे राजे प्रथम त्याच दिशेकडे मोहिमी करतात व त्या सुरनदीच्या आश्रयानें संपन्न झालेल्या प्रदेशांत वास करि-तात. आपल्या पूर्वजांनींही पूर्व दिशेकडूनच

क्रम धरून दिग्विजय केला व गंगेच्या तीरीं **हस्तिनापूर** हें नगर वसवून ती आपली राजधानी केली. आपले आजे **शतानीक** महाराज यांच्या प्रकृतीला व स्वभावाला **कौशांबीस** राहाणें सुखकर वाटलें ह्मणून ते मात्र येथें येऊन राहिले, तेव्हांपासून हीच नगरी आपली राजधानी झाली आहे. वास्तविक पाहिलें असतां सार्वभौम राजानें अमुकच ठिकाणीं राहिलें पाहिजे असा कांहीं नियम नाहीं, व सार्वभौम पदवीही विवक्षित स्थळीं राहिल्यानें मिळत असते असें नाहीं. ती पराक्रम गाजवून मिळवावी लागते." याप्रमाणें भाषण करून **यौगंधरायण** स्तब्ध राहिला. राजाला तें भाषण मान्य झालें, व पराक्रम हेंच वैभवास चढण्याला मुख्य साधन आहे असें समजून तो त्याला ह्मणाला, "प्रधानजी, तुह्मी ह्मणतां तेंच खरें आहे. स्थळमाहात्म्यानें साम्राज्य प्राप्त होत नाहीं. तें सर्वस्वी

पौरुषाधीन आहे. पुरुष एकटा व निराश्रित असला तरी, तो जर पराक्रम करील तर कुबेराचेंही वैभव त्याला प्राप्त होईल. ह्मण आहे कीं 'नर करनी करे तो नरका नारायन होय.' अशा पराक्रमी पुरुषांच्या कथा तुह्मीं पुष्कळ ऐकिल्या असतील." नंतर **यौगंधरायणा**नें विनंति केल्यावरून व **वासवदत्ता** आणि **पद्मावती** यांनाही कांहीं करमणूक व्हावी ह्मणून **वत्सराजानें विदूषक** या नांवाच्या एका ब्राह्मणाची एक सुरस कथा सांगितली. त्या कथेंत तो ब्राह्मण मूळचा जरी अत्यंत दरिद्री होता तरी आपल्या पराक्रमानें आणि साहसानें सार्वभौम पद पावून आपल्या स्त्रियांच्या समागमानें कसें सुख भोगूं लागला याचें सुरेख व मार्मिक वर्णन केलें होतें. ती **वत्सराजाच्या** तोंडची विचित्र आणि अद्भुत कथा ऐकून **वासवदत्ता, पद्मावती** व जवळ बसलेली मंत्रीमंडळी यांस फारच समाधान

वाटलें. नंतर **वत्सराज** ह्मणाला, "दैव जर अनुकूल असेल तर धीर पुरुषांचें सत्व हा एक मोह पाडणारा मंत्रच होऊन त्याच्या सामर्थ्यानें लक्ष्मी त्याच्या घरीं पाणी भरावयास लागते, यांत संशय नाहीं."

वरील भाषण ऐकून **यौगंधरायण** ह्मणाला "महाराज आपण पराक्रमी असून दैवही आपणांला अनुकूल आहे. तसेंच राजनीति जाणणारे आह्मी मंत्रीही आपल्या पदरीं आहों; यासाठीं मनांत योजिलेल्या दिग्विजयाच्या कार्यास आपण आतां लवकर लागावें." **वत्सराज** ह्मणाला, "प्रधानजी, तुह्मी ह्मणतां तसेंच करावयाचें; पण तुह्मांला सांगतों, ज्यांत कल्याणाची सिद्धि करून घ्यावयाची असते अशा महत्कार्यांत प्रायशः विघ्नें फार येत असतात; यासाठीं तीं टाळण्याकरितां **शंकरा**ची प्रथम आराधना करून त्याच प्रसाद संपादावा हें मला बरें दिसतें. त्याच

प्रसादावांचून वांच्छित सिद्धि कधीं व्हावयाची नाहीं." **यौगंधरायणाला** हें भाषण मान्य झालें, व समुद्रामध्यें सेतु बांधण्याचें **रामचंद्राच्या** मनांत येतांच मुख्यमुख्य वानरमंडळीनें जसें त्याला अनुमोदन दिलें तसाच या प्रसंगीं सर्व प्रधानमंडळीचा राजाच्या ह्मणण्यास तत्काल रुकार पडला. नंतर उभयतां राण्या व मंत्री यांसहवर्तमान **वत्सराज श्रीशंकराचें** आराधन करीत बसला. याप्रमाणें तीन दिवस कडकडीत उपोषणें करून तपश्चर्या केल्यावर चौथ्या दिवसाच्या पाहांटेस राजाचा किंचित् डोळा लागल्यासारखें झालें. त्या वेळीं साक्षात् **शंकर** त्याच्या स्वप्नांत येऊन त्याला ह्मणाले, "राजा, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालों आहें. आतां ऊठ आणि इच्छित कार्याला एकदम आरंभ कर. ग निर्विघ्न जयप्राप्ति होईल, व सकल विद्यांवर एकछत्री राज्य करणाऱ्या पुत्राचा तुला

लवकरच लाभ होईल, असा माझा पूर्ण आशी-
र्वाद आहे." हा दृष्टांत होतांच राजा गडबडून
जागा झाला. उपोषणांनीं त्याच्या शरीरास
अत्यंत ग्लानि आली होती; तथापि सूर्याच्या प्र-
काशानें प्रतिपदेचा चंद्र जसा तेजस्वी होऊन
उदय पावतो त्याप्रमाणें तो **श्रीशंकराच्या** प्र-
सादानें विगतश्रम होत्साता कांतिमान् दिसूं ला-
गला, व याच्या मनास मोठी हुशारी वाटूं ला-
गली. त्याणें तो स्वप्नदृष्टांत आपल्या प्रधानांस
कळविला, तेव्हां त्यांसही अत्यंत आनंद झाला
व पुढील कार्याविषयीं उमेद आली. पुष्पांप्र-
माणें ज्यांचीं शरीरें अत्यंत कोमल अशा त्या उ-
भयतां राण्या व्रतोपवासांनीं अगदीं गळून गेल्या
होत्या, त्यांना तो दृष्टांत संजीवनी मंत्राप्रमाणें
होऊन त्यांच्या तो कानीं पडतांच त्यांस हुशारी
वाटली. या **शंकराच्या** वरानें राजाच्या अं
त्याच्या पूर्वजांचें तेज आणि वीरश्री यांचा सं

होऊन उभयतां राण्यांची महापतिव्रता स्त्रियांमध्यें गणना होऊं लागली. राजाला **शंकरानें** वर दिल्याची बातमी लवकरच सर्व नगरभर पसरली, तेव्हां नगरवासी जनांनीं मोठा उत्सव करून आपणांस झालेला आनंद प्रदर्शित केला.

दुसऱ्या दिवशीं **यौगंधरायण** दरबारांत आल्यावर राजाला ह्मणाला, "महाराज, भगवान् **शंकर** आपणांला प्रसन्न आहेत तस्मात् आपण धन्य आहां. आतां सकल शत्रूंना जिंकून स्वभुजसंपादित लक्ष्मीचा आपण खुशाल उपभोग घ्यावा. ही लक्ष्मी जरी चंचल आहे, तरी आपल्यासारख्या राजांनीं स्वधर्मानें तिचें संपादन केलें असतां त्यांच्या वंशांत ती चिरस्थायी होते. क्षत्रियांनीं आपल्या धर्मानें ह्मणजे स्वपराक्रमानें संपादन केलेलें वैभव कधींही लयास जात नाहीं. याचें उदाहरण देण्यास फार लांब जावयास नको. आपणांला जो हा अगणित द्रव्यसंचय व हें अ-

मूल्य रत्नखचित सिंहासन प्राप्त झालें आहे तें आपल्या पूर्वजांनीं बाहुबलानें मिळविलें होतें, ह्मणून जरी तें इतके दिवस भूमीमध्यें गुप्त राहिलें होतें तरी शेवटीं तें दुसऱ्याच्या हातीं न लागतां आपल्याच घरीं चालून आलें. सारांश, द्रव्यप्राप्तीसाठीं प्रयत्न करणें तो स्वधर्मानें वागूनच केला पाहिजे. राजानें तर या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे; कारण, राज्यरूप वृक्षाचें मूळ काय तें धन होय, व तें जर अधर्मानें मिळविलें तर त्या मूळाला कीड लागून वरील राज्यरूप वृक्ष कितीही विस्तृत असला तरी त्याचा नाश होण्यास विलंब लागत नाहीं. आपला धर्म ह्मणजे पराक्रमानें पृथ्वीचा जय करणें व नीतीनें प्रजेचें पालन करणें हा होय. यासाठीं आमच्या साह्यानें या धर्माचरणापासून प्राप्त होणारें ऐश्वर्य-अर्थात् दिग्विजय द्वारा सार्वभौमपदाचं प्राप्ति-मिळविण्याच्या उद्योगास आपण आ

आरंभ करावा. आपले उभयतां श्वशुर आपणांस सर्वप्रकारें अनुकूल आहेत व त्यांच्या अनुमतानें वागणारे पुष्कळ राजे आपणांस या कामीं मदत करतील. **वाराणसी**चा राजा **ब्रह्मदत्त** हाच काय तो आपला द्वेष करणारा आहे; यासाठीं प्रथम त्याच्यावरच स्वारी करून त्याची खोड मोडावी. त्याला जिंकल्यानंतर पूर्वदिशेकडील सारे देश प्रथम काबीज करावे आणि मग क्रमाक्रमानें बाकीच्या दिशांकडे वळून तिकडील प्रदेशांतही आपल्या विजयाचा झेंडा रोंवावा. याप्रमाणें आपल्या हातून दिग्विजय झाला ह्मणजे आपल्या पूर्वजांच्या उज्वल यशाचें पुनरुज्जीवन केल्याचें श्रेय आपणांस मिळेल.

**यौगंधरायणा**चें हें उत्साहप्रद भाषण ऐकतांच दिग्विजयाविषयीं **वत्सराजा**चा पूर्ण निय झाला, व लागलीच त्यानें स्वारीची तयारी ण्याविषयीं सेनापतीस हुकूम दिला. **वासव-**

दत्तेचा भाऊ **गोपालक** आणि **पद्मावतीचा सिंहवर्मा** हे उभयतां मोठमोठीं सैन्यें घेऊन त्याला साह्य करण्याकरितां लवकरच येऊन दाखल झाले. त्यांचा यथायोग्य सत्कार करण्याकरितां **वत्सराजानें गोपालकास विदेहदेशाचें** आणि **सिंहवर्म्याला चेदीदेशाचें** राज्य अर्पण केलें. भिल्लांचा राजा **पुलिंदक वत्सराजाचा** परम मित्र आणि हितकर्ता असून तो **विंध्यपर्वतांतील** डोंगराळ प्रदेशांत राज्य करीत असे, त्यालाही त्यानें मदतीकरितां निमंत्रण केलें, त्याप्रमाणें तो आपलें सैन्य घेऊन मोठ्या उत्साहानें **वत्सराजास** येऊन मिळाला. त्यानें बरोबर आणिलेलें सैन्य एवढें मोठें होतें कीं, वर्षाकाळीं आकाश जसें मेघांनीं व्याप्त होतें त्याप्रमाणें त्या काळ्या कभिन्न भिल्लांच्या सैन्यानें सारा **वत्सदेश** व्यापून टाकिला. **वत्सराजा**चे शत्रु होते त्यांना ही सैन्याची कडेकोट तय

झालेली ऐकून मोठें आश्चर्य वाटलें व पुढें काय अनर्थ ओढवतो न कळे असें ह्मणून ते फार घाबरून गेले. **वाराणसी**चा राजा **ब्रह्मदत्त** याच्यावर प्रथम स्वारी करण्याचा बेत ठरला होता; ह्मणून तेथील स्थितीची माहिती आणविण्याकरितां **यौगंधरायणा**नें तिकडे दूत रवाना केले. नंतर चांगला मुहूर्त पाहून त्या दिवशीं **वत्सराज** सैन्यासह **वाराणसी**कडे जावयास निघाला. त्या वेळीं जयसूचक असे पुष्कळ शकुन झाल्यामुळें पुढील कार्याविषयीं त्याला मोठी उमेद आली. एका मोठ्या यशस्वी हत्तीवर **वत्सराज** आरूढ झाला. त्या वेळीं पर्वतशिखरावर फुलांनीं भरलेल्या वृक्षाखालीं बसलेला मृगेंद्र जसा शोभतो तसा **वत्सराज** त्या गजेंद्रावरील अंबारीमध्यें शोभूं लागला. हे दिवस शरदृतूचे होते यामुळें नद्यांना उतार असून मार्ग सुगम झाला होता. अशा मार्गानें **वत्सराजा**ची

स्वारी चालली असतां सैन्याच्या गलबल्यानें सर्व प्रदेश दणाणून गेला, व सर्व दिशा धुरळ्यानें व्याप्त झाल्यामुळें अकाळींच वर्षाकाळ सुरू झाल्याची भ्रांति होऊं लागली. सैन्याच्या जयघोषाचे प्रतिध्वनि दशदिशांत घुमूं लागले, त्या योगानें त्या स्वारीपासून उद्भवणारा अनर्थ त्या एकमेकींस जणूं काय कळवीत आहेत असें वाटूं लागलें. सुवर्णांचे अलंकार घातलेल्या घोड्यांची कांति सूर्यप्रभेप्रमाणें चमकत होती, यामुळें ते अग्नीपासून निर्माण झाले कीं काय असें वाटूं लागलें. सैन्यांतील हत्ती पाहून पर्वतराजांनीं **वत्सराजा**ची मर्जी संपादन करण्याकरितां ते आपले कुमारच जणूं काय त्याच्या साह्यार्थ पाठविले आहेत असें प्रेक्षकांस भासूं लागलें. त्यांचे शुभ्र कान हीं त्यांच्यावर उडत असलेलीं चामरें व गंडस्थळांतून वाहणारें तांबडें दानोदक हें पर्वतोदरांतून स्रवणाऱ्या नानाविध धातुरसांचे प्र-

वाह असा भास होऊं लागला. **वत्सराजाच्या** स्वभावाला परोत्कर्ष कधीं सहन होत नसे; ह्म- णूनच कीं काय त्याच्या सैन्याच्या गमनामुळें उडत असलेल्या धुरळ्यानें सूर्याचें तेज अगदीं झांकून टाकिलें. **वासवदत्ता** आणि **पद्मावती** या उभयतां राण्या राजाच्या मागूनच एका ह- त्तिणीवर बसून चालल्या होत्या, त्या त्याच्या स- द्गुणांला लुब्ध झालेल्या कीर्ति आणि विजयश्री यांप्रमाणें शोभत होत्या. सैन्यांतील जरीपटके वाऱ्यानें फडफडत होते ते जणूं काय 'आमच्या महाराजांस शरण या, नाहींपेक्षां पळून जा' असें शत्रूंना सांगत आहेत असें वाटूं लागलें. याप्र- माणें मार्गक्रमण करीत असतां प्रफुल्लित शुभ्र कमलांनीं ज्यांतील सरोवरें शोभमान दिसत आहेत असे अनेक प्रदेश **वत्सराजाच्या** दृ- ष्टीस पडले. जातां जातां अनेक उंचसखल प्र- देश त्याच्या पाहण्यांत आले. त्यांतील उंच-

वटे, सैन्याच्या भारानें पृथ्वीखालीं दबून जाते कीं काय अशा भ्रांतीनें शेषानें वर उचलून धरलेल्या फणांप्रमाणें ठिकठिकाणीं दिसत होते.

**वाराणसीं**तील खबर काढण्याकरितां **यौगंधरायणा**नें दूत पुढें रवाना केले होते असें पूर्वीं सांगितलेंच आहे. ते तेथें पोंचल्यावर त्यांनीं साधूंचे वेष धारण करून सर्व नगरभर फिरण्याला आरंभ केला. त्यांच्यामध्यें ढोंगधत्तुरा जाणणारा एकजण मोठा धूर्त होता तो मुख्य महंत झाला व बाकीचे त्याचे चेले बनले. नगरामध्यें भिक्षेवर निर्वाह करून त्या चेल्यांनीं हे आमचे गुरुजी त्रिकालज्ञ आहेत असें सर्वांस सांगून त्यांचें मोठें प्रस्थ माजविलें, तेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं लोकांची फारच गर्दी होऊं लागली. होतां होतां **ब्रह्मदत्त**राजाच्या पुत्रांपैकीं एकाची श्रद्धा त्या ढोंगी गुरूवर फारच बसून तो त्याचा चेला बनला. मग काय विचारितां ! गुरुजींना राज्यां-

तील सर्व गुप्त कारस्थानें त्या चेल्याच्या द्वारें समजूं लागलीं व तीं सारीं तो **यौगंधरायणाला** कळवूं लागला. **ब्रह्मदत्ताचा योगकरंडक** या नांवाचा एक प्रधान होता, तो **यौगंधरायणा**सारखाच मोठा बुद्धिमान् व धूर्त असे. **वत्सराज** आपणावर चाल करून येत आहे असें समजतांच त्यानें त्याच्या सैन्याचा नाश करण्याकरितां नानाप्रकारच्या कपटयुक्ति लढविल्या. मार्गांत लागणाऱ्या विहिरी, तलाव, इत्यादि जलाशयांत त्यानें विष कालवून ते दूषित केले. तसेंच वृक्षवल्लि, गवतकाडी इत्यादि वनस्पतींवरही विषाचा प्रयोग करून ठेविला. ज्यांच्या समागमानें उपदंशाची बाधा होईल अशा रोगग्रस्त वेश्या सैन्यांत सोडून दिल्या. कपटानें व जारणमारणादि मंत्रक्रियांनीं मनुष्यवध करणाऱ्या दुष्ट लोकांनीं रात्रंदिवस सैन्यांत मिसळून राहून त्याचा नाश करावा अशी तजवीज केली. **यौगंधरायणाला**

या सर्व कपटयुक्ति योजिल्याचें त्याच्या जासुदांच्या मार्फत समजलें होतें. त्यानें जलतृणादि कोणताही पदार्थ शुद्ध केल्यावांचून कोणीं घेऊं नये व अनोळखी स्त्रियांचा सैन्यांत प्रवेश होऊं देऊं नये याविषयीं सक्त बंदोबस्त करविला. सेनापतीच्या साह्यानें प्राणनाश करणाऱ्या दुष्ट लोकांस पकडून त्यांस ठार मारून टाकविलें. याप्रमाणें **योगकरंडकानें** योजिलेल्या साऱ्या युक्ति फसल्या असें समजतांच **ब्रह्मदत्तराजाचे** डोळे उघडले व **वत्सराजाचें** सैन्य अगदीं जवळ येऊन ठेपलेलें पाहून, एवढ्या दुर्जय आणि अफाट सैन्यासमोर आपला टिकाव लागणार नाहीं असें समजून तो फार घाबरून गेला. प्रधान **योगकरंडक** याचीही अक्कल गुंग होऊन पुढें काय करावें तें त्याला सुचेनासें झालें. शेवटीं त्या दोघांचें खलबत होऊन **वत्सराजाला** शरण गेल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी जेव्हां त्यांची खातरी झाली, तेव्हां

**ब्रह्मदत्त**राजा मोठमोठे नजराणे बरोबर घेऊन व आपले हात बांधून **वत्सराजा**ला शरण जाण्याच्या हेतूनें त्याच्या लष्करांत आला. शूर पुरुष शरणागताला कधीं मरण द्यावयाचे नाहींत. **ब्रह्मदत्त** शरण आला असें समजतांच **वत्सराजा**नें त्याचा बहुमान करून त्यास संतुष्ट केलें आणि मांडलिकाप्रमाणें त्याजपासून करभार घेण्याचें ठरवून त्याची त्याच राज्यावर स्थापना केली.

**वाराणसी**च्या राजास जिकल्यानंतर तिकडील प्रदेशांत आणखी कांहीं लहानमोठे राजे होते त्यांजवर **वत्सराजा**नें आपल्या सैन्याची चाल केली. मोठ्या जोरानें वाहणारा वायु लवचिक झाडांना कांहीं उपद्रव करीत नाहीं; पण वर डोकीं करून ताठ उभे राहणारे वृक्ष मुळासकट उपटून टाकितो त्याप्रमाणें जे जे राजे नम्र होऊन त्याला शरण आले त्यांस आपले मांडलिक बनवून जे कोणी शिरजोरपणानें त्या-

च्याशीं सामना करण्यास उभे राहिले त्यांचा त्यानें पराभव केला. याप्रमाणें एकामागून एक राजे जिंकित व देश काबीज करीत तो प्रतापशाली राजा पूर्वसमुद्राच्या तीरावर येऊन दाखल झाला. यावेळीं तो समुद्र जोरानें उसळणाऱ्या लाटांनीं अगदीं खवळून गेला होता. जणूं काय आपल्या तीरावरील **वंग**देशीय सर्व राजे पराजित झाल्यामुळें त्रस्त होऊन भयानें तो थरथरां कांपत आहे असें भासूं लागलें! **वत्सराजा**नें कांहीं दिवस तेथें वास करून त्या समुद्राच्या किनाऱ्यावर आपल्या विजयाचा सूचक असा एक उंच ध्वजस्तंभ उभा केला. जणूं काय पाताललोक त्यानें जिंकूं नये हें मागणें मागण्याकरितां स्वतः नागराज **वासुकी**च तेथें येऊन उभा राहिला आहे अशी तो स्तंभ पाहून प्रेक्षकजनांस भ्रांति झाली! पुढें त्यानें **कलिंग**देशच्या राजावर स्वारी केली. तो **वत्सराजा**चा

पराक्रम व कीर्ति ऐकून अगोदरच घाबरला होता, यामुळें तो जवळ येऊन ठेपला असें समजतांच करभार घेऊन तो त्याला शरण आला. नंतर **महेंद्र** पर्वत आणि **विंध्यकूट** पर्वत यांच्या दऱ्याखोऱ्यांतील किरकोळ राजांचा पराजय करून त्यानें आपलें सैन्य दक्षिण दिशेकडे चालविलें. शरत्काल प्राप्त झाला असतां पर्वतशिखरांचा आश्रय करून राहणारे मेघ जसे निस्सत्व होऊन गर्जनारहित होतात तसे **वत्सराजाच्या** सैन्याची धाड तिकडील डोंगराळ प्रदेशांत राज्य करणाऱ्या राजांवर पडतांच ते बिचारे निस्सत्व व निस्तेज होऊन मुकाट्यानें त्याला शरण आले. पुढें **कावेरी** नदी उतरून त्यानें **चोलक** देशांत प्रवेश केला. ती नदी उतरतांना त्याच्या सैन्याच्या संमर्दानें तिचें पाणी अगदीं गढूळ होऊन गेलें. व त्याबरोबरच, त्या **चोलकेश्वराचा** पराजय झाल्यामुळें त्याचा की-

तिचंद्रही मलीन झाला! पुढें जातां जातां त्याला **मुरल** देश लागला. तेथील राजे बरेच शिरजोर होते; पण **वत्सराजानें** त्यांचा हां हां ह्मणतां पराजय करून व त्यांच्या डोक्यांवर करभार लादून त्यांस खालीं वांकावयास लाविलें. त्याबरोबरच पतींचा अपमान झाल्यामुळें दुःखानें उरस्थळें बडवून घेणाऱ्या त्यांच्या स्त्रियांचे उन्नत स्तनही खालीं पाहावयास लागले! तेथून स्वारी निघाली ती **सप्तगोदावरी**च्या तीरावर येऊन दाखल झाली. सात प्रवाहांनीं समुद्रास जाऊन मिळणाऱ्या त्या नदीचें स्वच्छ उदक त्याच्या हत्तींनीं यथेच्छ प्राशन केल्यावर व तिकडील सर्व प्रदेश जिंकल्यावर कुच दरकुच करीत तो **नर्मदा**तीराच्या प्रदेशांत शिरला, व ती नदी ओलांडून **उज्जयनी**जवळ येऊन दाखल झाला. तेथील राजा **चंडमहासेन** त्याचा सासरा हा तो आल्याची बातमी समजतांच त्याला सामोरा गेला व

त्यानें त्याला मोठ्या सन्मानानें राजधानींत नेलें. मार्गानें जातांना, ज्यांच्या वेण्यांमधून फुलें खालीं गळत असल्यामुळें ज्या द्विगुणित शोभायमान दिसत होत्या अशा नागरिक स्त्रियांच्या नेत्रकटाक्षांची एकसारखी वृष्टि त्याच्यावर होत होती. अशा थाटानें दोघी राण्यांसहवर्तमान **वत्सराजानें** श्वशुरगृहांत प्रवेश केला. सासुरवाडीस कांहीं दिवस विश्रांति घेत असतां **चंडमहासेनानें** त्याची इतकी उत्तम प्रकारें बरदास्त ठेविली कीं, तिच्या योगानें त्याला त्याच्या घरच्या अत्यंत प्रिय अशा सुखोपभोगांचा त्या काळीं विसर पडला. लग्न झाल्यापासून **वासवदत्तेचें** माहेरीं जाणें काय तें याच वेळीं झालें; यामुळें आईबापांच्या भेटीनें तिला फारच आनंद झाला; तथापि बालपणीं पितृगृहीं असल्या वेळीं जें तिला सुख होत होतें त्याला ती आतां अंतरल्यामुळें तिला कांहींसें वाईटही वाटलें. **चंडमहासेनाला वासवदत्तेच्या** भेटीनें जर

आनंद झाला तसा **पद्मावतीच्या** भेटीनेंही झाला.

कांहीं दिवस **उज्जयनीमध्यें** मुक्काम करून सासऱ्यानें केलेल्या आदरसत्कारानें संतुष्ट होत्साता **वत्सराज पश्चिम दिशेचा** विजय करण्याकरितां तेथून निघाला. निघतांना **चंडमहासेनानें** आणखी बरेंच सैन्य त्याच्या मदतीस दिलें, तें बरोबर घेऊन त्यानें प्रथम **लाट** देशावर स्वारी केली. प्रतापाग्नीची केवळ ज्योतच अशी त्याची खड्गलता जेव्हां त्या देशांत चमकूं लागली तेव्हां आपल्या पतींची आतां धडगत दिसत नाहीं असें जाणून तेथील स्त्रिया ढळढळां रडूं लागल्या व त्या ज्योतीच्या धुरानें त्यांच्या दृष्टि अगदीं मंदावून गेल्या. तेथील **मंदराचलावरील** वृक्ष त्याच्या सैन्यांतील हत्तींनीं जेव्हां हालवून सोडिले तेव्हां समुद्राचें पुनः [1]मंथन कर-

---

१ **मंदराचलाचा** मंथा व नागराज **वासुकि** याची 'री करून पूर्वीं एक वेळ देवदैत्यांनीं समुद्राचें मथन केलें ' अशी पुराणांत कथा आहे.

ण्याकरितां हा राजा मला उपटून नेणार कीं काय असें समजूनच जणूं काय भयानें तो थराथरां कांपूं लागला असें वाटूं लागलें! सूर्य पूर्वेस उगवतो असा नित्यक्रम आहे पण **वत्सराजा**चा प्रताप पाहून हा कोणी तरी असह्य तेजाचा प्रतिसूर्यच पश्चिमेकडे उदय पावला आहे असें तेथील लोकांस वाटूं लागलें. असो. याप्रमाणें **लाट** देश जिंकून आपल्या अफाट सैन्यासह **वत्सराज, कुबेराच्या अलकावती**नामक नगरीच्या योगानें व शुभ्र **कैलास** पर्वताच्या वास्तव्यानें अत्यंत रमणीय आणि भाग्यशाली अशी जी **उत्तर** दिशा तिकडे संचार करूं लागला. तिकडील **सिंधु** देशाच्या राजाचा पराभव करून त्याचें पुष्कळ हरिसैन्य[1] त्यानें आपल्याबरोबर घेतलें व त्याच्या मदतीनें, **श्रीरामचंद्रानें** हरिसैन्याच्या साह्यानें राक्षसांचा जसा

---

१ हरि हा शब्द घोडा आणि वानर यांचा वाचक आहे. यावरून हरिसैन्य म्हणजे घोडेस्वार आणि वानरसेना असा अर्थ होतो.

विध्वंस केला तसा तिकडील सर्व म्लेच्छांचा त्यानें फडशा उडविला. पुढें जातां जातां **तुर्क** देश लागला. तेथील घोडेस्वार, **वत्सराजा**चें सैन्य पाहून खवळलेल्या समुद्राच्या लाटांप्रमाणें चवताळून त्याच्या अंगावर आले; पण त्या सैन्यांतील हत्तींच्या गंडस्थळांचे ठोंसे खाण्याचा जेव्हां त्यांच्यावर प्रसंग आला तेव्हां त्यांच्या अगदीं चिंधड्या उडून गेल्या. पुढें त्यानें **पारसिक** देशच्या राजावर स्वारी केली, व भगवान् **श्रीविष्णू**नें समुद्रमथनाच्या प्रसंगीं आपल्या चक्रानें **राहु**नामक दुष्ट दैत्याचें मस्तक जसें छेदिलें तसें **वत्सराजा**नें तेथील राजाचे हात बांधून त्याचें शिर धडापासून वेगळें केलें आणि तो देश आपल्या राज्यांत सामील केला. याप्रमाणें त्या दिशेकडील सर्व म्लेच्छराजांचा पराभव केल्यामुळें, **हिमालय** पर्वतांत संचार करणाऱ्या **भागीरथी**-प्रमाणें त्याची कीर्ति सर्व दिगंतभर पसरली. नं-

तर तेथून स्वारी निघाली ती **कामरूप**नामक देशांत आली. बलवानांशीं स्पर्धा करूं नये हें तत्त्व जाणणारा तेथील राजा आपल्या छत्रचामरादि राजचिन्हांचा त्याग करून निर्वीर्य होत्साता मोठ्या नम्रतेनें **वत्सराजाला** शरण आला, व त्यानें पुष्कळ हत्ती त्याला नजर केले. चालणाऱ्या पर्वतांप्रमाणें ते धिप्पाड हत्ती ग्रहण करून त्यानें मांडलिक राजाप्रमाणें त्याची तेथील राज्यावर स्थापना केली.

याप्रमाणें सर्व पृथ्वी जिंकून व सर्व राजांवर आपला दरारा ठेवून **पद्मावती**चा पिता मगधेश्वर **प्रद्योत** याच्या भेटीसाठीं तो निघाला. मार्गानें त्याचें सैन्य आनंदानें जयघोष करीत व भयानें शत्रूंची गाळण करीत चाललें असतां पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यांतून निघणाऱ्या त्या जयघोषाच्या प्रतिध्वनीशिवाय दुसरा कोणीही त्याला प्रत्युत्तर देण्यास समर्थ झाला नाहीं. **मगध** दे-

शाची राजधानी **पाटलीपुत्र** नगर येथें पोंचल्यावर **प्रद्योत** राजानें सामोरें जाऊन मोठ्या उत्सवानें आपल्या विजयी जामातास राजवाड्यांत नेलें. **वासवदत्ता** आणि **पद्मावती,** या दोघी राण्या त्याच्या बरोबरच होत्या. त्यांच्या सान्निध्यानें, रात्र आणि चांदणें यांच्या संयोगानें कामदेव जसा संतुष्ट होतो तसें त्याच्या मनास अत्यंत समाधान वाटलें. राजवाड्यांत गेल्यावर त्याच्या सन्मानार्थ **प्रद्योत** राजानें मोठा उत्सव केला. **वासवदत्ता** पूर्वी त्याच्या घरीं गुप्त वेषानें जाऊन राहिली होती व तिच्या खऱ्या स्थितीची त्याला त्या वेळीं माहिती नव्हती; यामुळें तिच्या योग्यतेस उचित असा सत्कार त्याच्या हातून झाला नव्हता. सांप्रत **वत्सराजा**ची पट्टराणी या नात्यानें ती आलेली पाहून त्यानें तिचा योग्य सत्कार केला, व **पद्मावती**वर तिचें निस्सीम प्रेम आहे असें प्रत्यक्ष पाहून तिच्या-

विषयीं त्याच्या मनांत अधिक पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. केवळ **मगधेश्वरानेंच वत्सराजाचें** आदरातिथ्य केलें असें नाहीं. नगरवासी सर्व लोकांचीं मनें त्याच्यावर अनुरक्त असल्यामुळें त्यांनींही घरोघर मोठा उत्सव करून त्याच्या आगमनानें झालेला आनंद प्रदर्शित केला. नंतर थोडे दिवस तेथें मुक्काम करून तो जयशाली राजा समुद्रतुल्य अफाट सैन्यानें भूपृष्ठ व्याप्त करीत स्वकीय राज्यांतील प्रांत जो **लावाणक** त्यांत येऊन दाखल झाला.

दिग्विजयाच्या कामामध्यें मोहिमेवर मोहीम करतां करतां **वत्सराजाच्या** सैन्यांतील लोक फार थकून गेले होते; ह्मणून त्यांना थोडे दिवस विश्रांति मिळावी, यासाठीं त्यानें **लावाणकांत** सैन्याचा तळ देऊन सर्व लोकांस स्वच्छंदानें वागण्याची मोकळीक दिली. एके दिवशीं **यौगंधरायणाला** एकांतीं भेटीस बोलावून तो त्याला

ह्मणाला, "प्रधानजी, तुमच्या सल्लामसलतीनें वागून पृथ्वीवरील सर्व राजे म्यां जिंकिले आहेत व सामदानादि उपायांनीं म्यां त्यांस वश करून घेतलें आहे. या दिग्विजयाचें श्रेय वास्तविक ह्मटलें ह्मणजे तुमचें आहे. हे अनुकूल करून घेतलेले राजे आतां माझ्या मर्जीबाहेर वागतील असें मला वाटत नाहीं; पण **काशी**चा राजा **ब्रह्मदत्त** याचा मला विश्वास येत नाहीं. तो मोठा कपटी व खोल कारस्थानें करणारा असल्यामुळें केव्हां आपणावर उलटून पडेल याचा नेम नाहीं. कुटिल पुरुषांचें वर्तन नळींत घातलेल्या कुत्र्याच्या शेंपटाप्रमाणें नेहमीं असतें. जोंपर्यंत तें शेंपूट नळींत आहे तोंपर्यंत सरळ असतें व नळीचा प्रतिबंध नाहींसा झाला कीं पुनः पूर्ववत् वांकडें होतें. तसाच प्रकार या **ब्रह्मदत्ता**विषयीं मला वाटतो. या बेट्याचा, कांहीं तरी उपाय योजून तो पुनः वर डोकें न करील असा पक्का बंदोबस्त

केला पाहिजे." हें भाषण ऐकून **यौगंधरायण** ह्मणाला, "महाराज, आपण ह्मणतां तसें वर्तन करावयाची त्याची छाती होईल असें मला तर वाटत नाहीं; कारण आपण त्याच्यावर स्वारी करतांच तो होऊन आपणांस शरण आला आहे, व आपणही त्याचा सन्मान करून त्याला त्याच्या राज्यपदावर कायम केलें आहे; तेव्हां आपणावर उपकार करणाराला अपकार करण्याइतका तो मूर्ख व कृतघ्न असेल असें मला वाटत नाहीं. जाणूनबुजून सर्पाच्या शेंपटावर पाय देण्याचें धाडस कोण करील? इतकेंही असून 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' या ह्मणीप्रमाणें त्याला कदाचित् वाईट बुद्धि झालीच तर तिच्या योगानें आपणांस कांहीं अपाय न होतां उलट त्याचाच नाश होईल, याविषयीं तिळमात्रही संशय धरावयास नको." याप्रमाणें सांगून, विनाकारण दुसऱ्याचा नाश करण्यास जर कोणी प्रवृत्त झाला तर त्या-

योगानें त्याचाच नाश होतो हा जगांतील सामान्य नियम उदाहरणद्वारा स्पष्ट करण्याकरितां त्यानें राजाला **आदित्यप्रभ** या नांवाचा एक राजा आणि **फलभूति** या नांवाचा एक ब्राह्मण यांची एक मार्मिक कथा सांगितली. नंतर **यौगंधरायण** पुनः राजाला ह्मणाला, "महाराज, **ब्रह्मदत्ता**ला जरी आपण जिंकिलें आहे तरी त्याचें आपल्या हातून कल्याणच झालें आहे; तस्मात् तो आपल्यावर शस्त्र धरील असें कधीं व्हावयाचें नाहीं. कदाचित् धरलेंच तर त्याची रग जिरविण्यास आपणांस कितीसा उशीर लागणार आहे?" हें प्रधानाचें भाषण ऐकून **वत्सराजा**चें समाधान झालें आणि तो आपलें नित्यकर्म करण्यासाठीं उठून गेला.

दुसऱ्या दिवशीं, ज्यानें सकल पृथ्वी आपल्या पराक्रमानें जिंकिली आहे अशा त्या भाग्यशाली राजानें **लावाणक** प्रांत सोडून आपल्या

राजधानीस जाण्याचा निश्चय केला. सर्व सैन्य व परिवार यांसह त्याची स्वारी निघाली ती कुच दरकुच करीत **कौशांबीस** येऊन दाखल झाली. आपला राजा दिग्विजय करून परत नगरास येत आहे अशी बातमी समजतांच नागरिक जनांनीं त्याच्या सन्मानार्थ व त्याच्या आगमनानें झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां आपापल्या घरीं मोठा मंगलोत्सव सुरू केला. जिकडे तिकडे उभारलेल्या ध्वजपताका वाऱ्यानें डोलत असल्यामुळें **कौशांबी** नगरी आपला पति बहुत दिवसांनीं घरीं आला ह्मणूनच कीं काय आपले हात वर करून आनंदानें नाचत आहे अशी दिसूं लागली. या समयीं राजानें केवळ नगरांतच प्रवेश केला असें नाहीं, तर त्याच्याकडे सर्व नागरिक स्त्रियांची एकसारखी नजर लागून राहिली असल्यामुळें नेत्रकमलांच्या वनांतही त्यानें प्रवेश केला. व तेणेंकरून तीं कमलें जणूं काय

वाऱ्यानें हालत आहेत असा भास होऊं लागला. मार्गानें स्वारी चालली असतां चारणगण त्याच्या यशाचे पोवाडे गात होते व बंदीजन त्याचीं स्तुति करीत होते. राजवाड्याजवळ स्वारी पोंचतांच सर्व मांडलिक राजे व सरदारमंडळी यांनीं आपलीं मस्तकें वांकवून मोठ्या नम्रतेनें त्याला मुजरे केले. अशा समारंभानें उभयतां राण्यांसहवर्तमान **वत्सराजा**ची स्वारी राजवाड्यांत प्रवेश करिती झाली.

दुसऱ्या दिवशीं **वत्सराजा**नें मोठा दरबार भरविला व त्यामध्यें त्याच्या पूर्वजांचें जें रत्नखचित सिंहासन त्याला सांपडलें होतें त्यावर मोठ्या समारंभानें त्यानें आरोहण केलें. नंतर दिग्विजय करीत असतां जे राजे शरण येऊन त्याच्या बरोबर आले होते त्यांस त्यांचीं राज्यें अर्पण करून त्यांची त्यानें व्यवस्था लाविली व त्यांचा बहुमान करून त्यांस आपापल्या स्थानीं जाण्या-

विषयीं निरोप दिले. या समारंभांत **वत्सराजानें** अतोनात दानधर्म केला. सकल पृथ्वी जिंकून आणिलेले द्रव्याचा यत्किंचित्‌ही लोभ न धरितां तें त्यानें गोरगरीब, ब्राह्मण, अतिथि, अभ्यागत इत्यादिकांना देऊन सर्वांस संतुष्ट केलें. त्याप्रमाणेंच मांडलिक राजे, वडेवडे सरदार व मंत्रीमंडळी यांसही त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मोठमोठीं इनामें व जहागिरी देऊन त्यांचा सन्मान केला. हा समारंभ चालला असतां अनेक प्रकारचीं मंगलवाद्यें वाजत होतीं. त्यांचा प्रतिध्वनि सर्व आकाशमंडळांत भरून असें भासूं लागलें कीं हा प्रतिध्वनि नव्हे, तर चारी दिशांकडील लोकपाल संतुष्ट होत्साते जयजयकार करून राजाची स्तुति करीत आहेत! असो. याप्रमाणें दिग्विजयाची धामधूम व त्याच्या सांगतेचा समारंभ समाप्त होऊन जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यानंतर हा भाग्यशाली राजा, प्रधान **यौगंधरायण** व सेना-

पति **रुमण्वान्** या उभयतांवर संपूर्ण राज्यभार टाकून आपण **वासवदत्ता** आणि **पद्मावती** यांसह स्वस्थ विश्रांति घेत वसला. आपल्या धवल यशाप्रमाणें शुभ्र अशा चांदण्याच्या रात्रीं एक साक्षात् **कीर्ति** आणि दुसरी **विजयलक्ष्मी** याप्रमाणें शोभणाऱ्या त्या दोघी राण्यांस दोहों बाजूंस बसवून शत्रूच्या प्रतापाप्रमाणें उन्माद करणारें मद्य प्राशन करीत व त्यांच्या समागमें नानाप्रकारचे विलासभोग भोगीत तो मोठ्या आनंदांत काळ घालवूं लागला.

वर वर्णन केल्याप्रमाणें हा भाग्यशाली राजा सर्व पृथ्वी जिंकून एकछत्री राज्याचा उपभोग घेत **कौशांबींत** येऊन राहिल्यावर त्याचा बहुतेक काळ **वासवदत्ता** आणि **पद्मावती** यांच्या सहवासानें ऐषआरामांत जात असे. **यौगंधरायण** आणि **रुमण्वान्** यांसारखे हुशार आणि कार्यदक्ष मंत्रि राज्यशकट हांकण्याच्या कामांत अत्यंत

निष्णात असल्यामुळें त्याला राज्यकारभाराची मुळींच काळजी राहिली नाहीं. खुषमस्कऱ्या **वसंतक** हा नेहमीं त्याच्या जवळच असे. तो मजेदार गोष्टी सांगून राजा व राण्या यांचें मनोरंजन करीत असे. केव्हां केव्हां **वासवदत्ता** व **पद्मावती** यांस गावयास व नृत्य करावयास लावून हा चैनी राजा आपण स्वतः वीणा वाजवीत त्या संगीत क्रीडेंत दंग होऊन जाई. **वासवदत्ते**चा मंजुल कंठरव राजाच्या त्या **घोषवती** वीणेच्या मधुर स्वरांत इतका मिळून जाई कीं, दोहोंतील भेद ऐकणाराच्या लक्षांत बिलकूल येत नसे. राजाचीं बोटें हालत यावरून मात्र तो विण्याच्या तारा छेडीत आहे असें समजे. स्वच्छ चांदण्या रात्रीं राजवाड्याच्या गच्चीवर बसून विलास करीत असतां वारांगना सुवर्णाच्या कलशांमध्यें उत्तम मद्य आणून त्याला पाजीत असत, जणूं काय साक्षात् मदनाला राज्याभिषेक करण्याकरितां त्या तें पवित्र

गंगाजल आणून देत आहेत! **वासवदत्ता** आणि **पद्मावती** या दोघींच्या मनांत परस्परांविषयीं हेवा किंवा राग याचा कधीं लवलेशही वागत नसे; तथापि मद्यप्राशनानें त्यांच्या भोंवया वक्र होऊन नेत्र लाल होऊन जात, यामुळें एकमेकींच्या हेव्यानें त्या राजावर रागावल्या आहेत अशी प्रेक्षकांस भ्रांति होई; परंतु खरोखर प्रकार तसा नव्हता. उलट राजाला त्यांच्या त्या चंचल मुद्रा पाहून मोठी गम्मत वाटे. सूर्योदयीं कोमल आणि आरक्त किरणांनीं कमलवन जसें शोभतें त्याप्रमाणें स्फटिकाचे प्याले मद्य भरून जिकडे तिकडे ठेविले असल्यामुळें त्यांची मद्य प्राशन करण्याची जागा शोभमान दिसत असे.

पूर्वोक्त विलासांचा कंटाळा आला ह्मणजे हा हौशी राजा पारधी लोक बरोबर घेऊन, हातांत धनुष्य, पाठीवर बाणांचा भाता व अंगांत चिलखत, अशा थाटानें मृगया करण्याकरितां अ-

रण्यांत जाई. एके दिवशीं तो वर सांगितल्याप्रमाणें तयारी करून, श्वापदांची शिकार जेथें पुष्कळ मिळेल अशा एका अरण्यांत गेला. तेथें चिखलांत लोळल्यामुळें काळेकभिन्न असे रानडुकरांचे कळप त्याला आढळले. त्यांना पहातांच सूर्य आपल्या दाट किरणांनीं अंधकाराचा जसा नाश करतो त्याप्रमाणें त्यांचा त्यानें प्रखर बाणांच्या प्रहारांनीं फडशा उडविला. पुढें संचार करतां करतां कृष्णसार मृगांचे कळप त्याला आढळले. ते या शस्त्रधारी राजाला पाहून भयभीत होत्साते सर्व रानभर पळत असतां पूर्वी जिंकलेल्या दिग्वधूंचे जणूं काय हे नेत्रकटाक्षच आहेत असा त्याला भास झाला. मोठमोठे गवे व रानटोणगे यांच्या कळपांचे कळप त्याच्या बाणांच्या तडाक्यांनीं गतप्राण होऊन त्यांच्या शरीरांतून वाहणाऱ्या रक्तानें तो प्रदेश तांबडा लाल झाला, तो पाहून असा भास होऊं लागला

कीं तें रक्तकमलांचें वनच त्या हिंस्र पशूंच्या शृंगाघातापासून मुक्त झाल्यामुळें आनंदित होत्सातें राजाची सेवा करण्यासाठींच जणूं काय तेथें प्राप्त झालें आहे ! सिंहव्याघ्रादि भयंकर जनावरें जबडे पसरून त्याच्या अंगावर चवताळून येत, त्या वेळीं यत्किंचित्‌ही न भितां तो त्याच्या वशांत जोरानें भाला खुपसून त्यांस तेथल्या तेथेंच जमीनदोस्त करी, तेव्हां ते ज्या किंकाळ्या फोडीत त्यांबरोबरच त्यांचे प्राण निघून जात, हें पाहून राजाला मोठा आनंद होई. असो. याप्रमाणें नित्यशः शिकार करण्याच्या नादांत राजा अगदीं दंग झाला असतां एके दिवशीं **नारद** ऋषि त्या ठिकाणीं त्याला येऊन भेटले. सूर्याप्रमाणें देदीप्यमान असून आपल्या अंगकांतीनें सर्व आकाशमंडल प्रकाशित करणारा तो ब्रह्मर्षि अकस्मात्‌ आलेला पाहून राजानें त्यास साष्टांग नमस्कार केला व बसावयास आसन देऊन य-

थाविधि पूजन केलें; तेणेंकरून संतुष्ट होत्साते **नारद** ऋषि त्याला ह्मणाले, “राजा, तू आलीकडेस राज्यकारभार पाहाण्याचें सोडून या मृगयेच्या नादास फार लागला आहेस असें मला समजलें, तेंव्हांपासून तुझ्याविषयीं मी फार काळजी करीत आहें. तुझे पूर्वज जसे मला प्रिय होते तसा तूही आहेस, ह्मणून वेळींच तुला बोध करून सावध करावें, यासाठीं मी एथें आलों आहें. **पांडु** राजा या नांवाचा तुझा एक महा पराक्रमी पूर्वज होऊन गेला. त्याला तुझ्यासारखेंच मृगयेचें व्यसन जडलें होतें, व शेवटीं त्याच्याच पायीं तो प्राणास मुकला. ती कथा,[१] राजा, तुला थोडक्यांत सांगतों. लक्ष लावून ऐकून घे. त्या तुझ्या पूर्वजाला तुझ्यासारख्याच **कुंती** आणि **माद्री** या नांवाच्या दोन भार्या

---

१ ह्या कथेचें महाभारतांत सविस्तर वर्णन केलेलें आहे.

होत्या. तुझ्याप्रमाणेंच त्यानेंही समुद्रवलयांकित पृथ्वी जिंकल्यावर त्याला मृगयेचें व्यसन लागलें. एके दिवशीं तो अरण्यामध्यें मृगया करण्याकरितां गेला असतां तेथें एक मृग आपल्या मादीबरोबर सुरतक्रीडेंत रममाण झालेला त्याच्या दृष्टीस पडला. राजा मृगयेच्या नादानें वेडा झालाच होता. त्यानें कांहीं विचार न करितां त्या जोडप्यावर जो एक तीक्ष्ण बाण सोडिला त्याच्या तडाक्यानें तें गतप्राण होऊन खालीं पडलें ! हा मृग कोण ह्मणशील तर **किंदम** या नांवाचा तो एक ऋषि होता. तो मृगरूप धरून आपल्या भार्येचा संभोग करीत असतां **पांडु** राजानें त्याचा वध केला, तेव्हां प्राणोत्क्रमणाच्या वेळीं त्या ऋषीनें कोपाविष्ट होऊन त्याला शाप दिला कीं, ज्याअर्थीं, माझा कांहींएक अपराध नसतां केवळ अविचारानें तू माझा वध केला आहे, त्याअर्थीं माझ्याप्रमाणेंच तुलाही स्त्रीसंभोगकालीं

मृत्यु येईल. आपल्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल **पांडु** राजास फार वाईट वाटलें, व मृत्यूच्या भीतीनें त्यानें राज्य व सर्व भोगेच्छा यांचा त्याग करून उभयतां स्त्रियांसहवर्तमान शांत अशा तपोवनाचा आश्रय केला. तेथें गेला तरी तो ब्रह्मशाप त्याच्यामागें लागलाच होता. तो कशानें टळणार? विनाशकाल आला ह्मणजे विपरीत बुद्धि व्हावयाचीच. त्याप्रमाणें त्याला दुर्बुद्धि होऊन तो एके दिवशीं कनिष्ठ स्त्री **माद्री** इच्याशीं रममाण झाला तों तत्काल मरण पावला! तस्मात् तुला सांगतों, राजेलोकांनीं मृगयेच्या नादास लागणें हा त्यांच्या हातून मोठा प्रमाद घडतो. या मृगयारूपिणी क्रूर आणि भयंकर राक्षसीनें आजपर्यंत हजारों राजांचे बळी घेतले आहेत. तस्मात् ज्या व्यसनापासून कोणत्याही प्रकारचें हित नसून व्यर्थ आयास मात्र होतात व अंतीं प्राणनाश होण्याचीही भीति

असते तें व्यसन तू सोडून दे; कारण यापासून कोणाचेंही कधीं कल्याण झालें नाहीं. ह्या व्यसनापासून तुला सोडविण्याचें दुसरें एक कारण आहे, तें असें कीं, तुझी राणी **वासवदत्ता** इच्या पोटीं तुझ्यापासून साक्षात् कामदेवाचा अंशभूत असा एक महापराक्रमी पुत्र निर्माण होणार आहे; यासाठीं तू आपल्या जिवाला फार जपत जा. यांतच तुझें कल्याण आहे. हा पुत्रजन्म कसा होणार याविषयीं तुला पूर्वीचा वृत्तांत सांगतों. पूर्वीं **शंकरांनीं मदनाला** जाळून टाकिलें त्या वेळीं मदनस्त्री **रति** इणें आपल्या पतीला पुनर्जन्म व्हावा ह्मणून **शंकरांची** आराधना केली, तेव्हां संतुष्ट होऊन त्यानें तिला असा वर दिला कीं, माझी स्त्री **पार्वती** पुत्रकामिनी आहे, यासाठीं ती मृत्युलोकीं अवतीर्ण होऊन तिच्या पोटीं तुझा पति मदन पुत्ररूपानें उत्पन्न होईल. या वराप्रमाणें पार्वती **वासव-**

**दत्तेच्या** रूपानें **उज्जयनीचा** राजा **चंडमहा-सेन** याची कन्या होऊन तुझी पट्टराणी झाली आहे व तिच्या पोटीं साक्षात् **रतिपति मदन** उत्पन्न होऊन तो सकल विद्याधरांचा चक्रवर्ती राजा होणार आहे; यासाठीं तू निरंतर **शंक-रांची** आराधना करीत जा." हा **नारदानें** के-लेला बोध **वत्सराजाच्या** मनांत चांगला ठसला, व आजपासून मी मृगयेचा नाद सोडून देतों असें त्यानें कबूल केलें. **नारद** ऋषि संतुष्ट होऊन राजाचा निरोप घेऊन तेथून निघून गेले. राजाही मृगयेचा नाद सोडून आपल्या राजधा-नीस परत आला.

समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य हातीं आ-ल्यामुळें **वत्सराजाचें** ऐश्वर्य या वेळीं अत्युच्च शिखरास जाऊन पोंचलें होतें. एका गोष्टीची मात्र त्याला उणीव होती. पोटीं पुत्रसंतान न-सल्यामुळें सारें ऐश्वर्य व्यर्थ आहे असें त्याला

वाटत होतें. **नारद** ऋषींनीं सांगितल्याप्रमाणें आपणास पुत्ररत्नाचा लाभ होईल अशी त्याला बळकट आशा होती, ती पूर्ण कधीं होते याची तो वाट पाहात होता. **वासवदत्ते**लाही पुत्राचें मुख कधीं पाहीन असें झालें होतें. कोणी पुत्रवती स्त्रिया पाहिल्या ह्मणजे आपण निपुत्रिक आहों असें समजून तिला फार खेद वाटे, तेव्हां जवळचीं माणसें, तुला **नारदा**च्या आशीर्वादानें व **शंकरां**च्या प्रसादानें लवकरच पुत्र होईल, काळजी करूं नको, असें सांगून तिचें समाधान करीत. **वत्सराज**ही तिला वारंवार सांगे कीं, तू **शंकरां**चें आराधन कर ह्मणजे **नारदा**च्या आशीर्वादाप्रमाणें तुला लवकरच पुत्रलाभ होईल. पतीच्या सांगण्याप्रमाणें तिनें **शंकरां**ची आराधना करण्यास आरंभ केला, व तिच्या बरोबर राजाही व्रतस्थ होऊन बसला. तीं उभयतां अनुष्ठान करीत बसलीं आहेत असें

पाहून **यौगंधरायणादि** प्रधान व नगरांतील सर्व लोक **शंकरांची** आराधना करूं लागले. याप्रमाणें सर्व नगरभर जिकडे तिकडे अनुष्ठानांची गर्दी उडाली. राजा व राणी यांनीं तीन दिवस खडखडीत उपोषणें केलीं. तिसऱ्या दिवशीं पाहांटेस त्यांचा किंचित् डोळा लागला असतां साक्षात् **शंकर** संतुष्ट होत्साते त्यांच्या स्वप्नांत येऊन ह्मणाले, "राजा, हें तुमचें अनुष्ठान आतां समाप्त करा. तुमची दोघांची भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहें व माझ्या प्रसादानें **कामदेवा**चा अंशभूत व सकल विद्याधरांचा राजा असा पुत्र तुह्मांस लवकरच होईल." याप्रमाणें दृष्टांत देऊन **शंकर** अंतर्धान पावले. लगेच राजा व राणी उभयतां जागीं झालीं आणि तो स्वप्नांतील दृष्टांत त्यांनीं प्रधान व इतर जन यांस कळविला. तेव्हां जिकडे तिकडे आनंदच आनंद होऊन मोठे उत्सव सुरू झाले. राजानें

त्या व्रताची सांगता मोठ्या थाटानें करून सर्व लोकांस विपुल द्रव्य देऊन संतुष्ट केलें.

पुढें थोड्याच दिवसांनीं एके दिवशीं राणी **वासवदत्ता** आपल्या मंदिरांत निद्रित असतां तिला असें स्वप्न पडलें कीं, कोणी एक जटा धारण केलेला व सर्वांगास भस्म चर्चिलेला असा भव्य पुरुष आपल्यापुढें येऊन उभा राहिला आहे व त्यानें एक फळ आपल्या हातांत देऊन, 'मुली, तू हें फळ भक्षण कर ह्मणजे तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील.' असें सांगून तो तेथल्या तेथें अदृश्य झाला. दुसरे दिवशीं सकाळीं जागी झाल्यावर तिनें तो स्वप्नवृत्तांत राजाला व प्रधानादि मंडळीस कळविला; तेव्हां साक्षात् **शंकरांनीं**च हें फळ दिलें असावें व यावरून पुत्रप्राप्ति लवकर होणार हें खचीत आहे असें समजून सर्वांना अत्यंत हर्ष झाला. **वासवदत्तेनें शंकरांनीं** दिलेलें फळ भक्षण करतांच साक्षात् **कामदेवा**चा

अंश असा तेजस्वी गर्भ तिच्या उदरांत झाला. त्यामुळें पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें ति मुखचंद्र शोभमान दिसूं लागला. तिच्या नेत्रांत पहिल्यापेक्षां विशेष चंचलता आली व मुखावर पांढुरकी दिसूं लागली. हीं चिन्हें पाहू वत्सराजाचें ह्रदय आनंदानें भरून गेलें. तिच्याबरोबर प्रेमळ सख्यांचा समुदाय निरंतर बसत असे; त्यामुळें पुढें अवतीर्ण होणाऱ्या विद्याधरपतीची सेवा करून त्याला इष्ट फल देण्यासाठीं त्या मूर्तिमती विद्याच तेथें प्राप्त झाल्या आहेत असें वाटे. ज्यांचीं अग्रें नील पल्लवाच्या कांतीप्रमाणें श्यामवर्ण झालीं आहेत असे तिचे पयोधर, गर्भस्थपुत्राला राज्याभिषेक करण्याकरितां आणिलेले जलपूरित कलशाच कीं काय असे शोभूं लागले. जसजसा तिचा गर्भ वाढूं लागला तसतसे तिला डोहळे होऊं लागले. डोहळ्यांवरून पुढें होणाऱ्या बालकाचें शुभाशुभ

समजत असतें. **वासवदत्तेच्या** पोटीं . पराक्रमी व मंत्रसामर्थ्यानें विद्याधरांचें अ- ंपत्य मिळविणारा पुत्र निर्माण व्हावयाचा ोता, ह्मणून तिचे डोहळेही तसेच शुभसूचक ोते. तिला नेहमीं विद्याधरांच्या व मांत्रिक ामर्थ्यांच्या कथा ऐकाव्या असें वाटूं लागलें. एकदां तिनें स्वप्नांत असें पाहिलें कीं, सुरस गा- यन करणाऱ्या विद्याधरांच्या स्त्रियांबरोबर विमा- नांत बसून आपण आकाशांत यथेच्छ संचार करीत आहों. नंतर जागी झाल्यावर तशीच आ- काशक्रीडा आपण करावी अशी तिला इच्छा झाली. प्रधान **यौगंधरायण** हा तिचे दोहद पुरविण्याच्या कामांत फार दक्ष असे. त्यानें मं- त्रतंत्राच्या योगानें विमान तयार करून तिची ती इच्छा पूर्ण केली. ती त्या विमानांत बसून आ- काशमंडलांत फिरत असतां नागरिक स्त्रिया व पुरुष यांना तिला पाहून मोठें कौतुक वाटलें.

एके दिवशीं तिच्या मनांत अशी इच्छा उद्भवली कीं, एकाद्या उदारधी विद्याधराची कथा आपण ऐकावी. तिनें ती इच्छा **यौगंधरायणाला** कळवितांच त्यानें सर्व मंडळी जमवून **जीमूतवाहन** या नांवाच्या एका विद्याधराची कथा[1] सांगितली. **जीमूतवाहन** हा **जीमूतकेतु** या नांवाच्या एका विद्याधरपतीचा पुत्र होता, व तो मोठा पराक्रमी असून औदार्य, भूतदया, परोपकारिता, परहिततत्परता, इत्यादि अनेक सद्गुणांनीं मंडित होता. त्याची भूतदया तर इतकी प्रबळ होती कीं, **शंखचूड** नांवाच्या एका नागाचे प्राण वांचविण्यासाठीं त्यानें आपला जीव खर्चीं घातला! **वासवदत्तेच्या** गर्भापासून विद्याध-

---

१ ही कथा मूळ ग्रंथ कथासरित्सागर यांत सविस्तर सांगितलेली आहे. **श्रीहर्षदेव** यानें संस्कृतभाषेंत **नागानंद** या नांवाचें एक सुरस नाटक रचिलेलें प्रसिद्ध आहे, त्यांतील संविधानकास याच कथेचा आधार आहे.

रांच्या राजाचीच उत्पत्ति व्हावयाची होती; तेव्हां तिला व राजाला ती कथा ऐकून किती आनंद झाला असेल हें सांगावयास नकोच. अशाच दुसऱ्या कथा **यौगंधरायण** आणि **वसंतक** हे नेहमीं **वासवदत्ते**ला सांगून तिचें मनोरंजन करीत असत, त्यामुळें गर्भभारानें अलस आणि मंद झालेल्या तिच्या प्रकृतीस हुशारी वाटत असे.

एके दिवशीं **वत्सराज** प्रधान **यौगंधराणा**सहवर्तमान एकांतांत गोष्टी करीत बसला असतां **वासवदत्ता** तेथें येऊन त्याला ह्मणाली, "प्राणनाथ, माझ्या उदरांत हा गर्भ राहिल्या दिवसापासून याचें रक्षण कसें होईल याविषयीं मी फार काळजी करीत होतें; पण काय ईश्वरी चमत्कार असेल तो असो. काल रात्रीं हीच काळजी करीत मी शय्येवर पडलें- असतां माझा डोळा लागला, इतक्यांत मला स्वप्न पडलें, त्यांत कोणी एक दिव्य पुरुष माझ्यापुढें येऊन उभा

राहिलेला मीं पाहिला. त्यानें आपल्या सर्वांगाला भस्म लाविलें होतें. त्याच्या जटा पिंगट वर्णाच्या असून त्यानें मस्तकावर चंद्र धारण केला होता, व त्याच्या हातांत त्रिशूळ होता. असा तो देदीप्यमान पुरुष प्रेमळ शब्दांनीं मला ह्मणाला, "मुली, तुझ्या या गर्भाचें रक्षण कसें होईल याविषयीं तू यत्किंचित्‌ही काळजी करूं नको. हा गर्भ माझ्या प्रसादानें तुझ्या उदरांत राहिला आहे, व याचें रक्षण करणारा मीच आहें. मी जें हें तुला सांगत आहें यावर तू भरंवसा ठेव आणि निश्चिंत राहा. माझ्या सांगण्याच्या खरेपणाचा प्रत्यय तुला पहावयाचा असेल तर उद्यां कोणी एक स्त्री आपल्या पतीचा घात करण्याच्या दुष्ट हेतूनें त्याच्यावर मिथ्या दोषारोप करून दाद मागण्याकरितां राजाकडे येईल; पण ती स्त्री लबाड व दुराचरणी आहे; तिचें भाषण खरें मानूं नका असें

तू राजाला सांग." याप्रमाणें सांगून तो पुरुष अदृश्य झाला! प्राणनाथ, या स्वप्नांत काय खरे-पणा आहे तो आपण पहावा, मला यांत कांहीं समजत नाहीं." याप्रमाणें ती बोलत आहे इत-क्यांत खरोखरच एक स्त्री आपलीं पांच पोरें ब-रोबर घेऊन व आपल्या नवऱ्याचा हात धरून त्याला फरफर ओढीत राजवाड्याच्या देवडीवर आल्याची खबर द्वारपाळकाकडून राजाला मि-ळाली, ती ऐकून सर्वांस मोठा अचंबा वाटला. नंतर त्यानें त्या स्त्रीला तिच्या पोरांसह व नव-ऱ्यासह आंत बोलावून आणवून तिची सर्व ह-कीकत ऐकून घेतली व त्याबद्दल तिच्या नवऱ्या-सही प्रश्न केले. नंतर **यौगंधरायणाच्या** स-ल्ल्यानें तिच्या फिर्यादीचा यथान्याय निकाल क-रून त्यानें तिला शिक्षा दिली आणि तिच्या नवऱ्याला इनाम देऊन मोठ्या सन्मानानें त्याला वाटेस लाविलें. **वासवदत्तेला** स्वप्नांत दिसलेल्या

पुरुषानें सांगितलेल्या या गोष्टीचा प्रत्यय येतांच तो पुरुष साक्षात् **शंकर** असावा अशी सर्वांची खातरी झाली, व गर्भाचें रक्षण करणारा मी आहें असें त्याणें सांगितलें यावरून तर आपणांस सत्पुत्रप्राप्ति खचित होणार असा त्याला पूर्ण विश्वास पटला.

दिवसानुदिवस **वासवदत्तेचा** गर्भ शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें वाढीस लागला, त्यामुळें तेजःपुंज झालेलें तिचें शरीर व मुखचंद्र यांजकडे रात्रंदिवस पहात बसलेल्या राजाच्या नेत्रांची कधींच तृप्ति होईना. त्याला ती प्रसूत केंव्हां होईल व आपणास पुत्रमुखदर्शनाचा लाभ केंव्हां होईल असें झालें होतें. याच सुमारास प्रधान **यौगंधरायण**, सेनापति **रुमण्वान्**, खुषमस्कऱ्या **वसंतक**, आणि **नित्योदित** नांवाचा राजाचा आवडता द्वारपाळ या चौघांच्या स्त्रिया प्रसूत होऊन त्यांस पुत्र झाले. हे सर्व पुत्र पुढें होणाऱ्या

कल्याणाचे सूचक असे शुभलक्षणवान् होते. त्यांचीं नावें **मरुभूति, हरिशिख, तपंतक,** आणि **गोमुख** अशीं त्यांच्या बापांनीं अनुक्रमानें ठेविलीं होतीं. आपणाला होणाऱ्या पुत्राचे हे सर्व बाळपणचें संवगडी व मोठेपणीं राज्यकारभारांतील साह्यकर्ते होतील असें जाणून **वत्सराजास** अत्यंत हर्ष झाला व त्यांच्या जन्माप्रीत्यर्थ त्याणें मोठा आनंदोत्सव केला. हा उत्सव चालला असतांना, "राजा, हे चारी पुत्र तुला होणाऱ्या चक्रवर्ती पुत्राचे प्रधान होऊन ते तुझ्या शत्रुकुलाचा नाश करतील,' अशी आकाशवाणी झाली. **वासवदत्ता** या वेळीं अगदीं प्रसूत होण्यास टेंकली होती. तिला प्रसूतिकाळीं कष्ट होऊं नयेत व त्या वेळची सर्व व्यवस्था नीट राहावी, ह्मणून पुत्रवती असून बाळंतपणाच्या कामांत हुशार अशा अनेक स्त्रिया तिच्या जवळ रात्रंदिवस राहूं लागल्या. प्रसूतिगृहाच्या खिड-

क्यांतून अर्क आणि शमी या झाडांच्या पानांच्या ताट्या हवा शुद्ध राखण्यासाठीं लाविल्या होत्या. हातांत नानाप्रकारचीं आयुधें धारण केलेल्या शूर शिपायांचा पाहारा प्रसूति गृहासभोंवती ठेविला होता. त्यांच्या त्या रत्नखचित आयुधांचें तेज इतकें झळकत होतें कीं, त्या योगानें राणीच्या तेजस्वी गर्भाचें रक्षण करण्याच्या कामांत ते डोळ्यांत तेल घालून जपत बसले आहेत असें पाहाणारांस वाटूं लागलें. प्रसंगीं उपयोग व्हावा म्हणून **यौगंधरायणा**नें हुशार वैद्य व मंत्रतंत्रादि विद्या जाणणारे लोक जवळ आणून ठेविले होते. सारांश, सुखप्रसूति होण्यासाठीं ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता होती त्या सर्वांची योग्य व्यवस्था करून ठेविली होती.

पूर्ण दिवस भरतांच शुभयोगावर **वासवदत्ता** प्रसूत झाली. स्वच्छ अमृताच्या कांतीप्रमाणें ज्याची कांति झळकत आहे अशा तेजस्वी चं-

द्राला दिग्वधू जशी प्रसवते त्याप्रमाणें **वासव-दत्तेच्या** उदरांतून सुंदर आणि मनोहर असें पुत्ररत्न निर्माण झालें. जन्मतांच त्या बालकानें आपल्या तेजानें केवळ तें प्रसूतिगृहच प्रकाशित केलें असें नाहीं; तर आपल्या मातेच्या मनांतील चिंतारूप तमाचा नाश करून तेंही आनंदवृत्तीनें प्रकाशित करून टाकिलें! राणीला प्रसूतिवेदना होऊं लागल्या हें समजल्यापासून **वत्सराज** चिंताक्रांत होऊन आपल्या महालांत बसला होता. त्याला **यौगंधरायणानें** दूत पाठवून पुत्रजन्माची शुभवार्ता कळविली, ती ऐकतांच त्याला जो आनंद झाला त्याचें वर्णन काय करावयाचें आहे! तें आनंदकारक वर्तमान सांगणाऱ्या दूताला त्याणें योग्य इनाम देऊन संतुष्ट केलें. खरोखरच या समयीं **वत्सराज** आनंदाच्या भरांत इतका गढून गेला होता कीं, त्याणें त्या दूताला आपलें सर्व राज्यहीं देऊन टाकिलें असतें; पण जशी त्याची

औदार्यबुद्धि त्या वेळीं जागृत होती तसाच पात्रापात्र विचारही त्याच्या अंगीं पूर्णपणें वसत होता; ह्मणून त्याणें तसें केलें नाहीं. राज्य दिलें नाहीं हें लोभामुळें नव्हे, तर यःकश्चित् जासुदाला राज्य देणें अनुचित होय हें जाणूनच त्याणें त्याच्या योग्यतेप्रमाणें बक्षीस देऊन त्याची संभावना केली. असो. पुष्कळ दिवसांपासून आपल्या हृदयरूप भूमींत उगवून वाढीस लागलेल्या मनोरथरूप वृक्षाला आज उत्तम फळ आलें असें ऐकून त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. पुत्राचें मुख केव्हां जाऊन पाहीन असें त्याला होऊन तो मोठ्या औत्सुक्यानें प्रसूतिगृहाकडे धांवतच गेला. तेथें तें दिव्य बालक त्याच्या दृष्टीस पडतांच तो आनंदानें नाचूं लागला. पोंवळ्याप्रमाणें लाल व किंचित् लांबट असें त्या बालकाचें अधरपुट, त्याप्रमाणेंच मस्तकावरील बारीक कांतलेल्या लोंकरीसारखे मृदु केश पाहून

त्याचें तें सुंदर मुख सम्राज्यलक्ष्मीच्या हातांतील लीलाकमलच कीं काय असें त्याला दिसूं लागलें, व त्याच्या पायांवरील छत्रचामरादि राजचिन्हें पाहून इतर राजांनीं भीतीनें आपलीं राजचिन्हें एव्हांपासूनच टाकून दिलीं कीं काय असें वाटूं लागलें. अशा त्या सुंदर, सुलक्षण आणि यशस्वी पुत्राचें मुखकमल उत्फुल्ल आणि हर्षभरित नेत्रांनीं निरखून पहात असतां राजाचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले व अशा त्या सुलक्षण पुत्राविषयीं त्याच्या मनांत अत्यंत प्रेमभाव उत्पन्न झाला. **यौगंधरायणादि** प्रधानमंडळीलाही राजाला पुत्रलाभ झाल्यामुळें अत्यंत हर्ष झाला. याप्रमाणें सर्व मंडळी आनंदांत असतां, "राजा, हा तुझा पुत्र कामदेवाचा अवतार आहे. याचें नांव तू **नरवाहनदत्त** असें ठेव. हा मोठा पराक्रमी होऊन सकल विद्याधरांचा चक्रवर्ती राजा होईल, व बहुतकालपर्यंत त्यांच्यावर राज्य क-

रील," अशी, आकाशवाणी झाली. तिच्या मागून लागलीच आकाशांतून पुष्पवृष्टि होण्यास आरंभ झाला, व दुंदुभि वाजूं लागले. आपल्या पुत्राच्या जन्माप्रीत्यर्थ देवांनीं एवढा आनंद प्रदर्शित केला हें पाहून राजाच्या मनांत त्या पुत्राविषयीं अधिकच स्नेहबुद्धि उत्पन्न झाली व तिच्या योगानें मनाला अत्यंत समाधान वाटून त्याणें तो जन्मोत्सव मोठ्या थाटानें सुरू केला. उंच नगारखाने तयार करवून त्यांवर नौबती झडूं लागल्या. त्याच्या आवाजानें सर्व गगनमंडळ व्याप्त झालें, जणूं काय सकल विद्याधरांना त्यांच्या भावी राजाच्या जन्मवृत्ताचा डांगोराच पिटण्याकरितां राजानें हा प्रयत्न केला! नगरांतील सर्व लोकांनीं आपापल्या हवेल्यांच्या उंच शिखरांवरून लाल रंगाच्या पताका उभारिल्या होत्या, त्या वाऱ्याच्या योगानें इतस्ततः हेलकावे खात असल्यामुळें सर्व नगरभर गुलाल उधळल्याप्रमाणें

शोभा दिसूं लागली. वारांगनांचें नृत्यगायन जिकडे तिकडे सुरू झालें, तेणेंकरून साक्षात् कामदेव [1]अनंग असूनही या वेळीं शरीर धारण करून राजगृहीं अवतीर्ण झाल्यामुळें सुरांगनांना हर्ष होऊन त्या मृत्युलोकीं येऊन नृत्य करूं लागल्या कीं काय असा भास होऊं लागला. पुत्रलाभामुळें अत्यंत हर्षभरित झालेल्या राजानें सर्व लोकांस अलंकार, वस्त्रें, द्रव्य इत्यादिकांच्या देणग्यांची इतकी रेलचेल केली कीं, त्या योगानें गरिबांपासून तों श्रीमंतांपर्यंत सारे लोक सारख्या वैभवाचा उपभोग घेत आहेत असें वाटूं लागलें. या औदार्याचा इतका कळस झाला कीं, एका जामदारखान्यावांचून संपत्तीची उणीव त्या वेळीं दुसऱ्या कोठेंच दिसेनाशी झाली! जिकडे तिकडे मंगलवाद्यांचा गजर, बंदीजनांचे स्तुतिपाठ, वारां-

१. कामदेव ह्मणजे मदन यास शंकरानें जाळिलें ह्मणून त्याला अनंग ह्मणजे अंगरहित हें नांव पडलें आहे.

गनांचें मधुर गायन आणि नर्तन, इत्यादि मंगल-सूचक गोष्टींची एकच गर्दी उडून सर्व नगर आनंदसमुद्रांत जणूं काय डुंबत आहे असें वाटूं लागलें. याप्रमाणें पुष्कळ दिवसपर्यंत हा आनंदोत्सव एकसारखा चालू ठेवून सर्व प्रजाजनांचे मनोरथ परिपूर्ण झाल्यावर वत्सराजानें तो समाप्त केला.

आकाशवाणीनें सुचविल्याप्रमाणें राजानें त्या सुलक्षण पुत्राचें नांव **नरवाहनदत्त** असेंच ठेविलें. शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें तें बालक दिवसें दिवस वाढूं लागलें. हळू हळू त्याच्या मुखांत दंतांकुरांचा उद्भव होऊं लागला व शब्दही फुटला. त्याचे ते बोबडे आणि अस्पष्ट शब्द ऐकून व बाललीला पाहून त्याच्या मातापितरांस जो आनंद होत असे त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. तो आनंद केवळ अनुभवानेंच समजणारा आहे. असो.

**नरवाहनदत्त** कांहींसा मोठा झाल्यावर तो नानाप्रकारचे खेळ खेळूं लागला. **यौगंधरायणादि** प्रधानमंडळीचे पुत्र त्याचे समवयस्क असून त्याचे भावी सचीव ठरलेलेच होते. त्यांस बरोबर घेऊन तो क्षत्रिय धर्मास उचित असे नानाप्रकारचे खेळ खेळत असे. हे सर्व खेळ त्यांच्या भावी महोदयाचे सूचक असत. त्या खेळांचें अभिनंदन करण्याकरितां देवांनीं आकाशांतून मोठ्यानें जयघोष करून त्याच्यावर पुष्पवृष्टि केली. ती पाहून राजा व राणी यांना मोठी धन्यता वाटली. सारांश, त्या भाग्यशाली पुत्राचीं शुभलक्षणें व तदनुसार त्याच्या क्रीडा पाहून **वत्सराजाचे** दिवस फार आनंदांत जाऊं लागले.

**नरवाहनदत्त** मोठा झाल्यावर त्याणें **शंकराची** आराधना करून त्यास प्रसन्न केलें व त्याजपासून सकल विद्या प्राप्त करून घेतल्या. त्या विद्यांच्या प्रभावानें त्याणें सर्व विद्याधरपतींचा प-

राजय करून त्यांस अनुकूल करून घेतलें. इतकें झाल्यावर पूर्वी आकाशवाणीनें भविष्य सांगितल्याप्रमाणें व **नारद**ऋषींच्या अशीर्वादाप्रमाणें त्याला सहजच सर्व विद्याधरांचें आधिपत्य प्राप्त झालें. तो **वत्सराजा**प्रमाणेंच मोठा पराक्रमी असून त्याणेंही पुष्कळ स्त्रिया वरल्या होत्या त्या सर्वांमध्यें **मदनमंचुका** या नांवाची एक विद्याधरकन्या त्याची पट्टराणी होती, ति सहवर्तमान त्याला, **हिमाचला**च्या **ऋषभ**नाम एका शिखरावर एक विद्याधर नगरी होती तेथे मोठ्या थाटानें राज्याभिषेक झाला. हा महाभिषेकाचा समारंभ झाल्यावर **वत्सराज, वासवदत्ता, पद्मावती** व **यौगंधरायणा**दि मंत्रं इतकी मंडळी बरोबर घेऊन **नरवाहनदत्ताला** भेटण्याकरितां **ऋषभ** पर्वतावर गेला. पुत्र पराक्रमी व भाग्यशाली निपजला तर आईबापांना आनंद वाटावा हें स्वाभाविकच आहे. या प्रसंगीं

तर **नरवाहनदत्ताला** सकल विद्याधरांचें सार्व-भौमपद प्राप्त झालें होतें; तेव्हां त्याचें तें ऐश्वर्य पाहून **वत्सराज** आणि **वासवदत्ता** यांस किती आनंद झाला असावा याचें अनुमान वाचकांनींच करावें. त्या उभयतां मातापितरांस पुत्राच्या ऐ-श्वर्याची ती परम सीमा पाहून मोठी धन्यता वा-टली. त्यांणीं त्याला प्रेमालिंगन देऊन अंकावर घेतलें आणि तेथील राज्याचा आपल्या हातांनीं पुनः अभिषेक करण्याकरतांच कीं काय, आनंदा-श्रुंनीं त्याला स्नान घातलें! नंतर तेथील दिव्य सुखाचा अनुभव घेत **वत्सराज** कांहीं दिवस तेथें राहून पुत्राचा निरोप घेऊन सर्व परिवारा-सह **कौशांबीस** परत आला.

या समयीं **वत्सराज** बराच वार्धक्यदशेस पोंचला होता. स्वतः दिग्विजय करून त्याणें साऱ्या पृथ्वीचें एकछत्री राज्य संपादन केलें होतें. नानाप्रकारच्या ऐहिक सुखांचा उपभोग

घेऊन त्यांचा त्याला वीटही आला होता. पुत्र **नरवाहनदत्त** हाही मोठा पराक्रमी निपजून त्यालाही सकल विद्याधरांचें सार्वभौमपद प्राप्त झालें होतें. या सर्व गोष्टींमुळें ऐहिक स्थितीच्या संबंधानें त्याला यापुढें कर्तव्य ह्मणून कांहींएक राहिलें नव्हतें; तेव्हां अर्थातच या मृत्युभूमीचा त्याग करून निजधामास जावें असा विचार त्याच्या मनांत उद्भवूं लागला; थोड्याच दिवसांत हा विचार परिपक्व होण्याला एक कारणही झालें, तें असें कीं, एके दिवशीं पूर्वोक्त विचारानें त्याचें मन व्यग्र झालें असतां अकस्मात् **उज्जयिनीं**हून एक दूत त्याच्याकडे आला, व त्याणें जें दुःखकारक वर्तमान कळविलें तें ऐकून त्याचें मन फारच उद्विग्न झालें. तें वर्तमान हें कीं, त्याचा सासरा **चंडमहासेन वासवदत्ते**चा बाप, हा परलोकवासी झाला, व त्याची राणी **अंगारवती** इणें सहगमन केलें! हें वर्तमान ऐ-

कतांच **वत्सराज, वासवदत्ता,** आणि तिचा भाऊ **गोपालक** हीं अत्यंत शोक करूं लागलीं, व त्याच्या भरांत त्यांस मूर्च्छा येऊन तीं धाड्कन् जमीनीवर निपचेत पडलीं ! जवळच्या मंडळींनीं उपचार केल्यामुळें कांहीं वेळानें देहभानावर येऊन त्यांणीं **चंडमहासेना**च्या नांवानें जलांजलि अर्पण केला. सासऱ्याच्या मरणानें या अशाश्वत संसारांत स्थिरता कोणासच मिळावयाची नाहीं, हा विचार मनांत ठसून तेव्हांपासून **वत्सराजा**चें मन फारच उदास झालें, व त्याणें देहत्याग करण्याचा निश्चय केला ! त्याणें **गोपालका**ला जवळ बोलाविलें आणि **उज्जयिनी**स जाऊन पित्याच्या राज्याचें संरक्षण कर असें सांगितलें; तेव्हां तो डोळ्यांस पाणी आणून ह्मणाला, " महाराज, आपण व भगिनी **वासवदत्ता** यांस अशा या दुःखमय स्थितींत टाकून ताताच्या मरणानें शून्यवत् भासणाऱ्या त्या नग-

रीचें दर्शनही घेण्याविषयीं माझें मन धजावत नाहीं; मग तेथें जाऊन राज्य करण्याची गोष्ट कशाला पाहिजे ? मला तें राज्य नको, व कांहीं-एक नको. माझा कनिष्ठ भ्राता **पालक** याणें पित्याच्या मागें राज्यपदारूढ होऊन प्रजापालन करावें अशी त्याला माझी अनुज्ञा कळवा ह्मणजे झालें." हें त्याचें भाषण ऐकून **वत्सराजानें** आपला सेनापति **रुमण्वान्** याला **उज्जयिनी**स पाठविलें व त्याच्या हातून कुमार **पालक** याला राज्याभिषेक करविला. ऐहिक स्थितीची अस्थिरता व विषयोपभोगाविषयीं विरक्तता हे भाव राजाच्या अंतःकरणांत पूर्णपणें बाणून गेल्यामुळें **यौगंधरायणा**दि प्रधानमंडळीस जवळ बोलावून तो त्यांस ह्मणाला, "प्रधानहो, या निःसार संसारांतील सर्व गोष्टींचा मला आतां तिटकारा आला आहे. आजपर्यंत मी नानाप्रकारचे सुखोपभोग घेतले. पृथ्वीवरील सर्व शत्रु जिंकून ए-

कछत्री राज्याचा उपभोग घेतला, व पुत्राप्रमाणें प्रजेचें पालन केलें. परमेश्वरकृपेनें ज्याला सकल विद्याधरांचे आधिपत्य प्राप्त झालें आहे असें पुत्ररत्नही मीं या डोळ्यांनीं पाहिलें; तस्मात् या जगांत मला आतां कांहींएक कर्तव्य ह्मणून राहिलें नाहीं. मला वार्धक्यानेंही गांठिलें आहे. तेव्हां आतां या शुष्क आणि निर्बल शरीरयष्टीचा लोभ धरून क्लीबाप्रमाणें राज्य करावें यांत कांहीं अर्थ वाटत नाहीं; तस्मात् **कालंजर**[१]पर्वतावर प्रयाण करून तेथें या नाशवंत देहाचा त्याग

---

१ सांप्रत **बुंदेल**खंडांत या नांवाचा एक लहान पर्वत आहे तोच हा कीं काय तें समजत नाहीं. भागवताच्या पांचव्या स्कंदांत भूगोलवर्णन दिलेलें आहे, त्यांत पृथ्वीचीं सात द्वीपें कल्पून त्यांतील **जंबु**द्वीपाच्या मध्यभागीं **मेरु** या नांवाचा एक सुवर्णाचा पर्वत आहे व त्याच्या सभोंवती **मेरुकर्णिका** या नांवाचे वीस पर्वत आहेत असें वर्णन आहे. त्यांतच **कालंजर** याची गणना आहे.

करावा व तेणेंकरून धर्मशास्त्रसंमत शाश्वतपदाचा लाभ करून घ्यावा असा माझा निश्चय झाला आहे, याविषयीं तुमचें कसें काय मत आहे ?" यावर सर्व प्रधान आणि राणी **वासवदत्ता** यांणीं एकत्र विचार करून राजाला सांगितलें, " महाराज, ज्या उत्तम आणि शाश्वतपदाचें आ-पण साधन करूं इच्छितां तें पद प्राप्त करून घेण्याची आह्मांसही इच्छा आहे. आपल्याग" या जगांत राहून आह्मांस तरी काय कर आहे ? तस्मात् परलोकप्राप्तीसाठीं आपण जो म धरणार तोच आह्मीही स्वीकारणार." हा त्यांच दृढ निश्चय पाहून **वत्सराजास** फार आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. लागलीच त्याणें महा-प्रयाणाची तयारी करविली. **वासवदत्ता, प-द्मावती** व **यौगंधरायणा**दि मंत्री यांसहवर्त-मान गजारूढ होऊन तो **कालंजरपर्वता**कडे जावयास निघाला त्या वेळीं सर्व नगरवासी आ-

बालवृद्ध स्त्रीपुरुषांस अत्यंत दुःख झालें व ते सर्व त्याच्याबरोबर जावयास निघाले. **गोपालक** माझ्याप्रमाणेंच तुमचें पालन करील असें सांगून राजानें त्यांचें कसें तरी समाधान केलें, व आपण उभयतां राण्या आणि प्रधान यांसह सर्वकाल प्रिय अशी ती घोषवती वीणा हातांत घेऊन त्या महापथगिरीवर निघून गेला. जातांना **[कौ]शांबी**चा राज्यकारभार त्याणें **गोपालका**वर [सों]पविला, पण **वत्सराज** आणि भगिनी **वासदत्ता** यांच्या वियोगामुळें त्याचेंही अंतःकरण उदास असल्यामुळें राज्यकारभाराकडे त्याचें मन लागेना. शेवटीं त्याणें **उज्जयिनी**हून ज्येष्ठ भ्राता **पालक** याला बोलावून आणवून **कौशांबी**चें राज्य त्याच्या स्वाधीन केलें. याप्रमाणें **पालक** हा **उज्जयिनी** आणि **कौशांबी** या दोन्ही राज्यांच मालक झाला. **गोपालका**च्या मनांत ऐहि[क] स्थितीविषयीं पूर्ण वैराग्य उत्पन्न झाल्यामु[ळें]